13-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) A
SRR/ AKN/ MMP/ 10:00

**(सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते)**

**पृ.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणावर चर्चा

**मु.शी.:** राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलच्या आभारप्रदर्शनाच्या प्रस्तावावर चर्चा

(प्रस्ताव पुन्हा प्रस्तुत झाला.)

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर हे ऑनलेग होते. त्यांनी आता आपल्या भाषणाला सुरुवात करावी.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणावरील चर्चेत भाग घेण्यासाठी मी उभा आहे. राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत आपल्या सर्वांना मिळाली आहे. हे भाषण वाचल्यानंतर आपल्या असे लक्षात येईल की, हे भाषण मंत्रिमंडळाने तयार केलेले आहे.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, सभागृहात कोरम नाही.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य भाषण करीत आहेत, मंत्री महोदय त्याबाबतच्या नोटस् घेत आहेत.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, सभागृहात कोरम असणे आवश्यक आहे. कालही अभिभाषणावर चर्चा झाली. आज आम्ही सकाळी येथे उपस्थित आहोत. आमचे भाषण ऐकण्यासाठी सभागृहात कुणी तरी उपस्थित हवे की नको ?

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हे सभागृह नियमानुसार चालले पाहिजे. सभागृहात कोरम नाही. त्यामुळे आपण सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करावी, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** कालही आपण उशिरापर्यंत बसलो होतो. आजही खूप कामकाज आहे. त्यामुळे मी आपल्याला विनंती करतो की, सन्माननीय सदस्यांचे भाषण आपण ऐकून घ्यावे.

...2....



श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, कालही आम्ही सभागृहात उपस्थित होतो. काल उशिरापर्यंत कामकाज झालेले नाही. आपण आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाची बैठक बोलाविली. आपल्या आदेशाप्रमाणे आम्ही सभागृहात उपस्थित राहिलो आहोत. परंतु, सत्तारुढ पक्षाचे फक्त एकच सन्माननीय सदस्य आणि एक मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत. अशा प्रकारे कामकाज रेटून न्यायचे आहे का ? शासन याबाबत गंभीर नाही.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, काल उशिरापर्यंत कामकाज चालले आहे. मंत्री महोदय सभागृहात उपस्थित आहेत, मीही आलो आहे, सन्माननीय सदस्यांच्या भाषणाची नोंद घेतली जात आहे. काही वेळात अन्य सन्माननीय सदस्य सभागृहात येतील. काही बैठका सकाळी असतात. त्यामुळे कदाचित सदस्यांना येता आले नसेल. सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे, अशी मी त्यांना विनंती करतो.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय संसदीय कार्य मंत्र्यांची शिष्टाई आम्हाला मान्य आहे. परंतु, अशा प्रकारे आम्हाला गृहित धरुन कामकाज चालविता येणार नाही. आम्ही सुध्दा काल सभागृह संपेपर्यंत सभागृहात होतो. काल उशिरापर्यंत कामकाज झालेले नाही. आता सभागृहात कोरम नसल्यामुळे आपण 5 मिनिटे सभागृहाची बैठक स्थगित करावी.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, आम्हाला सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर आणि सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांची भाषणे ऐकावयाची आहेत. त्यामुळे त्यांनी तांत्रिक मुद्दे उपस्थित करु नयेत, अशी माझी त्यांना विनंती आहे.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, हे सभागृह नियमाने चालले पाहिजे. आम्हाला हे मान्य नाही. सभागृहात कोरम ठेवण्याची जबाबदारी सत्तारुढ पक्षाची आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती :** मी सन्माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर यांचे नाव पुकारल्यानंतर त्यांनी आपल्या भाषणाला सुरुवात केली. त्यावेळी कुणीही हरकत घेतली नाही. त्यामुळे आपली संमती आहे, असे समजून आपण कामकाज सुरु केले आहे.

...3.....



श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचे भाषण सुरु झाल्यानंतर कोरम नसल्याची बाब आमच्या लक्षात आली व आम्ही हरकत घेतली. कोरम ठेवण्याची जबाबदारी सत्तारुढ पक्षाची आहे. राज्यपालांच्या अभिभाषणावरील अतिशय महत्त्वाची चर्चा सभागृहात सुरु असताना कोरम असणे गरजेचे आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, सभागृहाचे कामकाज नियमानुसार चालले पाहिजे. सभागृहात कोरम ठेवण्याची जबाबदारी सत्तारुढ पक्षाची आहे. त्याबाबत त्यांनी प्रयत्न करावेत. परंतु, अशा पध्दतीने प्रत्येक विषयाच्या बाबतीत जर सरकारची निष्क्रियता दिसून येणार असेल तर ते बरोबर नाही. सन्माननीय सदस्यांनी सूचना केल्याप्रमाणे आपण सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करावी आणि मग पुढील कामकाज सुरु करावे.

**तालिका सभापती :** सभागृहात कोरम झालेला आहे. आता सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सभागृहात जे चालले आहे ते सभागृहाच्या प्रथा, परंपरेला शोभणारे नाही. सभागृहात कोरम नसल्यामुळे आपण सभागृहाची बैठक 5 मिनिटांसाठी स्थगित करावी.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांनी मांडलेल्या मताची आणि सूचनेची गांभीर्याने नोंद घेण्यात आलेली आहे. आता कोरम झालेला असल्यामुळे सन्माननीय सदस्यांनी आपले भाषण पुढे सुरु करावे.

श्री.रामहरी रुपनवर : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणातील मुद्यांबाबतच्या काही त्रुटी मी आपल्या निदर्शनास आणून देणार आहे. राज्यपालांच्या

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

अभिभाषणामध्ये एका महत्त्वाच्या विषयाचा समावेश झालेला नाही. संपूर्ण राज्यात स्वाईन फ्लुची साथ आहे. राज्यभर ही साथ असल्याचे सरकारने मान्यही केलेले आहे. कालच सन्माननीय सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात सन्माननीय आरोग्य मंत्र्यांनी रुग्णालयांमध्ये यंत्रसामुग्री नाही, साधनसामुग्री नाही, मोठ्या प्रमाणावर डॉक्टर आणि अन्य कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत, हे कबूल केले आहे. नागपूर येथे झालेल्या हिवाळी अधिवेशनात

...4.....



श्री.रामहरी रुपनवर..........

आरोग्य मंत्री महोदयांनी असे म्हणणे मांडले होते की, "राज्यात जर एखादी मोठी साथ आली तर काय होईल, हे सांगता येणार नाही. कारण, रुग्णालयांमध्ये अपुरा कर्मचारी वर्ग आहे, साधनसामुग्री नाही, औषधे अपुरी आहेत. येत्या दोन महिन्यात सर्व पदे भरली जातील." लक्षवेधी सूचनेच्या उत्तरात आरोग्य मंत्री महोदयांनी या सर्व बाबी मान्य केल्या आहेत. आता मात्र राज्यपालांच्या अभिभाषणात याबाबतचा कोणताही उल्लेख आलेला नाही. राज्यात स्वाईन फ्लुची साथ खरोखरच आलेली आहे आणि सुमारे 200 माणसे दगावली आहेत. एवढ्या गंभीर विषयाचा अंतर्भाव मात्र राज्यपालांच्या अभिभाषणात झालेला नाही. याबाबतीत मंत्रिमंडळ गंभीर असावयास हवे होते. परंतु, तसे दिसत नसल्यामुळे मी खेद व्यक्त करतो. वास्तविक पाहता, ही बाब सन्माननीय सदस्यांनी आरोग्य मंत्री महोदयांच्या निदर्शनास आणून दिली होती व या त्रुटी दोन महिन्याच्या आत पूर्ण करु असे आश्वासन त्यांनी दिले होते. त्यामुळे याबाबतचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात असावयास हवा होता. परंतु, तो झालेला नाही, ही बाब अतिशय गंभीर आहे.

सभापती महोदय, या सरकारने महाराष्ट्र टोलमुक्त करु असे आश्वासन निवडणुकीत दिले होते आणि लोकांनीही फार मोठ्या उत्साहाने या सरकारला निवडून दिले होते. त्यानंतर टोलमुक्त महाराष्ट्र बघावयास मिळेल, अशी जनतेची अपेक्षा होती.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर...

राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात टोलबंदीचा कोठेही उल्लेख करण्यात आलेला नाही. वास्तविक पाहता निवडणुकीच्या वेळी दिलेली आश्वासने आणि मॅनोफास्टो यांचा समावेश राज्यपाल महोदयांच्या पहिल्या अभिभाषणात करणे आवश्यक होता. हे सरकार सत्तेवर आल्यानंतर या वर्षीचे राज्यपाल महोदयांचे हे पहिलेच अभिभाषण आहे. त्यामध्ये टोल संदर्भातील उल्लेख किंवा धोरण दिसून येत नाही. टोल मुक्ती मिळेल म्हणून सरकारकडे लोक आशेने पाहत आहेत. असा उल्लेख नसल्यामुळे मला खेद व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, एलबीटी बंद करु असे आश्वासन जनतेला देण्यात आले होते. एप्रिल पासून एलबीटी बंद करु, त्यामध्ये सुधारणा करु, एलबीटी लावणार नाही.... (अडथळा).... बजेट जरी सादर होणार असला तरी ही सामुदायिक हिताच्या योजनेचा विशेष उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करायला पाहिजे होता. बजेटमध्ये जी बाब नमूद करण्यात येणार आहे ती बाब या सरकारची विशेष योजना म्हणून नमूद करावयास पाहिजे होती. कारण सरकारने जी आश्वासने दिली ती पाळली आहेत यासाठी या सर्व बाबींचा उल्लेख पाहिजे होता. असा उल्लेख नसल्यामुळे याबाबत मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, दुसरा विषय असा आहे की, नाशिक भागातील पाणी राज्य सरकार गुजरात राज्याला देण्याचा विचार करीत आहे. ही अत्यंत गंभीर बाब आहे. गुजरात राज्यात 45 टक्के सिंचन आहे व महाराष्ट्रात फक्त 18 टक्के सिंचन आहे. अशा परिस्थितीत महाराष्ट्रातून वाहनाऱ्या नद्यांचे पाणी गुजरात राज्याला दिले जात आहे. पूर्वीच्या सरकारने तसा करार केला होता असे सांगितले जात आहे. त्यासंदर्भातील टिपणी माझ्याकडे आहे, या बैठकीत जी चर्चा झाली होती त्याची टिपणी माझ्याकडे आहे. पाणी किती वाटप करायचे ते नंतर ठरविण्यात येईल असे नमूद केले आहे. पाणी अडवायचा निर्णय घेण्यात आलेला आहे. या बैठकीचा बेस पकडून माननीय मुख्यमंत्री यांनी परवाच्या दिवशी केंद्रीय मंत्री माननीय श्रीमती उमा भारती यांना पत्र देऊन पाणी देण्याचे सूचित केले आहे. महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी दिले तर नारपार, तापी, दमनगंगा या नद्यांचे गोदावरी खोऱ्यात येणारे पाणी पूर्णपणे थांबणार आहे. जळगांव जिल्ह्यातील जळगांव, चाळीसगांव, भडगांव, अंमळनेर हे तालुके व नाशिक जिल्ह्यातील कळवण, सटाणा, मालेगांव,

...2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर...

देवळा या तालुक्यात तसेच संपूर्ण मराठवाड्यात पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण होईल. नाशिक, अहमदनगर व मराठवाडा येथे पाण्याचा वाद आहे, तो वाद मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. हे पाणी गुजरात राज्याला दिले नाही तर नाशिक, अहमदनगर व मराठवाड्यातील पाण्याचा वाद संपुष्टात येईल. जळगांव, चाळीसगांव व नाशिक येथील कळवण, सटाणा व मालेगांव या तालुक्यातील पाण्याचे प्रश्न कायमस्वरुपी सुटतील. पाणी द्यावयाचे असेल किंवा पाणी घ्यावयाचे असेल तर हा निर्णय राज्याचा हिताचा कसा आहे, हे लोकांना पटवून दिले पाहिजे व त्याचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात केला पाहिजे. महाराष्ट्राचा विकास होणार आहे म्हणून आपण गुजरातला पाणी देणार आहोत, याचा उल्लेख असायला पाहिजे होता. विकास होत नसेल तर महाराष्ट्र सरकार पाणी देणार नाही. या राज्यातील विधिमंडळ हे सर्वोच्च आहे त्यामुळे तो निर्णय येथे होणे अपेक्षित होते.

सभापती महोदय, धनगर समाजाला आरक्षण देण्याचा उल्लेख देखील या अभिभाषणात करण्यात आलेला नाही. हे सरकार सत्तेवर आल्यावर पहिल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत निर्णय घेण्यात येईल असे सांगण्यात आले होते. यासंदर्भातील उल्लेख देखील करण्यात आला नाही. ज्या विषयामुळे राज्यात परिवर्तन झाले तो विषय राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात येऊ नये ही मोठी शोकांतिका आहे. दुसरे असे की, धनगर समाजाला आरक्षण देण्यासाठी जाणूनबुजून विलंब करण्यात येत आहे. याबाबत या समाजाची हेटाळणी होता कामा नये हे सरकारने लक्षात घेतले पाहिजे. माननीय मुख्यमंत्री सांगत होते की, सरकार सत्तेवर आल्यावर पहिल्या 15 दिवसात आरक्षणाचा निर्णय घेण्यात येईल. हा विषय हसण्यावर नेला जात आहे. परंतु आता मध्येच आदिवासी आरक्षणाच्या कोट्याचा उल्लेख करण्यात आला आहे. आदिवासी यांच्या कोट्यातून आरक्षणाची मागणी कोणीही करीत नाही. आदिवासी यांनी त्यांच्या कोट्यातून आरक्षण दिले तरी ते घेण्यास धनगर समाज तयार नाही. आदिवासी देखील आमचे बांधव आहेत. धनगर समाज काय म्हणतो हे फक्त सरकारने नीट समजून घेतले पाहिजे. आरक्षण नाही दिले तरी चालले पण धनगर समाजाचे म्हणणे काय आहे ते सरकारने समजून घेतले पाहिजे. धनगर समाजाला घटनेने आरक्षण दिले आहे. महाराष्ट्र सरकारला आरक्षण देण्याचा अधिकार नाही. राज्य सरकार आरक्षण

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामहरी रुपनवर...

देऊ शकत नाही. आरक्षण द्यावे अशी मागणी राज्य सरकारकडे नाही. हा अधिकार केंद्र सरकारचा आहे. घटनेने ज्या समाजाला आरक्षण दिले आहे, तो समाज ज्या राज्यात राहतो, त्या राज्य सरकारने त्या समाजाला आरक्षणाच्या सवलती द्याव्यात, अशी शिफारस राज्य सरकारने केंद्र सरकारकडे करायची आहे. ज्या समाजाला आरक्षण नाही त्यांना कायदा करुन आरक्षण दिले जात आहे. धनगर समाजाला घटनेने आरक्षण दिले असताना त्यांना आरक्षणाचा फायदा दिला जात नाही. ...(अडथळा)....सन 1949 मध्ये घटनेने धनगर समाजाला आरक्षण दिले आहे. यामध्ये आदिवासी बांधवाचा काही संबंध येत नाही.

सभापती महोदय, एकाच मतदार यादीत 100 मतदार असतील तर सर्व मतदारांना सारखाच अधिकार आहे. त्यातील 50 मतदारांना मतदान करु नका तुम्ही उभेच राहू नका असे म्हणता येणार नाही. हा विषय केंद्र सरकारचा आहे. राज्य सरकारला माझे म्हणणे असे आहे की, त्यांनी फक्त केंद्र सरकारकडे शिफारस करायची आहे. धनगर समाजाला घटनेने आरक्षण दिले आहे. घटनेत आरक्षण आहे किंवा नाही ते सरकारने पहावे. असेल तर द्यावे नसेल तर देऊ नका. राज्य सरकारने शिफारस केल्यावर घटनेत आरक्षण आहे किंवा नाही याचा निर्णय केंद्र सरकार करणार आहे. त्यामुळे फक्त राज्य सरकारने शिफारस करावी. राज्य सरकारला आरक्षण देण्याचे अधिकार नसताना आम्ही 15 दिवसात आरक्षण देऊन असे सांगून धनगर समाजाची फसवणूक करण्यात येत आहे. धनगर समाजाला आरक्षण देण्याची शिफारस केंद्राकडे करण्यात आली नाही, म्हणून त्या समाजाला आजपर्यंत आरक्षणाचा फायदा घेता आलेला नाही. म्हणून हा समाज आता तुमच्या मागे आला असून तुम्ही त्याची फसवणूक करु नका. सरकारच्या विरोधात जनतेच्या अतिशय तीव्र भावना आहेत. 23 मार्च 2015 रोजी दोन ते तीन लाख लोकांचा विधानभवनावर मोर्च्या काढण्यात येणार आहे. धनगर समाजाचा समावेश अभिभाषणात असता तर आम्हाला बरे वाटले असते.

सभापती महोदय, अवकाळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांना सरकारने चार हजार कोटी रुपये दिले असे सांगण्यात येते, परंतु शेतकऱ्यांना अद्याप एक पैसा देखील मिळालेला नाही. तसेच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

या अभिभाषणात असे नमूद करावयास पाहिजे होते की, शेतकऱ्यांना एक हजार रुपयांपेक्षा कमी रकमेचा धनादेश देण्यात येऊ नये. तसे नमूद करण्यात आले नाही.

..4...



श्री.रामहरी रुपनवर...

सभापती महोदय, कॉ.पानसरे यांच्या हत्येच्या अनुषंगाने कायदा सुव्यवस्थेची हमी देण्याचा उल्लेख अभिभाषणात करायला पाहिजे होता तो करण्यात आला नाही म्हणून मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, राज्यात 1 एप्रिल 2015 पासून राष्ट्रीय भूमी अभिलेख आधुनिकीकरण कार्यक्रमाअंतर्गत ऑनलाईन ई-फेर फार कार्यक्रमाची अंमलबजावणी होणार असून सर्व भूमी अभिलेख तलाठ्यांच्या लॅपटॉपवर 2 ऑक्टोबर 2015 पासून उपलब्ध होतील, असे शासन सांगत आहे. तलाठ्यांची संख्या अत्यंत कमी आहे. त्यामुळे अनेक अडचणी येतील, ही संख्या वाढविण्याचा उल्लेख या अभिभाषणात आवश्यक होता, तो उल्लेख करण्यात आलेला नसल्यामुळे मी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबाबत खेद व्यक्त करतो व माझे भाषण संपवितो.

-----

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल चे.विद्यासागर राव यांनी जे अभिभाषण केले त्या संदर्भातील आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी मांडलेला आहे. त्या प्रस्तावाला पाठिंबा देण्यासाठी व त्यावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात राज्याचा मेमोरँडम दिलेला आहे. राज्याच्या विकासाचा मुद्दा दिलेला आहे. काल काही सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हे अभिभाषण म्हणजे आमच्या सरकारच्या काळातील रिटेक केलेले आहे. मी या सभागृहात नवीन आहे. परंतु मी या सभागृहात कायम राहणार आहे. आमच्या मित्रांनी विमानतळाच्या प्रोजेक्ट संबंधी उल्लेख केला. तो प्रोजेक्ट रद्द करता येत नाही. जे प्रकल्प आहेत, ते आमच्या शासनाने कन्टिन्यू केलेले आहेत. त्या प्रकल्पांसाठी शासनाने पैसे खर्च केलेले असल्यामुळे ते प्रकल्प पूर्ण करणे हे शासनाचे कर्तव्य आहे.

सभापती महोदय, आमच्या शासनाने काही नवीन निर्णय घेतलेले आहेत. जल युक्त शिवार योजनेच्या माध्यमातू प्रत्येक वर्षी 5 हजार गावे दुष्काळ मुक्त होणार आहेत. पुढील 5 वर्षात 25 हजार गावे टँकर मुक्त होऊ शकतात. यामुळे महाराष्ट्र टँकर मुक्त होऊ शकतो. याबद्दल मी माननीय राज्यपालांचे, माननीय मुख्यमंत्र्यांचे अभिनंदन करतो.

सभापती महोदय, शासनाने आमचे दैवत, लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांच्या नावाने ऊसतोड कामगारांसाठी महामंडळ स्थापन केलेले आहे. जिस बाप का बेटा लायक होता है उस बाप की इज्जत होती है और जिस बाप की बेइज्जती होती है उस बाप का बेटा नालायक होता है. आमच्या सरकारने प्रथम लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांच्या नावाने ऊसतोड कामगारांसाठी महामंडळ स्थापन करुन महाराष्ट्राचा भौगोलिक, सामाजिक आशय देण्याचा प्रयत्न केलेला आहे, याबद्दल मी माननीय राज्यपालांचे, सरकारचे अभिनंदन करतो. तसेच, आमच्या शासनाने महिलांसाठी शौचालय बांधण्याचे काम केलेले आहे.

सभापती महोदय, मी सांगू इच्छितो की, माझ्या मतदारसंघात मुळशी तालुका आहे. मुळशी तालुक्यात टेमघर व मुळशी धरणे आहेत. तेथील 66 गावे बाधित आहेत. मागील शासनाने इको

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर........

झोन सिस्टीम केलेली आहे. आज तेथे सर्व पक्षीय लोकांनी मोर्चा काढून आंदोलन सुरु केलेले आहे. मी माननीय पालकमंत्र्यांना विनंती करतो की, एका बाजूला लवासा सिटी आहे आणि दुसऱ्या बाजूला सहारा सिटी आहे. या दोन्ही शहरांना फायदा होतो आणि जी मधील 66 गावे आहेत त्यांना मात्र फायदा होत नाही. शासनाने याचा गांभीर्याने विचार करून इको झोन सिस्टीसाठी ज्या अटी घातलेल्या आहेत त्या रद्द केल्या तर तेथील शेतकऱ्यांना फायदा होईल. वर कुरण, खाली धरण आणि मध्ये मरण, असे तेथील शेतकऱ्यांचे जीवन आहे. या संदर्भात शासनाने गांभीर्याने विचार करावा, अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेते, सन्माननीय सदस्य सर्वश्री अमरसिंह पंडित, सुनील तटकरे यांचे मी अभिनंदन करतो. मी मागील 23 वर्षापासून एका जातीचा नाही तर शाहू, फुले, आंबेडकर चळवळीचा संघर्ष करीत आहे. माझ्या पक्षातर्फे श्री.बाबासाहेब पाटील हे पहिले आमदार निवडून आले. माझ्या पक्षातर्फे निवडून आलेले श्री.राहुल कुल हे दुसरे आमदार आहेत. I am not a demander, I am commander. मी कोणाच्या मेहरबानीवर आमदार झालेलो नाही, तर माझा फोटो लावून आमदार झालेले लोक सभागृहात आहेत. मी आपल्याला सांगू इच्छितो की, मला या सभागृहात यायचे नव्हते. मला लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांनी शब्द दिला होता. परंतु, माझे मित्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय श्री.देवेंद्र फडणवीस साहेब, माझी बहिण माननीय ग्रामविकास मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी आग्रह केल्यामुळे मी या सभागृहात आलेलो आहे. माझी आपल्याला विनंती आहे की, माझ्या मंत्री पदाबाबत तुम्ही काळजी करण्याचे कारण नाही. मी मंत्री होईल ना होईल, मी एक चळवळीतील कार्यकर्ता आहे. I am not a Minister, I am history maker. हे विसरता कामा नये. मित्रांनो, आमच्या मित्र पक्षाबरोबर मैत्री केलेली आहे. मी सांगू इच्छितो की, सन्माननीय सदस्य श्री.स्पनवर साहेब, आपल्या पक्षाची राज्यात 65 वर्षे सत्ता असताना देखील धनगर, कोळी, वंजारी समाजाचा प्रश्न आपण सोडवू शकला नाही. मी परवा माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांबरोबर चर्चा केली. आपण देखील तेथे उपस्थित होता. माननीय पंतप्रधान सकारात्मक आहेत, माननीय मुख्यमंत्री देखील सकारात्मक

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर........

आहेत. आम्ही 15 दिवसांपूर्वी संबंधित विभागाच्या सचिवांना बोलावून घेतले आणि आदिवासी बांधवांवर अन्याय होऊ नये या दृष्टीने प्रयत्न करण्यात आलेले आहेत. धनगर समाजाला आरक्षण देणे ही या शासनाची नैतिक जबाबदारी आहे आणि त्या दृष्टीने पावले उचलण्यात आलेली आहेत. परंतु तुमची इच्छा नव्हती म्हणून आमचे वाटोळे झालेले आहे, हे मी आघाडी शासनाला सांगू इच्छितो. स्व.वसंतराव चव्हाण, स्व.वसंतराव नाईक राज्याचे मुख्यमंत्री होते. तेव्हा पासून हा समाज आपल्या राज्यात एनटीमध्ये आहे आणि आंध्रमध्ये तो समाज एससीमध्ये आहे. मग शाहू, फुले, आंबेडकर असे म्हणणाऱ्या राज्याचे काय आहे ? काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला मी प्रश्न विचारु इच्छितो की, आपण फक्त फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेता. परंतु, डॉ.बाबासाहेब आंबेडकर इंग्लंड येथे ज्या घरात राहत होते ते घर फक्त माझ्या मित्र पक्षाच्या शासनानेच विकत घेतले. तुमच्यामध्ये ती दानत तयार होऊ शकली नाही.

सभापती महोदय, इंदू मिलच्या प्रश्नाबाबत आम्हाला राजकारण करावयाचे नाही. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी या संदर्भात माननीय पंतप्रधान श्री.नरेंद्र मोदी साहेबांबरोबर चर्चा केलेली आहे. त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये आमच्या बरोबर होते. माननीय पंतप्रधानांनी सांगितले की, मैं तो दस दिन के अंदर प्रॉब्लेम सॉल्व कर रहा हूं. आमच्या समाजाला 35 जागा मिळालेल्या आहेत. मी मुख्यमंत्री महोदयांना सांगितले की, ज्या प्रमाणे मराठा समाजाचे आरक्षण घाईगडबडीत झाले त्या प्रमाणे घाईगडबड न होता, आदिवासी समाजावर अन्याय न होता, टेक्निकल मिस्टेक होऊ नये म्हणून आम्ही संबंधित विभागाच्या सचिवांना बोलावून बैठक घेतली. सन्माननीय सदस्य श्री.रुपनवर साहेब, तुमच्या पक्षाने आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने हा प्रश्न सोडविला नाही. परंतु आम्ही शासनाचे मित्र पक्ष म्हणून आदिवासी समाजावर अन्याय न होता धनगरांचा प्रश्न सोडविणार आहोत.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी राजकारणाच्या संदर्भात माझ्यावर टिका केली. मी त्या टिकेला उत्तर दिले नाही. एक-दीड महिन्यापूर्वी या संदर्भात वर्तमानपत्रात बातमी छापून आली की, आता महादेव जानकार यांना विधान परिषदेचे सदस्यत्व मिळालेले आहे, आता

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.महादेव जानकर.........

धनगरांचे काम संपले. माननीय विरोधी पक्षनेते श्री.धनंजय मुंडे साहेब असे बोलले. मी त्या टिकेला उत्तर दिले नाही आणि देणार नाही. (...अडथळा...) त्यांनी मला शुभेच्छा दिल्या नव्हत्या, त्यांनी माझ्यावर टिका केली होती. (...अडथळा...) ठीक आहे, शुभेच्छा दिल्या होत्या. काल सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी देखील या संदर्भात उल्लेख केला होता. मी आपल्याला एवढेच सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाने या समाजासाठी काय केले याबद्दल मी मेमोरँडम देणार नाही. आपण या लोकांना आवश्यक ती राजकीय भागीदारी दिली नाही. धनगर समाजाची लोकसंख्या बरीच आहे. आपण पहिला ठराव द्यावयास पाहिजे होता. आम्ही आपले अभिनंदन केले असते. परंतु तुम्ही ठराव दिला नाही ही शोकांतिका आहे. कोणी विरोध केला ? Who is the defaulter of that factor? आम्हाला माहीत आहे की, जर तुमची निती शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचारांची असती, बहुजन समाजाच्या हिताची असती तर स्वतःला जाणता राजा म्हणून घेतले नसते. साधी शिफारस करावयाची होती. त्या शिफारशीला देखील आपण विरोध करण्याचा प्रयत्न केला....

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर आपल्या भावना व्यक्त करीत आहेत. परंतु, कोणी कोणाची फसवणूक केली हे काळाच्या ओघात समोर येईल. परंतु, मी आपल्याला सांगू इच्छितो की, माननीय श्री.शरद पवार साहेब राज्याचे मुख्यमंत्री असताना पहिल्या प्रथम धनगर समाजाचा एनटी प्रवर्गात समावेश करुन त्या समाजाला आरक्षण देण्याचे ऐतिहासिक काम आमच्या नेतृत्वाने केलेले आहे, हे मी अभिमानाने सांगतो. दुसरे म्हणजे राज्य सरकारने या संदर्भात केंद्र शासनाकडे ठराव पाठवावा यासाठी माननीय श्री.शरद पवार साहेबांनी अनेक वेळा बैठका घेतल्या, ज्यावेळी त्यांनी धनगर समाजाच्या नेत्यांसमवेत बैठका घेतल्या त्या बैठकांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा प्रदेशाध्यक्ष म्हणून मी उपस्थित होतो. त्यांचे नाव घेण्याचा नैतिक अधिकार तुम्हाला नाही. हे काय करीत आहेत, या विषय तुम्ही बोला. ते तुमच्या बाजूला बसलेले आहेत, त्यांच्या भावना काय आहेत, त्यांचे उत्तर काय आहे, या विषयी आपण बोला आणि नंतर पुढे बोलण्याचे धाडस करावे, एवढेच मला सांगावयाचे आहे.

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, त्यावेळी सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर साहेब या सभागृहाचे सदस्य नव्हते. परंतु, सन्माननीय सदस्य श्री.रुपनवर साहेबांना माहिती आहे की, ज्यावेळी धनगर समाजाला आरक्षण देण्याविषयीचा प्रश्न सभागृहात चर्चेला आला त्यावेळी माननीय श्री.विष्णू सवरा साहेबांनी स्पष्टपणे सांगितले की, एसटी समाजाच्या सवलती धनगर समाजाला देता येणार नाहीत. माननीय आदिवासी विकास मंत्री श्री.विष्णू सवरा साहेब सभागृहात उपस्थित आहेत. सन्माननीय सदस्य श्री.जानकर साहेब, ज्यांना आपण मित्र पक्ष म्हणून संबोधत आहात त्या मित्र पक्षाला आपण विचारावे की, कोणतेही आरक्षण देण्याची यांची आयडियालॉजी आहे काय ? आरक्षण मिळेल न मिळेल, त्यासाठी सर्वांना प्रयत्न करावा लागेल. परंतु तुम्ही नाव घेऊन जर कोणाला दोष देणार असात तर ते चुकीचे आहे. आरक्षण मिळावे अशी आमची देखील इच्छा आहे. तुम्ही जसे भटके आहात, तसे आम्हीही भटके आहोत आणि व्हीजेएनटीचा विषय माननीय श्री.शरद पवार साहेबांनीच या ठिकाणी केलेला आहे.

श्री.महादेव जानकर : सभापती महोदय, कोणी केली, काय केले, हे जनतेला चांगले माहीत आहे. आम्ही ते करुन दाखविणार आहोत आणि तुम्ही शुभेच्छा दिल्या, पाठिंबा दिला त्याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. आमच्या काळातच हा आरक्षणाचा प्रश्न सुटणार आहे, हे विसरता कामा नये. पीएम आमचे आहेत, सीएम आमचे आहेत आणि डिसिजन मेकर देखील आमचे आहेत, एवढे बोलून माझे दोन शब्द संपवितो.

-------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर विरोधी व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. (...अडथळा...) विरोध शब्द वापरला तर समोरच्या बाजूने हरकत घेतली पाहिजे. माननीय श्री.बापट साहेब, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर विरोध व्यक्त करण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

श्री.गिरीष बापट : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर विरोधी पक्षातर्फे विरोध व्यक्त करावयाचा नसतो तर खेद व्यक्त करावयाचा असतो.

श्री.अमरसिंह पंडित : सभापती महोदय, माझा विरोध व्यक्त करण्यासाठी नाही तर खेद व्यक्त करण्यासाठी उभा आहे. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस साहेबांनी विरोधी पक्षात असताना माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर बोलताना जे भाषण केले होते त्या भाषणाची प्रत माझ्याकडे आहे. त्यांनी असे म्हटले होते की, या प्रस्तावाला विरोध करण्यासाठी मी उभा आहे.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित.......

सभापती महोदय, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे सरकारच्या कार्याचा आरसा असतो. मंत्रिमंडळाच्या सल्ल्यानुसार ते काम करीत असतात. माननीय राज्यपालांच्या मनात असो वा नसो, मंत्रिमंडळाने तयार करुन दिलेले भाषण त्यांना वाचायचेच आहे. माननीय राज्यपालांचे पद या राज्यातील सर्वोच्च पद असताना अशा उच्चपदस्थ व्यक्तीकडून तयार करुन दिले जाणारे भाषण खोटे असू नये याची खबरदारी घेण्याची आवश्यकता होती. दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये केंद्रीय योजनांचा उहापोह करण्यात आला. त्यामुळे सरकारने स्वत:ची पाठ थोपटून घेण्याचे काम केले आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये म्हटले आहे की, पुढील 2 वर्षात 44 हजार विहिरींचे नियोजन रोजगार हमी योजनेतून होणार आहे. हे ऐकावयास बरे वाटते. परंतु बीड जिल्हयातील 90 टक्के गावे 50 टक्क्यापेक्षा कमी आणेवारी असलेली आहेत. आज बीड जिल्हयात एकाही विहिरीचे काम सुरु नाही. साठवणूक करणा-या ज्या वॉटर बॉडी आहेत त्यांची उपलब्धता नाही. याचे कारण असे की, तुमच्याकडे एमबी रेकॉर्ड करण्यासाठी स्टेशनरी नाही. क्षुल्लक कारणास्तव बीड जिल्हा आणि मराठवाडा दीड वर्षापासून दुष्काळाला सामोरा जात आहे. त्या मराठवाडयामध्ये मनरेगा कामांबाबत ही उदासिनता असेल तर माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाला अर्थ उरतो का? मनरेगा अंतर्गत मजुरांना दिवसाकाठी कमाल 165 रुपये मजुरी दिली जाते. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी लोकसभेत अर्थसंकल्पीय भाषण करताना असे घोषित केले की, केंद्रीय कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू करीत आहोत. मी कोणाला विरोध करु इच्छित नाही. एकीकडे प्राचार्यांना महिन्याला 1.75 लाख रुपये वेतन मिळते, शिक्षकांना दरमहा 60 हजार रुपये वेतन मिळते. परंतु मनरेगा अंतर्गत काम करणाऱ्या मजुराची मजुरी वाढविली जात नाही. एखाद्या मजुराने 165 रुपयांपेक्षा जास्त काम केले तरी त्याला रोजगार वाढवून दिला जात नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय सदस्य तुलना करीत आहेत त्याबद्दल माझी हरकत नाही. तुलना करणाऱ्यांमध्ये अनेक घटक आहेत.

श्री.अमरसिंह पंडित : हा विषय शिक्षकांशी संबंधित नाही. कर्मचाऱ्यांशी संबंधित असणारा विषय आहे. केवळ माझ्या मतदारसंघातील विषय असल्यामुळे माननीय सदस्य हरकत घेत असतील तर त्याला माझी हरकत आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विक्रम काळे : केवळ शिक्षक आणि प्राचार्य यांचे वेतन वाढणार नसून या राज्यातील 15 कोटी लोकांचे वेतन वाढणार आहे. त्यामुळे तुलना करताना हेतुपुरस्सर शिक्षक आणि प्राचार्य यांचा उल्लेख केला जात आहे त्याला माझी हरकत आहे. मजुरांना वेतन वाढवून मिळाले पाहिजे, त्याकरिता आमचा पाठिंबा आहे. आम्ही त्यांच्यासोबत आहोत. त्यामुळे जी तुलना केली आहे ते वक्तव्य रेकॉर्डवरुन काढून टाकण्यात यावे.

**तालिका सभापती** : माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.अमरसिंह पंडित : कामकाजातून काढण्यासारखे आक्षेपार्ह वक्तव्य मी केलेले नाही. मनरेगा अंतर्गत काम करणारे मजूर ब्रासवर काम करीत असतात. एखाद्या मजुराची क्रयशक्ती अधिकची असेल आणि त्याने सकाळी 7 वाजता काम सुरु केले तरी त्याला दिवसभरासाठी 165 रुपयापेक्षा अधिक मजुरी दिली जात नाही त्याबाबत माझी हरकत आहे. कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू होणार आहे. माझ्या मतदारसंघातील पिंपळगाव येथील एका कुटुंबातील मुलगा व सून नोकरीला आहेत. परंतु त्या कुटुंबातील प्रमुखाला श्रावणबाळ योजनेतून 700 रुपये मिळण्याकरिता बँकेसमोर उभे रहावे लागते. काय साध्य केले आहे? हा असमतोल आहे या संदर्भात विचार करावा लागेल. मनरेगा अंतर्गत काम करणाऱ्या मजुरांना 165 रुपयांपेक्षा अधिक मजुरी द्यायची नाही. दुसरीकडे कर्मचाऱ्यांना सातवा वेतन आयोग लागू केल्यानंतर महिन्याला 2-2 लाख रुपये वेतन दिले जाणार आहे. कारण हे कर्मचारी संघटित आहेत. ते आंदोलन करु शकतील म्हणून त्यांच्या पदरात माप टाकले जात आहे. मजूर असंघटित आहेत म्हणून त्यांच्या पदरात माप टाकायला तयार नाही. हा असमतोल थांबवावा लागेल.

सभापती महोदय, सूक्ष्म सिंचनाच्या संदर्भात मी हिवाळी अधिवेशनात उल्लेख केला होता. मला हे अपेक्षित होते की, गेली तीन वर्षे सातत्याने मराठवाडा दुष्काळाला सामोरा जात असताना आम्ही माननीय महसूल मंत्र्यांना विनंती केली होती की, मराठवाड्यातील दारिद्र्य रेषेखालील शेतकऱ्यांना ड्रिप योजनेसाठी 75 टक्के सबसिडी द्यावी आणि 25 टक्के रक्कम ते शेतकरी आपला स्वत:चा हिस्सा म्हणून देतील. याचे मॉनिटरिंग करण्याकरिता जिल्हाधिकाऱ्यांना अधिकार द्यावेत

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणि पॅकेज म्हणून उपलब्ध होणारी रक्कम विभागीय आयुक्तांकडे जमा करावी. आमच्याकडे प्यायला पाणी नाही. प्यायच्या पाण्याशिवाय आम्ही बोलायचे नाही. शेतीसाठी आम्ही पाणी

..3..



श्री.अमरसिंह पंडित.....

मागायचे नाही. अठराविश्वे दारिद्र्य असलेल्या मराठवाड्यातील लोकांना आता शेती करणे गरजेचे राहिलेले नाही. गारपिटीच्या, दुष्काळाच्या अनुदानावर जगायचे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याबद्दलचा उल्लेख नसल्यामुळे मी पुन्हा एकदा खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, वैदर्भिय सरकारबाबत आम्ही मराठवाड्यातील लोकांनी काय बोलायचे? मी काल महाराष्ट्र शासनाची वेबसाईट पाहिली. पहिली 20 पृष्ठे विदर्भातील कोणते प्रकल्प पूर्णत्वास जात आहेत याच माहितीने भरलेली आहेत. बॅकलॉग संदर्भात केळकर समितीची स्थापन केली गेली. श्री.माधवराव चितळे यांनी कालच्या लोकसत्ता दैनिकामध्ये लेख लिहिला आहे. त्या समितीमध्ये विदर्भाचे प्रकल्प पूर्ण करण्याच्या संदर्भात उल्लेख केला गेला. मुख्यत: केळकर समिती मराठवाड्यातील अनुशेष निश्चित करण्यासाठी स्थापन केली होती. आमचे दु:ख आहे, आमच्या वेदना आहेत, आमचा संसार आहे, आम्हाला विचारा. मराठवाड्यातील लोकांची समिती स्थापन करुन त्यांचे दु:ख, त्यांच्या वेदना राज्यातील जनतेसमोर येऊ द्या. तुम्हाला ते करायचे नाही. वैदर्भिय सरकारकडून विदर्भातील प्रकल्पासाठी पैसा देत असताना मराठवाड्यातील प्रकल्पांबाबत दुजाभाव का दाखविला जातो? जायकवाडी प्रकल्पाचा दुसरा टप्पा अपूर्ण आहे. मराठवाड्यातील अनेक प्रकल्प अपूर्णावस्थेत असताना त्याबद्दल अभिभाषणामध्ये उल्लेख नाही यासारखे दुसरे दुर्दैव काय असू शकते? माननीय मंत्री श्री.बबनराव लोणीकर हे मराठवाड्याचे नेते आहेत. मराठवाड्याच्या संदर्भात राज्य सरकार दुजाभाव का दाखवित आहे? मराठवाड्याला राज्य सरकार न्याय देणार नाही. शासनाचा जो 100 दिवसांचा कारभार आहे त्यामध्ये मराठवाड्याचा कोणताही उल्लेख नाही हे मराठवाड्याचे दुर्दैव आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्रातील लोकसभेच्या 48 खासदारांपैकी कॉंग्रेस पक्षाचे श्री.अशोक चव्हाण आणि श्री.राजीव सातव हे दोनच खासदार निवडून आले. उर्वरित 46 खासदार भारतीय जनता पक्ष व शिवसेना पक्षाचे निवडून आलेले आहेत. त्यात मराठवाड्याने बऱ्यापैकी आमदार निवडून दिले. असे असताना त्यांनी केवळ हुजरेगिरी करण्यासाठी या सभागृहात यायचे का?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर इ.1...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

सभापती महोदय, श्री.गोपीनाथ मुंडे यांच्या स्मारकासंबंधीचा उल्लेख माननीय सदस्य श्री.महादेव जानकर यांनी त्यांच्या भाषणामध्ये केल्याबद्दल मला त्यांचा अभिमान वाटतो. श्री.गोपीनाथ मुंडे यांचे औरंगाबाद येथे स्मारक बांधण्यासाठी आपण योजना आखल्यामुळे मी आपले अभिनंदन करतो. श्री.गोपीनाथ मुंडे हे केंद्र शासनामध्ये ग्रामविकास मंत्री पदी होते. त्यांचे स्मारक औरंगाबाद येथेच का करण्यात येत आहे ? श्री.गोपीनाथ मुंडे हे या राज्याचे नेते होते. असे असताना औरंगाबाद येथे त्यांचे स्मारक बांधण्यासंबंधीचा संकुचितपणा का दाखविण्यात येत आहे ? मुंबई ही राज्याची राजधानी असताना तेथे त्यांचे आपण स्मारक का उभारत नाही ? ते मराठवाड्यातील होते म्हणून त्यांच्या पायात बेड्या बांधायच्या असतील तर ते चुकीचे आहे. असे असताना सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर या निर्णयाचे स्वागत करीत असतील तर तो कितपत उचित आहे याचा विचार त्यांनी केलेला बरा.

सभापती महोदय, 100 दिवसात या शासनाने अतिशय महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. केळकर समितीने सुचविले आहे की, मराठवाड्यामध्ये आयएम, आयआयटी, एम्स झाले पाहिजे. पण हे विदर्भामध्येच होत आहेत. हे सर्व विदर्भासाठी करायचे असेल तर मी माझी शंका व्यक्त केली तर त्यात काहीही गैर होणार नाही. मराठवाडा हा लेबर ओरिएन्टेड आहे. आज मराठवाड्यामध्ये नवीन प्रकल्प येऊ शकत नाही. त्यामुळे मराठवाड्यामध्ये स्कील्ड लेबर तयार करण्याचे काम आपण हाती घेतले पाहिजे. परंतु, दुर्दैवाने मराठवाड्यामध्ये कोणताही एक प्रकल्प येत नाही. महाराष्ट्रातील काही रस्त्यांचे चौपदरी करण्याचे काम हाती घेण्याचा निर्णय केंद्र शासनाने घेतल्याची बातमी नुकतीच वर्तमानपत्रात वाचली. त्यात औरंगाबाद-सोलापूर रस्ता चौपदरी करण्यात येणार असल्याची बातमी होती. दुर्दैवाने ते काम अद्यापि सुरू झालेले नाही. या रस्त्यावर रोज अपघात घडत असून त्यात एक जण तरी मृत्युमुखी पडत आहे. आज आपणाला हा आकडा वाढवायचा आहे काय ? आज महाराठवाड्यातील रस्ते चालण्यालायक नाहीत. केंद्र में पी.एम.हमारे, राज्य में सी.एम. तुम्हारे, फोर लेन हमारे, काम कहां हो रहा है ?

...2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.अमरसिंह पंडित...

तेव्हा आपण मराठवाड्याच्या संदर्भातील एक काम तरी करून दाखवावे. आमचे फोटो लावून निवडून येतात असे आता येथे बोलण्यात आले. मराठवाड्यातील लोकांवर अन्याय होत असताना त्याचा उल्लेख श्री.महादेव जानकर यांच्या भाषणात होणे गरजेचे होते. त्यासाठी धमक लागते. दुर्दैवाने तसे झाले नाही याची नोंद आपण घ्यायला हवी.

सभापती महोदय, मी एका अतिशय महत्त्वाच्या मुद्याचा उल्लेख करणार आहे. अकोला, बुलढाणा, नागपूर येथील सहकारी बँका डबघाईला आल्या होत्या. मध्यंतरीच्या काळात या बँका जीवंत राहण्यासाठी पंतप्रधान कार्यालयातून मदत मिळाली असून ती मदत या बँकांच्या खात्यात जमा झाली आहे. विदर्भाबरोबरच मराठवाड्यातील सहकारी बँका देखील अडचणी आलेल्या आहेत. परंतु, दुर्दैवाची बाब अशी की, मराठवाड्यातील सहकारी बँकाना कोणत्याही प्रकारची मदत करण्यात आली नाही. आज मराठवाड्यातील शेतकऱ्याला कोणत्याही प्रकारचे कर्ज मिळत नाही. केंद्र शासनाने विदर्भातील बँका जीवंत राहण्यासाठी जे प्रयत्न केले तसा प्रयत्न मराठवाड्यातील बँका जीवंत राहण्यासाठी करणे गरजेचे होते. पण त्यासाठी त्यांना कोणती अडचण आली, त्यासंबंधीचा उल्लेख उत्तरामध्ये आला पाहिजे. बीड, जालना, नांदेड जिल्हा मध्यवर्ती बँकांना मदत करण्यासंबंधीचा दृष्टिकोन या शासनाने स्वीकारला पाहिजे. कालच माननीय मंत्री श्री.दादाजी भुसे यांनी सांगितले की, बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे लायसेन्स नसल्यामुळे आम्ही त्यांना मदत करू शकत नाही. याची त्यांनी किमान माहिती घेतली पाहिजे होती. बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेला लायसेन्स मिळालेले आहे. परंतु, दुर्दैवाने त्यांना कसे काय ब्रिफिंग करण्यात आले हे मला माहीत नाही. त्यांनी सांगितले की, या बँकेला लायसेन्स मिळालेले नाही हे दुर्दैव आहे. जाणीवपूर्वक अशा प्रकारचे वक्तव्य सभागृहात करून लोकांची दिशाभूल करण्याचे काम या सरकारकडून चालले आहे. ते का चालले आहे या प्रश्नाचे उत्तर मला आज मिळत नाही. मी अतिशय स्पष्ट आणि परखड भाषेत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर तीव्र खेद व्यक्त करतो आणि आपण मला बोलण्याची संधी दिल्याबद्दल आपले आभार मानतो. धन्यवाद. ...3

......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघवंशी (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी सर्वच मुद्यांना स्पर्श करणार नाही. राज्यपालांचे अभिभाषण वाचल्यानंतर त्यात माननीय राज्यपालांच्या मनातील काहीच नाही असे दिसते. माननीय राज्यपाल प्रचंड गाजावाजा करून आमच्या आदिवासी भागात आले होते. ते आधीच येणार होते. पण तो दौरा रद्द झाला. त्यांनी पेसा कायद्याच्या माध्यमातून आदिवासींचे निरीक्षण करण्याचे काम अगदी जवळून केले. परंतु, या अभिभाषणामध्ये आदिवासींच्या विकासासाठी, कल्याणासाठी एकही शब्द आलेला नाही हे मला खेदाने नमूद करावेसे वाटते. राज्यपालांच्या अभिभाषणाचे एकूण 101 मुद्दे असून 96 वा मुद्दा आदिवासींसंबंधात आहे म्हणजे आदिवासींना शेवटची प्रॉयॉरिटी देण्यात आलेली आहे. आपल्या राज्यात आदिवासींची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. 25 आमदार व 9 खासदार आदिवासी समाजाचे निवडून येतात. असे असताना आदिवासींच्या विकासासाठी या सरकारने कुठलाही ठोस कार्यक्रम या वर्षामध्ये घेतलेला नाही ही अत्यंत दु:खाची बाब आहे. समाजकल्याण विभागासाठी, दलित समाजासाठी फार काही आहे असे मला वाटत नाही. फक्त इंदू मिलच्या जागेवर स्मारक झाले म्हणजे दलित समाजाचा विकास झाला असे होत नाही. त्यांच्यासाठी आपण 12 टक्के निधीची तरतूद केली आहे. या समाजासाठी आपण कुठल्या योजना घेत आहोत याचा गांभीर्याने विचार सरकारने करायला पाहिजे होता असे मला वाटते. 1 कोटी 70 लाख लोकांना आपण धान्य देऊ शकत नाही हे या राज्याचे दुर्दैव आहे. पूर्वीच्या सरकारमध्ये अडचणी होत्या. सरकारचे काम अडचणी सांगणे हे नाही. सरकार हे पालक आहे. सरकारकडे बघणारा माणूस सरकार हे आपलेच आहे या विचाराने बघत असतो. प्रत्येक वेळी सरकारला तिजोरीमध्ये खडखडाट आहे असे सांगता येणार नाही. या जबाबदारीतून सरकारला पळता येणार नाही. 1 कोटी 70 लाख गरीब लोकांना विकासाची स्वप्ने दाखवून आपण सत्तेमध्ये सहभागी झाला आहात. त्या गरीबांना दोन वेळचे अन्न देण्याचे पुण्याचे काम आपण करावे अशी अपेक्षा सर्वसाधारण जनतेची आपल्याकडून आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी....

गो-वंश हत्या बंदीचा कायदा बऱ्याच वर्षांपासून होता. पण हा कायदा आता झाला अशा प्रकारे या कायद्याचे कौतुक करण्यात येत आहे. यासंबंधी शासनाने कोणतेचे पर्याय सुचविलेले नाहीत. पूर्वीच्या काळामध्ये पांजरापोळ होते. पांजरापोळमध्ये गावातील भाकड जनावर जात होते व तेथे त्याची सोय व्हायची. परंतु, आता पांजरापोळ बंद झाले आहे. पांजरापोळच्या जमिनी लोकांनी विकून टाकल्या आहेत. तेव्हा भाकड जनावरांचे शासन काय करणार आहे, त्यांच्यासाठी छावण्या उभारण्यात येणार आहेत काय, याचा साधा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही. दिल्ली आणि मुंबईमध्ये एकाच पक्षाचे सरकार आल्यामुळे त्यांनी कायदा करून शेतकऱ्याला अडचणीत आणण्याचे पाप केलेले आहे असे मला वाटते. माझी सरकारला विनंती आहे की, महाराष्ट्राच्या वाट्याचे पाणी गुजरातमध्ये जात आहे. तापीचे सर्व पाणी शेतकऱ्यांच्या शेतामध्ये येण्यासाठी बंद पडलेल्या सहकारी उपसा सिंचन योजना सुरू करू असे सांगण्यात आले होते. या सरकारच्या मार्च महिन्याच्या आत 20 सहकारी उपसा सिंचन योजना सुरू होणार होत्या. त्यासंबंधातील घोषणा सभागृहाचे नेते माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथ खडसे यांनी आमच्या भागात येऊन केली होती. त्यासंबंधातील साधा उल्लेखही अभिभाषणामध्ये करण्यात आलेला नाही.

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी.........

आजही महाराष्ट्रातील 100 टक्के पाणी उकईमध्ये जात आहे. आम्ही आमच्या बॅरेजेसमध्ये फक्त 30 फूट पाणी अडवितो. तापी खोऱ्यातील 100 टक्के पाणी गुजरात राज्यात जात आहे हे आपणास नाकारुन चालणार आहे. लोकांनी सहकाराच्या माध्यमातून ज्या उपसा सिंचन योजना उभ्या केल्या आहेत त्याचे कर्ज आघाडी सरकारने माफ केले आहे. आघाडी सरकारने 71 हजार कोटी रुपये माफ केले. आज शेतकऱ्यांच्या 7/12 उताऱ्यावर कर्जाचा बोजा नाही. परंतु त्याचा काही उपयोग झालेला नाही. या सर्व गोष्टींचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, भारतीय जनता पक्षाने निवडणुकीच्या काळात अनेक घोषणा केल्या होत्या पैकी त्यामध्ये आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचार बाहेर काढण्यात येईल. माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस हे सदस्य असताना त्यांनी आदिवासी विकास विभागातील भ्रष्टाचाराची चौकशी करण्याची सातत्याने मागणी केली होती. आदिवासी विकास विभागाची सन 2004 ते 2009 या काळातील श्वेतपत्रिका काढली पाहिजे अशी त्यांनी मागणी केली होती. आता त्यांच्या पक्षाचे सरकार आहे आणि श्वेतपत्रिका काढण्याची मागणीही त्यांनी केली होती. तेव्हा आता आदिवासी विभागाची श्वेतपत्रिका का काढण्यात येत नाही ? हे सरकार सत्तेवर आल्यापासून सांगत आहे की, तिजोरीमध्ये खडखडाट आहे. माझे म्हणणे आहे की, श्वेतपत्रिका काढण्यासाठी निधीची आवश्यकता नाही. माझी मागणी आहे की, आदिवासी विकास विभागाची श्वेतपत्रिका ताबडतोब काढली पाहिजे. माननीय मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, आम्ही आर्थिक परिस्थितीची श्वेतपत्रिका काढत आहेत. आपणास ज्या सोयीच्या श्वेतपत्रिका वाटत आहेत त्याच काढाव्यात असे काही नाही. आपण यापूर्वी आदिवासी विकास विभागाच्या भ्रष्टाचाराची श्वेपत्रिका काढण्याची मागणी केली होती त्याप्रमाणे श्वेतपत्रिका काढाल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो. या विषयावर कोणीही बोलत नाही याचे मला दुर्दैव वाटते.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.चंद्रकांत रघुवंशी.........

सभापती महोदय, शहरातील नगरपालिकेच्या असंख्य अडचणी आहेत. आदिवासी भागातील ग्रामपंचायत लोकवर्गणी भरु शकत नाही म्हणून ते शासकीय योजनांपासून वंचित राहत होते हा इतिहास आहे म्हणून आघाडी सरकारने आदिवासी क्षेत्रातील ग्रामपंचायतींची लोकवर्गणी शिथिल केली होती. माझी शासनाला विनंती आहे की, राज्यातील आदिवासी विभागात ज्या 10 नगरपालिका येतात त्या नगरपालिका त्यांची इच्छा असूनही शासनाच्या योजना घेऊ शकत नाही. 20 टक्के लोकवर्गणी भरण्याइतपत त्यांची आर्थिक कुवत नाही. "क" वर्ग नगरपालिकेला 10 टक्के लोकवर्गणी भरण्याची अट आहे. आदिवासी भागातील 10 नगरपालिकांची लोकवर्गणीची अट शिथिल करावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांनी अभिभाषणाच्या रुपाने आमच्या तोंडाला पाने पुसली आहेत, त्याबद्दल मी खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

--------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर ( विधानसभेने निवडलेले ) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, या सभागृहात ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन नवीन पालघर जिल्हा निर्माण करण्याचा निर्णय घेण्यात आला तेव्हा सर्व पक्षांनी त्यास एकमताने पाठिंबा दिला होता. दिनांक 1 ऑगस्ट रोजी आदिवासी बहुल असलेल्या नवीन जिल्ह्याची निर्मिती झाली. विधानसभेच्या निवडणुका आल्यामुळे त्या ठिकाण जमिनी हस्तांतरणाच्या व इतर कामांना गती मिळाली नाही. त्यानंतर नवीन सरकार सत्तेवर आले. सुदैवाने जिल्ह्याचे आमदार माननीय श्री.विष्णू सवरा त्या जिल्ह्याचे पालकमंत्री झाले. आमची अपेक्षा होती की, आता वेगाने कामे होतील, पण तसे झाले नाही. पालघर जिल्ह्याची निर्मिती झाल्यानंतर जव्हार येथे असलेले जात पडताळणी कार्यालय, अप्पर जिल्हाधिकारी कार्यालय आता बंद झाले आहे. उप निबंधक, सहकारी संस्था कार्यालय, मुद्रांक शुल्क कार्यालय इत्यादी कार्यालये अजूनही सुरु झालेली नाहीत.

सभापती महोदय, मध्यंतरीच्या काळात जिल्हाधिकाऱ्यांचे स्टेटमेंट आले होते की, इमारती सिडकोकडून बांधायच्या की एमएमआरडीकडून बांधायच्या याबाबत निर्णय होत नाही. कारण सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हे काम द्यायचे नाही असे त्यांनी जाहीर केलेले आहे. त्या ठिकाणी जागा उपलब्ध आहे परंतु अजून जागेचे हस्तांतरण व्हावयाचे आहे.

सभापती महोदय, जिल्हा परिषद निर्माण होऊन देखील कोणत्याही कामास सुरुवात झालेली नाही. नवीन जिल्हा झाला नसता तर बरे झाले असते असे लोकांना वाटू लागले आहे. या सर्व गोष्टींचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात नाही, त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, या ठिकाणी आमच्या जिल्ह्याचे पालकमंत्री उपस्थित असते तर बरे झाले असते. नवीन सरकार आल्यानंतर सर्व जिल्ह्यांत डीपीडीसीची बैठक झाली परंतु पालघर जिल्ह्यात डीपीडीसीची बैठक जिल्हाधिकाऱ्यांनी घेतली. या बैठकीस लोकप्रतिनिधींना बोलाविण्यात आले नाही. अशा पद्धतीने जिल्हाधिकारी काम करणार असतील तर त्याकडे शासनाने लक्ष दिले पाहिजे अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, नवीन जिल्हा झाल्यापासून साधे लायसन्स रिन्युअल करण्यासाठी तीन महिने लागत आहेत. यापूर्वी ते काम पाच दिवसात होत होते. अशा अनेक गोष्टी येथे सांगता येतील. पण मला त्या खोलात जायचे नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.आनंद ठाकूर.......

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.चंद्रकांत रघुवंशी यांनी सांगितल्याप्रमाणे आदिवासी विभागाकडे पूर्णत: दुर्लक्ष झालेले आहे. माझ्या जिल्ह्यातील डहाणू, तलासरी, जव्हार, मोखाडा, या भागांमध्ये सोयीसुविधांबाबत तसेच रोजगार निर्मितीबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख नाही त्याबद्दल मी खेद व्यक्त करतो. माझे आदिवासी बांधव कामासाठी जिल्ह्याच्या बाहेर जात असल्यामुळे पाड्यांवर - वाड्यांवर घराला काठी लावून घरे बंद केली जात आहेत आणि त्यावी येथे कोणतीही चर्चा झालेली नाही.

सभापती महोदय, आघाडी सरकारने कोस्ट गार्ड प्रशिक्षण केंद्र निर्माण करण्यासाठी 100 एकर जागा दिली होती. परंतु ते कोस्ट गार्ड प्रशिक्षण केंद्र सरकारने तेथून हलविले आहे. महाराष्ट्रातील आणि मुंबईतील प्रकल्प हलविण्यात येत असल्याचा उल्लेख येथे करयात आला.

सभापती महोदय, पार्टी विथ डिफरन्स, अच्छे दिन आयेंगे, इंडिया शायनिंग अशा घोषणा देणाऱ्यांकडून जास्त अपेक्षा करण्याची गरज नाही. त्यांचा डिफरन्स आता दिसू लागला आहे. जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेल्या देशाच्या प्रमुखाला त्यांच्या पक्षाचा सत्तेत सहभाग असलेल्या अतिसंवेदनशील राज्यामध्ये देशद्रोहीला सोडले जाते आणि त्याची त्यांना माहिती नसते यावरुन सर्वकाही सिद्ध होते.

सभापती महोदय, राज्यात झालेली गारपीट, अवकाळी पाऊस याबाबत शेतकऱ्यांच्या झालेल्या नुकसानीबाबतचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये नाही त्याबद्दल आम्हाला आश्चर्य वाटत नाही कारण आम्हाला त्यांच्याकडून अशीच अपेक्षा वाटत आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील 90 टक्के योजना या आघाडी सरकारच्या काळातील आहेत हे कालच्या चर्चेमध्ये मान्य करण्यात आले आहे. फक्त पॅकेजींग बदलले आहे. फक्त गोंडस नाव देऊन ते आपल्या नावे खपविण्याचा प्रयत्न केला जात आहे. आपण कितीही आश्वासने द्यायची आणि शेवटी "प्रचारका एक जुमला था" हा एकच शब्द बोलायचा. तो एक जुमला था असे म्हटले की त्यामध्ये सर्व काही येते. आपण त्या जुमल्याच्या माध्यमातून लोकप्रियता मिळवावयाची. आपण अशाप्रकारे सरकार चालवत असाल तर राज्यातील लोकांना न्याय मिळणे कठीण आहे.

13-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) F-5

AJIT/ MMP/ AKN/ पूर्वी श्री.भारवि.. 10:50

श्री.आनंद ठाकूर.......

सभापती महोदय, या सरकारमधील लोकांचा नशिबावर फार मोठा विश्वास आहे. पेट्रोल आणि डिझेलचे भाव कमी झाले तर ते आमच्या नशिबामुळे असे म्हणणारे नेतृत्व त्यांच्याकडे आहे. चांगले होणार असेल तर ते आमच्या नशिबाने आणि वाईट झाले तर ते तुमचे पाप. असे म्हणून वेळ मारुन नेण्याचा प्रकार आहे. मला एवढेच म्हणायचे आहे की, रोज मरे त्याला कोण रडे. आपण रोज असे रडून दाखविणार असाल तर ते लोकांना कळून येणार आहे. त्यांचा काम करणाऱ्यावर भर नसून फक्त प्रचार करण्यावर भर आहे. तेव्हा मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर खेद व्यक्त करुन माझे भाषण पूर्ण करतो.

----------

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)**

**उप सभापती** : आज माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सकाळी 11.00 वाजेपर्यंत चर्चा होईल आणि त्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर सुरु होईल असे मी काल सांगितले होते. आता माननीय मुख्यमंत्र्यांचा निरोप आलेला आहे. या चर्चेला उत्तर देण्यासाठी ते सभागृहात येत आहेत. त्यामुळे आपण किमान 11.15 वाजेपर्यंत ही चर्चा संपवावी. आता मी केवळ सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे व श्री.हेमंत टकले यांना बोलण्याची संधी देणार आहे. माझी दोन्ही सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी आपले भाषण 15 मिनिटांत संपवावे.

श्री.संजय दत्त : सभापती महोदय, मला वाटते सन्माननीय सदस्य सर्वश्री हेमंत टकले, माणिकराव ठाकरे व प्रा.जोगेंद्र कवाडे यांना बोलण्याची संधी द्यावी.

श्री.प्रकाश गजभिये : सभापती महोदय, मला सुध्दा बोलण्याची संधी द्यावी.

ॲड.जयदेव गायकवाड : महोदय, आम्हाला सुध्दा या चर्चेत भाग घ्यावयाचा आहे.

**उप सभापती** : काल माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर चार तास चर्चा झाली आहे. मी काल किमान चार वेळा आजच्या वेळेच्या नियोजनाबाबत सांगितले होते.

ॲड.जयदेव गायकवाड : महोदय, आम्ही ज्युनिअर आहोत म्हणून आम्हाला वगळता काय, आमचे नाव का वगळले जाते ? असा प्रकार नेहमी होतो.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य उभे राहून बोलतात.)

**उप सभापती** : या ठिकाणी ज्युनियर आणि सिनियरचा प्रश्न नाही. आपल्याला हेच ऑर्ग्युमेंट करायचे असेल तर मी पुढील वक्त्यांना संधी देत नाही, आपण बोलण्यास सुरुवात करावी. मला माननीय मुख्यमंत्र्यांचा जो निरोप आलेला आहे तो मी सांगितला. माननीय मुख्यमंत्री 11 ते 12.15 वाजेपर्यंत उत्तर देणार होते. मी सन्माननीय सदस्यांना अजून 15 मिनिटे बोलण्याची संधी दिली आहे. वास्तविक पाहता आज सकाळच्या सत्रात 11 ते 12.15 वाजेपर्यंत माननीय मुख्यमंत्र्यांचे उत्तर ठेवण्यात येणार होते. परंतु आपल्या सर्वांच्या आग्रहास्तव सभागृहाची बैठक आज सकाळी 10.00 वाजता ठेवण्यात आली.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले : महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयदेव गायकवाड यांना बोलण्याची संधी द्यावी. माझी काही हरकत नाही.

**उप सभापती** : ठीक आहे. सन्माननीय सदस्य ॲड.जयदेव गायकवाड यांनी आपल्या भाषणास सुरुवात करावी.

ॲड.जयदेव गायकवाड (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सभागृहात अशाप्रकारे कामकाज चालते या बद्दल मला खेद होतो. जे सन्माननीय सदस्य ज्युनियर आहेत अशा चार-पाच सन्माननीय सदस्यांना प्रत्येक वेळी चर्चेतून वगळले जाते.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर मी खेद व्यक्त करतो. वास्तविक पाहता माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून नवीन काही मिळेल असे वाटले होते. गेली 15 वर्षे सत्तेच्या बाहेर असलेली आणि विरोधी पक्षात बसलेली मंडळी या राज्याच्या भवितव्याचा गंभीर आणि खोलवर विचार करेल अशी आमची अपेक्षा होती. पण या अभिभाषणात दिसून येते की, निम्म्यापेक्षा जास्त योजना या मागच्याच सरकारच्या काळातील आहेत. त्याच योजना पुढे नेल्या जात आहेत. या सरकारने काही नवीन गोष्टी केल्या आहेत, पण त्या अतिशय विरोधी स्वरुपाच्या वाटतात. या सरकारमधील माननीय शालेय शिक्षण मंत्री आणि आमचे मित्र श्री.विनोद तावडे यांनी अलीकडच्या काळात मराठी भाषेच्या वर्धापन दिनानिमित्त भाषण केले होते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याचा प्रयत्न करण्यात येईल आणि तो दर्जा आम्ही मिळवून देऊ असे त्यांनी सांगितले होते. परंतु माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात मराठी भाषेची मोडतोड केली आहे. मराठी भाषेची अशाप्रकारे मोडतोड केल्यामुळे हे सरकार मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देणार हे ऐकून आश्चर्य वाटते.

महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील पृष्ठ क्र.6, मुद्दा क्र.35 वर 'स्मार्ट सिटी' या इंग्रजी शब्दाचा वापर केला आहे. मी विचारु इच्छितो की, या शब्दाला मराठीत दुसरा पर्यायी शब्द सापडला नाही काय ? तसेच पुढ मुद्दा क्र.37 मध्ये मेक इन महाराष्ट्र, मुद्दा क्र.57 मध्ये डिजीटल इंडिया, डिजीटल लॉकर, ऑनलाईन, इलेक्ट्रॉनिक, क्लिअरन्स, दिल्ली-मुंबई कॉरिडॉर अशा प्रकारचे शब्द आहेत. तसेच महाकौशल्य जी.ओव्ही.एन, कॉल सेंटर्स अशा अनेक इंग्रजी

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.जयदेव गायकवाड....

शब्दांचा अभिभाषणात देवनागरीमध्ये उल्लेख केलेला आहे. हे बघितल्यानंतर इतकी वर्षे विरोधात बसलेल्या या सरकारचे मराठी भाषेवर किती प्रेम आहे याचा प्रत्यय माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातून येतो.

महोदय, हे राज्य सरकार आपले आहे असे लोकांना वाटतच नाही. हे राज्य सरकार चार-पाच महिन्यांपूर्वी सत्तेवर आले, तसेच या पक्षाचे सरकार केंद्रात येऊन जवळपास एक वर्ष होत आले. परंतु हे सरकार आपल्यासाठी काही करेल असे लोकांना वाटत नाही. अलीकडच्या काळात निसर्गाचा कोप झाला. राज्यामध्ये अवकाळी पाऊस झाला. राज्यात अवकाळी पाऊस येऊन या सरकारवर पहिले संकट आले असे मी म्हणेन. हे राज्य सरकार पहिल्या संकटाला योग्यप्रकारे तोंड देऊ शकले नाही. शेतकऱ्यांना मदत करण्याबाबत या सभागृहात चर्चा झाली. अवकाळी पावसामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करुन त्यांना दिलासा दिला पाहिजे, त्यांना कसे जगविले पहिजे यावर चर्चा झाली. महोदय, राज्यात रोज होणाऱ्या आत्महत्या उघड्या डोळयांनी पाहणारे हे सरकार आहे. गेल्या 100 दिवसांत 300 शेतकऱ्यांनी आत्महत्या कैल्या आहेत. तरी देखील दगडी हृदयाच्या लोकांना याबाबत काहीच वाटत नाही. मागच्या सरकारच्या काळात सुध्दा शेतकऱ्यांच्या आत्महत्या व्हायच्या, मग आता झाल्या तर काय, अशा प्रकारची प्रवृत्ती या सरकारकडून आपल्याला पहावयास मिळते. मला वाटते शासनाने आपली भूमिका बदलली पाहिजे.

महोदय, या राज्य सरकारने गेल्या 100 दिवसांत 100 निर्णय घेतले आहेत. या सरकारकडून दररोज एक निर्णय घेतला जातो. वर्तमानपत्र उघडले की, माननीय मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस सरकारचा एक ना एक निर्णय वाचायला मिळतो. आजच्या वर्तमानपत्रात नवी मुंबई प्रकरणी घेण्यात आलेल्या निर्णयाचा उल्लेख आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, गेल्या 100 दिवसांत घेतलेल्या 100 निर्णयांपैकी किती निर्णयांची अंमलबजावणी झाली याचा हिशेब माननीय मुख्यमंत्र्यांनी उत्तराच्या भाषणात दिला पाहिजे.

सभापती महोदय, एका गोष्टीबद्दल मी सरकारला धन्यवाद देतो. मी आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ता आहे. राज्य सरकार मुंबईमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भव्य स्मारक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

उभारणार आहे. वास्तविक पाहता हा निर्णय मागच्या सरकारचाच आहे. त्याला कंटीन्यू केल्याबद्दल

..4..



ॲड.जयदेव गायकवाड....

मी सरकारला धन्यवाद देतो. तसेच दुसरा चांगला निर्णय हा भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे विद्यार्थी दशेत लंडनमध्ये राहिलेले घर खरेदी करण्याचे शासनाने ठरविले आहे. परंतु या अनुषंगाने पुढे काय पावले टाकली हे आम्हाला माहीत नाही. वास्तविक पाहता राज्य सरकारचा हा निर्णय चांगला आहे. हे घर खरेदी करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करावी, अशी मी विनंती करतो.

महोदय, काल सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी या ठिकाणी एक सूतोवाच केले. त्यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाबद्दलचा उल्लेख केला होता. परंतु त्यांच्या म्हणण्याचा या ठिकाणी सत्ताधारी बाजूने टिंगल किंवा प्रतिवाद करण्याचा प्रयत्न केला गेला. शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी त्यास हरकत घेतली आणि आम्हाला शिकवू नका अशी भाषा वापरली.

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगतो. शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी त्यावर हरकत घेतली नव्हती. मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, सरसेनापती बाळासाहेब ठाकरे यांच्याबद्दल तुम्हाला जितका आदर आहे त्याच्यापेक्षा कितीतरी जास्त पट आदर आम्हाला आहे. ते आमचे नेते आणि मार्गदर्शक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली पूर्वी आमचे सरकार सत्तेत आले होते. माननीय श्री.शरद पवार साहेबांनी सांगितले होते की, बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक सरकारच्या खर्चाने करण्याची आमची तयारी आहे. परंतु त्यावेळी माननीय श्री.उध्दव ठाकरे यांनी सांगितले की, बाळासाहेबांच्या स्मारकासाठी सरकारच्या मदतीची गरज नाही. शिवसैनिक स्वतः त्यांचे स्मारक उभे करु शकतात.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

शिवसैनिकच काय तर आम्ही सुध्दा त्यांच्याबरोबर समर्थ आहोत. आदरणीय बाळासाहेब ठाकरे यांच्याविषयी श्रध्दा ठेवणारे जे आहेत ते सर्व समर्थ आहेत. त्यामुळे सरकारच्या मदतीची गरज नाही असे उद्ध्वजींनी सांगितले म्हणून सरकारने केले नाही. तुम्ही म्हणालात तर आम्ही आजही करू आमचा निर्णय झाला की, तुम्हाला त्याच्यासाठी विचारण्याची आवश्यकता नाही. तुम्हाला बोलण्याचीही आवश्यकता नाही. तुमचे नखरे सूर आमच्या लक्षात येत आहेत. सन्माननीय सदस्यांनी हरकत घेतली नव्हती. आमच्या नेत्यांनी सांगितले की, आम्ही स्वतंत्रपणे आमच्या हिंमतीने स्मारक उभे करू आणि त्यामुळे तो विषय आला होता.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये समावेश नसल्यामुळे निश्चितपणे आम्हाला त्याची दखल घ्यावी लागली. काल अनेक सन्माननीय सदस्यांनी देखील निदर्शनास आणले आहे की, बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्मारकाचा देखील उल्लेख अभिभाषणामध्ये झालेला नाही. छत्रपती शिवाजी महाराज हे आमचे देखील दैवत आहे. देशाच्या स्वातंत्र्याच्या इतिहासातील पर्वाचे नायक छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्मारक अति भव्य झाले पाहिजे असा विषय सभागृहामध्ये झालेला आहे. पूर्वीच्या सरकारने देखील त्याबद्दलचा संकल्प केला होता. आपण हे संकल्प प्रत्यक्षात आणण्यासाठी काय करणार आहात या संदर्भातील उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये झाला पाहिजे होता. परंतु तसा उल्लेख झालेला नाही हे अतिशय खेदाने म्हणावेसे वाटते. माननीय मंत्री श्री. एकनाथराव खडसे साहेबांच्या निर्णयांच्या संदर्भात मधल्या काळात टीका झाल्या. शेतकऱ्यांसाठीचा विजेचा प्रश्न निर्माण झाला होता.

श्री. धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना 5-5 मनिटे बोलू द्यावे.

**उप सभापती** : मी असे केल्यास सर्व सन्माननीय सदस्यांना त्याप्रमाणे संधी द्यावी लागेल.

(गोंधळ)

श्री. धनंजय मुंडे : सन्माननीय सदस्यांना 5-5 मिनिटे बोलू द्यावे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर 2 दिवसांची चर्चा आहे. मात्र काल फक्त 7 तास चर्चा झाली आहे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, काल अभिभाषणावर 7 तासांपेक्षा जास्त चर्चा झाली आहे. आपण शासकीय कामकाज करावे आणि रात्रभर चर्चा करावी.

**उप सभापती** : माझी हरकत नाही. आपण अजून 3 दिवस चर्चा चालवा. आपण अडचण समजून घेतली पाहिजे.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, मी एवढेच सांगेन की, आम्हाला या सरकारचा चेहरा हळूहळू स्पष्ट होताना दिसत आहे. सरकारचे हिडन अजेंडा हळूहळू लक्षात येऊ लागला आहे. आम्हाला सरकारचे रंग पहिल्यापासूनच माहीत आहेत. सरकारने मुस्लीमांच्या आरक्षणाबाबत घेतलेली भूमिका स्पष्ट करते की, सरकारला येथे हिंदुत्ववाद आणायचा आहे. मुस्लीमांच्या आरक्षणा बद्दल स्पष्ट भूमिका घेतली की, आमचा त्यांच्या आरक्षणाच्या संदर्भात विरोध आहे. शासनाने ते स्पष्ट केले आहे. शासनाला हिंदूंना संघटित करायचे आहे. धर्मनिरपक्षतेची चौकट खिळखिळी करण्याचा प्रयत्न बाहेर सर्व मंडळी करीत असतात. सरकार असा चेहरा दाखविते की, आम्ही धर्मनिरपेक्ष आहोत. घटनेच्या बेसिक स्ट्रक्चरला धक्का लावणार नाही अशी वाटचाल दाखवायची आणि बाहेरून संघटनेच्या लोकांनी घरवापसी वगैरे सांगायचे. सरकारने मुस्लीमांबद्दल घेतलेले धोरण योग्य नाही. आम्ही धर्माच्या नावावर आरक्षण देणार नाही असे सांगितले आहे. धर्माच्या नावावर आरक्षण देणार नाही तर कसे देणार आहेत ? घटनेमध्ये अनुच्छेद 16(4) मध्ये या संदर्भात तरतूद आहे. देशातील मागासलेला समाज, समूह आहेत त्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी तरतूद करून त्यांना आरक्षण द्यावे लागेल असे सांगितले आहे.

श्री. भाई गिरकर (बसून) : सभापती महोदय, आरक्षणाच्या संदर्भात घटनेचा अनुच्छेद 174 आहे.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, फुले, शाहू, आंबेडकर यांचे वारस म्हणवून घेता आणि प्रतिगामी शक्तींना बळ देता याचे मला वाईट वाटते. तुम्ही राज्यघटनेच्या संदर्भातील गोष्टी बोलू नयेत. मी एवढेच सांगेन की, आगामी काळात या सरकारे रंग पहायला मिळतील. अभिभाषणातून ज्या काही संकल्पना दिसतात त्यातून फार मोठा दिलासा जनतेला मिळालेला नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड. जयदेव गायकवाड ....

शासनाने गोरगरिबांच्या तोंडातील घास हिरावून घेतला आहे. गरीब दुबळया लोकांना धान्य मिळत होते तेही बंद केले आहे. आता यांनी लोकशाहीची भाषा काय बोलावी. एवढे बोलून मी माझे भाषण पूर्ण करतो. धन्यवाद !

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे मत व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे. मी कमीत कमी 5 मिनिटांत भाषण संपविण्याचा प्रयत्न करणार आहे. आपण बोलण्यास संधी दिल्याबद्दल मी आपला आभारी आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाच्या संदर्भात आम्ही काय खेद व्यक्त करायचा ? माननीय राज्यपालांनीच आपली अगतिकता दर्शवून खेद व्यक्त केला आहे. आपण अभिभाषणातील पृष्ठ क्रमांक 8 वरील मुद्दा क्रमांक 47 पहावा, त्यामध्ये लिहिले आहे की, राज्यामध्ये अपराध सिध्द होण्याचे प्रमाण खूपच कमी आहे याची शासनाला जाणीव आहे. माननीय राज्यपालांनी स्वतःचा अगतिकता व्यक्त केलली आहे. मोठी स्वप्ने दाखवून स्वप्नरंजन करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. स्वप्न पाहणे वाईट नाही. एक कवी म्हणतो की, "मंजिले उन्हीं को मिलती हैं जिनके सपनो मे जान होती है, उड़ान पंखो से नहीं हिंम्मत ओर हौसलों से होती है."

सभापती महोदय, हिंमत आणि हौसला माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसत नाही याचा मला खेद वाटतो. भाकरीचे चित्र दाखवून उपाशी माणसाचे पोट भरत नाही. जोपर्यंत उपाशी माणसाच्या पोटात भाकर जात नाही तोपर्यंत त्याचे पोट भरत नसते. माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे अशाप्रकारे भाकरीचे चित्र दाखविण्यासारखे आहे. आपण शेतकऱ्यांचेच प्रश्न पहा. अवकाळी पाऊस, गारपीट, वादळी वारे यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे आणि ते आपणही पाहत आहोत. शेतकऱ्यांच्या विषयी अनुदानावर जगण्याची प्रवृत्ती निर्माण न करता स्वबळावर कसे स्वाभिमानाने जगता येईल असा कसोशीचा प्रयत्न माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये दिसत आहे का ? निसर्गाने शेतकऱ्यांचा थट्टा चालविली आहे. परंतु कमीत कमी शासनाने मात्र या उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांची थट्टा करू नये. निसर्गाचे ऋतूचक्र बदलत चालले आहे. एक कवी म्हणतो की, "मेघ उतावळा अवेळी सांडला, कसा निसर्गाने खेळ हा मांडला, पुसून टाकून उद्याची गणिते, नशिबाचा नवा हिशेब मांडला, मेघ उतावळा अवेळी सांडला, धूळधाण सारी करून पिकांची निसर्ग मात्र आमच्या शेतकऱ्यांशी भांडला". सभापती महोदय, अशा प्रकारची अवस्था राज्यातील शेतकऱ्यांची झाली आहे. सरकार तातडीने पंचनामे करीत नाही. तुमचे तलाठी, तहसीलदार, नायब तहसीलदार, कलेक्टर, शासकीय यंत्रणा या संदर्भात संवेदनशील का बनू

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा. जोगेंद्र कवाडे ....

शकत नाहीत ? आपण पोटतिडकीने म्हणणे मांडतो. तुम्ही तुमच्या पध्दतीने आणि आम्ही आमच्या पध्दतीने या संदर्भातील म्हणणे मांडतो. आपला सूर मात्र एकच असतो की, राज्याचे भले झाले पाहिजे, शेतकऱ्यांचे कल्याण झाले पाहिजे. शेतकरी ज्या दु:खात, वादळात सापडला आहे त्या वादळातून तो बाहेर आला पाहिजे, स्वाभिमानाने, ताठ मानेने उभा राहिला पाहिजे. ही सर्वांचीच भावना आहे. शासन, प्रशासन हे देखील संवदेनशील असले पाहिजे या संदर्भात आपण निश्चितपणे काळजी घेईल अशी मला अपेक्षा आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची स्थिती अत्यंत भयानक आहे. काल मी नाशिकला जाऊन आलो. 11 तारखेला भर दुपारी नाशिक रोडला सौरभ बर्वे नवाच्या पॉलिटेक्निकक कॉलेजमध्ये पहिल्या वर्षात शिकणाऱ्या बौध्द विद्यार्थ्याचा दिवसाढवळ्या कुऱ्हाड, कोयत्याने खून करण्यात आला. आपल्या राज्यात हे सर्व सुरू आहे. राज्यात महिलांची मंगळसूत्रे हिसकावून घेण्याचे प्रकार सुरू आहेत. बालिकांवर बलात्कार केले जात आहेत. काल डोंबिवली येथील रूग्णालयात 5 दिवसाच्या मुलीला दुसऱ्या मजल्यावरून फेकून देण्यात आल्याचे टीव्हीवर दाखविण्यात आले.

सभापती महोदय, सीताबर्डी हे माननीय मुख्यमंत्र्यांचे गाव आहे. मी देखील तेथे राहणारा आहे. सीताबर्डी येथे आमचे ऑफिस आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सिताबर्डी येथे माझे घर आहे, माझे ऑफिस आहे. त्याच्या बाजूला इलेक्ट्रॉनिक मार्केट आहे. त्या ठिकाणी भरदिवसा बुरखा पांघरुन गुंड दुकानामध्ये शिरतात आणि खटवाणी नावाच्या दुकानदाराचा खून करतात. आम्ही सीसीटीव्हीचे चित्रण बघितल्यानंतर हादरुन गेलो, संपूर्ण महाराष्ट्र हादरुन गेला, अशी अवस्था आहे. संपूर्ण राज्यात गुंडगिरी सुरु आहे. दुचाकींना आगी लावण्याचे प्रकार सुरु आहेत. महागांवमध्ये डॉ.बाबासाहेबांचे तैलचित्र अनेक वर्षांपासून आहे. त्याच्या बाजूला छत्रपती शिवाजी महाराजांचे तैलचित्र होते. छत्रपती शिवराय आमचे आदर्श आहेत. ती केवळ शिवसेनेची, भारतीय जनता पक्षाची, रिपब्लिकन पार्टीची दौलत नाही, ती संपूर्ण राज्याचीच नव्हे तर देशाची दौलत आहे. ज्याप्रमाणे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे तैलचित्र होते, त्याप्रमाणे शिवाजी महाराजांचे देखील तैलचित्र त्या ठिकाणी होते. परंतु, काय झाले माहीत नाही, बाबासाहेबांच्या तैलचित्राच्या बाजूला काही लोकांनी फलक लावला. बौध्द समाजाच्या लोकांनी विनंती केली की, शिवाजी महाराजांचे तैलचित्र आहे, दरवर्षी आम्ही शिवजयंती साजरी करतो, बाबासाहेबांची जयंती साजरी करतो. संयुक्त जयंती देखील साजरी करतो. शिवजयंती, भिमजयंतीची परंपरा आम्ही सुरु केली आहे, तुम्ही सुरु केलेली नाही. पण त्या ठिकाणी जेव्हा आक्षेप घेण्यात आला तेव्हा सुरुवातीला फलक हटविण्यात आला. नंतर मात्र पुन्हा बळजबरी करुन हा फलक तेथे लावण्यात आला आणि त्यामुळे संपूर्ण गावामध्ये तणावाचे वातावरण निर्माण झाले. मी विचारले की, कोण हा प्रकार करीत आहे ? मला जे समजले त्यानुसार दुर्दैवाने सत्ताधारी पक्षातील मंडळी त्याला साथ देत आहेत व त्यामुळे तणाव निर्माण झाला आहे. महसूल मंत्री महोदय तुमच्या मित्रपक्षाचे लोक अशा प्रकारे त्या ठिकाणी धुमाकूळ घालीत आहेत, आपण त्याकडे लक्ष द्यावे. कारण, ही खेदाची बाब आहे.

सभापती महोदय, राज्यात मनरेगा योजना सुरु आहे. या कामावरील मजुरांना दिवसाला 165 रुपये मजुरी मिळते. एका बाजूला दीड दीड लाख रुपये पगार घेणारे अधिकारी आणि दुसऱ्या बाजूला रोज 165 रुपये मजुरी घेणारा मजूर ही तफावत, खालपासून वरपर्यंत असणारे हे अंतर आपल्याला कमी करता येणार नाही का ? दिवसेंदिवस हे अंतर, ही तफावत वाढत चालली आहे,

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

ती कमी कशी करता येईल, याचा प्रयत्न सरकारने केला तर आमच्या मजुरांना, असंघटित कामगारांना न्याय मिळेल.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणात राज्याचे थोर नेते कै.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा कोणताही उल्लेख नाही. महसूल मंत्री महोदयांनी या संदर्भात खुलासा केला ते बरे झाले. ते स्वबळावर स्मारक बांधण्याचा प्रयत्न करणार आहेत, त्यामुळे हा प्रश्न उद्‌भवला नाही, असे आपले म्हणणे आहे. परंतु, राज्यपालांच्या अभिभाषणात याचा उल्लेख आला असता तर आम्हाला अधिक बरे वाटले असते. स्व.बाळासाहेब ठाकरे हे महान नेते होते, देशाचे नेते होते. त्यांच्या संदर्भात योग्य निर्णय घेतला असता, त्याचा उल्लेख केला असता तर बरे झाले असते. तसे झाले असते तर आमच्या मित्रांना त्याबाबत आक्षेप घेण्याची गरज राहिली नसते.

सभापती महोदय, इंदू मिलच्या जागेवर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे भव्य स्मारक उभारण्याबाबतचा निर्णय आघाडी सरकारच्या काळात झाला. छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारक अरबी समुद्रात आपण उभे करणार आहात. पण त्यासाठी किती तरतूद केली आहे, काम कोणत्या टप्प्यावर आहे, याचा उलगडा झालेला नाही. येत्या काही दिवसात राज्याचे बजेट मांडले जाणार आहे. त्यावेळी दूध का दूध और पानी का पानी होणारच आहे. त्यावेळी यासाठी किती तरतूद केली आहे, हे आम्हाला समजणार आहेच.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.महादेव जानकर दिल्लीत जाऊन आले. पीएम काय म्हणतात, सीएम काय म्हणतात, हे सांगितले तरी मध्ये कोण डीएम आहे, हे कोणी सांगत नाही. तुम्ही प्रस्ताव मांडला त्याची अंमलबजावणी किती झाली ते तरी सांगा, एकदा ते देशाला कळू तरी द्या.

सभापती महोदय, सन्माननीय शिक्षण मंत्री श्री.विनोदजी तावडे हे विदेशाच्या दौऱ्यावर होते. लंडनला शिक्षण घेत असताना ज्या इमारतीत डॉ.बाबासाहेब रहात होते, ती इमारत बाबासाहेबांचे स्मारक करण्यासाठह विकत घेण्याबाबतची घोषणा आघाडी सरकारने केली होती, आपले सरकार त्याचा पाठपुरावा करीत आहे, याबद्दल मी आपल्याला धन्यवाद देतो. परंतु, यासाठी किती दिवस लागतील, हे एकदा या सभागृहाला कळू द्या. या संदर्भात एक कालबध्द कार्यक्रम ठरला पाहिजे. त्या दृष्टीकोनातून आपण विचार केला पाहिजे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

सभापती महोदय, हे सरकार गरिबांच्या बाजूचे असल्याचा देखावा आणि चित्र उभे केले जात आहे. हे शासन, प्रशासन, पोलीस दल गरिबांच्या बाजूचे आहे की, धनदांडग्यांच्या, बिल्डरांच्या बाजूचे आहे, असा प्रश्न आमच्या मनामध्ये निर्माण झाला आहे. मुलुंड येथील डॉ.आर.पी.रोड, सिध्दार्थ नगर-1 मध्ये रिध्दी सिध्दी कॉर्पोरेशन कंपनीच्या माध्यमातून इमारतीचे बांधकाम सुरु आहे. या ठिकाणी रहात असलेले नागरिक अनेक वर्षांपासून रस्ता वापरीत होते. ते वापरीत असलेला रस्ता बिल्डरने तोडून टाकला आहे आणि केवळ 10 फुटांचा रस्ता वापरण्यासाठी ठेवला आहे. या संदर्भात आमच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी, नागरिकांनी पोलीस ठाण्यामध्ये तक्रार केली. परंतु, आज तो बिल्डर या कार्यकर्त्याला धमकी देत आहे, त्याला तीन वेळा जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या गेल्या आहेत. त्या कार्यकर्त्याने धमकीचे फोन टेप करुन ठेवले आहेत. कार्यकर्त्यांनी पोलीस स्टेशनला तक्रार केली असली तरी त्याची कोणी दखल घेत नाही, त्याला सुरक्षा दिली जात नाही, डीसीपी, एसीपी कोणीही लक्ष देत नाही. हे पोलीस खाते शासन, प्रशासन धनदांडग्यांच्या, श्रीमंतांच्या, पैसेवाल्यांच्या संरक्षणासाठी आहे. गरीब मात्र अशा प्रकारे धमकावला जात आहे. याबाबत शासनाने गंभीर नोंद घेतली पाहिजे आणि संबंधितांविरुध्द कारवाई केली पाहिजे, अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, गाय, वळू, बैल यांच्या संदर्भात गोवंश हत्याबंदीचे विधेयक अंमलात आले आहे. गायीच्या पोटात 36 कोटी देव राहतात, असे आपण म्हणतो. (अडथळा) ठीक आहे. 33 कोटी देव राहतात. ज्याप्रमाणे लोकसंख्या वाढत चालली आहे त्याप्रमाणे ईश्वरांचीही संख्या वाढत चालली आहे. निर्णय जरी चांगला असला तरी ज्यांची आर्थिक परिस्थिती नाही, ज्यांचे कुटुंब, ज्यांचा परिवार, ज्यांचा चरितार्थ यावर अवलंबून आहे, त्यांची काही पर्यायी व्यवस्था आपण केली आहे का ? काल परवा खाटीक समाजाचा मोर्चा निघाला. हजारो खाटीक समाजाचे लोक त्यामध्ये सामील होते. त्यामध्ये मुलसमान खाटीक आहेत, हिंदू खाटीक आहेत, इतरही समाजाचे, हा व्यवसाय करणारे लोक आहेत, त्यांची पर्यायी व्यवस्था सरकारने केली आहे की नाही ? दुसरी बाब

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे.......

ही आहे की, या व्यवसायाच्या माध्यमातून देशाला विदेशी चलन मिळते त्याचेही मोठे नुकसान होणार आहे. या संदर्भात मुख्यमंत्री महोदयांनी खुलासा केला आहे. परंतु, त्यांचे पुनर्वसन कशा पध्दतीने करता येईल, पर्यायी सोय कशी करता येईल, याचा विचार सरकारने केला पाहिजे. या माध्यमातनू मोठ्या प्रमाणावर चामड्याचा उद्योग निर्माण झाला आहे. चामडे कमावण्याचा व्यवसायही आहे. त्यांच्यावरही परिणाम होणार आहे. या राज्यात जनावरे मारणे आणि खाणे यासाठी कायदे केले जातात पण या राज्यात दलितांची खुलेआम हत्या होते, त्याबाबत मात्र काहीही कोणतीही कारवाई होत नाही, ही बाब मला आपल्या लक्षात ाअणून द्यावयाची आहे. हे सर्व आपण थांबविले पाहिजे.

सभापती महोदय, राज्यपालांच्या अभिभाषणातील पृष्ठ क्रमांक 9 वरील मुद्दा क्रमांक 56 मध्ये असे म्हटले आहे की, "माझ्या शासनाने दिनांक 26 जानेवारी, 2015 रोजी "आपले सरकार" हे मोबाईल ॲप्लिकेशन व पोर्टल सुरु केले आहे. या माध्यमातून नागरिकांना आश्वासित मुदतीत आपल्या तक्रारीचे निवारण करणे, प्रशासनासंबंधित त्यांच्या सूचना व अभिप्राय कळविणे आणि कोणतीही योजना किंवा कार्यक्रमाविषयीची अपेक्षित माहिती देखील मिळविणे शक्य होईल." एखाद्याने माहिती मागितली, तक्रार केली, पत्र पाठविले तर त्याचे उत्तर किती दिवसात दिले पाहिजे, याबाबतची कालमर्यादा मात्र शासनाने निश्चित केलेली नाही. कारण, वर्षोनुवर्षे तक्रारी पडून असतात, शासन, प्रशासन दखल घेत नाही. त्यामुळे शासनाने या संदर्भात कठोर कारवाई केली पाहिजे, अशी आमची मागणी आहे.

सभापती महोदय, लोकनेते स्व.गोपीनाथ मुंडे साहेबांचे स्मारक उभारण्याबाबतचा उल्लेख अभिभाषणात आहे. मुंडे साहेबांचा संबंध केवळ ऊसतोड कामगारांपुरता मर्यादित नव्हता, असंघटित, श्रमजीवी कामगारांपुरता मर्यादित नव्हता.

यानंतर श्री.वि.खर्चे......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे...

लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे हे सर्व बहुजन समाजाचे व मागासवर्गीयांचे महाराष्ट्रातील नेते होते. त्यांचे स्मारक महाराष्ट्राच्या राजधानीत मुंबईत का होऊ नये आमची मागणी आहे. सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी देखील स्मारकाची मागणी केली आहे. ते फक्त मराठवाड्याचे नेते नव्हते. पर्यावरणाचा हा दृष्टीदोष आहे तो कृपा करुन दूर करावा. मुंबईसारख्या महानगररीत व राज्याच्या राजधानीत स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे उत्कृष्ट स्मारक उभे करावे अशी विनंती करतो.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. चंद्रकांत रघुवंशी यांनी आदिवासी समाजाचा मुद्दा उपस्थित केला होता. आदिवासी समाजाचे हित लक्षात घेऊन त्याबाबत शासन निर्णय घेणार आहे किंवा नाही. धनगर समाजाच्या आरक्षणाचा प्रश्न निर्माण झालेला आहे. त्यांना आरक्षण मिळाले यासाठी राज्य सरकारने केंद्र सरकारकडे लवकरात लवकर पाठपुरावा केला पाहिजे. आता येथे मुख्यमंत्री महोदय उपस्थित झाले आहेत. मुस्लिम आरक्षणाचा विषय प्रलंबित आहे. महाराष्ट्राच्या जनतेत असा मॅसेज जाता कामा नये की, हे सरकार द्वेषाचे राजकारण करीत आहे. सरकार अल्पसंख्याक समाजाची फसवणूक करुन त्यांच्याशी द्वेष बुध्दीने वागत आहे. दलित, आदिवासी, अल्पसंख्याक मुस्लिम समाजाची फसवणूक केली जात आहे, अशा प्रकारे द्वेषाचे राजकारण केले जात आहे, असे चित्र समाजात निर्माण होता कामा नये, अशी माझी शासनाला विनंती आहे. राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाबाबत मी खेद व्यक्त करतो व आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबाबत आपले आभार मानून माझे भाषण संपवितो. धन्यवाद, जयभिम.

------------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, राज्यपाल महोदयांनी केलेल्या अभिभाषणावर खेद व्यक्त करण्यसाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, आपणा सर्वांना माहिती आहे की, ही एक परंपरा आहे. सत्ताधारी पक्ष येत्या वर्षभरात काय नियोजित कार्यक्रम हाती घेणार आहे. राज्याच्या विकासासाठी कोणत्या मूलभूत गोंष्टी करणार आहे. राज्यात आधीच्या काळातील काही गोष्टी करायच्या राहून गेल्या असतील तर त्या पुन्हा नव्याने सुरु करण्यासाठी काय प्रयत्न करण्यात येणार आहेत. त्याचप्रमाणे राज्यात सतत उद्‌भवणारा दुष्काळ, गारपीट या समस्यांना कशा प्रकारे सामोरे जाणार आहे. सर्व सामान्य जनतेला कोणत्या पध्दतीने दिलासा देण्यात येणार आहे. याचे विस्तृत विवेचन सत्तेवर असलेल्या पक्षाच्या मंत्रिमंडळाकडून राज्यपाल यांच्याकडे सादर केले जाते व त्यानंतर माननीय राज्यपाल आपल्या भाषणात प्रत्येक मुद्यांच्या वेळी 'माझ्या शासनाने' असा त्याचा उल्लेख करतात. हे अभिभाषण जेव्हा आम्हाला मिळाले तेव्हा आमच्या अशा लक्षात आले की, गेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीनंतर एक वेगळे चित्र सामान्य जनतेसमोर उभे करण्याचा प्रयत्न फार मोठ्या प्रमाणावर झालेला आहे. त्या कामासाठी आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन एक प्रकारे वेगळे चित्र निर्माण करुन त्यामध्ये पूर्वीचे जे होते ते असे काही बेमालूनपणे गुंडाळायचे व ते नव्या पॅकेजमध्ये समोर आणून एक अविर्भाव त्यातून प्रकट करण्यात येत आहे.

सभापती महोदय, राज्यपाल महोदयांच्या या भाषणातील प्रत्येक पानावर अशा प्रकारच्या सर्व गोष्टी आढळून येतील. या भाषणातील काही गोष्टींचे क्रम बदलण्यात आले आहेत. हा एक सुखद धक्का देण्यात आलेला आहे. साधारणपणे मराठी भाषेचा विषय हा अभिभाषणात शेवटच्या क्रमांकावर जात होता. हा विषय आता आपण सत्ता हाती घेतल्यावर अभिभाषणातील 16 व्या क्रमांकावर आला आहे. त्यामध्ये असे नमूद केले आहे की, मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळविण्यासाठी भारत सरकारकडे नेटाने पाठपुरावा करीत आहे. शासन मराठी भाषा भवन बांधण्याकरिता प्रयत्न देखील करीत आहे. मला वाटते गेल्या तीन ते चार वर्षापासून मराठी भाषा भवन बांधण्याच्या कामाचा विषय ज्या ठिकाणी पूर्वी रंगभवन होते त्या ठिकाणी करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत होता. या बांधकामाच्या संदर्भातील प्रगती आज काय आहे, याबाबत अभिभाषणात

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले...

कोठेही उल्लेख दिसून येत नाही. मराठी भाषेचे धोरण ज्या पध्दतीने अंमलात आणले जात आहे त्यासाठी विशेष कार्यक्रम हाती घेण्यात येणार आहे काय ? यासंदर्भातील स्पष्टता या मुद्यांमध्ये दिसून येत नाही.

सभापती महोदय, दुसरा विषय नाशिक येथे भरविण्यात येणाऱ्या कुंभमेळ्याचा आहे. नाशिकचे पालकमंत्री येथे उपस्थित आहेत. सिंहस्थ कुंभ मेळा भरण्याच्या तारखा अगोदर ठरतात, त्याचे नियोजन आधीपासून सुरु असते. नाशिकच्या कुंभमेळ्याबाबत लक्ष घालण्यास सुरुवात केल्यापासून त्या नियोजनात ज्या त्रुटी आढळून आल्या आहेत, त्याचा पाठपुरावा करावा. महत्वाची बाब अशी आहे की, नाशिक येथील गोदावरी नदीवर कुंभमेळ्याच्या काळात जास्तीत जास्त अत्याचार होऊन तेथे प्रदूषण खूप मोठ्या प्रमाणात वाढते. याचा बंदोबस्त केला नाही तर सुप्रीम कोर्टाने सांगितल्याप्रमाणे कुंभमेळा भरवावा किंवा नाही, असा प्रश्न उपस्थित झालेला आहे. इतकी तातडीचे गरज असताना यासाठी ज्या उपाययोजना करण्यात येणार आहेत त्या कोठपर्यंत आल्या आहेत, याचा उल्लेख राज्यपाल महोदयांच्या भाषणात करण्यात आला नाही.

सभापती महोदय, वेगवेगळ्या ठिकाणी हायकोर्टाची खंडपीठे तयार करण्यात येत आहेत. नाशिकमध्ये यासंदर्भातील पूर्व तयारी झालेली असताना यापुढील कार्यवाही राज्य शासन करणार आहे किंवा नाही याबाबतची स्पष्टता या अभिभाषणात करण्यात आली नाही. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांचे विषय आहेत, एपीलए धारकांचा धान्य पुरवठा बंद करण्यात आला आहे. टंचाईमुक्त गावे करण्याची घोषणा करण्यात आली आहे, त्याची अंमलबजावणी प्रत्यक्षात करताना काळ, काम व वेग यांचे गणित आपणाला करायला पाहिजे. त्याचा अभ्यास शासनाने केला आहे काय ? शासनाने अनेक योजनांची नावे बदलून त्यांना नव्या स्वरुपात सादर करण्याचा अट्टाहास करण्यात आला आहे. तो आता केव्हा तरी थांबवावा लागणार आहे. 100 दिवसापेक्षा जास्त दिवस आता हे सरकार सत्तेवर आले आहे. त्यामुळे जुनी दुखनी उगाळत बसण्यापेक्षा नवीन काय करण्यात येणार आहे. यावर अधिक लक्ष दिले तर महाराष्ट्रातील जनतेला दिलासा मिळाल्याशिवाय राहणार नाही.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सभापती महोदय, केंद्र सरकारने पूर्वीच्या काळातील नियोजन आयोग रद्द केला असून आता निती आयोगाची स्थापना करण्यात आली आहे. यामध्ये काही महत्वाच्या विषयांसाठी मुख्यमंत्री महोदयांचे गट नियुक्त करण्यात आले आहेत. देशातील 12 मुख्यमंत्री महोदयांचा एक

...4..



श्री.हेमंत टकले...

उप गट स्थापन करण्यात आला आहे. दुर्दैवाने त्या उप गटामध्ये महाराष्ट्रातील मुख्यमंत्री महोदयांना स्थान मिळालेले नाही. महाराष्ट्र हे देशातील पहिल्या क्रमांकाचे राज्य आहे. देशाच्या जीडीपीमध्ये सर्वात जास्त वाटा महाराष्ट्र राज्याचा आहे. देशात सर्वात जास्त कर संकलन महाराष्ट्रात होते. असे असताना देखील उप गटात महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री महोदयांना का स्थान देण्यात आले नाही. या प्रश्नांचे उत्तर मुख्यमंत्री महोदयांकडून आम्हाला मिळण्याची अपेक्षा आहे. देशात महाराष्ट्राचे व मुंबईचे जे महत्व आहे ते कमी करण्याच्या दिशेने केंद्र सरकार पावले टाकत आहेत काय याचा विचार करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, दुसरा प्रश्न कापसाच्या किंमतीच्या संदर्भातील आहे. कापसाची मिनिमम सपोर्ट प्राईज गुजरात राज्य जास्त दिली जाते, असा उल्लेख करण्यात आला आहे. गुजरात मधील भारतीय किसान संघ म्हणजे भारतीय जनता पक्षाच्या एका संघटनेने कापसाला योग्य भाव मिळत नाही. म्हणून तेथे आंदोलन केले आहे. त्यामुळे सरकार वारंवार गुजरात राज्याचा उल्लेख ज्यावेळी करते तेव्हा तेथील खरी परिस्थिती काय आहे, हे जाणून घेऊन निवेदन केले तर त्यासंर्भातील स्पष्टता अधिक चांगल्या प्रकारे होईल. गुजरात येथे आपल्या राज्याचे मुख्यमंत्री गुंतवणुकीसाठी आणि मेक इन महाराष्ट्रासाठी एका परिषदेला जाऊन आले होते. त्यांच्याच शब्दात सांगायचे झाले तर..."Maharashtra has constantly rank no. 1 State for investment in this country. Between April and October this year the State witnessed a foreign direct investment FDI, Equity in flow of 20193 billion."

या नंतर श्री.बोरले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

आपल्या राज्यात एवढी गुंतवणूक होत असताना आपल्याकडे हा दुजाभाव का निर्माण केला जात आहे, याबद्दलची स्पष्टता आपल्या विवेचनामध्ये यावयास पाहिजे.

सभापती महोदय, मंत्रिमंडळातील मंत्री माननीय मुख्यमंत्री महोदयांच्या नेतृत्वाखाली काम करीत असतात. आपण प्रशासनाच्या दृष्टीने जी काही फेररचना केलेली आहे त्यामुळे खरोखरच प्रशासन गतीमान झालेले आहे काय किंवा प्रशासनाला खीळ बसलेली आहे काय, याबाबत खुलासा होण्याची आवश्यकता आहे. मंत्रिमंडळाची जेवढी सदस्य संख्या असते तेवढे मंत्री कदाचित मंत्रिमंडळात नसतील. त्यामुळे काही मंत्र्यांवर कामाचा अधिक ताण पडत असेल हे जरी जाणून घेतले तरी राज्यातील एकूण प्रश्नांचा मुकाबला करण्यासाठी या व्यवस्थेमध्ये आपल्याला अधिक सुसूत्रता आणता येईल काय, याबाबत माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात कोणताही उल्लेख आलेला नाही. महाराष्ट्रातील जनतेने आपल्याला 5 वर्षे राज्यकारभार करण्याची संधी दिलेली आहे. आपण घाईगडबडीत एका वर्षातच सर्व चमत्कार करण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता नाही. आज राज्यात काय परिस्थिती आहे ? आज राज्यातील सामान्य जनतेला सुरक्षित वाटते काय, महिलांना सुरक्षित वाटते काय, रस्त्यावर होणाऱ्या अपघातांची संख्या कमी झालेली आहे काय आणि अपघात झाले तर त्यासाठी ज्या सोईसुविधा आहेत त्या योग्य आहेत काय ? राज्यातील शेतकऱ्यांवर जसे संकट येते त्या प्रमाणे सर्व सामान्य लोकांसमोर आरोग्याचा गंभीर प्रश्न उभा राहिलेला आहे. आज राज्यात स्वाईन फ्ल्यूचे अनेक रूग्ण आहेत. मला असे वाटते की, हा उल्लेख करणे करणे योग्य होणार नाही. आम्ही टी.व्ही. चॅनलवर भारतीय जनता पक्षाच्या प्रदेशाध्यक्षांचे बोलणे ऐकत असतो. आजची सभासद संख्या किती झाली, हे ते सांगतात. मला असे वाटते की, आपण स्वाईन फ्ल्यूच्या रूग्णांची संख्या सांगितली तर आपल्या राज्यकारभाराबाबत लोकांना काय वाटते हे लोकांना कळेल.

सभापती महोदय, सामाजिक सलोखा या विषयासंबंधी आपले शासन गंभीर आहे काय ? मी जाणीवपूर्वक हा उल्लेख करीत आहे. नागपूर येथील हिवाळी अधिवेशनाच्या वेळी मुस्लिमांच्या

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

पाच टक्के शैक्षणिक आरक्षणाला हायकोर्टाने धक्का लावलेला नव्हता. ते सुरु ठेवण्याची आपली नैतिक जबाबदारी होती आणि इतर आरक्षणाबरोबर मुस्लिम आरक्षणासाठी सुप्रिम कोर्टात जाण्याची आवश्यकता होती. त्यावेळी शासनातर्फे उत्तर देण्यात आले की, आम्ही या संदर्भात सल्लामसलत करीत आहोत, आम्ही ॲडव्होकेट जनरल यांचा सल्ला घेत आहोत आणि त्यानंतर यातून मार्ग निघेल. परंतु यातून मार्ग काढण्यासाठी आपण मनापासून प्रयत्न करीत आहात काय, या विषयी जनतेच्या मनामध्ये विश्वास राहिलेला नाही.

सभापती महोदय, मी राज्यातील कायदा व सुव्यवस्थेविषयी बोलणार आहे. मागील शासनाच्या काळात डॉ.नरेंद्र दाभोळकर साहेबांची हत्या झाली. त्यांच्या मारेकऱ्यांचा अद्याप तपास लागलेला नाही. त्यावेळी आपण सातत्याने सर्वांना धारेवर धरत होता. कॉ.गोविंद पानसरे यांची हत्या झाली. त्यांच्या मारेकऱ्यांचा देखील तपास लागत नाही. मला असे वाटते की, गृह खाते अत्यंत संवेदनशील पद्धतीने हाताळण्याची आवश्यकता असताना आणि गृह विभागाला दोन राज्यमंत्री असताना आपल्या विभागाकडून जनतेची जी अपेक्षा आहे ती पूर्ण होत नाही. म्हणून मला या विषयी खेद व्यक्त करावासा वाटतो.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणातील मुद्दा क्र.77 मध्ये सीमा भागातील नागरीकांना दिलासा देण्यासाठी शासन अत्यंत गंभीर आणि संवेदनशील आहे, असे नमूद केलेले आहे. मागील पानावरून पुढे सुरु असे हे सर्व आहे. परंतु या संदर्भात कोठेही स्पष्टता दिसत नाही. बेळगाव आणि त्या परिसरातील मराठी माणसांवर होणारा अन्याय आपण सर्व लोक उघड्या डोळ्यांनी बघत आहोत. परंतु त्यासाठी ज्या काही उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे त्या केल्या जात नाहीत. तेथील मराठी शाळा, मराठी संस्कृती, तेथील मराठी माणसांच्या एकूण पद्धतीविषयी ज्या उपायोजना करावयास पाहिजेत त्या होताना दिसत नाहीत. त्यांना सामाजिक दृष्ट्या स्थिरता मिळण्याच्या दृष्टीने प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. सुप्रिम कोर्टात निकाल लागेल तेव्हा लागेल. परंतु ती जनता होरपळून निघत असताना त्यांना दिलासा देण्यासाठी आपण

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले........

एखादा अभ्यास गट तयार करुन, तेथील लोकांना आपल्या समवेत घेऊ, आपल्याला तेथे आणखी काय करता येईल, सामंजस्याने पुढील पाऊल कसे टाकता येईल, याबाबत विचार करण्याची आवश्यकता होती. मंत्रिमंडळाने याकडे लक्ष देण्याची अत्यंत आवश्यकता आहे, असे मला वाटते. या सर्व बाबींचा उल्लेख माननीय राज्यपालांच्या अभिभाषणात आलेला नाही. त्यामुळे मी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल तीव्र खेद व्यक्त करतो आणि थांबतो.

--------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : मी एक गोष्ट आपल्या निदर्शनास आणून देतो. आपण एका सन्माननीय सदस्याला बोलण्याची परवानगी द्यावी, अशी मला विनंती करता. माझ्याकडे अनेक सन्माननीय सदस्यांची नावे आलेली आहेत. त्यामुळे मी प्रत्येक सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली तर काय त्यात काय गैर आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दोन सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी द्यावी. ते सदस्य दोन मिनिटात महत्वाचे विषय मांडतील. उत्तराचे भाषण महत्वाचे आहे, याची मला कल्पना आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर सभागृहात सलग दोन दिवस चर्चा होत आहे.

**उप सभापती** : माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे म्हणणे मला मान्य आहे. परंतु, काल रात्री 8.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज सुरु होते. त्यावेळी आपण स्वतः सांगितले की, आता जे सन्माननीय सदस्य बोलत आहेत त्यांना ऑनलेग ठेवावे आणि उद्या सकाळी 10.00 वाजता विशेष बैठक घेऊन ही चर्चा पुन्हा सुरु करावी. त्या प्रमाणे आपण सकाळी 10.00 वाजता सभागृहाचे कामकाज सुरु केले. प्रत्येक वेळी जर अशा प्रकारे माझ्याकडे नावे येणार असतील तर सभापतीस्थानी असलेल्या व्यक्तीने काय करावयाचे ?

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, काल ज्या सन्माननीय सदस्यांची नावे आपल्याकडे दिली होती, तीच नावे आहेत.

**उप सभापती :** आता सन्माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांनी आपले भाषण सुरु करावे.

----------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये (नामनियुक्त) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर माझे विचार व्यक्त करण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावर काल चर्चा झाली आणि आजही चर्चा होत आहे. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये एकूण 101 मुद्दे आहेत. मी सांगू इच्छितो की, माननीय राज्यपालांचे अभिभाषण म्हणजे शासनाचा चेहरा असतो, आरसा असतो. त्या आरशामध्ये आपण राज्याचे भविष्य, विकास, संतुलित विकास बघतो. घटनेच्या अनुच्छेद 167 मध्ये मुख्यमंत्री महोदयांची कर्तव्ये नमूद केलेली आहेत. घटनेच्या अनुच्छेद 167 मध्ये असे नमूद केलेले आहे की, "राज्यपालांना माहिती पुरवणे, इत्यादींबाबत मुख्यमंत्र्याची कर्तव्ये- (क) राज्याच्या कारभाराच्या प्रशासनासंबंधीचे मंत्री परिषदेचे सर्व निर्णय व विधिविधानाकरिता आलेले सर्व प्रस्ताव राज्यपालांना कळविणे, (ख) राज्याच्या कारभाराच्या प्रशासनासंबंधी व विधिविधानाकरिता आलेल्या प्रस्तावासंबंधी राज्यपाल मागतील ती माहिती पुरविणे आणि (ग) ज्या बाबीवर एखाद्या मंत्र्याने निर्णय घेतलेला आहे, पण मंत्री परिषदेने जिचा विचार केलेला नाही अशी कोणतीही बाब, राज्यपालांनी आवश्यक केल्यास, मंत्री परिषदेच्या विचारार्थ सादर करणे, हे प्रत्येक राज्याच्या मुख्यमंत्र्यांचे कर्तव्य असेल."

सभापती महोदय, राज्याच्या विकासाविषयी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये कोणताही उल्लेख दिसत नाही. आपण आघाडी शासनाच्या काळातील योजना बघितल्या तर आपल्या लक्षात येईल की, कै.आर.आर.पाटील साहेबांनी राज्यातील डान्सबार बंद करुन महिलांचे कुंकू वाचविले, त्यांनी महात्मा गांधी तंटा मुक्ती योजना सुरु केली, संत गाडगेबाब ग्राम स्वच्छा अभियान सुरु केले, तंबाकू आणि गुटखा बंद केला, रमाई योजना सुरु केली. "बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ" हा प्रस्ताव देखील येथे आला आणि महत्वाचे म्हणजे शिक्षण हक्क कायदा देखील लागू केला. आपण जन धन योजना सुरु केली. परंतु शेतकऱ्यांच्या खात्यात एक पैसाही जमा झालेला नाही.

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश गजभिये.....

मिहान प्रकल्प पूर्ण झालेला नाही. इंदू मिलच्या जागेवरील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाचा प्रश्न अनिर्णित आहे. चार दिवसांपूर्वी आम्ही सर्व पक्षीय आमदारांनी माननीय पंतप्रधानांची भेट घेतली. त्यांच्याकडे या स्मारकाच्या प्रस्तावाबाबत विचारणा केली असता असे सांगण्यात आले की, हा विषय राज्याचे मुख्यमंत्री हाताळत आहेत. त्यानंतर आम्ही माननीय मुख्यमंत्र्यांना भेटलो. आम्ही केंद्रीय मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांचीही भेट घेतली होती. अजूनही निर्णय झालेला नाही. इंदू मिलची 12.5 एकर जमीन अद्याप राज्य शासनाकडे हस्तांतरित झालेली नाही. 14 एप्रिल पूर्वी ही जमीन राज्य सरकारकडे हस्तांतरित करणार आहात काय? एवढे बोलून वेळेअभावी मी माझे भाषण पूर्ण करतो.

-------

.2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती** : मी माननीय मुख्यमंत्र्यांना त्यांनी उत्तराचे भाषण सुरु करावे अशी विनंती करतो.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, आपण भाषण करण्याकरिता तीन सदस्यांची नावे उच्चारली होती, त्यामध्ये माझे नाव होते. या तीनही सदस्यांना बोलायची संधी दिली जाईल असे आपण सांगितले होते. म्हणून मी आसनस्थ झालेलो आहे. आपण मला बोलायची संधी देणार नसाल तर मी बायकॉट करतो.

**उप सभापती** : त्यावेळी आपण विनंती केल्याप्रमाणे मी माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर यांना बोलायची संधी दिली.

श्री.माणिकराव ठाकरे : आपण माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये यांना बोलायची संधी दिली.

**उप सभापती** : मी त्यांना परवानगी दिलेली नव्हती. ते स्वतः उठून उभे राहिले आणि त्यांनी भाषण करण्यास सुरुवात केली.

श्री.माणिकराव ठाकरे : मला आपण भाषण करण्यास परवानगी दिली होती. परंतु मला बोलू देणार नसाल तर मी निषेध करतो.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस (मुख्यमंत्री) : सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस, माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, जयंत पाटील, शरद रणपिसे, प्रा.अनिल सोले, ॲड.निरंजन डावखरे, सर्वश्री अनंत गाडगीळ, कपिल पाटील, भाई गिरकर, ॲड.अनिल परब, सर्वश्री किरण पावसकर, रामहरी रुपनवर, महादेव जानकर, अमरसिंह पंडित, चंद्रकांत रघुवंशी, आनंद ठाकूर, ॲड.जयदेव गायकवाड, प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री हेमंत टकले आणि प्रकाश गजभिये यांनी या ठिकाणी आपली मते व्यक्त केली. अनेक माननीय सदस्यांनी टीका केली. काही उपयुक्त सूचना देखील केल्या आहेत.......(अडथळा).....सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये सुमारे 20 माननीय सदस्यांनी सहभाग घेतला. प्रामुख्याने महाराष्ट्र राज्याचे धोरण काय आहे....(गोंधळ)..

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

सभापती महोदय, माननीय सदस्यांना नेमके काय करायचे आहे, सभागृहातून बाहेर जाणार आहेत की जागेवर बसणार आहेत? बाहेर जात होते तर थांबले का? एक तर त्यांनी जागेवर बसावे किंवा बाहेर जावे.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

विविध विषयावर या ठिकाणी माननीय सदस्यांनी मते व्यक्त केली आहेत. विशेषत: राज्यातील शेतक-यांची अवस्था काय आहे या संदर्भात मोठया प्रमाणात भाष्य केले गेले. राज्यामध्ये यावर्षी मोठा दुष्काळ पडला. सुमारे 24 हजार गावांमध्ये टंचाईची परिस्थिती निर्माण झाली. राज्य सरकारने 4000 कोटी रुपये आकस्मिकता निधीतून उपलब्ध करुन दिले......(अडथळा).... सभापती महोदय, आपण मला संरक्षण द्यावे. माननीय सदस्यांच्या काही भावना असतील तर त्या मांडता येतील. परंतु त्यांनी माननीय सभापतींवर अशा प्रकारे हेत्वारोप करणे योग्य नाही. माननीय सभापती कोणाच्या इशाऱ्यावर काम करीत नसतात. माननीय सभापती सभागृहाचे कामकाज चालवित असतात. आपण माननीय सदस्यांना समज द्यावी.

(विरोधी पक्षाचे काही सन्माननीय सदस्य सभागृहात घोषणा देत असतात)

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती :** मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्या निदर्शनास आणू इच्छितो की, मी सभागृहात शेवटी तीन नावे उच्चारली ही वस्तुस्थिती आहे. परंतु त्यावेळी हेही सांगितले होते की, काल सभागृहाची बैठक रात्री 8.00 वाजता संपली. त्यावेळी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते हे सभापतीस्थानी बसलेले होते. त्यापूर्वी मी स्थानापन्न होतो. त्यावेळी मी आणखी किती वक्ते बोलणार आहेत हे सांगितले होते. त्यानंतर माननीय विरोधी पक्षनेत्यांनी उठून सांगितले की, सभागृहाचे कामकाज आता थांबवावे, माननीय सदस्य श्री.रामहरी रुपनवर यांना ऑन लेग ठेवावे आणि उद्या सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेण्यात यावी. त्यानंतर तालिका सभापती श्री.रामनाथ मोते यांनी सभागृहाची बैठक स्थगित करीत असताना उद्या सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक घेण्यात येईल असे जाहीर केले. माननीय सदस्यांच्या आग्रहानुसार हे झालेले आहे. सभागृहाची बैठक रात्री 8.00 वाजता स्थगित केली गेली, कारण तुम्हाला जायचे होते. आम्ही आमचे कर्तव्य पार पाडत होतो. रात्री आम्ही सर्वजण थांबलो होतो. मी स्वत: थांबलो होतो, माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते थांबले होते आणि सभागृह चालू होते. विरोधी पक्षनेत्यांनी उठून सांगितले की, भाषण करणाऱ्या माननीय सदस्यांना ऑन लेग ठेवावे.

आपण म्हणालात की, मला बोलायची संधी दिली गेली नाही. म्हणून मी आपले नाव पुकारले आणि मी दालनात गेलो. त्यानंतर तुम्ही भाषण केले. आज सकाळी 10.00 वाजता सभागृहाची विशेष बैठक सुरु झाली त्यावेळी सभापतीस्थानी माननीय तालिका सभापती श्री.रामनाथ मोते स्थानापन्न झाले. त्यानंतर मी स्थानापन्न झालो त्यावेळी तीन वक्त्यांची नावे शिल्लक होती. तीनही नावे मी पुकारली. माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांचे नाव पुकारल्यानंतर ते म्हणाले की, मी आता बोलणार नाही. मग मी माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांचे नाव पुकारले. आपण म्हणालात की, त्यांना बोलायला द्या. मी त्यांना बोलायची संधी दिली. मी हेही सांगितले की, माननीय मुख्यमंत्री या ठिकाणी उपस्थित झालेले आहेत आणि ते 11.15 वाजता उत्तराचे भाषण सुरु करतील. सभागृहाला हे ज्ञात आहे. अशी वस्तुस्थिती असताना सभागृहाचे सदस्य अशा प्रकारे आम्हाला कोंडीत पकडत असतील तर आम्ही कोणत्या प्रकारे काम करायचे?

...5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती......**

माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना मी बोलण्याची विनंती केली त्यावेळी त्यानी त्यांच्या पक्षाच्या दुस-या सदस्यांना संधी दिली. परंतु मी आपल्याला दोष देत नाही. या ठिकाणी माननीय मुख्यमंत्री आल्यानंतर त्यांना देखील आपण थांबविले. माननीय सदस्य श्री.प्रकाश गजभिये हे स्वत: उठून उभे राहिले आणि त्यांनी भाषण सुरु केले. मी त्यांना बोलण्याची अनुमती दिली नव्हती. अशा परिस्थितीत सभागृहात सभापतीस्थानी बसलेल्या पीठासीन अधिकाऱ्यांनी काय करायचे?

नंतर एम.1..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती**....

प्रत्येकाने आपल्या मर्यादा ओळखल्या पाहिजेत. आमच्याकडून काही चूकत असेल तर मी क्षमा मागतो. पण आपण आमचा जाहीर निषध करता हे बरोबर नाही.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, कोणाला काय वाटते म्हणून आपण क्षमा मागण्याची आवश्यकता नाही. वाटल्यास आम्ही आपली क्षमा मागतो. जे कोणी आपला निषेध करीत असतील त्यांचा आम्ही धिक्कार करतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, काल मी आपणास सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याशी चर्चा करूनच सभागृहाचे कामकाज रात्रौ 8.00 वाजता स्थगित करावे अशी सूचना केली होती व त्यावेळी उद्या सकाळी 10.00 वाजता राहिलेल्या सन्माननीय सदस्यांना आपले विचार मांडण्याची संधी द्यावी अशी विनंती केली होती आणि त्याप्रमाणे निर्णय झाला. त्यानंतर काही सन्माननीय सदस्य कमी अधिक वेळ बोलले. मी विरोधी पक्ष नेता या नात्याने माझे विचार मांडलेले नाहीत. काँग्रेस पक्षाकडून जेवढी यादी आली होती त्यापैकी जवळ जवळ 80 टक्के सन्माननीय सदस्य बोलले आहेत. आमच्याकडून देखील काही सदस्य बोलावयाचे राहून गेलेले आहेत. तेव्हा माननीय सभापतींचा निषेध होणे हे चुकीचे आहे. ते जर रेकॉर्डवर आले असेल तर आपण रेकॉर्डवरून काढून टाकावे. माझी सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांना विनंती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषण सुरू केलेले आहे. त्यामुळे आपण त्यांचे भाषण ऐकून घ्यावे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, येथे न्याय देण्याचा विषय हा महत्त्वाचा आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, येथे न्याय देण्याचा विषय नाही. आम्ही सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्याशी चर्चा करूनच निर्णय घेतला होता.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, काल माझ्याशी सन्माननीय विरोधी पक्ष नेते यांनी सभागृह किती वाजेपर्यंत चालवायचे यासंबंधात चर्चा केली होती आणि त्या अनुसार रात्रौ 8.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज चालविण्याचा निर्णय झाला व उद्या सकाळी विशेष बैठक घेण्याचे ठरले. त्याअनुसार आज सकाळी 10.00 वाजता चर्चेला सुरुवात झाली. या चर्चेमध्ये सर्वच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे...

सन्माननीय सदस्यांनी भाग घेतला आहे. माननीय मुख्यमंत्री सदनामध्ये येण्यापूर्वी सर्वांची भाषणे आटोपली पाहिजेत असे सांगितले. माननीय मुख्यमंत्री येण्याला 20 मिनिटे असल्यामुळे दोनच सन्माननीय सदस्यांनी बोलावे अशी सूचना आपण केली. त्यावेळी आम्ही सन्माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे बोलतील असे सांगितले. त्याप्रमाणे आपण एकूण तीन नावे निश्चित केली व त्यांच्या नावांचा उल्लेख देखील केला. माझे तिसऱ्या क्रमांकावर नाव येईल म्हणून मी शांत बसलो. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी सांगितल्याप्रमाणे आपण 1-2 सन्माननीय सदस्यांना संधी दिली. त्याबद्दल काहीच गैर नाही. पण या चर्चेतून माझेच नाव बाजूला जावे हे काही योग्य नाही. यासंबंधी माझे एवढेच म्हणणे आहे की, आपण मला काहीना काही बोलायला संधी द्यायला पाहिजे होती. निदान एक-दोन मिनिटे बोलण्यास संधी द्यायला पाहिजे होते. माझे नाव उच्चारून खाली बसावयास सांगितले असते तरी चालले असते. कारण तो आपला अधिकार आहे. आपणच सूचित केल्यानुसार मला बोलायला संधी मिळत नसेल तर तो हक्क मिळवून घेणे माझे काम आहे. मला संधी मिळायला पाहिजे होती एवढेच माझे म्हणणे होते. माननीय मुख्यमंत्री एका विशिष्ट वेळी आले होते याची मला कल्पना होती. त्यांना भाषण सुरू करावयाचे होते ते मला माहीत होते. जास्त वेळ घेता येणार नाही हे मला माहीत होते. पण खालून सन्माननीय सदस्य श्री.सुनीलजी तटकरे सांगतात की, माननीय मुख्यमंत्र्यांनी उभे रहावे. सभागृहात अशाप्रकारे हातवारे केले जात असतील तर ते योग्य नाही.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहतात.)

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, खालून कोणीही कशाप्रकारचा इशारा केला नव्हता. सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांची नावे जाहीर केली होती. तो आपलाच अधिकार आहे.

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना विनंती करतो की, कृपा करून त्यांनी खाली बसावे. माननीय मुख्यमंत्री हे त्यांनी दिलेल्या वेळेनुसार सभागृहात हजर झालेले आहेत हे मी सुरूवातीलाच सांगितले होते. आता जे झाले ते झाले....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मला आपण दोन मिनिटे बोलण्याची संधी द्यावी.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषणास सुरूवात केलेली आहे. त्यामुळे आपल्याला परत मागे जाता येणार नाही. सन्माननीय सदस्य माननीय सभापतींचे ऐकत नसतील तर त्यांच्यावर कारवाई करावी लागेल. असा प्रकार होत असेल तर सभागृहाचे कामकाज कसे काय चालेल ? आपण बोलत असतानाच सन्माननीय सदस्य उभे राहतात. आपला निषेध करतात. त्यासाठी सभापती म्हणून आपणा स्वत:ला दिलगीरी व्यक्त करावी लागते. आपण योग्य ॲक्शन घेणार नसाल तर बेशिस्त वाढत जाईल. माननीय मुख्यमंत्र्यांचे भाषण सुरू झालेले आहे. त्यामुळे नियमाप्रमाणे सभागृहाचे कामकाज झाले पाहिजे.

**उप सभापती :** मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, संसदीय कामकाजानुसार माननीय मुख्यमंत्र्यांनी भाषणास सुरूवात केलेली आहे. आपणास भाषण करायला संधी दिली तर ती माझी मोठी चूक ठरेल. सन्माननीय मुख्यमंत्र्यांनी आपल्या भाषणास सुरूवात केलेली आहे. माझी सभागृहाला नम्र विनती आहे की, माननीय मुख्यमंत्र्यांचे माननीय राज्यपालांच्या अभिभषणावरील उत्तर शांातपणे एकून घ्यावे. मी सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांना विनंती करतो की, त्यांनी कृपया खाली बसावे.

श्री.चंद्रकांत पंडित : सभापती महोदय, आपण उभे असताना सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे कसे काय उभे राहातात.

(दोन्ही बाजूकडील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, चार हजार कोटी रूपये राज्य सरकारने आकस्किता निधीतून दिले आहे. त्यापैकी 78 टक्के निधीचे वाटप झालेले आहे. आपल्या राज्यातील 82 टक्के शेती ही कोरडवाहू आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी, राज्याच्या उत्पादकतेसाठी आपण वेगवेगळे कमिशन, कमिट्या नेमल्या. त्यात प्रत्येकाने सांगितले आहे की,

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

आपल्या राज्यातील 82 टक्के शेती ही कोरडवाहू असल्यामुळे शेतकऱ्यांची उत्पादकता वाढत नाही. तो फक्त एकाच पिकावर असतो. निसर्गाच्या अवकृपेमुळे शेतकऱ्यांच्या शेतीवर खूप मोठा परिणाम होत आहे. आम्ही या राज्यामध्ये सिंचनाचे खूप मोठे प्रकल्प घेतले. या राज्याची एकूण भौगोलिक परिस्थिती बघितल्यानंतर एक गोष्ट लक्षात येते की, आपल्या येथे फ्लो एरिगेशनकरिता काही मर्यादा आहे. आपण फ्लो एरिगेशन कुठे पर्यंत करू शकतो यासंबंधातील मर्यादा सन 1997 मध्ये जल सिंचन आयोगाने सांगितलेल्या आहेत. कोरडवाहू शेतकऱ्याला मॉईश्चर सिक्युरिटी दिली तरच या राज्यातील उत्पादकता वाढू शकते. एकीकडे आपले धोरण खूप मोठी धरणे बांधण्याचे होते. देशातील 40 टक्के मोठी धरणे आपल्या एका राज्यात आपण तयार करीत आहोत. या मोठ्या धरणांची आवश्यकता देखील आहे. ती अनावश्यक आहेत असे मी कधीच म्हणणार नाही. आज धरणातूनच पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणी आणि उद्योगांसाठी पाणी मिळत आहे. पण एक खूप मोठा भाग हा फ्लो एरिगेशनखाली कधीच येणार नाही. त्यासंदर्भात काम करण्याची आवश्यकता होती. श्री.यशवंतराव चव्हाणांपासून ते श्री.वसंतराव नाईकांपर्यंत सगळ्यांनी जलसंधारणाच्या माध्यमातून या राज्यामध्ये विकेंद्रीत पाण्याचे साठे तयार केले पाहिजेत अशा प्रकारची भूमिका मांडली.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

पण दुर्देवाने ते महाराष्ट्रात होऊ शकले नाही. आज राज्यातील जवळपास 40 हजार गावांपैकी 20 ते 22 हजार गावे सातत्याने टंचाईग्रस्त असतात. त्या गावांमध्ये ओलाव्याची सुरक्षा देऊ शकलो नाही तर आपण राज्यातील शेतकऱ्यांची अवस्था बदलू शकणार नाही. तेव्हा राज्य सरकारने महत्वाकांक्षी अशी "जलयुक्त शिवार योजना" हाती घेतली. यापूर्वी देखील अनेक योजना सुरु होत्या. पण आपण एकाला शर्ट घालत होतो, एकाला पँट घालत होता, एकाला टोपी घालत होतो, एकाला बनियान घालत होतो. आपल्याकडे वेगवेगळ्या प्रकारच्या 14 योजना चालू होत्या. ज्याला आपण थीम स्प्रेडिंग ऑफ रिसोर्सेस म्हणतो. आपण वर्षानुवर्षे काम करुन देखील विकेंद्रीत पाण्याचे साठे तयार करु शकलो नाही. राज्य सरकारने "जलयुक्त शिवार योजनेंर्तगत" वेगवेगळ्या 14 योजना एकत्रित केल्या, त्याचा कॉन्व्हर्जन्स केला. आपण कॉन्व्हर्जन्स करीत असताना पाणलोट विकास क्षेत्राच्या योजना वेगळ्या ठिकाणी चालवत होतो. दुसरीकडे विकेंद्रीत पाणी साठा तयार करण्यासाठी साखळी बंधारे तयार करीत होतो. तर तिसरीकडे शेततळे तयार करीत होतो. आपण पाणलोट क्षेत्राला काय आवश्यक आहे याची ट्रिटमेंट करीत नाही, तोपर्यंत आपण दुष्काळमुक्त होऊ शकत नाही. यासाठी आपण 14 योजना एकत्रित आणून "जलयुक्त शिवार योजना" तयार केली. आपण कॉन्व्हर्जन्स ऑफ स्कीम केली, तसेच कॉन्व्हर्जन्स ऑफ कमांड देखील केले. कारण या योजना वेगवेगळ्या विभागांमार्फत चालविल्या जात होत्या. आपण या योजना जी.आर.काढून एकत्रित आणल्या. या कामांचे विभाग वेगवेगळे राहिले तर एक विभाग दुसऱ्या विभागाशी समन्वय ठेवत नाही हे आपणास माहीत आहे. तेव्हा आपण कॉन्व्हर्जन्समध्ये सिंगल पॉईंट कलेक्टर नेमून त्यांना अधिकार दिले. ते कोणत्याही विभागाचे रिक्वीझीशन करु शकतात. कलेक्टर आणि सीईओ जि.प.यांच्यावर ही जबाबदारी दिलेली आहे. या कामाचे संनियंत्रण करण्याकरिता समिती तयार केली असून त्या समितीमध्ये पालकमंत्री, आमदार आणि खासदार यांचा समावेश आहे.

सभापती महोदय, आपण कामास सुरुवात केली असून या वर्षी 5 हजार गावे घेतली आहेत. त्यापैकी 2 हजार 741 गावांमध्ये कामास सुरुवात केली असून कामांची संख्या 6 हजार 121 आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

त्याशिवाय आपण वेगवेगळ्या योजनांमधील निधीमध्ये वाढ करुन अधिकचा निधी दिला. राज्य सरकारने गॅप फिलिंगकरिता हजार कोटी रुपये अधिकचे दिले. त्यापैकी 600 कोटी रुपयांची कामे सुरु केली आणि 400 कोटी रुपये आता वितरित केले आहेत. "जलयुक्त शिवार योजना" ही सत्तारुढ पक्षाची योजना नाही. ही महाराष्ट्राची योजना आहे. अनेक भागांमध्ये वेगवेगळ्या पक्षाच्या आमदारांनी स्वत: लक्ष घालून त्यांच्या भागात कामे सुरु केली. मी येथे दाव्याने सांगतो की, आमदारांनी त्यांच्या भागात लक्ष घातले तर या योजनेच्या माध्यमातून त्यांच्या भागांमध्ये ते मोठे परिवर्तन करु शकतील.

सभापती महोदय, मराठवाडा विभागामध्ये "जलयुक्त शिवार योजनेच्या" माध्यमातून विकेंद्रीत साठे तयार केले तर 14 लाख हेक्टर जमीन पाण्याखाली येऊ शकते. मराठवाड्यातील परभणी भागामध्ये कॅचमेंट एरिया असल्यामुळे तेथे जलसंधारणाची कामे घेता येत नाहीत. आपण कॅचमेंट एरिया म्हणायचे परंतु गेल्या पाच वर्षात कॅचमेंट एरियामध्ये पाणी आले नाही आणि पुढील दोन वर्षात पाणी येण्याचे कोणतेही चान्सेस नाही म्हणजे त्यांचे दोन्ही बाजूंकडून मरण. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी या म्हणीप्रमाणे स्थिती झालेली आहे. कॅचमेंट एरिया असल्यामुळे जलसंधारणाची कामे घेता येत नाहीत आणि दुसरीकडे कॅचमेंट एरियामध्ये पाणी येत नाही. तो सर्व टेलचा भाग आहे. तेव्हा आपण निर्णय घेतला की, ज्या ठिकाणी कॅचमेंट एरिया असेल आणि जलसंपदा विभागाने त्या ठिकाणी दोन वर्षात पाणी आले नाही आणि पुढील वर्षात पाणी येण्याची शक्यता नाही असे सांगितले तर त्या ठिकाणी जलसंधारणाच्या कामास सुरुवात करायची.

**उप सभापती** :सभागृहाची वेळ दुपारी 12.15 पर्यंत होती. सभागृहाची वेळ मुख्यमंत्री महोदयांचे उत्तराचे भाषण पूर्ण होईपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, आपण "जलयुक्त शिवार योजनेच्या" माध्यमातून कामे सुरु केली आहेत. यामध्ये लोक सहभाग महत्वाचा आहे. जलसंपदा विभागामध्ये आणि इतर विभागांमध्ये असलेल्या मशिनरी आयडीयल पडून होत्या त्या सर्व मशिनरी मराठवाड्यामध्ये

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

हलविण्यात आल्या. एकेका जिल्ह्यामध्ये 12-15 मशीन्स पाठविल्या आहेत. पोकलेनसारख्या मशीन्स पाठवून कामे सुरु केली आहेत. आपण काही ठिकाणी गाळ काढण्याचे काम सुरु आहे. काही ठिकाणी सिमेंट नाला बांध बांधत आहोत. काही ठिकाणी शेततळे घेत आहोत. काही ठिकाणी विहिरी देखील घेत आहोत. आपण अशी वेगवेगळी कामे हाती घेतली आहेत.

सभापती महोदय, आपल्याकडे जुने गाव तलाव आहेत, जुने कोल्हापुरी पदधतीचे बंधारे आहेत. पण त्यांच्या छोटया छोट्या दुरुस्ती अभावी ते निकामी ठरले आहेत. त्यामध्ये पाणी साठत नाही आणि त्याच्या दुरुस्तीसाठी आपल्याकडे हेड नाही. त्यावर जे पैसे खर्च केले हे वाहून गेले. आम्ही "जल युक्त शिवार योजने"खाली प्रत्येक गावाचा पाण्याचा ताळेबंद केला. तो करीत असताना गावातील इरिगेशनसाठी किती पाण्याची आवश्यकता आहे, गैरसिंचनासाठी किती पाण्याची आवश्यकता आहे, पिण्याच्या पाण्यासाठी किती पाणी आवश्यक आहे, अस्तित्वात असलेल्या स्ट्रक्चरमध्ये किती पाणी साठत आहे, त्याचे रिपेरींग केले तर किती पाणी साठवू शकतो, अजून किती स्ट्रक्चर तयार केले पाहिजे याचा आराखडा तयार केलेला आहे. आपणास या स्ट्रक्चरची देखभाल करायची असेल तर आमदार निधीमधून निधी देण्यास मान्यता दिलेली आहे.

सभापती महोदय, आम्ही ही योजना तयार केली त्यावेळी माननीय अण्णा हजारे आणि श्री.पोपटराव पवार यांच्याबरोबर वर्कशॉप घेऊन त्यांचे इनपुटस घेतले. या संदर्भातील जी.आर.काढल्यानंतर माननीय अण्णा हजारे यांनी एक शंका व्यक्त केली की, इतक्या मोठ्या संख्येने कामे सुरु होणार आहेत, त्या कामांचे संनियंत्रण कसे राहील, कामामध्ये गडबड झाली तर काय ? मग त्यांनी आम्हाला दोन गोष्टी सुचविल्या. पहिली गोष्ट म्हणजे जो काही आराखडा असेल तो ग्रामसभेने मंजूर केला पाहिजे आणि दुसरी गोष्ट म्हणजे काम झाल्यानंतर ग्रामसभेने त्यास कॉन्करन्स दिला पाहिजे. आम्ही त्याप्रमाणे जी.आर.काढून दोन्ही गोष्टींचा स्वीकार केलेला आहे.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, आपण प्रत्येक कामाचे जीओ ट्रॅकिंग करीत आहोत. काम सुरु होण्यापूर्वी त्या कामाचा फोटो काढून तो लॉन्गीटयुड व लॅटीटयुड सहीत वेवसाईटवर टाकण्यात येईल आणि काम झाल्यावर देखील त्याचे लॉन्गीटयुड व लॅटीटयुड सहीत टाकण्यात येईल. म्हणजे अगोदर कामाची काय स्थिती होती आणि आता काय स्थिती आहे याची माहिती वेबसाईटवर पाहता येईल. आपण नेहमी म्हणतो "पाणी अडवा, पाणी जिरवा पण त्याऐवजी पैसेच जिरवले जातात." परंतु आपण यामध्ये असे करण्याची संधी ठेवलेली नाही. आपल्या कामाचा पहिला टप्पा झाल्यानंतर माननीय विरोधी पक्ष नेते व ज्येष्ठ सन्माननीय सदस्य सर्वश्री सुनील तटकरे आणि माणिकराव ठाकरे यांच्या समोर वेबसाईट उघडून त्यातील रॅन्डमली एक फोटो सिलेक्ट करून त्य कामाची जुनी स्थिती काय होती आणि नवीन स्थिती आहे हे आपणास दिसेल. त्यानंतर आपण प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी गावामध्ये जाऊन झालेले काम खरे आहे किंवा कसे याची तपासणी करू. या माध्यमातून एक वेगळी व्यवस्था निर्माण होईल. आपण मॉईस्चर सिक्युरिटी देऊ शकलो, टंचाईमुक्त गाव करु शकलो तर महाराष्ट्रात निश्चितपणे परिवर्तन होईल. आमच्या शेतकऱ्यांची उत्पादकता वाढेल.एवढेच नाही तर आमच्या शेतकऱ्यांच्या शेतमालाला भाव मिळाला पाहिजे हा देखील आमचा प्रयत्न आहे.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

सभापती महोदय, अनेकदा तुमच्या काळात शेतीमालाला काय भाव दिला आणि आमच्या काळात काय भाव दिला या बाबतची तुलना केली जाते. या निमित्ताने मी सांगतो की, मिनिमम सपोर्ट प्राईस ही पध्दत आपल्याकडे असल्यामुळेच शेतकरी जगत आहे. मिनिमम सपोर्ट प्राईसची पध्दत आपल्याकडे नसती तर व्यापाऱ्यांनी शेतकऱ्यांची मोठ्या प्रमाणावर पिळवणूक केली असती. आज याच मिनिमम सपोर्ट प्राईसच्या माध्यमातून बाजारामध्ये कापसाचा भाव 3200-3300 रुपये आहे. आपण सीसीआयच्या माध्यमातून 1 कोटी क्विंटल कापूस खरेदी केला आहे. आपण शेतकऱ्यांच्या कापसाला 4 हजार रुपये भाव दिला आहे. त्यासाठी राज्य सरकारने आपल्या तिजोरीतून सुरुवातीला 800 कोटी रुपये आणि नंतर पुन्हा 700 कोटी रुपये, अशाप्रकारे एकूण 1500 कोटी रुपये दिले आहेत. महोदय, मिनिमम सपोर्ट प्राईसच्या संदर्भात सांगू इच्छितो की, ज्यावेळी युपीए सरकार सत्तेत होते त्यावेळी त्यांनी गॅट परिषदेमध्ये मिनिमम सपोर्ट प्राईस देता येणार नाही असा करार केला होता. मी माननीय मोदी सरकारचे अभिनंदन करतो की, त्यांनी जिनिव्हा येथील परिषदेमध्ये पूर्वीचा करार मोडण्याचे काम केले. त्यांनी त्या परिषदेमध्ये स्पष्टपणे सांगितले की, आमच्या शेतकऱ्यांना मिनिमम सपोर्ट प्राईस द्यावीच लागेल. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला मिनिमम सपोर्ट प्राईस दिली नाही तर आम्ही त्याला संरक्षित कसे करु ? त्यांनी सांगितले की, आम्हाला गॅट परिषदेमधून बाहेर टाकले किंवा आमच्यावर बहिष्कार टाकला तरी चालेल परंतु आम्हाला पूर्वीचा करार मान्य नाही, म्हणून आम्ही तो करार मोडत आहोत. महोदय, जगाच्या इतिहासात आपल्या देशाने गॅट परिषदेता अगोदरच्या सरकारने केलेला करार मोडला. हा करार मोडला तरी आपल्या देशावर कोणत्याही देशाने बहिष्कार टाकला नाही, ही चांगली बाब आहे. त्यामुळेच आज शेतकऱ्यांना मिनिमम सपोर्ट प्राईस मिळत आहे. या कारणामुळेच मेकॅनिझम तयार झाले आहे. या सर्व गोष्टींमुळे आज शेतकऱ्यांना काहीना काही देऊ शकतो. आज कापसाच्या भावाबाबत विचार केला तर देशातील सर्व राज्यांमध्ये कापसाला 3200-3300 रुपये भाव मिळत आहे. गुजरातमध्ये कापसाला 4 हजार रुपये भाव मिळाला आहे. त्याचे कारण त्या राज्यात शेतकरी थेट इंडस्ट्रीशी जोडला गेला आहे. त्यामुळे आपल्याला तशा प्रकारच्या चेन तयार कराव्या लागतील.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येऊ नये म्हणून मी सांगू इच्छितो की, गुजरातमध्ये आजचा कापसाचा दर कितीपासून सुरु झाला याची माहिती माझ्याकडे आहे. महाराष्ट्रात जो भाव निघाला आहे तेवढाच गुजरातमध्ये सुध्दा आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी सांगतो की, आपले सरकार हे गुजरातच्या पुढेच जाणार आहे. गुजरातला सुध्दा मागे टाकू, आपण चिंता करु नका. त्यासाठी आपल्या राज्यातील शेतकऱ्यांसाठी व्हॅल्यू चेन तयार करण्याची आवश्यकता आहे. जोपर्यंत आपण प्रोसेसिंग सुरु करणार नाही किंवा व्हॅल्यू चेन उभी करणार नाही तोपर्यंत काहीच हाती लागणार नाही.

महोदय, जुन्या सरकारने या बाबत चांगल्या प्रकारचे प्रयोग सुरु केले होते. पण ते स्कील्डवर नेण्याची आवश्यकता आहे. राज्यातील किमानपक्षी 25 लाख शेतकऱ्यांना व्हॅल्यू चेनमध्ये आणण्याची आवश्यकता आहे. एकीकडे मॉइश्चर सिक्युरिटी सुध्दा द्यावयाची आहे. महोदय, मराठवाडा आणि विदर्भात विशेषतः कृषीपंपांचा अनुशेष मोठ्या प्रमाणावर आहे. आपण शेतकऱ्यांसाठी पाण्याची व्यवस्था केली. परंतु कृषी पंपाचे उर्जीतीकरण केले नाही तर शेतकऱ्यांना फायदा मिळू शकत नाही. त्यामुळे यासाठी योग्य ती मदत करण्याचा आमचा प्रयत्न आहे. माननीय ऊर्जा मंत्री आणि माननीय वित्त मंत्र्यांना आम्ही विनंती केली आहे की, या वर्षीच्या अर्थसंकल्पात या गोष्टींसाठी जरूर तरतूद करावी. मागेल त्याला ऊर्जापंप अशी परिस्थिती विदर्भ, मराठवाडा आणि खानदेशात आणलीच पाहिजे. मी सन्माननीय सदस्यांना सांगतो की, कोकणात सुध्दा अनुशेष आहे, पण तो वेगळ्या प्रकारचा आहे. त्याकडे सुध्दा लक्ष देणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या मदतीबाबतचा उल्लेख केला. मी सांगू इच्छितो की, शासनाने जाहीर केलेल्या मदतीपैकी 78 टक्के शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे जमा झाले आहेत. उर्वरित ठिकाणी जमीन मालक उपलब्ध होत नसणे, 7/12 वर अनेकांच्या नावांच्या नोंदी असणे अशा अनेक अडचणी आडव्या येत आहेत. त्या अडचणी दूर करीत आहोत. त्या ठिकाणी सुध्दा पैसे वितरित केले असून, ते जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत पोहोचले आहेत. आमच्या सरकारने शेतकऱ्यांचे तीन महिन्यांचे वीज बील माफ करण्यात येईल असे सांगितले होते. ते पैसे सरकारने भरले आहेत. तिसरी बाब म्हणजे कर्जाचे

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

पुनर्गठन करण्यात येईल असे आश्वासन सरकारने दिले होते. कर्जाच्या पुनर्गठनाचे पैसे सुध्दा सरकारने भरले आहेत. तसेच चौथी बाब म्हणजे, ज्यावर आपण भरपूर हल्ला केली ती खाजगी सावकारांच्या कर्जाबाबतची होय. ही गोष्ट खरी आहे की, या आश्वासनाची पूर्तता करण्यास आम्हाला थोडा उशीर झाला. खाजगी सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करीत असताना, त्यात अनेक प्रकारच्या अडचणींचा सामना करावा लागत होता. वास्तविक पाहता खाजगी सावकारीचे परवाने दोन प्रकारचे असतात. काही परवान्यांवर शेतीसाठी कर्ज देता येते आणि काही परवान्यांवर शेतीसाठी कर्ज देता येत नाही. काही परवाने हे 2013 च्या अगोदरचे आहेत. 2013 नंतरच्या परवान्यांचा प्रकार वेगळा आहे. यापेक्षा महत्त्वाची गोष्ट अशी लक्षात आली की, शेतकऱ्यांना कर्ज दिल्यानंतर सावकारी हुशारी करतात. त्यांनी शेतीसाठी कर्ज दिलेले असताना सुध्दा ते शेतीसाठी दिल्याचे दाखवत नाहीत. या संदर्भात आम्ही प्रत्येक प्रकरणाचा अभ्यास केला. मी माननीय सहकार मंत्र्यांचे अभिनंदन करतो. त्यांनी या प्रकरणी काय अडचणी येतात ते वारंवार मंत्रिमंडळाच्या निदर्शनास आणून दिले. मंत्रिमंडळाने या बाबत अंतिम निर्णय घेतला आहे. होय, आपण म्हणता त्यानुसार या बाबतचा अंतिम निर्णय कालच झाला आहे. त्या निर्णयानुसार जे शेतकरी गावात राहतात, ज्यांच्याकडे जमीन आहे, 7/12 वर त्यांच्या नावाची नोंद आहे, ज्यांच्या शेतीमध्ये पेरणी झाली आहे अशा प्रत्येक शेतकरी आणि त्याचे कुटुंब यामध्ये कव्हर केले आहे. अनेकदा शेतकऱ्याने आपल्या पत्नी आणि मुलांच्या नावे कर्ज घेतलेले असते. त्यामुळे शेतकरी, त्याची पत्नी, मुलगा, सून, आई-वडील, अविवाहीत मुलगी यांना कुटुंबाच्या व्याख्येमध्ये कव्हर केले आहे. परंतु यामध्ये अट अशी टाकली आहे की, तो नोकरी करणारा असू नये. कारण अनेक शेतकऱ्यांच्या कुटुंबातील व्यक्ती शहरात नोकरी करीत असते. अशा शेतकऱ्यांकडे उत्पन्नाचा स्त्रोत असतो. त्यांनी सावकारांकडून केवळ शेतीसाठीच कर्ज घेतले असेल असे नाही. त्यामुळे मी वर उल्लेख केल्याप्रमाणे अशा सर्व शेतकऱ्यांना कव्हर करून सरसकट कर्जमाफीचा निर्णय मंत्रिमंडळाने घेतला आहे. याचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर लाभ मिळेल. या कर्जमाफीचा लाभ मिळणाऱ्या शेतकऱ्यांचा प्राथमिक आकडा हा अंदाजे दोन ते अडीच लाखांच्या दरम्यान असेल. सावकारांकडून घेतलेल्या कर्ज माफीचा निर्णय घेत असताना अनेक अडचणी समोर होत्या. आम्हाला काहींनी सांगितले की, सरसकट कर्जमाफी दिल्यास त्या बाबतचा आक्षेप सीएजीच्या



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

अहवालात येईल. आम्ही त्यांना सांगितले की, आम्ही शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न करीत आहोत. त्यामुळे या संदर्भातील वस्तुस्थिती आम्ही सीएजीला समजून सांगण्याचा प्रयत्न करू.

सभापती महोदय, माननीय पंतप्रधानांनी राज्यात जी समिती पाठविली होती त्या समितीच्या अहवालात स्पष्टपणे नमूद केले आहे की, राज्यात आत्महत्या करण्याची अनेक कारणे असली तरी त्यातील एक महत्त्वाचे कारण हे सावकारांकडून घेतलेले कर्ज आहे. या बाबतीत राज्य सरकारने पावले उचलली आणि अवैध सावकारीला प्रतिबंध घालण्याबाबतचा कायदा संमत केला. वैध आणि अवैध सावकारी या दोन्ही पाशातून शेतकऱ्यांची सोडवणूक करून त्यांना मदत करण्याचा आमचे शासन प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, शेतकऱ्यांसाठी राज्य सरकारने ज्या वेगवेगळ्या योजना हातामध्ये घेतल्या आहेत त्या दीर्घकालीन स्वरुपाच्या आहेत. कृषीपंपांच्या बाबतीत मी अगोदरच सांगितले आहे. राज्य सरकारने सोलार पंपाची योजना आणली आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

हा पायलट प्रोजेक्ट आहे. आपल्याला 5 लाख पंप लावायचे आहेत. त्यामुळे आपल्याला फेल्युअर चालू शकत नाही. पायलट प्रोजेक्ट असल्यामुळे आताच 10 हजार पंप लावण्याची आपण सुरूवात करीत आहोत आणि त्या संदर्भात शासन निर्णयही काढला आहे. आपल्याला 10 हजार पंपाच्या संदर्भात काय फिडबॅक आहे, त्यात काही अडचणी येतात याचा विचार करून फायनल 5 लाख पंपांचा कार्यक्रम हाती घ्यायचा आहे आणि ते करताना आपण 10 ते 15 वर्षांचे मेंटेनन्स कॉंट्रक्टही करणार आहोत. विभागाने त्या संदर्भात पुरवठादारांच्या बैठकीत बोलणी करून त्यांना कंडिशन्स टाकल्या आहेत आणि त्यांनी देखील त्या मान्य केल्या आहेत. विभागाने त्यांना सांगितले आहे की, तुम्हाला त्या त्या ठिकाणी स्किल डेव्हलप करून गावातीलच मुलांना शिकवावे लागेल, त्यांनाच समजावे लागेल. आपण अशा अनेक गोष्टी करीत आहोत.

श्री. हरिसिंग राठोड : सभापती महोदय, हे शेतकरी नाहीत. आपण याची परत चौकशी करावी.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना जे दिसले नाही ते आम्हाला दिसले आहे आणि त्यामुळेच आम्ही सत्तेत आलो आहोत.

सभापती महोदय, वेगवेगळे विषय समोर आले आहेत. मुंबईच्या विकास आराखड्याचा प्रश्न उपस्थित करण्यात आला. मुंबईच्या विकास आराखड्याच्या संदर्भात राज्य शासनाची भूमिका अतिशय स्पष्ट आहे. आपण हा विकास आराखडा आता कोणत्या स्टेजला आहे ते समजून घेतले पाहजे. प्रशासनाने हा विकास आराखडा तयार करून मनपाच्या पुढे ठेवला आहे. कोणत्याही शहराचे नियोजन करण्याचे सर्व अधिकारी त्या शहराला आहेत आणि शहराची बॉडी म्हणून मनपाला आहेत. त्यामुळे तेथील मनपा विकास आराखडा मनपा सभागृहात घेऊन त्यावर सजेशन-ऑब्जेक्शन मागवेल आणि मग ते आल्यानंतर त्यावर मनपाची कमिटी तयार होईल, जी प्रत्यक्ष सजेशन-ऑब्जेक्शनचा विचार करेल आणि मग त्यानंतर त्यांना जो काही निर्णय घ्यायचा असेल तो ते घेतील. मला विश्वास आहे की, भाजप-शिवसेनेकडे मुंबई मनपा असेपर्यंत मराठी माणसाच्या हिताचा विचार, सामान्य माणसाच्या हिताचा विचार, झोपडीत राहणाऱ्या गरिबाचा विचारच होईल.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

निश्चितपणे मनपाच्या माध्यमातून हा विकास आराखडा योग्य प्रकारे तयार करून त्यानंतर पुन्हा महासभेपुढे जाईल आणि त्यानंतर तो राज्य शासनाकडे येईल. राज्य सरकारच्या स्क्रिनिंग कमिटीपुढे तो विकास आराखडा जाईल आणि मग राज्य सरकार त्याला मान्यता देईल. अजून खूप स्टेप्स बाकी आहेत. त्यामुळे आपण काळजी करू नका. सर्वांचे हित, सामान्य माणसांचे हित पाहण्याचे कामच विकास आराखड्याच्या माध्यमातून करण्यात येईल.

सभापती महोदय, मुंबईतील ग्रीन स्पेसेस वाचिविल्या पाहिजेत आणि त्या वाचविण्याचे काम निश्चितपणे या विकास आराखड्याच्या माध्यमातून केले जाईल. मराठी माणसाच्या हिताचे काम या विकास आराखड्याच्या माध्यमातून केले जाईल. काही कारणास्तव एखादी बाब मनपाच्या अखत्यारितून सुटली तर पुन्हा आपल्याला संधी आहे. राज्य सरकारकडे विकास आराखडा आल्यावर पुन्हा आम्हा मंत्रिमंडळातील सदस्यांकडून त्यावर निर्णय घेण्यात येईल. त्यामुळे आज विकास आराखड्याने पॅनिक होण्याची आवश्यकता नाही. अजून खूप प्रोसेस बाकी आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, हा मुंबईचा विकास आराखडा चुलीत घाला असे उद्धवजी म्हणाले आहेत.

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सुनील तटकरे साहेब हे आज काल अर्धवट पेपर वाचत आहेत. पूर्ण पेपर वाचला असता तर त्यांना समजले असते, असे त्यांनी म्हटले नसते. उद्धवजी असे म्हणाले की, मराठी माणसाच्या हिताचा नसेल तर ... आपण हे वाचलेच नाही. तुम्ही फक्त वाचले की, उचला आणि चुलीत घाला. सभापती महोदय सन्माननीय सदस्यांनी काळजी करूनये.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री हे नगरविकास खात्याचे मंत्री आहेत. विकास आराखडा प्रसिध्दीला आला आहे. विकास आराखडा मनपाच्या महासभेपुढे ठेवला गेला, तो महासभेला मंजूर होता म्हणून हरकती-सूचना मांडण्यासाठी पुढे आला. उद्ध्वजी किंवा त्यांच्या सन्माननीय सदस्यांना अगोदर माहीत असते तर तेथेच त्यांनी तो विकास आराखडा नाकारला असता आणि सजेशन-ऑब्जेक्शनला तो गेलाच नसता असे मला सांगावयाचे आहे.

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य हे नगरविकास राज्यमंत्री होते. आम्हाला आठवते की, ते सुरूवातीला जोरदार, इफेक्टिव्हली, एफिशिएंटली भाषणे करीत होते. आपल्याला माहीत आहे की, विकास आराखडा बदलायचा असेल तर हीच प्रोसेस करावी लागेल. आता त्याला मान्यता दिलेली नाही. विकास आराखडा सजेशन-ऑब्जेक्शकरिता अग्रेषित केला आहे, जनतेला खुला केला आहे. राज्य शासनाच्या वतीने निश्चितपणे त्यावर उचित निर्णय घेतला जाईल.

सभापती महोदय, एक विषय असा आला की, आम्ही आरआरझेड पॉलिसी रद्द केली आणि आता नदीपात्रामध्ये उद्योगांना परवानगी देणार आहोत. राज्यामध्ये आरआरझेड पॉलिसी आली. 25 नद्या नोटिफाय करून शासनाने आरआरझेडची पॉलिसी तयार केली. पॉलिसी तयार झाल्याबरोबर पहिले काम असे झाले की, अस्तित्वात असलेल्या 5 एमआयडीसींवर प्रश्नचिन्ह उभे राहिले. कारण नवीन पॉलिसीमध्ये झिरो इंडस्ट्री देखील नदीच्या पात्रापासून 2 कि.मी. पर्यंत करता येणार नाही असे सांगितले. त्यामुळे अस्तित्वात असलेल्या एमआयडीसीचे उद्योग बंद करण्याशिवाय दुसरा पर्याय नाही. नंतरच्या काळात असे झाले की, वेगवेगळ्या इंडस्ट्रींकडून तक्रारी येऊ लागल्या. आम्ही त्या तक्रारी पाहिल्या. आमच्या असे लक्षात आले की, नद्यांचे प्रदूषण म्युन्सिपल डिस्चार्जमुळे 90 टक्के होते आणि इंडस्ट्रीमुळे 5 टक्के होते. नद्या 90 टक्के मनपा, नगरपालिका यांच्या थेट डिस्चार्जमुळे प्रदुषित होतात. शासनाकडे या संदर्भात वेगवेगळ्या केसेस आल्या. मी आपल्याला उदाहरणादाखल एक केस सांगतो. सरकारने पुण्याच्या लिफ्ट बनविणाऱ्या शिन्डलर या कंपनीला कन्सेंट टू एस्टॅब्लिश दिला. कंपनीला त्यानंतर पूर्ण बांधकाम करता येते. कन्सेंट टू एस्टॅब्लिश दिल्यानंतर कंपनीने बांधकाम पूर्ण केले. एन्व्हॉयरमेंट असेसमेंट सर्व केले होते. मग कन्सेंट टू ऑपरेट देण्यात आले. बांधकाम झाल्यानंतर हा शेवटचा टप्पा असतो. त्यावेळी कोणीतरी सांगितले की, ही इंडस्ट्री 2 कि.मी. नसून 1980 मीटरमध्ये येते. 20 मीटरकरिता आरआरझेड पॉलिसी ही नदी व्हायोलेट करीत आहे. कंपनीने तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हण यांना संगितले की, आमची झिरो डिस्चार्ज इंडस्ट्री आहे. त्यामुळे हे आम्हाला लागू करू नका. त्यांनी संगितले की, तुमचे म्हणणे बरोबर आहे. आम्ही कॅटेगरी बदलू. दरम्यानच्या काळात

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. देवेंद्र फडणवीस ....

ते करू शकले नाहीत. कारण काहीही असेल. त्या संदर्भात निर्णय झाला नाही. नंतरच्या काळात अशा गोष्टी समोर आल्यावर आम्ही निर्णय घेतला की, आपण झिरो डिस्चार्ज इंडस्ट्री, ज्याकडून पोल्यूशन होत नाही, नदीपात्रात ज्यांचा डिस्चार्ज जाणार नाही, अशांची कॅटेगरी बदलून दुसऱ्या कॅटेगरीमध्ये आणले पाहिजे. शासनाने तशी फाईल मूव्ह केली. विधी व न्याय विभागाला ती फाईल गेली असता त्यांनी सांगितले की, शासनाला ही पॉलिसी करण्याचा अधिकारच नाही. कारण केंद्र शासनाची पॉलिसी अस्तित्वात आहे. पॉलिसी केली त्यावेळी आम्हाला हे विचारलेले नाही. केंद्र शासनाच्या पॉलिसीपेक्षा वेगळी पॉलिसी सरकारला पर्यावरण कायद्याच्या या कलमाच्या अंतर्गत करता येत नाही. त्यामुळे यामध्ये तुम्हाला बदल करता येणार नाही. ही स्क्रॅप केली पाहिजे. ही पॉलिसी कॉन्ट्राविन करते. संविधानाने दिलेल्या अधिकारांचा यामुळे अधिक्षेप होतो. आम्ही त्यावर माहिती मागविली असता असे लक्षात आले की, केंद्रीय पॉलिसी आहेच. ही ॲडिशनल पॉलिसी तयार केली आहे. त्यमुळे ती स्क्रॅप केली. त्यानंतर नदीपात्रात वगैरे कोणालाही इंडस्ट्री लावण्याची परवानगी मिळणार नाही. कारण राज्यामध्ये सर्व केंद्रीय कायदे आजसुध्दा लागू आहेत. आजही इंडस्ट्री लावायची असेल तर पहिल्यांदा लोकेशनल क्लिअरनस घ्यावा लागेल, त्यानंतर एन्व्हॉयर इम्पॅक्ट ॲनॅलिसीस करून एन्व्हॉयरमेंट क्लिअरन्स घ्यावे लागेल. कन्से्ट टू एस्टॅब्लिश घ्यावे लागेल आणि त्यानंतर कन्सेंट टू ऑपरेट घ्यावे लागेल. सर्व केंद्रीय कायदे अस्तितवात आहेत. त्यामुळे ती पॉलिसी कायद्याने योग्य नव्हती असा सल्ला दिला. ती पॉलिसी केली असली तरी तेवढेच कडक कायदे केंद्राचे आहेत. सर्व राज्यांनी केंद्र शासनाचे कायदे स्वीकारले आहेत आणि ते कायदे आजही अस्तित्वात आहेत.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.......

सभापती महोदय, या चर्चेत स्वाईन फ्लुचा मुद्दा उपस्थित झालेला आहे आणि तो खरोखरच अतिशय महत्त्वाचा आहे. आज संपूर्ण देशात स्वाईन फ्लुचा मोठा प्रकोप आहे. आज ज्या प्रकारे अवेळी पाऊस पडतो आहे आणि टेम्परेचर खाली खाली जात आहे, ते बघता जो पर्यंत टेम्परेचर वाढत नाही, तो पर्यंत स्वाईन फ्लुचा संसर्ग कमी होणार नाही. देशातील अन्य राज्यात किती मृत्यू झाले, आपल्या राज्यात किती झाले, अशा प्रकारची तुलना करणे मला संयुक्तिक वाटत नाही. पण मी सांगू इच्छितो की, संपूर्ण महाराष्ट्रात 5-6 मोठ्या शहरांमध्ये या साथीचा प्रादूर्भाव मोठ्या प्रमाणावर आहे. मुंबई, पुणे, पिंपरी-चिंचवड, नागपूर, लातूर आणि औरंगाबाद या शहरांमध्ये एकूण रुग्णसंख्येपैकी 90 टक्के रुग्ण आढळून आले आहेत. उर्वरित महाराष्ट्रातील ग्रामीण भागात 10 टक्के रुग्ण आहेत. पण ते या मोठ्या शहरांमध्ये जाऊन आलेले आहेत, राहून आलेले आहेत. या साथीला आळा घालण्यासाठी त्या विभागाच्या मंत्री महोदयांनी त्या त्या ठिकाणी जाऊन बैठका घेतल्या आहेत. वैद्यकीय शिक्षण मंत्री आणि सार्वजनिक आरोग्य मंत्री यांनी कोऑर्डिनेट करुन एक कोऑर्डिनेटेड प्रोटोकॉल उभा केला आहे. औषधांचा तुटवडा होता, तो आता उपलब्ध करुन दिला आहे. खाजगी रुग्णालयांनी रुग्ण दाखल करुन घ्यावेत, अशाही सूचना त्यांना देण्यात आल्या आहेत. खाजगी रुग्णालयांना औषधे आणि आवश्यक सामुग्रीचा पुरवठा शासनामार्फत करण्यात येत आहे किंवा त्याची प्रतिपूर्ती करण्यात येत आहे. गरीब रुग्णांना व्हेंटिलेटर उपलब्ध करुन देण्याबाबतच्या सूचना देण्यात आल्या आहेत. या सर्व उपाययोजनांसाठी 3 कोटी रुपये उपलब्ध करुन देण्यात आले असून तशा प्रकारचा शासन निर्णय देखील निर्गमित करण्यात आला आहे. शासनाचा असा प्रयत्न आहे की, तातडीने लोकांना मदत मिळाली पाहिजे, जेणेकरुन मृत्यू कमी होतील किंवा ते थांबविता येतील.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, मुख्यमंत्री महोदयांनी स्वाईन फ्लुच्या संदर्भात या ठिकाणी उल्लेख केला आहे. परंतु, अनुभव असा आहे की, स्वाईन फ्लुच्या रुग्णांना खाजगी रुग्णालये दाखल करुन घेत नाहीत. त्यामुळे या संदर्भात शासनाने खाजगी रुग्णालयांना सूचना

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस......

दिल्या पाहिजेत. शासकीय रुग्णालय नसेल आणि खाजगी रुग्णालये रुग्णांना दाखल करुन घेणार नसतील तर रुग्णांना तातडीने सेवा उपलब्ध होणार नाही. त्यामुळे मुख्यमंत्री महोदयांनी या संदर्भात संबंधितांना सूचना द्याव्यात, अशी माझी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी यापूर्वीच सांगितले आहे की, खाजगी रुग्णालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. तथापि, खाजगी रुग्णालयांनी स्वाईन फ्लुच्या रुग्णांवर उपचार करावा, त्यांना दाखल करुन घ्यावे, अशा प्रकारच्या सूचना पुन्हा एकदा नव्याने देण्यात येतील.

सभापती महोदय, या चर्चेत छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाबाबतचा उल्लेख झाला. परंतु, केवळ राज्यपालांच्या अभिभाषणात उल्लेख करुनच आम्ही थांबलो नाही तर त्या पलीकडे आम्ही हे काम नेले आहे. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकाचा उल्लेख 15 वर्षे राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणात करीत होता, परंतु, काम मात्र काहीच केले नाही. आम्ही या संदर्भात काय केले आहे, ते आपल्याला सांगतो. आघाडी शासनाच्या काळात केंद्र सरकारने ही ॲक्टिव्हिटी अनुज्ञेय नाही, हे स्मारक करता येणार नाही, असे नोटिफिकेशन काढले होते. परंतु, आम्ही केंद्र सरकारकडे पाठपुरावा करुन नोटिफिकेशनमध्ये ही ॲक्टिव्हिटी अनुज्ञेय आहे, अशा प्रकारची तरतूद करुन घेतली आहे. आपण कामाचा वेग बघा. ही ॲक्टिव्हिटी अनुज्ञेय असल्याचा प्रयत्न करीत असतानाच सजेशन, ऑब्जेक्शन मागविण्यात आले. ते प्राप्त झाले आणि या कार्यवाहीच्या कालावधीमध्येच राज्याच्या एमसीझेडएमएमध्ये हा प्रस्ताव ठेऊन त्यांच्याकडून तो मंजूर करुन घेतला आणि नोटिफिकशनच्या सजेशन, ऑब्जेक्शन शेवटची तारीख होती त्याच्या दुसऱ्या दिवशी प्राप्त झालेल्या सजेशन, ऑब्जेक्शनवर राज्य सरकारचे मत कळविण्यात आले आणि त्याच दिवशी तातडीने केंद्र सरकारने त्या संदर्भात ते अकाऊंट फॉर करुन बदल केला. त्यानंतर त्याच्या दुसऱ्या दिवशी लगेच एमसीझेडएमएने घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने आपण प्रस्ताव सादर केला आणि त्यानंतर केंद्र सरकारने टीओआर इश्यू केला. म्हणजे, तीन दिवसामध्ये आपण हे सर्व काम करुन दाखविले आहे.

...3....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, गेल्या अनेक दिवसांपासून छत्रपती शिवाजी स्मारकाबाबत मी सामान्य प्रशासन विभागाकडे माहितीच्या अधिकारात माहिती मागवीत आहे. परंतु, माहिती देण्यामध्ये या विभागाकडून टाळाटाळ होत आहे. मी स्वतः संबंधित उपसचिवांशी दूरध्वनीवर बोललो. त्यांनी मला असे सांगितले की, माहितीच्या अधिकारात माहिती मागू नका, तुमच्या पत्राव्दारे मागणी करा. त्यानुसार विरोधी पक्ष नेता म्हणून मी पुन्हा माझे पत्र पाठविले. अद्याप मला माहिती मिळालेली नाही. सदर माहिती देण्याच्या संदर्भात उच्च न्यायालयात याचिका क्रमांक 95/2014 दाखल करण्यात आली असून सदर प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे, अशी प्राथमिक माहिती मला दिली जात आहे. आता मुख्यमंत्री महोदय देत असलेली माहिती आणि मला देण्यात आलेली माहिती यामध्ये फरक आहे. नेमकी माहिती काय आहे, याबाबतचा खुलासा झाला पाहिजे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माहिती का देण्यात आली नाही, या बाबतची चौकशी करु.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, चुकीचे रेकॉर्डवर येऊ नये म्हणून मी उभा राहिलो आहे. या संदर्भात मला चांगली माहिती आहे. सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी माहिती मागविली होती, हे मला म्हणजे समितीला संबंधित अधिकाऱ्यांनी सांगितले होते. मी स्वतः विरोधी पक्षनेत्यांना सांगितले की, जी माहिती आपल्याला हवी असेल ती मी आपल्याला उपलब्ध करुन देतो. अधिकारी सुध्दा माहिती देण्यास तयार आहेत. माहिती देण्यास कोणी तयार नाही, असे नाही. त्यामुळे चुकीचे रेकॉर्डवर राहू नये, एवढीच माझी विनंती आहे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांना तारीखवार सर्व माहिती तातडीने उपलब्ध करुन दिली जाईल. माहिती का देण्यात आली नाही, याचीही चौकशी केली जाईल. ही माहिती का लपविली, कोणी लपविली, कशाकरिता लपविली, त्यामागे काय उद्देश होता, हे सर्व तपासले जाईल. हे उद्याच्या उद्या तपासू.

सभापती महोदय, आपल्याला पीएमसी अपॉईंट करावा लागतो. त्यासाठीचे टेंडर बोलाविण्यात आले आणि परवाच ते ओपन देखील केले आहे. लवकरच पीएमसीची नेमणूक

...4....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस.......

होईल. जुना आराखडा तयार झालेला आहे, तोही चांगला आहे. त्यामध्ये थोडेबहुत ऐतिहासिक बदल करण्याची आवश्यकता आहे, असे काही लोकांचे मत आहे. सर्वांची मते निश्चितपणे समाविष्ट करुन काही फेरबदल करावे लागले तर तेही करु. त्याचप्रमाणे या स्मारकाच्या उभारणीबाबतचे टप्पे देखील आपण ठरविलेले आहेत. कोणत्या टप्प्यावर काय करायचे, हे ठरविलेले आहे. मला सांगण्यास आनंद वाटतो की, देशातच नाही तर जागातील सर्वात मोठेछत्रपती शिवाजी महाराजांचे स्मारक या महाराष्ट्रात, या मुंबईमध्ये आपण उभे करीत आहोत.

सभापती महोदय, माननीय हिंदुह्रदय सम्राट, शिवसेना प्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे यांचेही एक मोठे स्मारक मुंबईमध्ये तयार करण्याचा निर्णय आम्ही घेतलेला आहे. या संदर्भात मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत करण्यात आलेली आहे. या समितीने 7 जागा निवडलेल्या आहेत. त्यापैकी नेमक्या कोणत्या जागी स्मारक उभारावे यासंदर्भातील चर्चा सुरु आहे. मी स्वत: श्री.उद्धवजी ठाकरे यांच्याबरोबर चर्चा केली आहे. सन्माननीय श्री.सुभाष देसाई, मी आणि काही अन्य लोकांची एक समिती आहे. ही समिती लवकरच याबाबतचा निर्णय घेईल आणि हे स्मारक आपण उभारु.

सभापती महोदय, औरंगाबादला लोकनेते स्व.गोपीनाथराव मुंडे यांचे स्मारक देखील आपण उभारणार आहोत.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, स्व.बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मारकाचा उल्लेख राज्यपालांच्या अभिभाषणात नाही, असा मुद्दा आम्ही काल उपस्थित केला होता. मघाशी माननीय महसूल मंत्री श्री.एकनाथराव खडसे यांनी सांगितले की, उद्धवजींनी स्मारक होऊ नये, असे सांगितले असल्यामुळे आम्ही त्याचा उल्लेख केलेला नाही.

यानंतर श्री.वि.खर्चे.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांनी काही भावना मांडल्या होत्या. शिवसेनाप्रमुख स्व.बाळासाहेब ठाकरे हे माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांचे वडील असले तरी या महाराष्ट्रातील जनतेची मालकी त्यांच्यावर आहे. याबाबत त्यांची काही मते असतील तर त्याबाबत त्यांच्याशी चर्चा करण्यात येईल. शासनाने असा निर्णय घेतला आहे की, स्व.बाळासाहेब ठाकरे यांचे स्मारक झाले पाहिजे. माननीय श्री.उध्दवजी ठाकरे यांना देखील सांगण्यात येईल की, राज्य शासनाची तसेच महाराष्ट्राच्या जनतेची स्मारक व्हावे अशी इच्छा आहे. त्यामुळे हे स्मारक सरकारकडून निश्चितपणे करण्यात येईल.

सभापती महोदय, मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. सन 2008 मध्ये कॅमेरे बसविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. काही कारणास्तव ते टेंडर पूर्ण होऊ शकले नव्हते. नंतरच्या काळात आघाडी सरकारने मुख्य सचिवांची समिती गठीत करुन सर्व अधिकार समितील देण्यात आले होते. मुख्य सचिवांच्या समितीचे मी अभिनंदन करतो. या समितीने तातडीने त्या संदर्भातील टेंडर काढून त्या संदर्भात निर्णय केलेला आहे. एल ॲन्ड टी व केंद्र सरकारची एमटीएनएल या नामांकित कंपन्यांना हे काम देण्यात आले आहे. या कामाची सुरुवात झालेली असून 90 आठवड्यात मुंबईत सीसीटीव्ही कॅमेरे कमान्ड ॲन्ड कंट्रोल सिस्टिम लावण्यात येईल. ही सिस्टीम देशातील सर्वात आधुनिक सिस्टीम असणार आहे. यामध्ये वेगवेगळ्या प्रकारचे कॅमेरे वापरण्यात आले आहेत. फेस डिटेक्शन यामध्ये आहे, कोस्टल सिक्युरिटीच्या दृष्टीने थर्मल कॅमेरे यामध्ये आहेत. परिवहन विभागाला आवश्यक असणारी ट्रॅफिक कंट्रोल सिस्टिमचे कॅमेरे यामध्ये आहेत. कमान्ड आणि कंट्रोल सिस्टीमच्या माध्यमातून मुंबईत मोठे परिवर्तन झाल्याचे आपल्याला दिसून येईन. अनेक वर्षाचा प्रलंबित निर्णय या सरकारने केलेला आहे...(अडथळा).. सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याचे टप्पे तयार करण्यात आले आहेत त्यामध्ये साऊथ मुंबईत पहिल्या टप्प्यात कॅमेरे बसविण्यात येणार आहेत. असे करीत करीत शेवटचा टप्पा 90 आठवड्यात पूर्ण करण्यात येणार आहे.

सभापती महोदय, आरे कॉलनीच्या जमिनीच्या संदर्भातील मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. आरे कॉलनीत जो हरित पट्टा आहे, तो नो डेव्हलपमेंट झोन आहे, ज्या ठिकाणी झाडे आहेत, त्या झाडांची कत्तल करावी व मुंबईची ज्याला आपण फुफ्फुसे म्हणतो ते नष्ट करावे या मताचे राज्य सरकार नाही. कारशेडच्या ठिकाणी कमीत कमी इम्पॅक्ट कसा होईल असे काही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

करता येईल काय किंवा तो कारशेड अन्यत्र हलविता येईल काय ? दुसरी जागा पाहता येईल काय, अशा सर्व शक्यता, अशक्यता पाहण्याकरिता एक समिती नियुक्त करण्यात आली आहे. ती समिती या संदर्भातील निर्णय लवकर सादर करणार आहे. त्यामुळे आरे कॉलनीतील हरित पट्टे वाचविण्याबाबत राज्य सरकार पुढाकार घेणार आहे. सरकार अशा देखील सुचना देत आहे की, कागदावर हरितपट्टे दाखविले जातात व त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे वाढली आहेत. अवैध दुकाने, कार्यालये, अवैध घरे झाली आहेत. त्यामुळे त्या जागेवर मेट्रो कारशेड करु नये, हे ठिक आहे, परंतु असे होत असताना खाजगी लोकांनी कत्तल करुन त्या ठिकाणी बांधकामे सुरु केली तर ते देखील योग्य होणार नाही. याबाबत आदेश देण्यात आले आहेत.

सभापती महोदय, मेट्रो-3 या प्रकल्पात गिरगावातील 28 इमारती येत आहेत. 12 हेक्टर जमीन तेथे लागणार आहे. या 28 इमारतीमध्ये 727 कुटुंबे राहत आहेत. यातील जास्तीत जास्त कुटुंबे मराठी आहेत. त्या ठिकाणी इम्प्रुमेंट सिस्टिम उभी करण्यात येणार आहे, त्यामध्ये या कुटुंबाचे पुनर्सवन त्याच ठिकाणी अतिशय चांगल्या पध्दतीने करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. कोणत्याही मराठी माणसाला गिरगावातून बाहेर जावे लागणार नाही. तेथे 1700 झोपड्या आहेत. त्यांना एमयूटीपी-2 प्रमाणे जे जवळच्या भागात निकष तयार करण्यात आले होते, त्यांना पीएपी म्हणून घरे देण्यात येणार आहेत, तो निर्णय झालेला आहे. मेट्रो-3 प्रकल्पात कोणत्याही मराठी माणसाला उद्ध्वस्त होऊ दिले जाणार नाही हे राज्य सरकारचे 100 टक्के कमिटमेंट आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी मुख्यमंत्री महोदयांन सांगू इच्छितो की, आपल्या मंत्रिमंडळातील मंत्री महोदय आरे कॉलनीबाबत निदर्शने करतात, मुख्यमंत्री भेटत नाहीत असे टीव्हीवर सांगतात. ही बाब राज्य शासनाला भूषणावह नाही. आपण घेतलेले मंत्रिमंडळाचे निर्णय त्या मंत्री महोदयांना कळले पाहिजेत. या प्रकारामुळे आमची संभ्रमावस्था निर्माण होते. मुख्यमंत्री महोदय आम्हाला भेटतात व मंत्री महोदयांना का भेटत नाहीत, ही बाब आम्हाला कळत नाही.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, सभागृहाची बैठक संपल्यावर असे कोणते मंत्री महोदय आहेत त्याची माहिती सन्माननीय सदस्यांकडून घेण्यात येईल व त्यांना आज माझ्या घरी जेवायला बोलविण्यात येईल.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) R-3

VVK/ AKN/ MMP/ प्रथम श्री.रोझेकर... 12:50

श्री.देवेंद्र फडणवीस...

सभापती महोदय, सफाई कर्मचारी, सरकारी कर्मचारी व पोलीस कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध झाली पाहिजेत. याबाबत राज्य सरकारने निर्णय केलेला आहे. चार एफएसआय देऊन जास्त संख्येने निवासस्थाने बांधण्यात येणार आहेत. सर्वच पोलीस कर्मचाऱ्यांना निवासस्थाने मिळाली पाहिजेत. केवळ सर्व्हीस कॉटर्स नाहीत तर टप्प्या टप्प्याने पोलीसांना स्वतःचे घर कसे मिळेल या संदर्भातील योजना तयार करण्यात येत आहे. सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने घरे दिली पाहिजेत. अशा प्रकारची योजना तयार करण्यात येत आहे. सफाई कर्मचारी हा जन्मभर व पिढ्यानपिढ्या काम करतो व सर्व्हीस संपल्यानंतर त्याला सर्व्हीस कॉटर्स सोडून जावे लागते. त्यानंतर त्याला कोणतेही घर मिळत नाही. सफाई कामगारांना मालकी हक्काने कशी घरे देता येतील यासंदर्भातील योजना राज्य सरकारने तयार केली आहे. परवडणाऱ्या घरांचा विषय देखील उपस्थित करण्यात आलेला आहे. राज्य सरकारकडून एफएसआयचा उपयोग एलआयजी 40 स्क्वेअर चौरस मीटर व एमआयजी 80 स्क्वेअर चौरस मीटरची घरे तयार करण्यासाठी झाला पाहिजे असा प्रयत्न करण्यात येणार आहे. याकरिता वाढीव एफएसआय किंवा इतर इस्टुमेंटचा वापर करण्यात येणार आहे. यासंदर्भात बृहत आराखडा तयार करण्यात आलेला आहे. गृह निर्माण विभागाची चर्चा होईल, तेव्हा गृह निर्माण मंत्री त्यासंदर्भातील सविस्तर माहिती सभागृहात देतील. घरांची संख्या वाढविल्याशिवाय निवाऱ्याचा प्रश्न सोडविला जाणार नाही.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मुख्यमंत्री महोदयांनी सफाई कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सांगितले आहे. या धर्तीवर ऑलेरेडी यापूर्वी महालक्ष्मी परिसरात जी झोपडपट्टी होती त्या ठिकाणी महानगरपालिकेच्या सफाई कर्मचाऱ्यांना मालकी हक्काने कायमस्वरूपी घरे दिलेली आहेत. ही घरे एसआरएची नाहीत. त्याच धर्तीवर सफाई कर्मचारी, पोलीस कर्मचारी, सरकारी कर्मचाऱ्यांना घरे मिळावीत अशा प्रकारची मागणी अनेक वेळा आम्ही केलेली आहे. यासंदर्भात आघाडी सरकारकडे पाठपुरावा करून अशा प्रकरची घरे दिलेली आहेत. मुख्यमंत्री महोदय योजना आखणार आहेत असे म्हणाले म्हणून मी हे सांगितले आहे, तशी योजना ऑलरेडी आहे.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, सफाई कामगारांचा विषय माझ्यासोबत सन्माननीय सदस्य श्री. भाई जगतात यांनी अनेक वेळा उपस्थित केलेला आहे. त्यांनी महालक्ष्मी येथील उदाहरण दिले आहे. महानगरपालिकेचा एक प्लॉट होता. महानगरपलिका व त्यांनी मिळून एसआरए योजना तयार केली होती. दुर्दैवाने अजूनही त्या प्रोजेक्टमध्ये मालकी हक्काची घरे देण्यात आलेली नाहीत. या संदर्भातील पक्रिया चालू आहे, 25 वर्षाची अट त्यात टाकण्यात आली आहे. सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना माझा पाठिंबा आहे. ती घरे अजूनही मालकी हक्काने मिळालेली नाहीत. सुप्रीम कोर्टापर्यत हा विषय गेलेला आहे. ही घरे देखील मालकी हक्काने त्या कर्मचाऱ्यांना देण्यात यावीत. सफाई कर्मचाऱ्यांना लवकरात लवकर कायमस्वरुपी घरे देण्यासाठी त्याचा आराखडा तयार करावा अशी मी विनंती करतो.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, राज्य सरकार या संदर्भात निर्णय घेत आहे. प्रत्येक सफाई कामगाराला मालकी हक्काचे घर मिळाले पाहिजे हा राज्य सरकारचा मानस आहे आणि तसा निर्णय राज्य सरकार निश्चितपणे घेत आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे साहेबांनी काल त्यांच्या भाषणात सांगितले की, जे प्रस्ताव आहेत ते आमच्याच काळातील आहेत, ही गोष्ट खरी आहे. आपण सांगितले की, मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा प्रकल्प आम्हीच आणलेला आहे. शंभर टक्के हा प्रकल्प तुमच्याच काळातील आहे, आमच्या काळातील नाही. परंतु मागील 10 वर्षात त्या प्रकल्पासाठी आवश्यक असणारी पर्यावरण विषयक मंजुरी तुम्ही मिळवू शकला नाही. त्यावेळी राज्यात आणि केंद्रात देखील तुमचेच सरकार होते. तुम्ही 10 वर्षात यासाठी पर्यावरण विषय मंजुरी मिळवू शकला नाही. शेवटी एक दिवस असा आला की, तत्कालीन मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांना असे घोषित करावे लागले की, आता आम्ही हे विमानतळ दुसरीकडे कोठे तरी करतो. त्यांनी ते दुसरीकडेही केले नाही, ही गोष्ट वेगळी आहे. परंतु त्यांना हे घोषित करावे लागले. आमचे सरकार सत्तेवर आल्यानंतर आमच्या सरकारने केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन यासाठी आवश्यक असणारे क्लिअरन्सेस आणले आणि फक्त क्लिअरन्सेस आणले नाहीत तर त्यामध्ये शेअर टिलचा मुद्दा होता त्यावरील क्लिअरन्स देखील आपण आणलेला आहे, आपण त्याचे आरएफपी देखील मागविले आणि जगातील नामांकित कंपन्यांनी हे एअरपोर्ट बांधण्यासाठी बिड्स दाखल केलेले आहेत. ही योजना तुमच्या काळातील असली तरी तुम्ही ती 10 वर्षात पूर्ण करु शकला नाहीत. आम्ही तीन महिन्यात या प्रकल्पाला या स्टेजपर्यंत पोहोचविले आहे. म्हणून आम्ही त्याचा उल्लेख करीत आहोत.

सभापती महोदय, त्यांनी सांगितले की, शौचालयाचा प्रस्ताव देखील काँग्रेसच्याच काळातील आहे. परंतु, शौचालयाचा प्रस्ताव कोणाच्या काळातील कसा काय असू शकतो. (...अडथळा...) मुळात म्हणजे शौचालय बांधण्याचे काम आपल्या काळात का पूर्ण होऊ शकले नाही ? त्याचे कारण असे होते की, आपण लाभार्थ्यांना 4 हजार रुपये देत होतो. (...अडथळा...) युतीचा काळ 20 वर्षापूर्वी होता. त्यानंतर 15 वर्षे तुमच्या पक्षाची सत्ता होती, हे आपण एवढ्या लवकर विसराला

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

काय ? आपण पूर्वी 4 हजार रुपये देत होतो. त्यामुळे शौचालय बांधण्याची कामे पूर्ण झाली नाहीत. आपण आता जो कार्यक्रम हाती घेतलेला आहे या कार्यक्रमामध्ये काय आवश्यक आहे त्या प्रमाणे आपण फेरबदल केलेले आहेत आणि त्याचे मॉडेल्स देखील तयार केलेले आहेत. कमीत कमी पाणी वापरावे लागले पाहिजे, सोक पिट कशा प्रकारचे असले पाहिजे, ऑप्टीमायझेशन कसे करायचे अशा प्रकारचा सर्व कार्यक्रम आपण आखलेला आहे. त्यामुळे शौचालयाचा कार्यक्रम कोणत्या पक्षाचा होऊ शकत नाही. हा सर्वांचाच कार्यक्रम आहे. तो तुमचाही आहे, आमचाही आहे, तो प्रत्येकाचा कार्यक्रम आहे आणि तो कार्यक्रम वेगाने पुढे नेण्याचे काम आम्ही स्वच्छ भारत मिशनच्या निमित्ताने करीत आहोत. आम्ही त्यासाठी तुमची मदत मागत आहोत. कारण, हा आपल्या सर्वांचा कार्यक्रम असल्यामुळे या कार्यक्रमाच्या अंतर्गत जास्तीत जास्त शौचालय कशी तयार होतील हा प्रयत्न आपल्याला करावयाचा आहे. आज ग्रामीण भागातील शौचालये असतील, घरे असतील. केंद्र शासन ग्रामीण भागात घरे बांधण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करुन देत आहे. परंतु, तरी देखील घरे होत नाहीत. का होत नाहीत ? कारण, घरे बांधण्यासाठी जागा नाही. दलित समाज, आदिवासी समाजातील लोकांना घरे द्यावयाची असतील तर घरे बांधण्यासाठी त्यांच्याकडे जागा नाही. त्यांच्याकडे प्लॉट नाहीत. त्यांना त्या ठिकाणी पट्टा मिळत नाही आणि म्हणून घर मंजूर झाले तरी ते होऊ शकत नाही. आपण या संदर्भात देखील निर्णय घेत आहोत आणि लवकरच 40 ते 50 हजार रुपयांपर्यंत, त्या संदर्भात आम्ही कॅबिनेट नोट वगैरे जवळपास फायनल केलेली आहे. त्याचा निर्णय मी नंतर घोषित करीन. आपण त्यांना त्या ठिकाणी जमीन देणार आहोत. एवढेच नाही तर त्यामध्ये काही अटी, शर्ती असतील तर त्या देखील आपण शिथिल करणार आहोत आणि जमिनीचा पट्टा लगेच कसा देता येईल या संदर्भातील काही नियम आपण तयार करणार आहोत. जेणे करुन प्रत्येकाला घर मिळाले पाहिजे आणि हे घर मिळत असताना त्याचे काही टाईप प्लॅन आपल्याला तयार करता येतील काय, असाही आमचा प्रयत्न आहे. आज प्री-कास्टची घरे अतिशय चांगल्या प्रकारची तयार होत आहेत आणि ती घरे अतिशय डयुरेबल अशा प्रकारची तयार होत आहेत. नवीन तंत्रज्ञान वापरुन, म्हणजे इंदिरा आवास योजनेतील घर

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

खोकाच असले पाहिजे का ? त्यापेक्षा वेगळे काही करता येइल काय, ते थोडे चांगले करता येईल काय, आपल्याला त्यात शौचालय इन्बिल्ट करता येईल काय, अशा प्रकारचा प्रयत्न आपण सुरु केलेला आहे. त्यामुळे यातून देखील ग्रामीण भागात खूप मोठ्या प्रमाणात परिवर्तन करण्याचा आपण प्रयत्न करु.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भात काही प्रश्न उपस्थित करण्यात आले. मला या निमित्ताने एकच गोष्ट सांगावयाची आहे की, कायदा आणि सुव्यवस्थेचा सर्वात महत्वाचा मुद्दा हा आहे की, गुन्हेगारांना भीती केव्हा वाटेल ? ज्यावेळी गुन्हेगारांना शिक्षा देण्याच्या प्रमाणात वाढ होईल. गुन्हेगारांना माहिती असते की, शिक्षाच होत नाही. खून केल्यानंतर फक्त 90 दिवस जेलमध्ये राहावयाचे आणि 91 व्या दिवशी बाहेर यायचे, यानंतर वर्षानुवर्षे केस चालणार आहे, विटनेस होस्टाईल होणार आहेत याची माहिती असल्यामुळे गुन्हेगार सराईत होतात. आपल्या राज्याचा रेट ऑफ कन्व्हिक्शन सर्वात कमी आहे आणि तो 8 टक्के, 9 टक्के, 10 टक्के, 12 टक्के अशा प्रकारे आहे. आम्ही सत्तेवर आल्यानंतर सर्वात प्रथम रेट ऑफ कन्व्हिक्शनवर लक्ष केंद्रीत केले, आम्ही त्याची पॉलिसी तयार केली, ती पॉलिसी मान्य केली. फॉरेन्सिक नेटवर्क स्ट्रेन्दनिंग करण्याचे काम केले. मला सांगताना आनंत होतो की, जानेवारी महिन्याचा आपला रेट ऑफ कन्व्हिक्शन 28 टक्क्यापर्यंत आलेला आहे आणि हा सातत्याने वाढणार आहे. आपण तो वाढविण्याचा प्रयत्न करीत आहोत आणि त्यासाठी आपण वेगवेगळ्या उपाययोजना केलेल्या आहेत. आपण त्यासाठी एक समिती नियुक्त केली होती. त्या समितीच्या शिफारशी आपण स्वीकारलेल्या आहेत आणि एवढेच नाही तर आमचे जे वकील आहेत त्यांना देखील आम्ही सांगणार आहोत की, 25 टक्क्यापेक्षा ज्यांचा रेट ऑफ कन्व्हिक्शन कमी आहे त्यांना आम्ही पुढील वेळी कन्टिन्युटी देणार नाही. आपण विटनेस प्रोटेक्शन संदर्भात पॉलिसी तयार केलेली आहे की, विटनेस प्रोटेक्शन कसे झाले पाहिजे. आपल्याला माहिती आहे की, चहाच्या टपरीवाला, रिक्षावाला यांना पकडून पंच बनविले जाते. मग ते सर्व पंच होस्टाईल होतात. ते

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस........

म्हणतात आम्हाला माहितीच नाही, आमची पेपरवर स्वाक्षरी घेतली. तर पंच कसे असले पाहिजेत, कोणाला पंच म्हणून नेमले पाहिजे या संदर्भात आपण काही मानके तयार केलेली आहेत. आज आपण प्रत्येक जिल्ह्यात फॉरेन्सिकची मोबाईल व्हॅन एसपी आणि कमिशनरेटला देतो. अशा अनेक उपाययोजना आपण हातामध्ये घेतलेल्या आहेत. ही गोष्ट खरी आहे की, घटना घडत असतात. परंतु, घटना घडत असल्या तरीही त्याला आपला रिस्पॉन्स काय आहे, आपला रेट ऑफ कन्व्हिक्शन काय आहे, हा त्यातील महत्वाचा विषय आहे. ज्यावेळी सभागृहात गृह विभागाच्या मागण्यांवर चर्चा होईल त्यावेळी मी सविस्तर उत्तर देणार आहे. आज म.वि.प. नियम 260 अन्वये कायदा व सुव्यवस्थेच्या प्रस्तावावर चर्चा होणार आहे. परंतु आपण मागण्यांवरील चर्चेच्या वेळी जास्त धोरणात्मक घोषणा करतो. म्हणून आपण ही घोषणा त्यावेळी करु.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, आपण दोन दिवसांपूर्वी टी.व्ही. वाहिन्यांवर बघितले की, लोणावळा येथील कुमार रिसॉर्टमध्ये गंभीर प्रकार घडलेला आहे. कायदा व सुव्यवस्थेच्या संदर्भातील विषय निघाल्यामुळे मी हा मुद्दा मांडत आहे. रेट ऑफ कन्व्हिक्शन वाढला पाहिजे, तो 28 टक्क्याऐवजी 98 टक्क्यापर्यंत वाढावा, त्याचे स्वागतच होईल. पंरतु संबंधित अधिकाऱ्यांने त्या घटनेची नोंद करुन घेतली नाही किंवा तशा प्रकारचे काही केले, तर ते होता कामा नये या दृष्टीने देखील पाऊले उचलावयास पाहिजेत. आपण फक्त एका दिशेनेच कायदा सुव्यवस्थेचा विचार केला तर ते पूर्ण होणार नाही, अपूर्ण होईल. म्हणून सर्व दिशेने त्यामध्ये प्रयत्न करावयास पाहिजेत, एवढेच आपल्या निदर्शनास आणून देतो.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, लोणावळा येथील केसमधील एक आरोपी आयडेंटिफाय झालेला आहे. या केसमधील एक आरोपी सापडलेला आहे. दुसरा आरोपी पळून गेलेला आहे. तो आरोपी देखील आयडेंटिफाय झालेला आहे. तो आरोपी बिहारमध्ये एका ठिकाणी आहे. त्याला देखील बिहार पोलिसांच्या मदतीने झीरो डाऊन करण्याचे काम सुरु आहे. परंतु, आपण सांगितले ती गोष्ट खरी आहे की, आपल्याला हे होलिस्टीकली बघावे लागेल. आपल्याला

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

याकडे आयसोलेटेड बघून चालणार नाही. खरे म्हणजे, मी आता हे निवेदन करीत नाही. आपण

..5...



श्री.देवेंद्र फडणवीस........

रेट ऑफ कन्व्हिक्शन वाढविण्याच्या दृष्टीने जो निर्णय घेतलेला आहे. त्याचे हे संपूर्ण निवेदन आहे. ते निवेदन मी सभागृहाच्या पटलावर ठेवतो. आपण ते निवेदन प्राप्त करून घ्यावे, अशी मी सभागृहाला विनंती करतो.

सभापती महोदय, या चर्चेच्या निमित्ताने टोल मुक्तीच्या संदर्भातील मुद्दा देखील मांडण्यात आला. आपण टोलच्या संदर्भात ज्या प्रकारचे करारनामे केलेले आहेत त्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. ज्यावेळी आम्ही असा प्रयत्न सुरु केला की, आपल्याला महाराष्ट्राला टोल मुक्त कसे करता येईल. त्यावेळी आपल्याला आश्चर्य वाटेल की,....

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस......

यातील जे मेजर टोल नाके आहेत, त्यापैकी सगळ्यात जास्त पैसे दिले जाणारा मुंबई-पुणे एक्स्प्रेस हायवे आहे. याच्या ॲग्रीमेंटमध्ये बायबॅकची तरतूद नाही, ही आश्चर्याची गोष्ट आहे. एखाद्या टोलच्या ॲग्रीमेंटमध्ये बायबॅक नसणे तितकेसे योग्य वाटत नाही. छोटे छोटे टोल आहेत, त्या ठिकाणी बायबॅकची तरतूद आहे. या टोलचे तीन टप्प्यात ॲग्रीमेंट झाले. ती ॲग्रीमेंट वेगवेगळ्या प्रकारची आहेत. मुंबई एन्ट्री पॉईंट, त्यामध्ये बायबॅक ठेवलेले नाही. तरी देखील या संदर्भातील चौकशी आम्ही सुरु केली आहे. कशा प्रकारे आपल्याला पाऊल उचलावे लागेल, कोर्टात जाऊन काय भूमिका घ्यायची, पॉलिसी तयार करीत आहोत. केंद्र सरकारने आपल्याला सांगितले होते की, जी वेगवेगळया प्रकारची सूट दिली जाते, त्यामध्ये आमदार, खासदार, राज्यपाल किंवा महत्वाच्या वाहनांसाठी सूट दिली जाते ती 15 टक्क्यापर्यंत देऊ शकतो. आपण कॅश फ्लोमध्ये थेट 15 टक्क्यापर्यंत अलाऊ केले. या सूट दिलेल्या वाहनांची क्युम्युलेटिव्ह संख्या पाहिली तर 1 टक्का सुध्दा नाही. यात खूप गुंतागुंत आहे. भारतरत्न सचिन तेंडूलकर यांनी एक पत्र लिहून कळविले आहे की, टोल नाक्यावर कशा प्रकारे त्रास होतो. जरुर त्या पत्राची आम्ही दखल घेतली आहे. माननीय सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.चंद्रकांत पाटील यांनी यापूर्वीच कार्यवाही सुरु केली आहे. ती कार्यवाही पुढील टप्प्यावर गेली आहे. जाचक टोलमधून सर्वसामान्य लोकांना कशी मुक्ती देता येईल हा प्रयत्न राहील. टोल वसूल होतो त्या ठिकाणची ट्रॅफिक कशी सुरळीत होईल, मूल्यमापन आणि मोजणी कशी करता येईल यावर काम केलेले आहे. नजिकच्या काळात पारदर्शीपणे पॉलिसी आणू. आपला हाच प्रयत्न आहे की, कायदेशीर अडथळे कमी करुन सामान्य माणसाला कसा दिलासा देता येईल या संदर्भात राज्य सरकारने काम सुरु केले आहे.

सभापती महोदय, अर्थसंकल्प यायचा आहे. एलबीटी बाबत राज्य सरकारची कमिटमेंट आहे. एलबीटी हटविण्याच्या संदर्भात राज्य सरकार पूर्णपणे अनुकूल आहे एवढेच या निमित्ताने सांगतो. मुंबईतील हिरे व्यापाऱ्यांच्या कार्यक्रमास मी उपस्थित राहिलो होतो. मी सहज त्यांच्या प्रतिनिधींकडे विचारणा केली की, तुम्ही मुंबईतून शिफ्ट का झालात? ते म्हणाले, खरे सांगायचे झाले तर आजही आम्हाला मुंबई आवडते. मुलांच्या शिक्षणाकरिता आम्ही इतकी वर्षे मुंबईत राहिलो. आम्हाला मुंबई आवडते. काही जाचक कायदे आणि काही लोकांचा त्रास इतका वाढला

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद फडणवीस...

होता की, आम्हाला मुंबईतून बाहेर जावे लागले. त्यांनी पुढे असे सांगितले की, तुम्ही जर मुंबईमध्ये पूर्वीसारखे चांगले वातावरण तयार केले तर आम्हाला मुंबईच आवडते. आम्ही मुंबईमध्येच राहू. त्यामुळे जरूर या संदर्भात राज्य सरकार जी काही उचित कारवाई करावयाची आहे ती करेल.

सभापती महोदय, मराठी भाषेच्या संदर्भात मुद्दा मांडला गेला. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या संदर्भात जी प्रोसेस आहे त्यातील सगळ्यात महत्वाचा टप्पा म्हणजे साहित्य अकादमीच्या शिफारशीसह केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविला पाहिजे. गेली अनेक वर्षे शासनाचे प्रयत्न सुरु होते, परंतु ते होत नव्हते. आता साहित्य अकादमीने या निमित्ताने आपल्या शिफारशीसह प्रस्ताव केंद्र सरकारकडे पाठविला आहे. त्यामुळे महत्वाचा टप्पा युती सरकार सत्तेवर आल्यानंतर पूर्ण केला गेला आहे. हा प्रस्ताव केंद्र सरकारच्या 3-4 मंत्रालयांकडे जातो आणि शेवटी कॅबिनेटचा निर्णय होतो. यातील सगळ्यात अडचणीचा टप्पा होता तो साहित्य अकादमीने शिफारस करुन केंद्र सरकारकडे प्रस्ताव पाठविण्याचा होता. ते काम युती सरकार सत्तेवर आल्यानंतर झाले आहे. त्यामुळे मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याच्या दृष्टीने राज्य सरकार आणि केंद्र सरकारने महत्वपूर्ण पाऊल उचललेले आहे.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, मी जो मुद्दा उपस्थित केला तो दर्जा देण्याबाबतचा नव्हता. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये 28 वेळा इंग्रजी शब्दाचा वापर झाला आहे त्याबद्दलचा मुद्दा होता. याबद्दल माननीय मंत्री श्री.दिवाकर रावते यांच्या तीव्र भावना आहेत. त्यांनी सभागृहात उठून सांगितले की, ही वस्तुस्थिती आहे, आम्ही दिलगीरी व्यक्त करतो. सरकारचे एका बाजूला मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्याबाबतचे प्रयत्न आणि दुसऱ्या बाजूला अभिभाषणामध्ये इतक्या मोठया प्रमाणात इंग्रजी शब्दांचा वापर याबाबत मी मुद्दा मांडला होता.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळविण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे त्याचे मी स्वागत करतो. हे काम लवकरच झाले पाहिजे. त्याबरोबरच

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

संस्कृत ही भाषा, पाली आणि प्राकृत भाषेला देखील प्रचलित करण्याकरिता राज्य सरकार प्रयत्न करणार आहे का?

..3..



श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, माननीय सदस्य प्रा.जोगेंद्र कवाडे यांनी अतिशय चांगला मुद्दा उपस्थित केला आहे. मी सभागृहाच्या माहितीसाठी सांगू इच्छितो की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ आणि जपानच्या प्रांतीय सरकारसोबत मिळून प्रयत्न करीत आहोत, त्या माध्यमातून पाली आणि प्राकृत भाषेच्या संदर्भातील संशोधन आणि जे काही जूने बुध्दकालीन अभिलेखे आहेत त्यांचा अन्वयार्थ काढणे, ते जास्तीत जास्त लोकांपयंत सोप्या भाषेत पोहोचविण्याचा प्रयत्न आपण करणार आहोत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : मी शासनाला धन्यवाद देतो. ज्याप्रमाणे नागपूरच्या रामटेक येथे कवि कुलगुरु कालिदास संस्कृत विद्यापीठ स्थापन केले आहे त्याच धर्तीवर पाली आणि प्राकृत भाषेकरिता विद्यापीठ स्थापन करता येत असेल तर आपण लक्ष द्यावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : रामटेक येथे संस्कृत विद्यापीठ स्थापन केले आहे. परंतु त्या विद्यापीठाला अद्याप इमारत उपलब्ध नाही, जागा दिलेली नाही, अधिकार दिलेले नाहीत. अनेक अडचणी आहेत. या विषयाबाबत उच्च शिक्षण मंत्री श्री.विनोद तावडे यांनी लक्ष घातले आहे. ते आपण निश्चितपणे करु.

श्री.कपिल पाटील : प्रत्येक विद्यापीठात पाली भाषेचे अध्यासन सुरु करावे.

श्री.देवेंद्र फडणवीस : माननीय सदस्य श्री.सुनील तटकरे यांनी जो मुद्दा मांडला त्याची नोंद घेण्यात आली आहे. मी काल विधानसभेत सांगितले होते. भाषांतर किती क्लिष्ट असते याबाबत माननीय सदस्य श्री.छगन भुजबळ यांनी मुद्दा उपस्थित केला होता. सोप्या भाषेत भाषांतर झाले पाहिजे अशा सूचना आम्ही दिल्या आहेत.

प्रा.जोगेंद्र कवाडे : इंग्रजी भाषा संपन्न झाली, जागतिक भाषा झाली कारण त्या भाषेने जगातील अनेक भाषांना सोबत घेतले. त्यामुळे इंग्रजी भाषा प्रगल्भ झाली, व्यापक झाली, सर्वसमावेशक झाली. मराठी आणि इंग्रजी भाषेतही शब्द कॉमन असतील आणि ते वापरले तर

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

काही बिघडत नाही. सूक्ष्म सिंचन हा शब्द ग्रामीण भागातील माणसाला कळणार नाही. परंतु ड्रीप इरिगेशन हा शब्द लगेच समजतो. सूक्ष्म म्हणजे अदृश्य नाही ना असे त्याला वाटते.

नंतर यू.1....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, भारनियमन हे पटकन कळत नाही. मात्र लोड शेडिंग म्हटले की, ते पटकन समजते. मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा देण्यासंबंधी राज्य सरकारचे कमिटमेंट असून ते आम्ही पूर्ण करतो. मराठी भाषेचा अधिकाधिक वापर झाला पाहिजे. न्यायालयामध्ये मराठी भाषेचा वापर करायचा हे ठरलेले आहे. पण आपले सर्वांचे दुर्दैव आहे की, पाहिजे तेवढे स्टेनो आपण उपलब्ध करून देऊ शकलेलो नाही. भाषेचा वापर केला पाहिजे असे बोलून चालणार नाही तर त्याच्या पाठीमागे आपल्याला पाठबळ उभे करावे लागेल. तसा प्रयत्न आम्ही निश्चितपणे करणार आहोत.

सभापती महोदय, येथे आरक्षणाचे मुद्दे उपस्थित करण्यात आले. धनगर समाजाला आरक्षण देण्यासंबंधीचा मुद्दा देखील उपस्थित करण्यात आला. यासंबंधी राज्य सरकारने अतिशय स्पष्ट भूमिका घेतली आहे. आदिवासी समाजाला आज जे आरक्षण आहे त्याल्या कुठल्याही प्रकारे धक्का न लावता धनगर समाजाला आरक्षण कसे देता येईल यासंबंधी शासन विचार करीत आहे. यासंबंधी ॲडव्होकेट जनरल सोबत एक बैठक देखील झाली. यासाठी आम्ही एक समिती नेमली आहे. गेल्या काळात आरक्षणासंबंधी जे काही निर्णय घेतले आहेत त्यासंबंधी कोर्टाने वेगळी भूमिक घेतली आहे. आम्ही आरक्षणासंबंधी जो काही निर्णय घेणार आहोत तो कोर्टाच्या कसोटीवर टिकला पाहिजे या मताचे आहोत. त्यामुळे आम्ही ॲडव्होकेट जनरलला रोपिंग केले आहे. यासंबंधातील आमची कार्यवाही सुरू आहे. ...(अडथळा)...

सभापती महोदय, मुस्लीम समाजाचे आम्ही फार मोठे कैवारी आहोत असे भासविण्याचा प्रयत्न विरोधी पक्षाकडून सातत्याने चालला आहे. या निमित्ताने माझा त्यांना सवाल आहे. आपणाला त्यांचा कैवार होता तर मग लोकसभेमध्ये पराभव झाल्यानंतर आपण जाता जाता अध्यादेश का काढला ? आपण अनेक वर्ष सत्तेमध्ये होतात तेव्हा आपण कायदा का केला नाही ? आपण जाता जाता अध्यादेश काढला आहे. कारण आपल्या मनामध्ये मुस्लीम समाजाला शिक्षण मिळावे असे वाटतच नव्हते. या बाकावरील आपल्या नोकऱ्या कायम राहिल्या पाहिजेत म्हणून मतांच्या राजकारणांसाठी सत्तेमध्ये असूनसुद्धा आपण निर्णय घेतलेला नाही. आपण तो निर्णय जाता जाता

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस....

घेतला आहे. तो निर्णय आम्ही रद्द केलेला नाही. जो अध्यादेश काढण्यात आला होता तो व्यपगत झाला आहे. हायकोर्टाने शिक्षणामधील आरक्षण अपहेल्ड केले आहे आणि नोकऱ्यांमधील आरक्षण स्ट्रक-डाऊन केले आहे. हा अंतिम आदेश नसून तो अंतरिम आदेश आहे. सुप्रीम कोर्टाचे निवाडे बघितले तर त्यांनी सातत्याने स्ट्रक-डाऊन केल्याचे दिसून येते. हायकोर्टाने ज्या मुद्यावर अपहेल्ड केले त्याच मुद्यावर तेथे फेटाळण्यात आले आहे. त्यामुळे हे कन्फ्लिक्टींग आहे. यासंबंधी आमची भूमिका अशी आहे की, संविधानाच्या अंतर्गत जो निर्णय होईल तो आम्ही करणार आहोत. संविधानाच्या पलिकडे जाऊन आम्ही निर्णय करणार नाही. संविधान संमत निर्णय होईल. आमचे माननीय मंत्री श्री.विनोद तावडे यांनी या संदर्भातील आकडेवारी देखील जाहीर केली आहे. आपण एक प्रकारे राज्यातील जनतेला फसविले आहे. आपण सांगितले की, 5 टक्के आरक्षण देत आहोत. त्यांनी सांगितले की, 7 टक्क्यांपेक्षा जास्त मुस्लीम समाज शैक्षणिक संस्थांमध्ये आहे. तो ओबीसी, एस.टी., एस.सी.मध्ये आहे. तो मेरिटमध्ये नाही. तेव्हा माझे म्हणणे एवढेच आहे की, या विषयासंबंधी आपण राजकारण करू नये. अल्पसंख्याक समाजासंबंधी आपणाला एवढी भावना असेल तर या राज्यामधील वक्फ बोर्डाच्या जमिनी कोणी लाटल्या आहेत. अल्लाच्या नावाने चॅरिटीसाठी जमिनी दिल्या होत्या. त्या जमिनी लाटणारे कोण आहेत ते आपण सांगावे. त्यांचे कैवारी बनायचे आणि अल्लाच्या नावाने जमिनी लाटण्याचे प्रकार झालेले आहेत. त्याचीही चौकशी केली जाईल व त्याचा रिपोर्ट मांडणार आहोत. अल्पसंख्याक समाजाचे पुनरूत्थान करण्यासाठी राज्य सरकारने योजना आखली आहे. नोकऱ्या, शिक्षण, राहण्याची व्यवस्था, वस्त्या येथे पायाभूत सुविधा देण्यासाठी राज्य सरकार निधींची कमतरता भासू देणार नाही. आपल्या सरकारने जेवढा निधी दिला त्यापेक्षा जास्त निधी आमचे सरकार देईल असा विश्वास मी व्यक्त करतो. तेव्हा मुस्लीम समाजाचे आम्हीच फक्त कैवारी आहोत असे आपण सांगू नका. जो पर्यंत अल्पसंख्याक समाजाला सोबत घेऊन चालणार नाही, जो पर्यंत त्यांना मुख्य धारेमध्ये आणणार नाही जो पर्यंत त्यांची प्रगती होणार नाही तो पर्यंत राज्याची आणि देशाची प्रगती होऊ शकणार नाही. त्यांची प्रगती करण्यासाठी संविधानाने ज्या ज्या तरतुदी केलेल्या आहेत त्या प्रत्येक

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.देवेंद्र फडणवीस...

तरतुदीचा वापर हे राज्य शासन करणार आहे. अल्पसंख्याक समाजाच्या जीवनामध्ये परिवर्तन करण्याचे काम हे राजय सरकार करणार आहे हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, जे काही आरक्षण द्यायचे आहे ते संविधानाच्या आधारे देण्यात येईल असे माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले आहे. आमच्या सरकारने मुस्लीम आरक्षणासंबंधी निर्णय घेतला होता. त्यासंबंधी जे पॉलिटीकली उत्तर द्यायचे होते ते माननीय मुख्यमंत्र्यांनी दिले आहे. मी माननीय मुख्यमंत्र्यांना सांगू इच्छितो की, संविधानाच्या आधारेच कोर्ट चालते. कोर्टाने मुस्लीम समाजाच्या शैक्षणिक आरक्षणासंबंधी कोणतीही हरकत घेतली नसेल तर मग तो अध्यादेश या सरकारने व्यपगत का केलेला आहे? मराठा समाजाला आरक्षण देण्याची जबाबदारी जशी सरकारची होती तशी मुस्लीम समाजाला शैक्षणिक आरक्षण लागू करण्याची जबाबदारी देखील या सरकारची होती. तसे त्यांनी का होऊ दिले नाही याचे उत्तर येथे देण्यात आले पाहिजे.

श्री.देवेंद्र फडणवीस : सभापती महोदय, मी तेच सांगितले आहे. पण माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी ते मन लावून ऐकले नाही. त्यांच्या मनामध्ये पुढे काय बोलावयाचे हे ठरलेले आहे. माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिलेला नाही. त्यांनी फक्त अंतरिम आदेश दिलेला आहे. यासंबंधातीन अंतिम सुनावणी सुरू आहे. उच्च न्यायालयाच्या निर्णयामध्ये दोन गोष्टी आहेत. उच्च न्यायालयाने शैक्षणिक क्षेत्रामध्ये आरक्षणाला परवानगी दिली आहे. मग त्यांनी नोकऱ्यांमध्ये आरक्षण का लागू केले नाही ? त्यामुळे त्या निर्णयामध्ये डायकोटॉमी आहे. सुप्रीम कोर्टाने काय निर्णय दिले आहेत ते मी सांगितले आहे. संविधानामध्ये जे सांगितले आहे ती प्रत्येक गोष्ट आम्ही अल्पसंख्याक समाजासाठी करणार आहोत. या निमित्ताने मी आपल्याला एकच गोष्ट सांगू इच्छितो की, राज्य सरकार नव्याने निवडून आलेले आहे. गेल्या 3-4 महिन्यामध्ये राज्य सरकारने अनेक निर्णय घेतले आहेत. या महाराष्ट्राला पुढे न्यावयाचे आहे. तेव्हा आपणा सर्वांना एकत्रितपणे काम करावयाचे आहे. माननीय राज्यपालांनी अभिभाषणाद्वारे जे काही सांगितले आहे त्याचा आम्ही निश्चितपणे पाठपुरावा करणार आहोत. राज्य सरकार या महाराष्ट्राला देशामध्ये पहिल्या क्रमांकाचे राज्य बनविल्याशिवाय राहणार नाही हा विश्वास व्यक्त करतो आणि माझे भाषण संपवितो. धन्यवाद.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**उप सभापती :** आता मी प्रस्ताव मतास टाकतो.

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

......

**उप सभापती :** सभागृहाची विशेष बैठक आता स्थगित होत आहे. सभागृहाची नियमित बैठक दुपारी 2.00 वाजता पुनः सुरू होईल.

(सभागृहाची बैठक दुपारी 1.29 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

................

यानंतर श्री.अजित.....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**( स्थगितीनंतर )**

**(सभापतीस्थानी माननीय उप सभापती )**

**३ लक्ष रक्कमेच्या पुढील कामासाठी ई-टेन्डरींग बंधनकारक केल्यामुळे मंजुर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यावर झालेला अन्याय**

**(1) * ३९३७ श्री.सतिश चव्हाण, श्री.हेमंत टकले, श्री.संदिप बाजोरिया, डॉ.सुधीर तांबे, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.विक्रम काळे, श्री.धनंजय मुंडे, श्री.अनिल भोसले, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.अमरसिंह पंडित, श्री.आनंदराव पाटील, श्री.रामहरी रुपनवर, श्रीमती हुस्नबानू खलिफे, श्री.संजय दत्त, श्री.किरण पावसकर, श्री.नरेंद्र पाटील, श्री.सुनिल तटकरे, श्री.प्रकाश गजभिये :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) शासनाच्या उपलब्ध होणा-या रुपये १५ लक्ष पर्यतच्या एकूण कामांपैकी ३३ टक्के कामे स्पर्धेशिवाय शासन नियुक्त काम वाटप समिती मार्फत मंजूर संस्थाना देण्यासंदर्भात दिनांक १६ /11/2006 च्या शासन निर्णयाद्वारे स्पष्टपणे आदेश दिले गेलेले आहेत. दिनांक २६ /11/2004 च्या शासन निर्णयांमुळे ३ लक्षच्या पुढील शासकीय साधन साहित्य खरेदीच्या कामासाठी ई टेंडरींग बंधनकारक केले गेलेले आहे. त्यामुळे मजुर संस्थाना विनानिविदा ३३ टक्के काम मिळण्याच्या हक्कावर गदा आलेली आहे असे जानेवारी २०१५ दरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासन याबाबत स्पष्ट निर्देश निर्गमित करणार आहे काय,

(3) असल्यास, त्याचा तपशील काय आहे,

(4) नसल्यास, त्यामागील विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रवीण पोटे-पाटील, श्री. चंद्रकांत पाटील यांच्याकरिता :** (१) अंशतः खरे आहे.
शासनाने सामान्य प्रशासन विभागांतर्गत दि.२६/११/२०१४ रोजी शासन निर्णयाव्दारे या संदर्भात सूचना निर्गमित केल्या आहेत.

(2), (3) व (४) शासनामार्फत सार्वजनिक बांधकाम विभागांतर्गतच्या कामांसाठी मजूर सहकारी संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या कामांसाठी सदर कामे संबंधित गटातील पात्र सदस्यांमध्ये स्पर्धात्मक निविदा बोलावून देण्याबाबत कार्यवाही करण्याची बाब नियोजित असून तत्संबंधी सविस्तर सूचना निर्गमित करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937..

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय,ज्या काही विविध पद्धतीने विकास कामे करण्याची जी प्रणाली आजपर्यंत होती, त्यामध्ये आमदार निधी असेल किंवा खासदार निधी असेल अशा कामांसाठी 15 लाख रुपयांपर्यंतची मर्यादा होती. आता शासनाने हा निर्णय 3 लाख रुपयांपर्यंत आणला आहे. एखादे सभागृह बांधायचे झाले तर त्यासाठी किमान 10 ते 15 लाख रुपये लागतात. एखादे शेततळे असेल किंवा इतर विकास कामे असतील किंवा आमदार आणि खासदार निधीतून काम करण्यासाठी गावकऱ्यांनी विनंती केली तर आपण त्यांची विनंती मान्य करु शकणार नाही. सभागृह, शेततळे, व्यायामशाळा या सार्वजनिक विकासाच्या गोष्टी आहेत. माझा प्रश्न आहे की, पूर्वी जो 15 लाख रुपयांचा निर्णय होता तोच निर्णय शासन कायम ठेवणार काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, कामामध्ये कोणताही गैरव्यवहार होऊ नये, कामात पारदर्शकता असावी या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे. हा अतिशय चांगला आणि योग्य निर्णय आहे. यापूर्वी चांगले काम झाले किंवा नाही हा विषय नाही. आमचे सरकार आल्यापासून ट्रान्सफरन्सी हा आमचा कन्सेप्ट आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी दिनांक 15 डिसेंबर, 2014 रोजी हा निर्णय घोषित केला. टेंडर काढल्यानंतर त्यामध्ये स्पर्धा झाली तर आपणास कमी किंमतीमध्ये चांगले काम मिळू शकते. त्यादृष्टीने हा निर्णय घेण्यात आलेला आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, कामात ट्रान्सफरन्सी यावी यासाठी हा निर्णय घेतलेला आहे. हा निर्णय पूर्वीच्या सरकारचा होता, फक्त निधीची मर्यादा कमी करुन ती 3 लाख रुपयांवर आणली आहे. उद्या जर दुरुस्तीच्या कामासाठी तीन-चार पाच लाख रुपये रक्कम खर्च करायची असेल तर त्यासाठी देखील ई-टेडरींग करावे लागेल. आमचे ई-टेंडरींगच्या बाबतीत काहीच म्हणणे नाही. परंतु आपणास तत्काळ दुरुस्ती करायची असेल तर त्यासाठी कोणता मार्ग काढणार आहात ? सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्था रजिस्टर्ड आहेत सुशिक्षित बेरोजगारांच्या संस्थांना एकूण कामाच्या 33 टक्के काम द्यावे असा पूर्वीच्या शासनाचा निर्णय होता की, या सुशिक्षित बेरोजगार संस्थांच्या कामाचे काय करणार आहात ?

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937..

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, आपण फक्त ई-टेंडरींगचा नियम केलेला आहे. बाकी सर्व नियम सारखेच आहेत. चांगले काम व्हावे यादृष्टीने काम करीत करीत आहोत.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, मी सविस्तर उत्तर देतो. मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना सांगू इच्छितो की, मजूर संस्थाना 33 टक्के कामाचे वाटप, सुशिक्षित बेरोजगार 33 टक्के आणि जनरलला 34 टक्के कामाचे वाटप आपण हे सूत्र कायम ठेवलेले आहे. 33 टक्के सुशिक्षितांच्या कामांमध्ये ई-टेंडरींग होईल त्यामध्ये अन्य कामाचे टेंडरींग होणार नाही. त्यामुळे 33 टक्के कामे सुशिक्षित बेरोजगारांना देण्यास सरकार बांधील आहे. 33 टक्के काम मजूर संस्थांना देणे बांधील आहे. ही कामे एकमेकांमध्ये मिक्स होणार नाहीत.

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, आमदार निधीच्या कामामध्ये पारदर्शकता आली पाहिजे असे राज्यमंत्री महोदय म्हणाले. खरे म्हणजे आमदारांना कामे वाटण्याचा अधिकार नाही. आमदार फक्त काम सुचवितो आणि शासकीय यंत्रणा ते काम करीत असते. शासनाला 3 लाख रुपयांपर्यंत खरेदी करायची असेल तर त्यासाठी ई-टेंडरींग करावे, त्यास आमची काही हरकत नाही. परंतु सिव्हीलचे काम करण्यासाठी ई-टेंडरींग करण्यात येऊ नये. साधी शौचालयाच्या दुरुस्ती करायची असेल तर कोणी ठेकेदार येत नाही आणि कित्येक वेळा टेंडर रिकॉल होतात. तेव्हा याची आपण माहिती घ्यावी. माझ्या मतदार संघातील "ब" आणि "क" वर्ग नगरापालिकेमध्ये साधे काम करण्यास कोणतीही एजन्सी पुढे येत नाही तर त्या ठिकाणी स्पर्धा कशी होणार ? आमच्या येथे ठेकेदार शोधून त्याला काम द्यावे लागते ही वस्तुस्थिती आहे. अशी परिस्थिती आपल्या गावातही असेल. ई-टेंडरींग हा शब्द चांगला वाटतो. पण आपणास खरेदी करायची असेल तर ई-टेंडरींग करावे. परंतु सिव्हीलच्या कामासाठी पूर्वीचीच अट कायम ठेवावी. माझ्या या सूचनेचा शासन विचार करणार काय ?

श्री.प्रवीण पोटे-पाटील : सभापती महोदय, आपण ई-टेंडरींगचा विषय जिल्ह्यापुरता मर्यादित ठेवलेला आहे. बाहेरुन कोणी ठेकेदार येऊन ई-टेंडरींग करेल असा इश्यू नाही. प्रत्येक जिल्ह्यामध्ये ई-टेंडरींग करण्यास लोक सक्षम आहेत आणि ते पुढे येत आहेत.

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937..

श्री.चंद्रकांत रघुवंशी : सभापती महोदय, ई-टेंडरींगसाठी डिजिटल सिग्नेचरची आवश्यकता असते. त्यामुळे कोणीही डिजिटल सिग्नेचर करण्यासाठी पुढे येत नाही. डिजिटल सिग्नेचर करण्यासाठी काय करावे लागते हे अजून अधिकाऱ्यांना समजत नाही तर ते ठेकेदारांना काय समजणार ? आपण ई-टेंडरींग जिल्ह्यासाठी करा अथवा तालुक्यासाठी करा पण ई-टेंडरींगसाठी ठेकेदार पुढे येत नाही ही अडचण आहे. आपणास आज नाही तर उद्या हा निर्णय बदलावा लागणार आहे. माझा प्रश्न आहे की, कामे लवकर होण्याच्या दृष्टीने शासन या निर्णयाचा फेरविचार करणार काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, कोणतीही नवीन पद्धती अवलंबिताना त्याची सवय होण्यास थोडा वेळ लागतो. आपण पगार, स्कॉलरशीप किंवा अनुदान बँकांमध्ये ई ट्रान्सफरींगद्वारे करण्यास सुरुवात केली. आता दुष्काळ आणि गारपीटग्रस्तांना मदत वाटली गेली नाही त्याचे कारण अनेकांनी बँकेत खाते उघडले नव्हते हे आहे. कोणी खाते उघडले नाही म्हणून आपण त्यामध्ये बदल करावा हे असे म्हणणे योग्य नाही. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, छोट्या गावांमध्ये ई-टेंडरींग प्रॅक्टीकल नाही. त्यावर मी सांगितले की, आपण केव्हाही ॲडव्हान्स टेक्नॉलॉजीचा वापर करताना त्याची सवय होण्यास थोडा वेळ लागतो.

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937....

श्री.चंद्रकांत पाटील....

हे केल्यानंतर हळूहळू लोकांनी त्याची सवय होते. आमदारांचे पगार होण्यासाठी पूर्वी फिजिकली फॉर्म भरुन दिले जायचे. परंतु या महिन्यापासून इलेक्ट्रॉनिक पध्दतीने पगार करण्यात येणार आहेत. यात सुरुवातीला जशा अडचणी येतील तशाच काही अडचणी सुरुवातीला नवीन सिस्टीम स्वीकारताना येतील. वर्षभरात 50 लाखापर्यंतची कामे मजूर सहकारी संस्थांना विना निविदा दिली जात होती, तसेच 75 लाख रुपयांपर्यंतची कामे सुशिक्षित बेरोजगारांच्या सहकारी संस्थांना विना निविदा दिली जात होती. या कामांचे वाटप कनिष्ठ अभियंता किंवा उप अभियंता करीत होते. मी आपल्याला सर्व काही सांगतो. पूर्वी सुशिक्षित बेरोजगारांना काम देण्यासाठी अधीक्षक अभियंत्यांच्या नेतृत्वाखाली समिती होती. मजूर सहकारी संस्थांना काम देण्यासाठी डीडीआर यांच्या नेतृत्वाखाली समिती होती. मला वाटते कामांचे वाटप करताना व्यावहारिकदृष्ट्या त्या ठिकाणी काय होत होते याचा आपण अंदाज घ्यायला पाहिजे. त्या समितीकडून आपल्या मर्जीप्रमाणे कामाचे वाटप केले जात होते. परंतु आता ई-टेंडरींगने कामे वाटप करताना आपण कोणावरही अन्याय करीत नाही. मजूर सहकारी संस्था आणि सुशिक्षित बेरोजगारांना कामे देताना जेवढा हिस्सा राखून ठेवला पाहिजे तेवढा ठेवत आहोत. आपणही मान्य कराल की, त्या समित्यांकडे पूर्णपणे अधिकार जात असल्यामुळे त्या समित्या हव्या त्या लोकांना कामे देत होती. मजूर सहकारी संस्थांची सुध्दा विभागाच्या माध्यमातून आम्ही तपासणी करणार आहोत. त्यामुळे ई-टेंडरींग या नव्या सिस्टीमशिवाय पर्याय नाही. शिवाय या प्रक्रियेमध्ये स्पर्धा झाल्यानंतर कमी रकमेत निविदा जातील आणि त्यातून सरकारचा पैसे वाचतील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, माननीय मंत्री या प्रश्नाला न्याय देण्याचा पूर्ण प्रयत्न करीत आहेत. यातील एक-दोन वाक्ये कानाला ऐकायला बरी वाटतात. माननीय मंत्री महोदय वारंवार पारदर्शकतेबाबत सांगत आहेत. मग पूर्वी पारदर्शकता नव्हती असा याचा अर्थ ध्वनित होतो. ते योग्य नाही. हा पक्षाचा नव्हे तर लोकप्रतिनिधींच्या हक्काच्या अवमानाचा प्रश्न आहे. पारदर्शकता आणि कामाची गुणवत्ता या दोन गोष्टी आपल्याला महत्त्वाच्या आहेत. निविदा प्रक्रियेत कमी किमतीची निविदा कशी येते या बाबतची सर्व माहिती आपल्याला आहे. कमी निविदाकार

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937....

श्री.भाई जगताप....

कसे काम करतात हे देखील आपल्याला माहीत आहे. गेली 67 वर्षे असेच होत आहे. परंतु नवीन पध्दतीमुळे ज्या अडचणी निर्माण होतील आणि ज्या उद्देशासाठी आपण हे सर्व काही करीत आहात तो उद्देश सफल होणार नाही. त्यामुळे पूर्वी कामे करण्यात ज्या काही बाबी निदर्शनास येत आहेत त्या अडविल्या पाहिजेत. ई-टेंडरींग हे नाव ऐकायला चांगले वाटते. ज्या ज्या सरकारी कामामध्ये ई-टेंडरींग केले आहे तेथील रिझल्ट तपासून पाहिले पाहिजे. या विषयाच्या बाबतीत अशी विनंती आहे की, पूर्वीच्या पध्दतीमध्ये जी सुधारणा करणे गरजेचे आहे ती केली पाहिजे. हा सरकारचा अधिकार आहे आणि आपण सर्वजण तो मान्य करू. एखादी सिस्टीम बदलवित असताना तिचे परिणाम आणि दुष्परिणाम हे दोन्ही तपासले पाहिजे. मी विचारु इच्छितो की, पूर्वी ज्या प्रकारे काम करण्यात येत होते त्यामध्ये तत्कालीक बदल करुन त्यानुसार पुढे काम देण्यात येईल काय ?

श्री.चंद्रकांत पाटील : महोदय, यामध्ये लोकप्रतिनिधींच्या हक्कांवर कोठेही गदा येत नाही. यामध्ये लोकप्रतिनिधींचा कोठेच रोल नाही. कारण समितीच कामांचे वाटप करीत असते. आता तरी या निर्णयावर सरकार ठाम आहे आणि या निर्णयामध्ये काहीही बदल होणार नाही.

श्री.जयंत प्र.पाटील : महोदय, राज्यामध्ये एकूण 36 जिल्ह्यात 14 हजार मजूर सहकारी संस्था आहेत आणि 7 लाखापर्यंत मजूर आहेत. अशा प्रत्येक क्षेत्रात अडचण आहे. आज कोठेही पारदर्शकता नाही. प्रत्येक ठिकाणी घोटाळा आहे. सर्वच ठिकाणी नियमानुसार कामे होतात असे नाही. ई-टेंडरींग म्हणजे काय ? आमच्या ग्रामपंचायतीने ई-टेंडरींग काढले होते. त्यामध्ये सावंतवाडी येथील एका व्यक्तीने तीन लाख रुपयांच्या कामाचे ई-टेंडरींग भरले आहे. ई-टेंडरींग चांगले असल्यामुळे मी त्याचे समर्थन करतो. पण त्याला मर्यादा ठेवली पाहिजे. वास्तविक पाहता 2 कोटी रुपयांचे काम असेल तर ई-टेंडरींग ठेवले पाहिजे. आज ई-टेंडरींगमुळे दोन-पाच लाख रुपयांचे कामच होत नाही. महोदय, मजूर सहकारी संस्थेला पर्याय म्हणून आपण माननीय केंद्रीय मंत्री श्री.नितीन गडकरी यांच्याशी चर्चा करावी. कारण सुशिक्षित बेरोजगारांना काम देणे ही माननीय मंत्री श्री.नितीन गडकरी साहेबांनी युती शासनामध्ये आणलेली योजना आहे. ई-



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937....

श्री.जयंत प्र. पाटील....

टेंडरींगमुळे कामाचे समान वाटप होणार नाही. मजुरांना काम मिळावे म्हणून मजूर सहकारी संस्था निर्माण केल्या आहेत. ज्या संस्थांच्या बाबतीत आक्षेप असतील त्यांची चौकशी करावी, त्यांचे कार्ड चेक करावे. परंतु या सहकारी संस्थांना कामाचे खऱ्या अर्थाने वाटप झाले पाहिजे. मजूर सहकारी संस्थेच्या समितीमध्ये मजूर फेडरेशनचे अध्यक्ष आणि दोन अभियंते यांचा समावेश आहे. सर्व सिस्टीमचा त्यामध्ये सहभाग आहे. कोण्या एकट्याचा त्यामध्ये सहभाग नाही. माननीय मंत्री, तुमच्यासारखे सर्वच प्रामाणिक नाहीत. त्यामुळे ही सिस्टीम आपल्याला इथपासून तिथपर्यंत बदलावी लागेल. आपण संस्थांना कामाचा कोटा ठरवून द्यावा. मी तर म्हणेन की, वाटप समिती अधिक पारदर्शक करावी. या बाबत पहिले पावले उचलावीत आणि त्यात जर अपयश आले तर ई-टेंडरींगचा पर्याय स्वीकारावा. काही सहकारी संस्था उभ्या करण्यासठी आम्ही भरपूर कष्ट घेतले आहे. आम्ही आदिवासी, दलित मजूरांच्या सहकारी संस्था उभ्या करण्यासाठी गावागावात जाऊन बैठका घेतल्या आहेत. परंतु या संस्थांना कामे देण्याऐवजी राज्य सरकारने ई-टेंडरींगचा निर्णय घेतला आहे. मला वाटते सहकार क्षेत्रात मजूर संस्थांमध्ये काम करणारे दोन्ही सभागृहातील जे आमदार आहेत त्यांच्याशी चर्चा करण्यासाठी माननीय मंत्र्यांनी एक बैठक आयोजित करावी. त्या बैठकीत आपण या बाबत ठरवावे. शेवटी माननीय मंत्र्यांचा निर्णय हा अंतिम आहे आणि त्यांना या बाबतचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे. त्या बैठकीमध्ये चर्चा करून निर्णय घ्यावा अशी मी विनंती करतो.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. माननीय मंत्री या विषयाला न्याय देण्याचा प्रयत्न करीत आहेत. परंतु ते त्यांच्या निर्णयावर ठाम आहेत. परंतु राज्य सरकारने जो निर्णय घेतलेला आहे त्याबाबत प्रत्यक्षात फिल्डवर अडचण येणार आहे. उदाहरणार्थ एखाद्या आमदाराने त्याच्या स्थानिक स्वराज्य संस्थेमधून एखाद्या ग्रामपंचायतीला निधी दिला आणि त्या कामाचे 3 लाख रुपयांपर्यंतचे ई-टेंडरींग झाले, समजा ती ग्रामपंचायत माझ्या विरोधातील असेल आणि मी ई-टेंडरींगमध्ये सहभाग घेतला तर ते काम पाच वर्षे नव्हे 15 वर्षे होऊ शकणार नाही. ते पैसे लॅप्स होतील. पण ही वस्तुस्थिती कोणीच लक्षात घेत नाही. जर खरोखरच काम

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

करण्याची इच्छा असेल तर ते काम होते. परंतु काम करीत असताना कामाचा दर्जा सुध्दा

..4..



ता.प्र.क्र.3937....

श्री.धनंजय मुंडे....

सांभाळला पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्यानुसार काम वाटप समितीची पारदर्शकता वाढविली पहिजे. माझा प्रश्न आहे की, ई-टेंडरींग सिस्टीम ही केवळ एकाच विभागात का स्वीकारली जाते ? मी जबाबदारीने सांगतो की, महिला व बालकल्याण विभागांतर्गत आयसीडीएसच्या पोषण आहार योजनेची हजारो, कोटी रुपयांची कामे ई-टेंडरींगने होत नाही. त्या विभागात ई-टेंडरींग होत नाही, तर थेट निविदा काढल्या जातात. सर्वोच्च न्यायालयाने ही कामे महिला बचत गटांना देण्याचे सुचविले होते. माननीय मंत्री, आपण पारदर्शकतेबाबत सांगत आहात. पण तुमचे सरकार जुन्या ठेकेदारांना दोन-दोन महिन्याची मुदत देत आहे. ई-टेंडरींग करावयाचे असेल तर सरसकट सर्व विभागांमध्ये करावे. माननीय मंत्री, आपण यामध्ये पारदर्शकता आणाल याची मला खात्री आहे.

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937....

श्री. धनंजय मुंडे ....

आपण वस्तुस्थिती लक्षात घेऊन यामध्ये पारदर्शकता आणावी. 3 लाख रूपयांच्या नियमा ऐवजी हाच नियम राहू द्यावा. कारण हा जुना नियम होताच. 10 लाख रूपये व 15 लाख रूपये असा नियम होताच. 10 लाख रूपयांच्या रकमेपर्यंत ग्रामपंचायतीला ई टेंडिरिंग होते. आपण 10 लाख रूपयांपर्यंत राहू द्यावे. मात्र 10 लाख रूपयांच्या पुढे ई टेंडरिंगला जाऊ द्यावे. 15 लाख रूपयांची अट बी ॲण्ड सी ला होती, तेही ई टेंडरिंगला जाऊ द्या. आमचे त्याबाबत काही म्हणणे नाही. आपण असे केल्याने थोडी फार कामे होतील. ग्रामपंचायतीचा 3 लाख रूपयांत 300 मीटर रस्ता देखील होत नाही. तुम्ही जिल्ह्याचा कोटा केला आहे. मजूर संस्था किंवा बेरोजगार संस्था यांच्या संदर्भात संबध जिल्ह्याचा क्रायटेरिया तयार केला आहे. बीड जिल्ह्यातील आष्टीच्या ठेकेदाराने परळी तालुक्यातील ई टेंडरिंगमध्ये भाग घेतला तर 3 लाख रूपयांच्या कामासाठी आष्टीहून 180 कि.मी. येऊन तो परळी येथील काम करणार आहे का ? कारण त्याच्या 3 येण्यामध्ये त्याचे 3 लाख रूपये खर्च होतील. सभापती महोदय, हे वस्तुस्थितीला धरून नाही. आपण असे केल्याने नाव होईल. पारदर्शक ई टेंडरिग असे म्हटले जाईल. सर्व गोष्टी होतील. पहिल्या गोष्टी ई टेंडरिंगच्या होत्या. आपण असे केल्याने सर्व वाटोळे होईल, स्थानिक विकास होणार नाही, ग्रामीण भागाचा विकास अडकेल. मुंबई, पुणे अशा मोठ्या शहरांतील छोट्या इमारतींना आमदारांकडून दुरूस्तीसाठी पैसा द्यावा लागतो. आमदारांना दुरूस्तीसाठी दिलेला पैसा देखील यामुळे खर्च होणार नाही. मी आपल्यासमोर वस्तुस्थिती मांडत आहे. शासनाने या बाबतीत काही सहानुभूतीपूर्वक निर्णय करावा आणि हा थोड्या फार प्रमाणात घेतलेला निर्णय बदलावा.

श्री. अमरसिंह पंडित : सभापती महोदय, शासन ई टेंडरिंगच्या संदर्भात आग्रही आहे. ई टेंडरिंग काही ठराविक खात्यापुरतेच आहे का, काही खात्यांना ई टेंडरिंगचे नियम लावण्याची माननीय मंत्र्यांना अडचण आहे का, माननीय मंत्री काही खात्यांना हे नियम का लावत नाहीत ? महिला व बाल विकास विभागाला वेगळा नियम आहे, कृषी विभागाला वेगळा नियम आहे. कृषी



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937....

श्री. अमरसिंह पंडित ....

विभागाची तालुका स्तरावर साधारणतः प्रत्येक वर्षी 350-400 कोटी रूपयांची कामे हातात, ही सर्व कामे विभागाकडून होतात. महिला व बाल विकास विभागाची अन्न पोषण आहार वितरण करण्याची व्यवस्था 15 वर्षांपासून असून त्यामध्ये काहीही बदल झालेला नाही. तुमची सत्ता आली तरी देखील तो ठेकेदार बदललेला नाही, 2-3 महिन्यांचे एक्स्टेंशनच दिले जात आहे. महिला व बाल विकासमध्ये देखील या संदर्भात बदल नाही. कृषी विभागात ई टेंडरिंगचा नियम लागू नाही. मग आपला आग्रह आणि अट्टहास का आहे ? सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी ग्राऊंड रिॲलिटी सांगितली आहे. एखाद्या ग्रामपंचायतीला ई टेंडरिंग द्यायचे नंतर तिसऱ्या माणसाच्या नावाने ते काम घ्यायचे आणि ते ग्रामपंचायतीने करायचे आणि डिपॉझिटच्या नावाने पैसे कपात करून घ्यायचे हे बरोबर नाही. 3 लाख रूपयांच्या कामामध्ये केवळ 2 लाख 15 हजार रूपये किंवा 2 लाख 32 हजार रूपयांच्या वर जात नाही. आपण या संदर्भातील निर्णय धोरण म्हणून केला आहे. शासन या संदर्भात परत एकदा विचारविनियम करणार आहे का, उर्वरित 2 विभागांनाही ई टेंडरिंगच्या प्रोसेसमध्ये सामावून घेणार आहेत का ?

श्री. चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, सभागृहाच्या भावना माझ्या लक्षात आल्या आहेत. परंतु, हा निर्णय मंत्रिमंडळात झाला आहे आणि त्यानंतर तसे आदेश देण्यात आले आहेत. सर्व खात्यांना हा नियम लागू आहे. कोणालाही हात लावण्याचे कारण नाही. आपण दिलेल्या माहितीची चौकशी करण्यात येईल. मंत्रिमंडळ स्तरावर हा निर्णय झाला आहे. सभागृहात मला ऑन माय ओन हा निर्णय बदलता येणार नाही. सभागृहाच्या भावना मी मंत्रिमंडळापर्यंत पोहचवितो.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, हा सुशिक्षित बेकारांचा प्रश्न आहे. माननीय मंत्री हे सुध्दा पदवीधर आमदार म्हणून पुणे विभागात नेतृत्व करीत आहेत. हा पदवीधर ठेकेदाराचा प्रश्न आहे, त्यांना काम मिळाले पाहिजे. आपण ज्येष्ठ माननीय मंत्री आहात. उत्तर नाही असे म्हणणे जमणार नाही. मी माननीय मंत्र्यांना सांगू इच्छितो की, सभागृहाच्या भावना लक्षात घेऊन या संदर्भात दोन्ही बाजूच्या सन्माननीय सदस्यांची एक बैठक घ्यावी आणि या बाबतीत धोरणात्मक



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3937....

श्री. विक्रम काळे ....

तोडगा काढावा. कारण ग्राऊंड रिॲलिटी सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितली आहे. आपणालाही माहीत आहे की, 3 लाख रूपयांत कोणतेही काम होत नाही. महागाई वाढत आहे. सिमेंटचे पोते साडे तीनशे रूपयांना झाले आहे. आपण अधिवेशन संपण्यापूर्वी याबाबत बैठक घेऊन या संदर्भातील निर्णय घेणार का ?

**उप सभापती** : आता पुढील प्रश्नाकडे वळू या.

श्री. विक्रम काळे : सभापती महोदय, माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळालेले नाही.

**उप सभापती** : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, माननीय मंत्र्यांनी उत्तर दिले आहे की, हा निर्णय मंत्रिमंडळात झाला आहे. मी ऑन माय ओन सभागृहात हा निर्णय घेऊ शकत नाही. मी आपल्या सर्वांच्या भावना मंत्रिमंडळासमोर ठेवीन.

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**राज्यातील आदिवासी विद्यार्थी राजीव गांधी विमा योजनेपासून वंचित असल्याबाबत**

(2) * ३६८६ ॲड.जयदेव गायकवाड, श्री.धनंजय मुंडे, श्री.सुनील तटकरे, श्री.प्रकाश गजभिये, श्री.हेमंत टकले, श्री.अनिल भोसले, श्री.विक्रम काळे, श्री.नरेंद्र पाटील, श्री.ख्वाजा बेग, श्री.अब्दुल्लाखान दुर्राणी, श्री.संजय दत्त, श्री.शरद रणपिसे, श्री.मुझफ्फर हुसैन सय्यद, श्री.अशोक उर्फ भाई जगताप, डॉ.सुधीर तांबे, श्री.सतिश चव्हाण, श्री.दिपकराव साळुंखे-पाटील, श्री.किरण पावसकर, श्री.अमरसिंह पंडित, श्री.संदिप बाजोरिया : सन्माननीय आदिवासी विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सर्व आदिवासी विद्यार्थी सरकारी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राजीव गांधी विमा योजनेअंतर्गत सरकारतर्फे विमा काढण्याचा निर्णय ११ नोव्हेंबर, २०११ रोजी शासननिर्णय व्दारे घेण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, राज्यातील आदिवासी विद्यार्थी सदर विमा योजनेपासून वंचित असल्याचे माहे जानेवारी, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, सदर विद्यार्थ्यांचा विमा न काढण्याची कारणे काय आहेत,

(4) असल्यास, प्रश्न भाग-२ बाबत चौकशी करण्यात आली काय,

(5) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार आदिवासी विद्यार्थ्यांना राजीव गांधी विमा योजनेचा फायदा देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(6) अद्याप उक्त प्रश्नाबाबत कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. विष्णू सवरा : (1) होय, हे खरे आहे.

(2) शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.पीआरई-2011/प्र.क्र.249/प्रशि-1,दि.11 जुलै, 2011 अन्वये राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना (अपघात विमा योजना) बंद करण्यात आलेली असून राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना सुरूकरण्यात आलेली आहे. सदर नवीन योजनाही शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असून या योजनेत विमा काढण्याची बाब अंतर्भूत नाही.

(3) प्रश्न उद्‌भवत नाही.

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3686....

श्री. विष्णू सवरा ....

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

(5) प्रश्न उद्‌भवत नाही.

(6) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, माझी उत्तराला हरकत आहे.

ॲड. जयदेव गायकवाड : सभापती महोदय, माझी देखील उत्तराला हरकत आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, मी पहिल्यांदा विचारले होते. आता मी उभा राहिलो आहे. माझी उत्तराला हरकत आहे. पहिल्यांदा मी उभा राहिलो आहे. माझेही प्रश्नांच्या नावामध्ये आहे. सन्माननीय सदस्यांनी पहिल्यांदा हरकत घ्यायला पाहिजे होती. माननीय मंत्री स्वतः या समाजाचे आहेत. अतिशय गांभीर्यपूर्वक प्रश्न विचारला होता की, "राज्यातील सर्व अदिवासी विद्यार्थी सरकारी वसतिगृहातील विद्यार्थ्यांना राजीव गांधी विकास योजनेंतर्गत सरकारतर्फे विमा काढण्याचा निर्णय दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 रोजी जीआर द्वारे काढण्यात आला होता, हे खरे आहे काय ?" माननीय मंत्र्यांनी उत्तरात म्हटले आहे की, होय, हे खरे आहे. जीआरची तारीख दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 आहे. ते बरोबर आहे. दुसऱ्या क्रमांकाच्या उत्तरात असे म्हटले आहे की, "शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्र.पीआरई-2011/प्र.क्र.249/प्रशि-1, दि.11 जुलै, 2011 अन्वये राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना (अपघात विमा योजना) बंद करण्यात आलेली असून राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना सुरू करण्यात आलेली आहे. सदर नवीन योजनाही शालेय शिक्षण विभागामार्फत राबविण्यात येत असून या योजनेत विमा काढण्याची बाब अंतर्भूत नाही." मला आश्चर्य असे वाटते की, नोव्हेंबरमध्ये झालेला निर्णय जुलैमध्ये कसा रद्द करण्याचा निर्णय घेतला ? अशा प्रकारे अधिकारी चुकीची आणि थातुरमातूर उत्तरे देत असतील, आदिवासी मुलांच्या विम्याच्या बाबतीत क्रूर चेष्टा करीत असतील तर माननीय मंत्र्यांनी याबाबतीत खुलासा करावा. माझा प्रश्न असा आहे की, माननीय मंत्री ज्या अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती सभागृहासमोर आणली त्यांच्यावर कारवाई करणार का ?

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3686....

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, सदर बाबतीत चौकशी करण्यात येईल. हा विषय महत्त्वाचा आहे. आपण त्याप्रमाणे प्रश्न विचारला पाहिजे. विद्यार्थ्यांच्या दृटीने हा प्रश्न अतिशय महत्त्वाचा आहे. जरूर या संदर्भात चौकशी करण्यात येईल.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, आम्ही एक गोष्ट समजू शकतो की, माननीय मंत्री मनापासून उत्तर देण्याचा प्रयत्न करीत आहेत. तुम्हाला कैचीत पकडण्याचा आमचा उद्देश नाही. तुमच्याच समोर उत्तर आहे. आता आपण या संदर्भात चौकशी काय करणार आहात ? कारण उत्तर लिखित आहे. अधिकाऱ्यांनी लिखित उत्तर दिले आहे आणि असे नसेल तर तुम्ही सांगा की, तुम्ही उत्तर दिले आहे. अधिकाऱ्यांनी दिलेले उत्तर चुकीचे आहे. उत्तर लिखित आहे. आता हे उत्तर सभागृहाच्या पटलावर आहे मग त्यामध्ये चौकशी कसली करणार आहात ?

श्री. विष्णू सवरा : सभापती महोदय, तारखेचा गोंधळ आहे. दिनांक 11 जुलै, 2011 चा जीआर असून तो शालेय शिक्षण विभागाने काढला आहे.

श्री. भाई जगताप : सभापती महोदय, हे उत्तर येणार आहे हे मला माहीत होते. आपले म्हणणे बरोबर आहे. मी ते वाचले आहे. शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचाच आहे. त्यामध्ये विमा योजना अंतर्भूत आहे. विमा योजना तुमच्या तारखेप्रमाणे दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 म्हणजे जुलैनंतर अंतर्भूत करण्यात आली आहे.

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3686.........

श्री.भाई जगताप........

दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 चा जी.आर.आपण रद्द केला आहे. त्यानुसार ती योजना रद्द झाली. त्यानंतर दिनांक 11 जुलै, 2011 च्या निर्णयाचा उल्लेख आपण केला आहे. मंत्री महोदयांनीच वाचून याबाबत खुलासा करावा. विद्यार्थ्यांना विमा मिळावा, या संदर्भातील हा प्रश्न आहे. अधिकाऱ्यांनी अतिशय चुकीची माहिती या ठिकाणी दिलेली असल्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई झाली पाहिजे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य तारखेचा आग्रह धरत आहेत.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, केवळ तारखेचा प्रश्न नाही. या ठिकाणी उत्तरात जुलैच्या जी.आर.चा उल्लेख करण्यात आला आहे आणि त्यानंतर पुढील प्रश्नांना 'प्रश्न उद्‌भवत नाही', असे उत्तर देण्यात आले आहे.

**उप सभापती :** सन्माननीय सदस्यांना माझी विनंती आहे की, त्यांनी अशा प्रकारे मंत्री महोदयांच्या अंगावर धावून गेल्यासारखे प्रश्न विचारु नयेत. मंत्री महोदय, आपण घाबरु नका, मी आपल्या पाठीशी आहे.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, आम्ही पोटतिडीकीने बोलतो आहोत. सध्याचे माननीय आरोग्य मंत्री डॉ.दिपक सावंत हे सन्माननीय सदस्य असताना पिशवीभर पुरावे घेऊन सभागृहात आले होते. मंत्री महोदयांनी देखील मागील अधिवेशनामध्ये कबूल केलेले आहे. हमाम साबणाचे स्पेलिंग बदलवून ड्युप्लिकेट साबणाचा पुरवठा केला जातो, अन्य वस्तू देखील ड्युप्लिकेट पुरविल्या जातात. या सभागृहामध्ये हे वारंवार सिध्द झालेले आहे. मंत्री महोदयांनी मागील अधिवेशनात मला असे उत्तर दिले होते की, आम्ही कारवाई करणार आहोत. त्यांनी कोणती कारवाई केली आहे ? आज तर या अधिकाऱ्यांनी मंत्री महोदयांच्या तोंडी अशा प्रकारे चुकीचे शब्द घातले आहेत. त्यामुळे त्यांच्याविरुध्द कारवाई झाली पाहिजे. हा प्रश्न वारंवार या सभागृहात आलेला आहे. आदिवासींसाठी असलेल्या बजेटची या लोकांनी राखरांगोळी करुन टाकली आहे. विद्यार्थ्यांपर्यंत या वस्तू पोहोचत नसतील तर मंत्री महोदय कोणती कारवाई करणार आहेत ?

..2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3686.........

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही चौकशी करु. प्रश्न असा आहे की, दिनांक 11 जुलै, 2011 रोजीच्या शासन निर्णयान्वये अगोदरची राजीव गांधी विद्यार्थी सुरक्षा योजना बंद केलेली आहे. त्याऐवजी आपण आता राजीव गांधी विद्यार्थी अपघात सानुग्रह अनुदान योजना सुरु केलेली आहे. या संदर्भातील हा प्रश्न आहे. विद्यार्थ्यांसाठी पूर्वी विमा योजना होती. त्या ऐवजी आता आपण सानुग्रह अनुदान योजना सुरु केलेली आहे. एखाद्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाला तर 75 हजार रुपये वगैरे बाबी त्यामध्ये होत्या. पूर्वीची योजना आपण बंद केली आहे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, मंत्री महोदयांच्या अंगावर जाण्याचा काही प्रश्न नाही. आम्ही आपल्याकडे बघून प्रश्न विचारीत असतो. परंतु, मला हे निदर्शनास आणावयाचे आहे की, अधिकाऱ्यांना कोणतेही गांभीर्य नाही. आपण बघावे की, तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीत या प्रश्नासमोर 'उत्तर आले नाही', असे छापण्यात आले होते, ते खोडण्यात आले आणि नंतर उत्तर देण्यात आले आहे. जे उत्तर नंतर देण्यात आलेले आहे ते देखील अतिशय विचित्र आहे. त्या संदर्भात माझी हरकत आहे. सन 2011 मधील योजना होती, त्यामध्ये काही बदल केलेले आहेत, त्याची आम्हाला माहिती आहे. माझा प्रश्न असा आहे की, या विद्यार्थ्यांचा विमा काढला जाणार आहे का ?

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, पूर्वीची योजना होती, ती बंद झालेली आहे. पूर्वी विम्याची योजना होती. त्याऐवजी आपण नवीन योजना आणलेली आहे. या योजनेनुसार सानुग्रह अनुदान दिले जाणार आहे. एखाद्या विद्यार्थ्याचा मृत्यू झाल्यास त्याला आपण 75 हजार रुपये देणार आहोत. विमा न काढता आपण सानुग्रह अनुदान योजना आणलेली आहे. यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठीत केलेली आहे. वसतिगृहातील विद्यार्थ्यांना आपण अनुदान देणार आहोत.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

..3....

ता.प्र.क्र.3686.........

ॲड.जयदेव गायकवाड : सभापती महोदय, या तारांकित प्रश्नाला दिलेले उत्तर अतिशय गोंधळाचे आहे. मंत्री महोदयांनी या प्रश्नासंबंधीची योग्य माहिती मिळवावी आणि तोपर्यंत हा प्रश्न आपण राखून ठेवावा, अशी माझी आपल्याला विनंती आहे.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, प्रश्न राखून ठेवण्याचे काही कारण नाही. मंत्री महोदयांनी अतिशय स्पष्टपणे सांगितले आहे की, विमा योजना बंद करण्यात आली असून नवीन सानुग्रह अनुदान योजना सुरु करण्यात आली आहे. नवीन योजनेमध्ये विमा नाही. सन्माननीय सदस्यांचा प्रश्न एकच आहे की, नवीन योजनेमध्ये विमा आहे का ? परंतु, तसा विमा नवीन योजनेमध्ये नाही.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी हा प्रश्न राखून ठेवावा, अशी विनंती केली आहे. मला असा प्रश्न विचारावयाचा आहे की, दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 चा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाचा आहे का ? हा शासन निर्णय सोयी-सुविधा आणि विम्यासंदर्भातील आहे. हा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाचा आहे का, या प्रश्नाचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे, अन्यथा, हा प्रश्न राखून ठेवावा, अशी माझी विनंती आहे.

श्री.विष्णू सवरा : सभापती महोदय, दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 रोजीचा शासन निर्णय हा आदिवासी विकास विभागाचा आहे. एकच गोष्ट आपल्याला सांगावयाची राहून गेली आहे, कदाचित ती माझ्या उत्तरामध्ये आली नसेल, पण अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे की, दिनांक 11 नोव्हेंबर, 2011 रोजीचा शासन निर्णय आदिवासी विकास विभागाचा असून जुलैमध्ये काढलेल्या शासन निर्णयानुसार विमा योजना बंद करण्यात आलेली आहे. त्याऐवजी सानुग्रह अनुदान योजना आणलेली आहे. हा शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रिडा विभागाचा आहे. यापूर्वी विमा योजना होती. ती योजना बंद झाली आहे. त्याऐवजी जुलै मधील शासन निर्णयानुसार आपण सानुग्रह अनुदान देणार आहोत.

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3686...

ॲड.जयदेव गायवाड : सभापती महोदय, मी अतिशय स्पेसिफिक प्रश्न विचारला होता, राज्यातील सरकारी वसतिगृहातील सर्व आदिवासी विद्यार्थ्यांना राजीव गांधी विमा योजनेअंतर्गत सरकारतर्फे विमा काढण्याचा निर्णय 11 नोव्हेंबर 2011 रोजी शासन निर्णय काढण्यात आला होता हे खरे आहे काय ? या प्रश्नाला मंत्री महोदयांनी लेखी उत्तरात 'होय' असे उत्तर दिलेले आहे. मंत्री महोदय आता सांगत आहेत की, विमा काढण्याचा शासन निर्णय नाही.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी स्पष्ट सांगितले पाहिजे की, आदिवासी वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांचा विमा काढला जाणार आहे किंवा नाही ?

श्री.विष्णू सावरा : सभापती महोदय, मी मघाशी सांगितले आहे की, क्रीडा खात्याने जो शासन निर्णय काढलेला आहे. त्यामध्ये दुरुस्ती करायची राहिली आहे. विम्या ऐवजी सानुग्रह अनुदान देण्यात येणार आहे ती दुरुस्त करण्यात येणार आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, 11 नोव्हेंबर, 2011 चा जो शासन निर्णय आहे त्या शासन निर्णयात विम्याचा उल्लेख नाही. मंत्री महोदयांनी लेखी उत्तर चुकीचे दिलेले आहे. सर्व सन्माननीय सदस्यांचे असेच म्हणणे आहे की, उत्तर चुकीचे दिल्यामुळे हा प्रश्न राखून ठेवावा. आदिवासी मंत्री महोदय अतिशय व्यवस्थितपणे काम करीत आहेत. मंत्री महोदयांबाबत आम्हाला आदर आहे, ज्या अधिकाऱ्यांनी उत्तर चुकीचे दिले असेल व ते मंत्री महोदयांच्या तोंडून सभागृहात येत असेल तर ही बाब चुकीची आहे. हा अतिशय गंभीर प्रश्न आहे, आदिवासी मुलांच्या जीवनाशी संबंधित हा प्रश्न आहे. विम्याची रक्कम 75 हजार रुपये मिळत होती, आता सानुग्रह अनुदान देण्याचा निर्णय शासन घेत आहे. हा प्रश्न गंभीर आहे येथे कोणालाही कमी लेखन्याचा विषय नाही. मंत्री महोदयांना तर बिलकूलच नाही. शासनाकडून योग्य उत्तर यावे असे सभागृहाला अपेक्षित आहे. आदिवासी विद्यार्थ्यांना योग्य न्याय मिळाला पाहिजे. ज्या अधिकाऱ्यांनी चुकीचे उत्तर दिले आहे त्या अधिकाऱ्यांवर मंत्री महोदय कारवाई करतील काय ?

श्री.विष्णू सावरा : सभापती महोदय, प्रश्न राखून ठेवण्याचा आता विषय राहिलेला नाही. राजीव गांधी विमा योजना पूर्वी होती, त्या ऐवजी राजीव गांधी सानुग्रह अनुदान योजना अशा प्रकारची दुरुस्ती करायची आमच्या विभागाकडून राहीलेली आहे. याबाबत चौकशी करुन



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3686...

श्री.विष्णू सावरा....

अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची आवश्यकता भासल्यास कारवाई करण्यात येईल. याबाबत जी दुरुस्ती करायची आहे ती विभागाकडून करण्यात येईल.

श्री.विक्रम काळे : सभापती महोदय, रेकॉर्डवर चुकीचे येत आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, या प्रश्नावर आपण बरीच चर्चा केली आहे. मंत्री महोदयांना जी माहिती आहे, त्या पध्दतीने त्यांनी या प्रश्नाला न्याय देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या प्रश्नांबाबत अद्यापही सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले नाही. माझी अशी विनंती आहे की, यासंदर्भात सर्व संबंधित सदस्यांची एक बैठक माननीय मंत्री महोदयांच्या दालनात बोलविण्यात यावी, त्यामध्ये हा विषय मार्गी लागू शकेल. आदिवासी विद्यार्थ्यांचा प्रश्न असल्यामुळे त्यांना योग्य तो न्याय मिळू शकेल असे मला वाटते.

**उप सभापती** : सन्माननीय सदस्य श्री.रामनाथ मोते यांनी केलेली सूचना अतिशय योग्य आहे, बऱ्याच सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारले आहेत, मंत्री महोदयांकडून देण्यात आलेल्या उत्तरामुळे सन्माननीय सदस्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे मंत्री महोदयांना माझी सूचना आहे की, सर्व संबंधित सदस्यांची एक बैठक आपल्या दालनात बोलवावी व हा प्रश्न निकाली काढावा.

श्री.विष्णू सावरा : सभापती महोदय, अधिवेशन संपण्याच्या आत या संदर्भातील बैठक बोलविण्यात येईल.

-------

....3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरच्या विद्यमान टप्प्यातून नाशिकला वगळण्यात आल्याबाबत**

**(३) * ३४८३ श्री.जयवंतराव जाधव, श्री.अनिल भोसले, श्री.किरण पावसकरर:र** सन्माननीय **उद्योग मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिकामध्ये मुबलक पाणी उपलब्ध नसल्याने दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरच्या विद्यमान टप्प्यातून नाशिकला वगळण्यात आल्याची खळबळजनक माहिती दिनांक १६ जानेवारी, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर डीएमआयसी प्रकल्पांतर्गत येणाऱ्या उद्योगांकरिता नाशिकमध्ये पुरेसे पाणी उपलब्ध नसल्याचा जलसंपदा विभागाने अहवाल दिल्यानंतर मराठवाड्यातील शेंद्रा आणि बिडकीन यांची निवड डिएमआयसीच्या विद्यमान टप्प्यात केल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक जिल्ह्यात २३ लहानमोठी धरणे असल्याने त्यातून नाशिकसह अंशतः मुंबई मराठवाड्यालाही पाणीपूरवठा होतो, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, डीएमआयसीच्या विद्यमान टप्प्यामध्ये नाशिकचा समावेश करण्यासाठी शासनामार्फत कोणती तातडीची उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?

**श्री.प्रवीण पोटे, श्री. सुभाष देसाई, यांच्याकरिता :** (१) दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर या प्रकल्पात इगतपुरी-नाशिक, सिन्नर या औद्योगिक क्षेत्राचा समावेश करण्यात आला होता. परंतु, सदर प्रकल्पासाठी पाणी व इतर अडचणी येत असल्यामुळे सदर प्रकल्पासंबंधीची कार्यवाही तूर्त स्थगित ठेवण्यात आलेली आहे.
(२) हे खरे नाही. तथापि, दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यात शेंद्रा बिडकीन या औद्योगिक क्षेत्राचा पूर्वीच समावेश करण्यात आला होता.
(३) नाशिक जिल्ह्यातील धरणातून नाशिकसह मराठवाडयाला पाणी पुरवठा करण्यात येतो.
(४) दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर या प्रकल्पात इगतपुरी-नाशिक, सिन्नर या औद्योगिक क्षेत्राचा समावेश करण्यात आलेला आहे. तथापि, तांत्रिक अडचणीमुळे सदर प्रकल्प तूर्त स्थगित ठेवण्यात आला आहे. तांत्रिक अडचणी दूर झाल्यानंतर सदर प्रकल्पाचे काम हाती घेण्यात येणार आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉर असे नमूद केले आहे. इंडस्ट्रियल कॉरीडॉर म्हणजे काय ? ते मला कळत नाही. काही सन्माननीय सदस्य मराठी भाषेचा आग्रह धरीत आहेत, त्यामुळे मंत्री महोदयांनी मराठीत हे शब्द सांगितले पाहिजे. या शब्दांना मराठीत काय म्हणतात ते आम्हाला कळले पाहिजे.

श्री.प्रवीण पोटे : सभापती महोदय, कॉरीडॉर म्हणजे प्रमुख एक भाग, सभापती महोदय काही शब्द आपण मराठीत व इंग्रजीत तेच वापरतो उदाहरणार्थ डेस्क बेंच, टेबल यांना इंग्रजी व मराठीत असेच म्हटले जाते. तशाच प्रकारचा हा शब्द समजण्यात यावा.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, शेतकरी कामगार पक्षाच्या प्रस्तावात जो शब्द आहे तोच शब्द शासनाने वापरलेला आहे. दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरीडॉरला शेतकरी कामगार पक्षाचा विरोध आहे, त्यांच्या प्रस्तावात याच शब्दांचा उल्लेख करण्यात आलेला आहे.

**उप सभापती** : हा प्रश्न शिक्षण विभागाचा नाही, उद्योग विभागाचा आहे.

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3483....

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, नाशिक जिल्हा धरणांचा जिल्हा म्हणून संपूर्ण राज्यात व देशात प्रसिध्द आहे. नाशिक जिल्हा संपूर्ण मुंबई शहराला पाणी पुरवठा करतो. नाशिक जिल्हा मराठवाड्याला देखील पाणी पुरवठा करतो....(अडथळा)... सभापती महोदय, मी म्हणतो हे चुकीचे असेल तर उत्तरात असे नमूद केले आहे की, औरंगाबाद शहराला पाणी देण्यात येत आहे. औरंगाबाद हे शहर मराठवाड्यात येते. पाणी देऊनही आपण नाही म्हणत असाल तर हे चुकीचे आहे. मंत्री महोदयांना माझा असा प्रश्न आहे की, नाशिक जिल्ह्यात 24 ते 25 छोटी मोठी धरणे आहेत. नाशिक जिल्हयातील लोकांची तहान भागवून महाराष्ट्र राज्यातील अनेक भागामध्ये नाशिक जिल्ह्यातून पाणी पुरवठा होत आहे. दिल्ली मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडॉरमध्ये नाशिक जिल्हा समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांकडून अशी माहिती पुरविण्यात आली की, नाशिक जिल्ह्यात पाण्याचा तुटवडा आहे. त्यामुळे हा प्रकल्प नाशिक जिल्ह्यात घेता येऊ शकणार नाही. याबाबत वर्तमानपत्रात अनेक ोळा बातम्या आल्या आहेत. हा प्रकल्प आला असता तर तेथे 10 लाख लोकांना रोजगार मिळाला असता. मुंबई व पुण्याच्या मध्यभागी नाशिक जिल्हा असल्यामुळे या परिसराचा विकास होणार होता. नाशिकची कनेक्टीव्हीटी मुंबई व पुणे शहराला चांगल्या प्रकारे होत आहे. एकीकडे असे म्हटले जाते की, मुंबईचा लोड कमी झाला पाहिजे. पुणे शहरावरील लोड कमी झाला पाहिजे. परंतु त्या दृष्टीने कोणतेच प्रयत्न करण्यात येत नाहीत. नाशिक शहरात इतके पाणी असताना देखील केंद्र शासनाकडे अशी माहिती देण्यात आली की, नाशिक येथे पाण्याचा तुटवडा आहे. त्यामुळे हा प्रकल्प उभारण्यात अडचण येऊ शकेल.

या नंतर श्री.बोरले...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.3483........**

श्री.जयवंतराव जाधव........

एकीकडे सांगितले जाते की, पाण्याचा तुटवडा आहे आणि दुसरीकडे सांगितले जाते की, काही अडचणी आहेत. त्या अडचणी कोणत्या आहेत ? नाशिक जिल्हा निम्म्या राज्याला पाणी पुरवितो. असे असताना या संदर्भात चुकीचे उत्तर दिले जाते. काही अडचणी आहेत म्हणजे आम्ही काय समजायचे ? नाशिक जिल्ह्यात मुबलक पाणी आहे. माननीय जलसंपदा मंत्री नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आमच्यावर अन्याय होत आहे. नाशिक जिल्ह्यात पाणीच नाही, असे सांगितले जाते. माझा पहिला प्रश्न असा आहे की, अशा प्रकारे चुकीची माहिती देणाऱ्या अधिकाऱ्यावर शासन कोणती कारवाई करणार आहे ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, जर पाणी मुबलक आहे तर आपण तातडीने त्यामध्ये नाशिक जिल्ह्याचा समावेश करणार आहात काय ? माझा तिसरा प्रश्न असा आहे की, काही अडचणी आहेत म्हणजे काय, हे मंत्री महोदय आम्हाला समजावून सांगणार आहेत काय ?

श्री.प्रविण पोटे-पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव साहेबांनी प्रश्नांचा एवढा भडीमार केलेला आहे की, त्यांच्या प्रश्नांचे उत्तर कसे द्यावे असा आमच्या समोर प्रश्न आहे. त्यांनी सांगितले की, माननीय जलसंपदा मंत्री नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. त्यांनी त्यांचे नाव देखील घेतले. मी सांगू इच्छितो की, दिनांक 15.09.2011 रोजी केंद्रीय मंत्र्यांबरोबर बैठक झाली होती. मुंबई-दिल्ली इंडस्ट्रीयल कॉरिडॉर करण्यास मान्यता मिळाली आणि दोन्ही भागात साधारणत: 150 किलो मीटर पर्यंत उद्योगधंदे सुरु करावयाचे ठरले. हा मानस चांगला होता, केंद्र शासनाने हे केले होते, सर्व काही व्यवस्थित होते. परंतु त्यावेळी पाटबंधारे विभागाने एक पत्र पाठविले. आम्ही त्यांना सांगितले की, आपल्याला या विभागामध्ये हा कॉरिडॉर करावयाचा आहे. त्यावेळी त्यांनी सांगितले की, यासाठी 23.17 द.ल.घ.मी. पाणी लागणार आहे. परंतु, पाण्याची व्यवस्था नसल्यामुळे आम्ही मंजुरी देऊ शकत नाही. त्यामुळे हा प्रोजेक्ट प्रलंबित राहिलेला आहे. हा प्रोजेक्ट व्हावा असा आमचा मानस आहे. हा प्रोजेक्ट झाला तर हजारो

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.3483........**

श्री.प्रविण पोटे-पाटील.........

बेरोजगारांना काम मिळणार आहे, याची आम्हाला कल्पना आहे. परंतु पाण्याचा विषय आहे. यासाठी मोठ्या प्रमाणात पाणी लागणार आहे. त्यामुळे हा प्रोजेक्ट थोडा रखडलेला आहे. हा प्रोजेक्ट आमच्या विचाराधीन आहे. आम्ही हा प्रोजेक्ट बंद केलेला नाही. आम्ही हा प्रोजेक्ट पूर्ण करु.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, जलसंपदा विभागाने आपल्याला सांगितले की, आमच्याकडे पाणी उपलब्ध नाही. मी सांगू इच्छितो की, आमच्या नाशिक जिल्ह्यातील ज्या सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या जमिनी धरणामध्ये गेलेल्या आहेत त्यांना अद्याप जमिनीचा मोबदला मिळालेला नाही. त्यांच्या वारसांना नोकऱ्या मिळालेल्या नाहीत. दिल्ली मुंबई इंडस्ट्रीयल कॉरिडॉरच्या निमित्ताने तेथे उद्योगधंदे सुरु होणार होते. परंतु आता त्यासाठी पाण्याची उपलब्धता नाही, असे उत्तर दिले जात आहे. मग नाशिक जिल्ह्याच्या माध्यमातून मुंबईला दिले जाणारे पाणी, औरंगाबाद जिल्ह्याला जो पाणी पुरवठा होतो ते पाणी नाशिक जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी अडवायचे काय ? हे पाणी अडविले तर पाण्याची उपलब्ध होईल काय ? मग आम्ही मराठवाड्याला, मुंबईला दिलेले पाणी अडवायचे काय ? त्यानंतर पाण्याची उपलब्धता होईल काय आणि त्यानंतर तुम्ही इंडस्ट्रीयल कॉरिडॉरसाठी मान्यता देणार आहात काय, असा प्रश्न निर्माण होतो. माननीय जलसंपदा मंत्री नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री आहेत. आम्ही यामध्ये नाशिक जिल्ह्याचा समावेश करणार आहोत, अशी घोषणा शासन करणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, दिल्ली मुंबई औद्योगिक पट्टयात इगतपूरी, नाशिक आणि सिन्नर हे विभाग आहेत. हे विभाग आम्ही यातून वगळलेले नाहीत. हा औद्योगिक पट्टा होणार आहे. या औद्योगिक पट्टयामध्ये औरंगाबाद भागातील शेंद्रा आणि दिघी बंदरापर्यंत असे दोन भाग आहेत आणि मधल्या भागामध्ये इगतपूरी, नाशिक, सिन्नरचा भाग येतो. हे विभाग यातून वगळण्यात आलेले नाहीत. परंतु, मध्यंतरीच्या काळात जलसंपदा विभागाने पाणी देण्याबाबत

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.3483........**

श्री.सुभाष देसाई.........

असमर्थता व्यक्त केली. म्हणजे, त्याला पूर्णपणे विरोध आहे अशातला भाग नाही. आपल्याला यातून मार्ग काढावा लागेल. औद्योगिकीकरण करावयाचे म्हणजे अनेक प्रश्न सोडवावे लागतील. पाण्याबद्दलची अडचण दूर करण्यासाठी शासन स्तरावर जलसंपदा विभाग आणि उद्योग विभागाची संयुक्त बैठक घेऊन आम्ही हा प्रश्न सोडवू आणि औद्योगिकीकरणाचा हा प्रयत्न पूर्णपणे यशस्वी होईल, असा मला विश्वास वाटतो. हा भाग यातून वगळण्यात आलेला नाही. तो औद्योगिक पट्टयाचा भाग आहे. तो कायम ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे आणि पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी जलसंपदा विभागाबरोबर नव्याने बैठक घेऊन हा प्रश्न सोडविण्याचा आम्ही प्रयत्न करू.

श्री.जयवंतराव जाधव : सभापती महोदय, अधिवेशन संपण्यापूर्वी बैठक घेण्यात येणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना त्या बैठकीसाठी बोलाविण्यात येईल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, शासनाने औरंगाबाद येथे औद्योगिक कॉरिडॉर बांधण्याचा निर्णय घेतलेला आहे आणि त्यासाठी शासनाने 5 हजार एकर जमीन संपादित केलेली आहे. या औद्योगिक पट्टयासाठी नाशिक येथून पाणी जाणार आहे. त्यावेळी औरंगाबाद विभागाने जलसंपदा विभागाकडे ही मागणी केली होती काय आणि जलसंपदा विभागाने कोणती परवानगी दिली ? दुसरे म्हणजे, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी सांगितले की, आम्ही कोणत्याही परिस्थितीत तापीचे एक इंच देखील पाणी गुजरात राज्यात जाऊ देणार नाही. म्हणजे आता आपल्याला 133 टीएमसी पाणी मिळणार आहे आणि ते पाणी मराठवाड्यात जाणार आहे. त्यामुळे आता हा पाण्याचा प्रश्न सुटलेला आहे. म्हणून शासन नाशिक येथील औद्योगिक पट्टा करण्याबाबत जलदगतीने निर्णय घेणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, होय.

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**ता.प्र.क्र.3483........**

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, दिल्ली मुंबई औद्योगिक पट्टयासाठी जमीन आयडेंटिफाय करणे, प्राथमिक बाबींची पूर्तता करणे, भू-निवड समिती समोर प्रस्ताव सादर करणे या सारख्या नियोजनात्मक बाबी शासन करणार आहे काय ?

श्री.सुभाष देसाई : सभापती महोदय, मी भूसंपादनाच्या मुद्याबाबत सांगू इच्छितो की, 3,200 हेक्टर जमीन यापूर्वीच ताब्यात घेण्यात आलेली आहे. त्यामुळे जमिनीचा प्रश्न नाही.

यानंतर श्री.भोगले......

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ता.प्र.क्र.3483......

श्री.सुभाष देसाई.......

चर्चेचा प्रश्न नाही. ज्या इतर पायाभूत सुविधा निर्माण करावयाच्या आहेत, त्या तयार करण्याचा प्रश्न आहे. त्यामध्ये पाणी हा एक भाग आहे. हे सर्व प्रश्न सोडवून हा औद्योगिक पट्टा चांगल्याप्रकारे स्थापन करण्याचे शासनाचे धोरण आहे, निर्णय आहे.

**उप सभापती** : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

---------

...2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करणे

**मु.शी.:** राज्यातील शेतकऱ्यांनी परवानाधारक सावकारांकडून घेतलेले कर्ज माफ करण्यासंबंधी माननीय सहकारमंत्र्यांचे निवेदन

श्री.चंद्रकांत पाटील (सहकार मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो :-

नि वे द न

(प्रेस : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे)

---------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी**

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, ऑर्गनायझर या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुखपत्रामध्ये जे अखंड भारताचे स्वप्न पहात होते त्यांनी आपला काश्मीर पाकिस्तानला बहाल करुन टाकून तसा नकाश प्रकाशित केला आहे. दुसऱ्यांच्या राष्ट्रभक्तीबद्दल सातत्याने संशय घेणारे आपला काश्मीर पाकिस्तानला देऊन टाकतात. काश्मीरमध्ये पीडीपी आणि बीजेपीचे संयुक्त सरकार स्थापन झाले त्याचे मी स्वागत करतो. चांगले पाऊल मोदी सरकारने उचलले आहे. त्याबद्दल दोषी असणारी मंडळी आहेत त्यांनी काश्मीरचा मेजर भाग पाकिस्तानला दिल्याचे चित्र, अधिकृत नकाशा ऑर्गनायझर या मासिकामध्ये प्रकाशित केला आहे. मी आपल्याकडे त्यासंबंधीचे कागदपत्र सादर करतो. ही घटना छोटी नाही. अत्यंत गंभीर घटना आहे. प्रत्येक देशभक्त माणसाने याबद्दल आवाज उठविला पाहिजे. हे सर्वोच्च सभागृह आहे. या ठिकाणी या घटनेचा निषेध केला पाहिजे. देशाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न ऑर्गनायझेशनच्या प्रकाशकांनी निर्माण केला आहे. त्यांनी घाईगर्दीने वेबसाईटवरुन नकाशा मागे घेतला आहे. अखंड भारताची जे घोषणा करीत होते त्यांनी काश्मीर पाकिस्तानला दिला का, सरकारने या गोष्टीला मान्यता दिली का हे सभागृहाला कळले पाहिजे. या प्रश्नावर सभागृहामध्ये गांभीर्याने चर्चा झाली पाहिजे. देशामध्ये जाती विद्वेष पसरवून ज्या शक्ती वाढू मागत आहेत, त्यांच्यावर पायबंद घातला गेला पाहिजे. तुम्ही सामील आहात असे मी म्हणत नाही. तुम्ही देशभक्त आहात. तुम्हाला हे मान्य नसेल तर ज्यांनी कोणी हे केले त्यांना वठणीवर आणले पाहिजे. त्याचा निषेध केला पाहिजे. त्यासाठी तुम्ही पुढे आले पाहिजे. जे उदार हिंदू आहेत, त्यांनी या प्रतिगामी शक्तीचा निषेध केला पाहिजे. भारतीय जनता पक्षाने याबद्दलची भूमिका स्पष्ट केली पाहिजे. जो आरएसएस मातृ संस्था मानली जाते, त्यातील एक गट या दृष्टीने कामाला लागलेला आहे. आजचे सगळे कामकाज बाजूला सारुन या विषयावर चर्चा झाली पाहिजे, शासनाने याबाबत खुलासा केला पाहिजे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी जो मुद्दा मांडला आहे त्या विषयाबाबतच्या सूचनेवर आमच्या सह्या आहेत. हा देशाच्या दृष्टीने अत्यंत गंभीर व संवेदनशील विषय सदनासमोर आलेला आहे. या गोष्टीचा आपण निषेध व्यक्त केला नाही

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

किंवा तसे गांभीर्य दाखविले नाही तर आपण चुकत आहोत असे होईल. म्हणून माझी विनंती आहे की, या विषयाबाबत निषेधाचा ठराव मंजूर करण्यात यावा.

..4..



श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या ऑर्गनायझर या मुखपत्रात देशाचा जो नकाशा दाखविला आहे तो अनेक वर्षापासूनचा आहे. माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना मांडली आहे तो विषय अतिशय गंभीर आहे. या विषयावर सभागृहामध्ये चर्चा झाली पाहिजे. हा देशाच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न आहे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये जी प्रस्तावाची सूचना मांडून गंभीर विषय सभागृहात उपस्थित केला आहे. एकूणच भारत पाकिस्तान, जम्मू-काश्मीरमधील सत्ताबदल, दोन्ही पक्ष, त्यांच्या सुरु झालेल्या कारवाया आणि हे सर्व होत असताना ज्या सत्ताधारी पक्षाची जननी आरएसएस आहे, त्यांना राजकारणात काय करायचे आणि काय करायचे नाही याचे अमृत पाजतात, त्यांचेच हे मुखपत्र आहे. देशाच्या अखंडतेवर घाला घालण्याचा प्रयत्न होत आहे. इतकी वर्षे तेथील जनता लढा देत आहे, तो लढा बाजूला सारुन तो संपूर्ण प्रदेश पाकिस्तान असल्याचा नकाशा ऑर्गनायझर या मुखपत्रामध्ये प्रकाशित होतो यापेक्षा दुसरी निषेधार्ह गोष्ट नाही. या विषयाबाबत सत्ताधारी पक्षाकडून भूमिका स्पष्ट झाली पाहिजे. झालेल्या कृतीचा सभागृहात निषेध नोंदविला गेला पाहिजे आणि या विषयावर चर्चा झाली पाहिजे. हे होणार नसेल, या विषयावर चर्चा करण्यास परवानगी देणार नसाल तर आम्ही सभात्याग करु.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, माननीय कपिल पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना मांडली आहे, त्या सूचनेचे समर्थन करण्यासाठी उभा आहे. जम्मू आणि त्याच्या वरचा काश्मीरचा भाग नकाशातून वगळण्यात आला आहे. काश्मीरच्या वरच्या भागात सर्व मुस्लीम समाज आहे, जम्मूमध्ये हिंदू समाज आहे.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

नंतर 2सी.1...

श्री.जयंत प्र.पाटील...

हा फरक आहे. आपण दोन वेळा पाकिस्तानशी काश्मीरसाठी युद्ध केले. त्या काश्मीरला वगळण्याचे धोरण चालले असेल तर ते चुकीचे आहे. त्यास या सभागृहाची मान्यता नाही. त्यामुळे मी येथे मांडलेल्या ठरावाचे समर्थन करतो व तो येथे चर्चेला यायला पाहिजे अशी मागणी करतो. यासंबंधी शासनाचे काय म्हणणे आहे ते आम्हाला समजले पाहिजे. ही जी भूमिका आहे ती चुकीची आहे, असे येथे सांगितले गेले पाहिजे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी मुद्दा उपस्थित केला आहे. ऑर्गनायझर या आर.एस.एस.च्या मुखपत्राने आपल्या देशाच्या नकाशातील काश्मीरचा भाग हा पाकिस्तानच्या हद्दीत दाखविला आहे. ही बाब अत्यंत गंभीर आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा अराष्ट्रीय स्वयंसेवक संघ आहे काय अशा प्रकारची भावना आज देशात निर्माण झाली आहे. नंतर त्यांनी तो नकाशा मागे घेतला असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. या विषयासंबंधी सत्ताधारी पक्षाने माफी मागितली पाहिजे. यावर येथे चर्चा झाली पाहिजे.

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे) :** हा विषय अत्यंत गंभीर आहे. याची शासनाने अत्यंत गांभीर्याने नोंद घेणे आवश्यक आहे.

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, यासंबंधी मला आमची बाजू मांडू द्यावी. यासंबंधी आपणाला निर्णय द्यावयाचा आहे. सन्माननीय सदस्य श्री.कपिल पाटील यांनी ऑर्गनायझर या साप्ताहिकामध्ये जो नकाशा छापून आला आहे त्यासंबंधी मुद्दा उपस्थित केला आहे. माजी काँग्रेस प्रदेशाध्यक्ष सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे यांच्यासह अनेक सन्माननीय सदस्यांनी हा मुद्दा उपस्थित केला आहे. ऑर्गनायझर या साप्ताहिकामध्ये चुकीचा नकाशा छापला गेला आहे त्यात आमची चूक झाली आहे असे सांगून संपादकांनी तो नकाशा त्यांनी मागे घेतला आहे आणि दुसरा नकाशा छापला आहे. हे काही ठरवून केलेले काम नाही. त्यांनी मोठ्या मनाने चूक मान्य केलेली आहे.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करतात.)

**तालिका सभापती :** मी माननीय मंत्री श्री.गिरीश बापट यांना सांगू इच्छितो की, आपण शासन म्हणून आपले म्हणणे मांडावे.

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.गिरीश बापट : सभापती महोदय, यात संपादकांनी त्यांची चूक मान्य केलेली असल्यामुळे राज्य स्तरावर याची चर्चा करणे योग्य होणार नाही. मी सन्माननीय सदस्यांच्या भावनेशी सहमत आहे. चूक आहे त्याला बरोबर म्हटले आहे काय, तर नाही. जे चुकीचे आहे त्याला आम्ही चूकच म्हणतो. त्यामुळे हा चर्चेचा विषय होऊ शकत नाही. त्यांनी चूक झाली आहे असे म्हटल्यामुळे त्या विषयावर पडता पडतो. मी चुकीचे कधीही समर्थन करणार नाही. काश्मीर हा या देशाचा अविभाज्य भाग आहे हेच आमचे मत आहे. संपादकांनी त्यांची चूक मान्य केली असल्यामुळे तो विषय आमच्या दृष्टीने संपलेला आहे.

**तालिका सभापती :** मी शासनाच्या निदर्शनास आणून देतो की, ही बाब अत्यंत गंभीर आहे. त्याची शासनाने गांभीर्याने दखल घेऊन या संबंधातील माहिती तातडीने घेऊन सभागृहासमोर सादर करावी. मी सदर सूचना अमान्य करीत आहे.

श्री.माणिकराव ठाकरे : सभापती महोदय, यासंबंधी शासनाने कोणतेही मत मांडले नसल्यामुळे आम्ही त्याचा निषेध करतो.

(विरोधी पक्षातील काही माननीय सदस्य घोषणा देत बहिर्गमन करतात.)

......

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाबाबत.**</u>

**तालिका सभापती :** आज दिनांक 13 मार्च 2015 रोजी सकाळी 10.13 वाजता सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री.धनंजय मुंडे, सन्माननीय सदस्य सर्वश्री.सुनील तटकरे,हेमंत टकले यांनी "डोंबिवली पूर्व (जि.ठाणे) येथील शुभदा नर्सिंग होमच्या आवारात एका नवजात बालकाचा मृतदेह आढळून येणे" या विषयासंबंधी म.वि.प.नियम 289 अन्वये सूचना दिली आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, म.वि.प.नियम 289 अन्वये प्रश्नोत्तराचा तास स्थगित करुन एका महत्त्वाच्या विषयावर चर्चा घेण्यासाठी मी सूचना दिली आहे. काल सर्वांनीच दूरचित्रवाणीवर एक घटना पाहिली असेल की, मराठवाड्यातील जालना जिल्ह्यातील एक महिला मुंबईला कामाला आली. प्रसुतीसाठी ती ठाण्याच्या एका रुग्णालयात दाखल झाली. ती ब्रश करायला बाथरुममध्ये गेली असताना तिचे पाच दिवसांचे बाळ हॉस्पिटलच्या चौथ्या पाचव्या मजल्यावरुन खाली फेकून देण्यात आले. अशी निर्दयी घटना महाराष्ट्रातील एका प्रमुख शहरातील प्रमुख भागामध्ये घडली आहे. असे जर घडत असेल तर आज राज्यातील कायदा व सुव्यवस्था कुठे चालली आहे असा प्रश्न निर्माण होतो. हा राज्यातील कायदा व सुव्यवस्थेसंबंधातील विषय आहे. ती पाच दिवसाची मुलगी कोणाची दुश्मन असू शकते. एक 82 वर्षाचा विचारवंत कोणाचा दुश्मन असू शकतो. कोणाला पाच मजल्यावरुन फेकून देण्यात येत असेल, कोणाचा खून होत असेल तर ही गंभीर बाब आहे. तेव्हा माझी आपल्याला विनंती आहे की, आजचे सर्व कामकाज बाजूला सारुन चर्चेला सुरुवात करावी.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्यांनी याच विषयावर आज सकाळी 9.40 वाजता म.वि.प.नियम 93 अन्वये सूचना दिली असून सदर सूचनेवर शासनाने निवेदन करावे असा निर्णय मी देत आहे. त्यामुळे सदर सूचना मी अमान्य करीत आहे.

.......

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी. :** नियम 93 अन्वये सूचना

**तालिका सभापती** : माझ्याकडे ज्या सूचना प्राप्त झाल्या आहेत त्यासंदर्भातील निर्णय सचिव वाचून दाखवतील.

सचिव : सन्माननीय सदस्य श्री.आनंद ठाकूर यांनी "पालघर जिल्ह्यातील जव्हार व डहाणू तालुक्यामध्ये बोगस शिधापत्रिका व शिधापत्रिका वितरणात मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी "वसई-विरार परिसरात दोनशे बोगस बाटली बंद पाण्याच्या कंपन्या कार्यरत असून अन्न व औषध प्रशासनाला महिन्याला 20 लाख रूपयांचा हप्ता जात असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून निदर्शनास येणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.विक्रम काळे यांनी "लातूर जिल्ह्यातील प्राथमिक शाळांमध्ये बंद पडलेल्या वर्ग तुकड्यांचे समायोजन इतर शाळांमध्ये झाले असून तुकड्या वाटपात अनियमितता झाली म्हणून चौकशी होणे व पटपडताळणी होऊन दिलेल्या तुकड्या निकषाप्रमाणे योग्य असून देखील शिक्षकांचे वेतन थांबविणे व त्या सर्व वर्ग तुकड्या नियमबाह्य पद्धतीने अनुदानावरून विनाअनुदानित करणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.सतिश चव्हाण यांनी "राज्यात सुशिक्षित बेरोजगाच्या 8500 सेवा संस्था नोंदणीकृत असून प्रत्येक संस्थेस प्रतिवर्षी 13200/- रूपये मिळणारे शासकीय अनुदान सन 2007-08 पासून बंद असणे तसेच सुशिक्षित बेरोजगार सेवा संस्थांना 16.50 टक्के कामे स्पर्धेशिवाय मिळण्याबाबतची होत असलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

...5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**सचिव....**

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.अमरसिंह पंडित यांनी "गेवराई (जि.बीड) तालुक्यातील सततची दुष्काळ व टंचाई परिस्थिती लक्षात घेऊन मौजे सावळेश्वर व म्हाळस पिंपळगाव येथील ग्रामस्थ व शेतकरी यांनी सावरगाव (निर्जन) येथील गोदावरी नदीपात्रातील वाळू उत्खनन बंद करण्याची केलेली मागणी" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी "ठाणे अप्पर आदिवासी उप आयुक्तांच्या अखत्यारित येणाऱ्या मुला-मुलींच्या आदिवासी वसतिगृहांना मूलभूत सुविधा न पुरविणे तसेच सरकारकडून देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्ती वाटपात घोटाळे करणे यामुळे आदिवासी समाजामध्ये निर्माण झालेले संतापाचे वातावरण" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर श्री.अजित....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव.....

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.जयवंतराव जाधव यांनी "नाशिक येथील जिल्हा सामान्य रुग्णालय व जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालयांमधील असुविधांमुळे रुग्णांना आरोग्य सेवेपासून वंचित रहावे लागत असणे, अत्यवस्थ रुग्णांना दाखल करुन न घेता खाजगी रुग्णालयांमध्ये पाठविण्यात येत असणे, दिनांक 18 फेब्रुवारी, 2015 रोजी सात वर्षाच्या स्वाईन फ्ल्यू सदृश्य बालकाला उपचार न मिळाल्यामुळे त्याचा मृत्यू झाल्याचे उघडकीस येणे, अशा हलगर्जीपणा व गैरकारभारामुळे रुग्णांमध्ये तीव्र संताप निर्माण होणे" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.धनंजय मुंडे यांनी " डोंबिवली (पूर्व) येथील शुभदा नर्सिंग होम या रुग्णालयात अंबरनाथ तालुक्यातील एक महिला रविवार दिनांक 8 मार्च, 2015 रोजी प्रसूत होऊन तिने मुलीला जन्म दिला. परंतु गुरुवारी सदर महिलेच्या बालकाला दुसऱ्या मजल्यावरुन फेकून दिल्याने बालकाचा मृत्यू होणे " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री.संजय दत्त यांनी "कामाचा अतिताण व विविध आजारांमुळे गेल्या दोन महिन्यात मुंबई पोलीस दलातील एकूण 26 पोलिसांचा अकाली मृत्यू होणे, पोलिसांवरील कामाचा बोजा कमी करण्यासाठी, त्यांना त्यांच्या हक्काच्या रजा मिळणे, त्यांच्या कामाचे तास आखून पोलिसांवरील कामाचा ताण कमी करण्यासाठी करावयाची कार्यवाही" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य ॲड.निरंजन डावखरे यांनी "ठाणे येथून सेतू कार्यालयातील जात प्रमाणपत्र तयार करण्याचे काम महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांकडून केले जात असणे, परंतु जात पडताळणीचे काम हे सामाजिक न्याय विभागाकडून करण्याबाबतचा शासनाने निर्णय

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

सचिव.....

घेतल्यामुळे दिनांक 4 मार्च, 2005 पासून ठाणे येथील सेतू कार्यालयातील महसूल अधिकाऱ्यांनी जात प्रमाणपत्र व नॉन क्रिमिलियरचे अर्ज स्वीकारणे बंद केल्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

----------

..3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ. शी.** : राज्यात सामाजिक बहिष्काराच्या वाढत असलेल्या घटना

**मु. शी.** राज्यात सामाजिक बहिष्काराच्या वाढत असलेल्या घटना यासंबंधी सर्वश्री अशोक ऊर्फ भाई जगताप, संजय दत्त,प्रा.जोगेंद्र कवाडे, सर्वश्री रामहरी रुपनवर, शरद रणपिसे, धनंजय मुंडे, सुनील तटकरे, जयंवतराव जाधव, अमरसिंह पंडित, दीपकराव साळुंखे, जगन्नाथ शिंदे, अनिल भोसले, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. भाई जगताप ( मुंबई स्थानिक प्राधिकारी संस्था ) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्या बाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"राज्यात रायगड जिल्ह्यात सामाजिक बहिष्काराच्या आणखी एका प्रकरणी रोहा तालुक्यातील डोंगरी गावात गावकीने विविध कारणांसाठी 21 कुटुंबाना वाळीत टाकणे, तसेच पोलादपूर येथील भोगाव ग्रामपंचायतीने श्री.राहूल येलंगे या एव्हरेस्टवीराला सुध्दा गावकीने वाळीत टाकणे, पेण तालुक्यातील कोळीवाडा येथे विनय महादेव भोईर यांना सावत्रभावाने व गावकीने वाळीत टाकणे, त्या पाठोपाठ आता औरंगाबाद जिल्ह्यातील जाधव वाडीतील सिद्धेश्वर कॉलनीतील पांडे यांच्या कुटुंबीयांना देखील जातपंचायतीने वाळीत टाकल्याची घटना माहे जानेवारी, 2015 रोजी वा त्या सुमारास घडणे, एकाच जातीतील, एकाच गोत्रातील तरुणासोबत प्रेमविवाह केला म्हणून कंजारभाट समाजाच्या एका दाम्पत्याबरोबरच त्यांच्या आई-वडील, भावांना जातपंचायतीने 8 वर्षापासून समाजातून बहिष्कृत केले असल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस येणे, पुण्यातील पिंपरी-चिंचवड, आळंदी, इचलकरंजी, संगमनेर व औरंगाबाद या ठिकाणी भरविण्यात आलेल्या वेगवेगळ्या जातपंचायतीमध्ये दंडापोटी म्हणून सदर दाम्पत्याने जातपंचायतीला आतापर्यंत 1 लाख 70 हजार रुपये भरुनही बहिष्कार मागे न घेणे, अनेकदा विनवण्या करुन, दंड भरुनही जातपंचायत बहिष्कार मागे घेत नसल्यामुळे वैतागलेल्या जोडप्यांनी समाजाविरुध्द बंड पुकारण्याचा



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप.....

घेतलेला निर्णय, यामुळे त्यांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, रेणुकाई पिंपळगाव, ता.भोकरदन, जि.जालना येथेही सामाजिक बहिष्कारातून वेगवेगळ्या 12 स्मशानभूमी असणे, रायगड जिल्ह्यासह संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक बहिष्काराची अनेक प्रकरणे उघडकीस येणे, त्यामुळे जनतेत पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, या बाबत सदरील कुटुंबाना न्याय मिळण्याबाबत तसेच वाळीत प्रकरणे थांबविण्यासाठी शासनाने जातपंचायती, गावकीवर तातडीने करावयाची कारवाई व उपाययोजना आणि शासनाची प्रतिक्रिया."

प्रा.राम शिंदे (गृह (ग्रामीण) राज्यमंत्री ) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे ):** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

( प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे )

..5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, ही लक्षवेधी सूचना कोणा एका व्यक्तीच्या विरोधात नाही. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळून 67 वर्षे झाली तरी दुर्दैवाने अजूनही काही अनिष्ट प्रकार सुरु आहेत आणि त्याबाबत आपण येथे अनेकदा भाष्य केलेले आहे. अनेकदा कारवाईचा बडगा उचललेला आहे,तरी देखील 21 व्या शतकामध्ये वाळीत टाकण्याच्या, बहिष्कृत करण्याच्या घटना घडत आहेत, ही दुर्दैवी बाब आहे. अशा प्रकारच्या घटना महाराष्ट्रात घडत आहेत ही वस्तुस्थिती आहे. ही घटना फक्त एका विशिष्ट गावापुरती मर्यादित नाही. कोकणामध्ये असे प्रकार खचितच जास्त आहेत,त्यामुळे आमच्या मनाला प्रचंड वेदना होतात. रायगड जिल्ह्यामध्ये अशा घटना जास्त आहेत त्याचे वाईट वाटते. औरंगाबाद, जालना आणि महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांमध्ये देखील अशा घटना घडत आहेत. त्या ठिकाणी एक समांतर सरकार चालते की काय, अशी परिस्थिती समोर आलेली आहे.

सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेवरील निवेदन मी वाचले आहे. या निवेदनात अशा प्रकारांना पायबंद घालण्याचा, त्यांच्यावर जरब बसविण्याचा किंवा त्यांना काही शासन करण्याचा उल्लेख असता तर मी त्याचे स्वागत केले असते. परंतु झालेल्या प्रयत्नाचे मी स्वागत करतो. मी विरोधी बाकावर आहे म्हणून फक्त विरोधी बोलणार नाही. निवेदनात नमूद केले आहे की, "वाळीत प्रकरणे थांबविण्यासाठी रायगड जिल्हा पोलीस कार्यक्षेत्रात मोहल्ला समितीच्या 529 बैठका, शांतता समितीच्या 429 बैठका, तंटामुक्त अभियांनांतर्गत 814 बैठका, गाव पातळीवरील 2488 बैठका घेतल्या." परंतु आपण एवढे करुनही आजही एव्हरेस्टवीर बहिष्कृत आहे. हे मी म्हणत नाही,आपण त्या मुलाला विचारा. त्या मुलाने दिलेली मुलाखत आपण ऐकली तर त्यामध्ये त्याने हेच म्हटले आहे की, आम्हाला गावाने बहिष्कृत केलेले आहे. ही रायगड जिल्ह्यातील घटना आहे.

सभापती महोदय, जालना जिल्ह्यातील घटनेच्या बाबतीत आपणएवढेच म्हटले आहे की, त्यांनी अशी तक्रार मागे घेतल्याचे पत्र दिलेले आहे. आपण सर्वजण इतकी वर्षे सार्वजनिक जीवनामध्ये काम करीत आहोत. हा प्रश्न कोणा एका व्यक्तीचा नसून तो समाजाच्या मानसिकतेचा आहे आणि त्याकडे आपण तितक्याच गांभीर्याने पाहिले नाही तर असे प्रकार सोकावतील. गावाच्या दबावाखाली तक्रार मागे घेण्यात आली काय ? कारण आठ-आठ वर्षे बहिष्कार टाकलेली प्रकरणे अचानक कशी मागे घेण्यात आली ? एखाद्याला बहिष्कृत करण्याचा अधिकार कोणाला दिलेला आहे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.भाई जगताप........

काय ? जात पंचायतीच्या 11 जणांना अटक करण्यात आली असे निवेदनात नमूद केलेले आहे. ज्यावेळी अशाप्रकारचा निर्णय होतो त्यावेळी संपूर्ण गावाचा पाठिंबा असतो म्हणून तो एक माणूस बहिष्कृत म्हणून राहतो. आपण फक्त 11 जणांना अटक करुन थातूर मातूर कारवाई केली असेल तर ते दुसऱ्या माणसांसाठी प्रोत्साहन होते. आम्ही देखील तसे करतो काय व्हायचे ते होऊ दे.

सभापती महोदय, या घटनेच्या माध्यमातून राज्यासमोर एक सामाजिक प्रश्न निर्माण झालेला आहे. ज्या पुरोगामी महाराष्ट्रात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला, लोकमान्य टिळकांचा जन्म झाला, छत्रपती शिवाजी महाराजांनी जगाला आणि देशाला संदेश दिला, त्या राज्यामध्ये अशा घटना घडत आहेत हे अतिशय वाईट आहे. आपल्याकडे पोलिसांनी जो रिपोर्ट दिलेला आहे त्याबाबत माझे स्पष्ट मत आहे की, त्यांनी फक्त खानापूर्ती केलेली आहे. या लक्षवेधी सूचनेमध्ये ज्या ज्या गावांचा उल्लेख करुन ज्यांच्या नावाचा उल्लेख केलेला आहे त्या सर्व व्यक्तींविरुध्द स्वत: जातीने लक्ष घालून त्याची पडताळणी करणार काय ? बहिष्कृत करण्याच्या घटनाांना आळा बसण्यासाठी वेळ आली तर कायद्यामध्ये बदल करण्याची भूमिका शासन घेईल काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय ज्येष्ठ सदस्य श्री.भाई जगताप यांनी अतिशय विस्तृत स्वरुपात त्यांचे म्हणणे मांडलेले आहे. शासनाने प्राप्त कायद्यानुसार जी काही कारवाई करणे अपेक्षित होते ती निश्चितपणे केलेली आहे. रायगड जिल्ह्यामध्ये घडलेल्या प्रकरणांचा आणि इतर ठिकाणी घडलेल्या प्रकरणांचा सूचनेमध्ये अंतर्भाव केलेला आहे. बहिष्काराची कारणे वेगवेगळी असली तरी त्यासाठी जातपंचायतीचा आधार घ्यावा लागतो किंवा तो त्या पद्धतीने झाला असावा असे मला वाटते. अशा प्रकरणांना आळा घालण्यासाठी शासनाच्या सर्वतोपरी प्रयत्न केले असले, संबंधितांना अटक करुन कारवाई केली असली, चार्टशीट दाखल केली असली अशा प्रकरणांमध्ये गृह मंत्र्यांनी स्वत: लक्ष घालावे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. तसेच नवीन कायदा आणणार काय असाही प्रश्न उपस्थित केलेला आहे. देशाला स्वातंत्र्य मिळून अनेक वर्षे झाली असताना अशा स्वरुपाचे गुन्हे घडत आहेत म्हणून मुख्यमंत्री महोदयांनी यापूर्वी जाहीर केलेले आहे

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

आणि मी आता ते सभागृहात जाहीर करतो की, या प्रकरणांना आळा बसण्यासाठी नवीन कायदा आणण्याचा सरकार विचार करीत आहे.

..7..



श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी रायगड जिल्ह्यातील दोन केसेसचा उल्लेख करतो. अलिबाग तालुक्यातील कमळपाडा गावातील लोकांना गेली 40 वर्षे बहिष्कृत केलेले आहे. त्यांना बहिष्कृत केल्याचा जबाब त्यांनी कोर्टात दिलेला आहे. तसेच जिल्हाधिकारी आणि एस..पी.समोर देखील दिलेला आहे. तेव्हा त्या संदर्भात संबंधितांवर शासन कारवाई करणार काय ? रेवदांडा ग्रामपंचायती अंतर्गत असलेल्या आगलेची वाडी येथे ज्याच्यावर केस झालेली आणि त्याला अटकपूर्व जामीन मिळालेला आहे. त्याला गावात येण्याची बंदी घातलेली आहे. त्या माणिक बळीने गेली पाच वर्षे गावात धिंगाणा घातलेला आहे. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, माणिक बळीसारख्या व्यक्तीला गावात येण्यावर बंदी घालण्यात येईल किंवा त्याच्यावर टाडासारखी कारवाई करण्याबाबत शासन निर्णय घेईल काय ?

यानंतर श्री.बोर्डे..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे : महोदय, सन्माननीय सदस्यांनी रायगड जिल्ह्यातील कमळपाडा आणि रेवदंडा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या आगलेची वाडी या घटनांचा उल्लेख केला. सन्माननीय सदस्यांनी सांगितलेल्या या दोन्ही विषयाच्या बाजू वेगवेगळ्या आहेत. जात पंचायती अंतर्गत त्यांच्या अनुवंशिक परंपरा किंवा त्या पंचायतीचा कायदा मोडला असेल तर त्या ठिकाणी अशा घटना घडतात. अनेकदा 40-40 लोकांच्या बाबतीत असे गुन्हे घडल्याच्या घटना आहेत. सन्माननीय सदस्यांनी निदर्शनास आणून दिलेल्या नवीन प्रकरणांची सखोल चौकशी करून, दोषींवर कारवाई करण्यात येईल. महोदय, मी जे उत्तर दिले ते अतिशय सूचक आणि महाराष्ट्राला भविष्यात पुढे घेऊन जाणारे आहे. या निमित्ताने एवढेच सांगतो की, बहिष्कृत करणाऱ्या जात पंचायतीच्या बाबतीत राज्य सरकार नवीन आणि अद्ययावत कायदा, जो कायदा मोडण्याची कोणाची हिंमत होणार नाही असा कायदा आणत आहे.

श्री.भाई जगताप : सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर देताना एक वाक्य उच्चारले आहे. रेकॉर्डवर चुकीचे राहू नये म्हणून मी हे सांगत आहे. जात पंचायतीचे नियम, परंपरा ही कायद्याला आणि घटनेला मान्य नाही. हे रेकॉर्डवर राहू नये. सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी सांगितल्यानुसार ज्या व्यक्तींच्या विरोधात अनेक गुन्ह्यांची नोंद आहे त्या व्यक्तीला प्रचलित कायद्यानुसार तडीपार करण्यास हरकत नाही.

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, मी अतिशय सूचक उत्तर दिले आहे. या दोन्ही बाजूचा विचार केला असता, "जात पंचायतीच्या अंतर्गत येणारे" असे म्हटले होते. मी कायद्याबाबत बोललो नाही. जात पंचायतीची वेगळी नियमावली आहे, म्हणूनच अशा घटना घडतात. म्हणूनच नवीन कायदा आणत आहोत. ते नियम मला, तुम्हाला आणि महाराष्ट्राला मान्य नाहीत, म्हणून आपण नवीन कायदा आणण्याची भाषा करीत आहोत. मोक्का, टाडा अशा प्रकारचे गुन्हे सातत्याने घडतात. त्यामुळे निश्चितपणे या बाबतीत नियमानुसार योग्य ती कारवाई लवकरात लवकर करण्यात येईल.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, आज सकाळी माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील आभार प्रदर्शनाच्या प्रस्तावाला उत्तर देताना माननीय मुख्यमंत्र्यांनी पोलीस विभागावर बोलताना कन्व्हीक्शनचा रेट कसा सुधारता येईल हे अग्रक्रमाने मांडले होते. या लक्षवेधी सूचनेच्या निवेदनात



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हेमंत टकले....

मोहल्ला समितीच्या 529 बैठका, शांतता समितीच्या 479 बैठका, तंटामुक्त अभियानांतर्गत 814 बैठका, गाव पातळीवरील 2488 बैठका, पोलीस ठाणेनिहाय 805 बैठका, उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी 317 बैठका, तक्रार निवारन दिनी 1288 बैठका घेतल्याचे नमूद केले आहे. या बैठका कमी झाल्या म्हणून एन.सी.सी./एन.एस.एस. विद्यार्थ्यांच्या माध्यमातून 258 बैठका घेतल्याचे नमूद केले आहे. मी तर म्हणेन की, बैठकांचा हा विक्रम झालेला आहे. परंतु एवढे सर्व करुनही यामध्ये यश मिळत नसेल तर या सर्व यंत्रणेमध्ये चूक आहे असे मला वाटते. राज्य सरकार जी काही कार्यवाही करीत आहे तिच्या अंमलबजावणीमध्ये काही तरी दुरुस्ती करावी लागेल. अशा घटनांवर आळा घालण्यासाठी सरकारने जरुर कायदा करावा. परंतु या संदर्भातील विधेयक पहिले मांडावे लागेल, ते संमत करुन त्याची अंमलबजावणी होईपर्यंत बहिष्कारांचे प्रकरण वाढत गेले तर समाजामध्ये विघटन होऊ शकते. आजच्या युगात नोकरीनिमित्त अनेकजण आपले मूळ गाव सोडून बाहेर जातात. गावात त्यांचा शेतीचा तुकडा असतो. परंतु ते जेव्हा आपल्या मूळ गावी परत येतात तेव्हा त्यांनी दुसऱ्या जातीच्या मुलीशी लग्न केल्यामुळे त्यांना गावातून बहिष्कृत केले तर त्यांचे जगणे दुर्दैवी होते. अशाप्रकारचे फार मोठे सामाजिक प्रश्न या बहिष्कारातून येतात. हे कमी होते की काय म्हणून 'घर वापसी' सारखे कार्यक्रम देशभरात सुरु आहेत. त्यामुळे या गोष्टींना पायबंद घालण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेला कायदा, सरकारी यंत्रणा आणि सरकारी यंत्रणांच्या माध्यमातून कारवाई केली पाहिजे. आपण अमुक इतक्या बैठका घेतल्या हे सांगून उपयोग नाही. कारण एवढ्या बैठका घेऊनही काही झालेले नाही, हे यावरुन सिध्द होते. त्यामुळे अशा प्रकारांवर आळा घालण्यासाठी वेगळ्या प्रकारच्या उपाययोजना हाती घेणे आवश्यक आहे. मी स्पेसिफिक विचारतो की, अशा प्रकारची उपाययोजना हाती घेण्याचा शासन विचार करेल काय ?

प्रा.राम शिंदे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, दिनांक 30/09/2013 च्या शासन परिपत्रकात ज्या ज्या गोष्टींचा अंतर्भाव आहे त्यानुसार पोलीस विभागागामर्फत कार्यवाही केली जाते. या ठिकाणी राज्याच्या आदरणीय मुख्यमंत्र्यांच्या भाषणाचा उल्लेख करण्यात आला. या निमित्ताने सांगतो की, राज्यातील कन्व्हीक्शन रेट वाढविण्यासाठी सरकार प्रयत्न करीत आहे. राज्यामध्ये 2008, 2009, 2010 मध्ये कन्व्हीक्शनचा रेट 8 टक्के, 9



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे....

टक्के, 12 टक्के आणि जास्तीत जास्त 15 टक्क्यापर्यंत गेला होता. परंतु आमच्या पक्षाचे सरकार आल्यानंतर तो रेट 20 टक्क्यांपर्यंत गेला आहे. शेवटी पोलिसांचे मनुष्यबळ वाढवून त्यांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहणे आणि कायद्याची तंतोतंत अंमलबजावणी करण्यासाठी जे काही लूपहोल्स आहेत ते दूर करण्यासाठी राज्य सरकारने प्रयत्न केले आहेत. शिवाय त्यासाठी विशेष तरतूद केली आहे.

सभापती महोदय, राज्यात 9 फॉरेन्सिक लॅब आहेत. आता नव्याने पोलीस अधीक्षक अंतर्गत 36 आणि आयुक्तालय अंतर्गत 9, अशा 45 फॉरेन्सिक सपोर्टीव्ह मोबाईल व्हॅन निर्माण करीत आहोत. कारण गोल्डन हवरमध्ये फॉरेन्सिक इव्हीडन्स मिळणे अत्यंत गरजेचे असते. जर विटनेस होस्टाईल झाला तर अपराध सिध्द होण्यासाठी त्याची मदत होत नाही, किंबहुना अपराध सिध्दतेचे प्रमाण कमी होते. त्यामुळे कलिनाच्या फॉरेन्सिक लॅबला अद्ययावत करणे गरजेचे आहे. गुजरातची फॉरेन्सिक लॅब ही जगातील चांगली लॅब आहे. सन्माननीय सदस्य श्री.माणिकराव ठाकरे हे मी बोलत असताना मध्येच बोलण्याचा प्रयत्न करीत आहेत. वास्तविक पाहता ते ज्येष्ठ असल्यामुळे माझे उत्तर होण्यापूर्वीच त्यांनी मध्येच बोलणे उचित वाटत नाही. माझ्याकडून चुकीचे वक्तव्य रेकॉर्डवर आले असेल तर मी ते दुरूस्त करीन. परंतु आपण माझे उत्तर पूर्ण होऊ द्यावे. मी त्यांचा आदर ठेवून खाली बसतो.

श्री.माणिकराव ठाकरे : महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी आताच सांगितले की, त्यांच्या पक्षाचे सरकार आल्यानंतर राज्यातील कन्व्हीक्शनच्या रेटमध्ये सुधारणा झाली आहे. याचे मला आश्चर्य वाटते. त्यांचे सरकार इतके कार्यक्षम असते तर अनेक गोष्टी दिसून आल्या असत्या. 1995 चा कन्व्हीक्शन रेट किती होता आणि युती सरकार गेल्यानंतर तो किती होता हे जर माननीय राज्यमंत्र्यांनी सांगितले तर बरे होईल. मी त्यांना सांगू इच्छितो की, 1995 मध्ये कन्व्हीक्शन रेट 32 टक्के होता आणि 1998 मध्ये तो 10 टक्क्यांपर्यंत खाली आला होता. मला वाटते त्यांनी ही सुध्दा आकडेवारी सभागृहात सांगितली पाहिजे.

प्रा.राम शिंदे : महोदय, मी माझ्या उत्तरामध्ये सन 2009-10 च्या कन्व्हीक्शन रेटचा रेफरंस दिला होता. त्यामुळे रेकॉर्डवर काहीही चुकीचे गेलेले नाही. माननीय मुख्यमंत्र्यांनी काल विधानसभेत उत्तर देताना जे सांगितले तेच या सभागृहात सुध्दा सांगितले. माननीय गृह राज्यमंत्री

..4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.राम शिंदे....

(शहरे) हे फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना सुचविण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालातील शिफारशी स्वीकारण्याबाबतचे निवेदन करण्यासाठी या ठिकाणी उपस्थित आहेत. राज्य सरकारने त्या सर्व शिफारशी स्वीकारल्या आहेत. त्यामुळे या संदर्भात जे काही करणे आवश्यक आहे ते करण्याचा शासनाचा निश्चितपणे प्रयत्न आहे.

---------

नंतर श्री.कांबळे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना सूचविण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालामधील शिफारशी स्वीकारणे.

**मु.शी.** : फौजदारी खटल्यातील सिध्दापराध प्रमाण वाढविण्यासाठी उपाययोजना सूचविण्याकरिता स्थापन करण्यात आलेल्या समितीच्या अहवालामधील शिफारशी स्वीकारणे संबंधी माननीय गृह (शहरे) राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ. रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो. :-

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

..2

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात सुधारणा

**मु.शी.** : महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमात सुधारणा संबंधी माननीय नगरविकास राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ. रणजित पाटील (नगरविकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो. :-

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : उच्च न्यायालयातील न्यायमुर्तींच्या संख्येत वाढ

**मु.शी.** : उच्च न्यायालयातील न्यायमुर्तींच्या संख्येत वाढ संबंधी
मानननीय गृह (शहरे) राज्यमंत्र्यांचे निवेदन

डॉ. रणजित पाटील (गृह (शहरे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने म.वि.प. नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो. :-

(**प्रेस** : येथे सोबत जोडलेले निवेदन छापावे.)

----

..4

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.** : रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विनापरवाना वाळू उत्खनन करण्यात येणे.

**मु.शी.** : रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विनापरवाना वाळू उत्खनन करण्यात येणे यासंबंधी श्री. जयंत प्र. पाटील, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. जयंत प्र. पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करते.

"रायगड जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये विना परवाना वाळू उत्खनन करण्याचे प्रकार महसूल विभागाच्या निदर्शनास येणे, अलिबाग, पेण, रोहा आदि भागात विना परवानगी हजारो ब्रास अनधिकृत वाळूचा साठा व वाहने जप्त करण्यांत येणे, अनधिकृत उत्खनन केल्याने बांधकामाच्या किंमतीमध्ये वाढ होणे, पर्यायाने अनधिकृत वाळू काढण्याच्या प्रकारात काही तालुक्यात महसूल विभाग सक्रीय असणे, याबाबत संपूर्ण जिल्ह्यासाठी वाळूची आवश्यकता असल्याने महसूल विभागामार्फत वाळू लिलावाबाबत जाहिरनामा प्रसिध्द करण्याची गरज निर्माण होणे, अनधिकृत वाळू उत्खनन होत असल्यामुळे सर्वसामान्य जनतेला नाहक आर्थिक भूर्दंड पडणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

श्री. एकनाथराव खडसे (महसूल मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(**प्रेस** : येथे सोबतचे निवेदन छापावे.)

----



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. जयंत प्र. पाटील : सभापती महोदय, मी या अधिवेशनामध्ये वाळूच्या विषयावर वेगवेगळ्या माध्यमातून बोललो आहे. माननीय मंत्र्यांनी त्याला उत्तरही दिले आहे. माझे दोनच प्रश्न आहेत. महसूल खात्याचे प्रत्येक गावामध्ये कोतवालापासून ग्रामसेवक, तलाठी, सर्कल हे अधिकारी आहेत. माझा प्रश्न असा आहे की, चोरीची वाळू मिळाली की तेथील संबंधित अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा नोंदविण्याच्या कारवाईचा निर्णय शासन घेईल का ? सभापती महोदय, सक्शन पंप बनविण्यावरच बंदी आहे. आपण या संदर्भात कायदा केला आहे. सक्शन पंप बनविण्यास किंवा ठेवण्यास बंदी आहे आणि असे असतानाही राजरोसपणे तेथील खाडीमध्ये सक्शन पंप आहेत. शासनाने सक्शन पंप ज्यांनी बनविले आहेत त्यांच्यावर गुन्हे दाखल केले पहिजेत. आघाडी सरकारच्या काळात सागरी पोलीस खाते निर्माण केले आहे, सागरी पोलीस स्टेशन्स निर्माण केली आहेत, ती सक्षम झाली पाहिजेत. महसूल खात्याच्या अधिकाऱ्यांना विचारले असता ते म्हणतात की, पोलीस यत्रंणा येत नाही, बोट देत नाही. राज्य शासन या संदर्भातील निर्णय गृह खात्याला सांगेल का ? शासन सर्व बाबतीत अपुरे पडते. त्यामुळे गुन्हेगार ताबडतोब जामीन घेऊन बाहेर पडतात. आपण त्यांना एमपीडीए कायद्याखाली अटक करणार का ? अशा गुन्हेगारांना किमान दोन वर्षे जामीन मिळणार नाही हे पाहिले पाहिजे. झोपडपट्टी दादांच्या संदर्भात कायदा केला तसा वाळू माफियांच्या विरूध्द कायदा करण्याचा निर्णय शासन लवकर घेईल का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, रायगड येथील अवैध वाळू उत्खननाच्या संदर्भातील हा विषय आहे. राज्यभर मोठ्या प्रमाणात वाळू चोरी होत आहे. वाळू चोऱ्या पकडण्यासाठी त्या ठिकाणचे अधिकारी त्या तुलनेत प्रयत्न करीत असतात. काही ठिकाणी अधिकाऱ्यांची हलगर्जी आहे तर आणि काही ठिकाणी माफियांचे हल्ले होत आहेत, असे दुहेरी प्रकार राज्यात सुरू आहेत. कोतवालापासून पोलीस पाटलापर्यंत आणि पोलीस पाटलांपासून जिल्हाधिकाऱ्यांपर्यंत सर्व यंत्रणा असताना चोऱ्या होत आहेत. त्यामुळे आपण संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याच्या संदर्भातील प्रश्न विचारला आहे. आमच्या निदर्शनास आले आहे की, बहुतांश पोलीस पाटील, कोतवाल त्या ठिकाणी जागरूकतेने काम करतात. तहसीलदार किंवा नायब

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. एकनाथराव खडसे ....

तहसीलदार किंवा जो कोणी संबंधित असेल त्यांनी बऱ्यापैकी प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु अनेक वेळा या अधिकाऱ्यांवरच हल्ले होऊन ते जखमी होण्याचे प्रमाण मोठे असल्याचे दिसून आले आहे. जे अधिकारी हलगर्जीपणा करतील त्यांच्यावर निश्चितपणे कारवाई करता येईल. आपण सांगितले की, गुन्हेगार वारंवार गुन्हे करतात, बंदी असताना सक्शन पंप वापरतात. मी सांगू इच्छितो की, राज्यात सक्शन पंपला सर्रासपणे बंदी नाही. जेथे 3 मीटरच्या खाली वाळू उत्खनन करायचे आहे, जेथे आवश्यक आहे तेथे जिल्हाधिकाऱ्यांनी खात्री करून सक्शन पंपच्या संदर्भात त्याच्या अखत्यारित परवानगी देणे किंवा राज्य शासनापर्यंत तो प्रस्ताव पाठवून परवानगी घेणे अशा स्वरूपाचा नियम वाळू धोरणामध्ये समाविष्ट केला आहे.

सभापती महोदय, सक्शन पंप अनधिकृतपणे वापरण्यात येत असतील तर असे सक्शन पंप जप्त करण्यात येऊन संबंधितांच्या संदर्भात निश्चितपणे कारवाई केली जाईल. आपण विचारले की, वांरवार असे गुन्हे करणाऱ्या वाळू माफियांवर एमपीडीए अंतर्गत गुन्हा दाखल करता येईल का ? अलीकडे काही गुन्हे वाढत आहेत, मुजोरी वाढत आहे. ट्रक अंगावर घालणे, अधिकाऱ्यांना मारहाण करणे असे प्रकार घडत आहेत. त्यामुळे वाळू माफियांवर एमपीडीएखाली गुन्हे दाखल करण्याचा निर्णय शासन घेईल, आवश्यकता भासल्यास कायद्यामध्ये दुरूस्ती करण्यात येईल.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. जयंत पाटील यांनी मांडलेला मुद्दा योग्य आहे. कारण अनेक वेळा अवैध उत्पादन होते आणि त्यातून अनेक गोष्टी घडतात आणि त्याचा परिणामही वेगवेगळ्या प्रकारे होतो. कालच माननीय मुख्यमंत्र्यांनी निवेदन करताना सांगितले की, नवी मुंबईच्या परिसरात 4 एफएसआय देण्यात येणार आहे. हा मुद्दा याच्याशी निगडीत आहे म्हणून विस्ताराने बोलत आहे. अनेक वेळा आमदार निधीची कामे, डोंगरी विकासाची कामे, डीपीडीसीची कामे, शासनाची कामे, खाजगी बांधकामे केली जात असतात. शासनाने वाळूबाबतचे धोरण निश्चित केलेले नसल्यामुळे असे प्रकार घडत आहेत. आपण या संदर्भात काही धोरण निश्चित केले पाहिजे. बांधकामे होत असतील, विकासकामे होत असतील आणि त्यास वाळुची आवश्यकता लागणार असेल तर ती उपलब्ध करून देण्यासाठी सरकारकडून

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. सुनील तटकरे ....

लिलाव पध्दती किंवा काही इतर पध्दती तयार केली पाहिजे. उच्च न्यायालयाने केलेल्या विहित पध्दती प्रमाणे प्रक्रिया होत नसेल तर अनधिकृत गोष्टींना आपोआप चालना मिळत असते. शासनाने यावर पायबंद घातलाच पाहिजे. वाळूमाफियांवर एमपीडीएची कारवाई केली पाहिजे यावर दुमत असण्याचे कारण नाही. शासनाने या संदर्भात सर्वंकष धोरण स्वीकारून पावसाळा संपल्यानंतर लगेच लिलाव पध्दती केली पहिजे, मग ती जिल्हाधिकारी स्तरावर असो वा विभागीय आयुक्तांच्या स्तरावर असो. ई टेंडरिंग असो किंवा ई ऑक्शन असो काही तरी पध्दती स्वीकारली पाहिजे. तातडीने दोन्ही उपाययोजना करण्याच्या दृष्टीने शासन काही निश्चित कालावधीत धोरण जाहीर करणार का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, वाळूच्या संदर्भात उच्च न्यायालयामध्ये एक पीआयएल दाखल करण्यात आली होती. वाळू उत्खननामुळे पर्यावरणाचा मोठा ऱ्हास होतो. त्यामुळे वाळू उपशावर बंदी घालण्यात यावी, यासाठी काही निकष तयार करण्यात यावेत अशी याचिकाकर्त्याची मागणी होती. ग्रीन ट्रायब्युनलकडे सुध्दा अशी मागणी करण्यात आली होती. सुधारित वाळू धोरण निश्चित करावे अशा सूचना केल्या आहेत. शासनाचे आधीचे वाळू धोरण होते, त्यामध्ये काही बदल करून नवीन धोरण करण्याचा निर्णय घेतला आहे. लवकरात लवकर वाळू धोरण निश्चित करून ते राज्यात लागू करता येईल. सदर बाबतीत व्यावसायिक, विकासक, संबंधित लोकप्रतिनिधी यांच्या सूचना मागवित आहोत, त्यांनी दिलेल्या सूचनांचा समावेश करून सुधारित वाळू धोरण 1 महिन्याच्या आत तयार करून उच्च न्यायालय व ग्रीन ट्रायब्युनल येथे सादर करायचे आहे. शासन तसा प्रयत्न नक्कीच करणार आहे.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, रायगड जिल्ह्यात सध्या वाळू उपशासाठी अधिकृत परवाने देण्यात आले आहेत का ?

श्री. एकनाथराव खडसे : सभापती महोदय, नाही.

श्री. सुनील तटकरे : सभापती महोदय, रायगड येथे सक्शन पंप आहेत का ?

( नंतर श्री. रोझेकर ....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे : रायगड जिल्ह्यामध्ये वाळू उत्खननाला परवानगी नाही. या संदर्भात हरित न्यायालयाने बंदी घातलेली आहे. नवीन वाळू धोरण हरित न्यायालयाला सादर केल्यानंतर त्यांची परवानगी मिळेल, असा राज्य शासनाचा प्रयत्न राहणार आहे. तोपर्यंत काही पर्यायी व्यवस्था करता येईल का, याची तपासणी शासनाकडून सुरु आहे.

श्री.भाई गिरकर : सभापती महोदय, कालच रायगड जिल्ह्यामध्ये वाळूचा ढिगारा पकडला गेला. आपले अधिकारी त्या ठिकाणी गेले होते. परंतु, वाळू नेमकी कोणाची आहे, हे समजले नाही. त्या ठिकाणी हजारो टन वाळू होती. परंतु, ती कोणी काढली, कोणाची आहे, याचा तपास लागलेला नाही. सिंधुदूर्ग जिल्ह्यामध्ये वाळू उपलब्ध आहे. परंतु, ती अधिकृतरित्या मिळत नाही. राज्य शासन नवीन वाळू धोरण आणणार आहे, त्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. जालना जिल्ह्यामध्ये टीव्ही-9 या वाहिनीचे वार्ताहर आणि एक सामाजिक कार्यकर्ता बातमी घेण्यासाठी त्या ठिकाणी गेले होते. परंतु, त्यांना मारहाण करण्यात आली. अशा प्रकारे वाळू माफियांची ताकद महाराष्ट्रभर वाढू लागली आहे. जालना जिल्ह्यात घडलेल्या प्रकाराची चौकशी करुन संबंधितांविरुध्द गुन्हे दाखल करणार का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, अनेक ठिकाणी वाळू माफियांनी शासकीय अधिकाऱ्यांवर, पत्रकारांवर किंवा अन्य लोकांवर हल्ले केलेले आहेत. जालना येथे घडलेल्या प्रकाराबाबतची चौकशी करण्यात येईल आणि संबंधितांविरुध्द कठोर कारवाई केली जाईल.

सभापती महोदय, राज्यभरात वाळूच्या संदर्भात वेगवेगळी धोरणे आणि न्यायालयाचे निदेश आहेत. कोकणाची परिस्थिती वेगळी आहे. उर्वरित महाराष्ट्रात वाळू धोरण आहे आणि त्याची अंमलबजावणी देखील सुरु आहे. कोकणातील रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि ठाणे जिल्ह्याच्या काही भागात वाळू आणि जांभा दगड यावर बंदी घालण्यात आली आहे. सन 2010 पासून हे प्रकरण प्रलंबित आहे. जांभा दगडाच्या संदर्भात माननीय केंद्रीय पर्यावरण मंत्री श्री.प्रकाश जावडेकर यांच्या बरोबर दोन-तीन बैठका झाल्या. कोकणातील लोकप्रतिनिधी या विषयाचा सातत्याने पाठपुरावा करीत होते. केंद्रीय पर्यावरण मंत्री महोदयांनी जांभा दगडाबाबत दिलासा दिलेला आहे, त्याबाबत सुट दिलेली आहे. त्यामुळे आता जांभा दगडाचा प्रश्न सुटलेला आहे. वाळूच्या संदर्भात अद्याप परवानगी दिलेली नाही.

...2....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे........

सभापती महोदय, सिंधुदूर्ग आणि रत्नागिरी जिल्ह्यात समुद्रातून आणावयाच्या वाळूच्या संदर्भात मेरिटाईम बोर्डाला अधिकार दिलेले आहेत. त्यांना असे सूचित करण्यात आले आहे की, ज्यावेळी बोटी समुद्रामध्ये येतात, त्यावेळी त्या चॅनलच्या माध्यमातून जी वाळू निघते ती उपसून किनाऱ्यावर 500 मीटर लांब अंतरावर टाकावी, त्याचा लिलाव करावा आणि ती विकावी. परंतु, मेरिटाईम बोर्डाकडे या संदर्भातील पुरेशी यंत्रणा नाही. ती यंत्रणा उपलब्ध करुन देण्याचा राज्य शासनाचा प्रयत्न आहे. पर्यावरण विभागाची परवानगी घ्यावी, अशी दुसरी अट त्यामध्ये आहे. त्यासाठी पर्यावरण बोर्डाच्या माध्यमातून समिती नियुक्त केलेली आहे. त्या समितीकडे या संदर्भातील प्रस्ताव जाऊन त्यांना मान्यता मिळते. उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार, हरित न्यायालयाच्या निर्णयानुसार याबाबतची अंमलबजावणी होत आहे.

सभापती महोदय, एका बाजूला बाजारात वाळू उपलब्ध आहे आणि दुसरीकडे वाळू उत्खननावर बंदी आहे. याचाच अर्थ, चोरीची वाळू मोठ्या प्रमाणावर बाजारात येत आहे. त्यामुळे सरकारचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, रॉयल्टी बुडत आहे. यामधून मार्ग काढण्याचा शासनाचा प्रयत्न आहे. केंद्रीय पर्यावरण मंत्री महोदयांबरोबर याच महिन्यात बैठक घेणार आहोत आणि याच महिन्यामध्ये वाळू धोरण निश्चित करुन राज्यभरामध्ये लागू करुन तातडीने यामधील अडचण दूर करण्याचा प्रयत्न राज्य शासन करणार आहे.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी अतिशय विस्तृत उत्तर दिलेले आहे. त्यामुळे अनेक गोष्टींबाबत समाधान झाले आहे.

सभापती महोदय, वाळू माफिया हा विषय फक्त रायगड जिल्ह्यापुरता मर्यादित नाही. हा संपूर्ण राज्याचा प्रश्न आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, प्रत्येक जिल्ह्यासाठी वेगळे वाळू धोरण आहे. परंतु, असे न करता राज्यभरासाठी एकसंध वाळू धोरण निश्चित करणार का ?

सभापती महोदय, नैसर्गिक साधनसंपत्तीची चोरी वाळू माफिया करतात. त्याप्रमाणेच कोतवाल, पोलीस पाटील, तहसीलदार आणि अन्य अधिकारी वर्ग हे श्रीमंत होत चालले आहेत. परंतु, सरकारी तिजोरीमध्ये पैसा येत नाही. दुसरीकडे शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी सरकारी

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

प्रा.जोगेंद्र कवाडे........

तिजोरीत खडखडाट असतो. हे सर्व थांबवायचे असेल तर वाळू माफियांविरुध्द संपूर्ण राज्यामध्ये एमपीडीए कायद्यान्वये किंवा त्याही पेक्षा कठोर कायद्यान्वये शासन कारवाई करणार आहे का ? कारण, ही गुंडगिरी थांबली पाहिजे. पोलीस विभाग किंवा महसूल यंत्रणेतील अधिकारी आपल्या कामाकडे दूर्लक्ष करील असतील तर त्यांच्याविरुध्द कठोर कारवाई झाली पाहिजे.

**तालिका सभापती :** सन्माननीय सदस्य श्री.जयंत पाटील यांनी एक प्रश्न विचारावा व त्यानंतर मंत्री महोदयांनी दोन्ही सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नांना एकत्रित उत्तर द्यावे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, मुंबई आणि रायगड परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर औद्योगिकरण होत आहे. या मोठ्या प्रमाणावर होणाऱ्या बांधकामांना लागणारी वाळू रायगड जिल्ह्यामध्ये उपलब्ध होऊ शकणार नाही. ज्या ठिकाणी गरज नाही त्या ठिकाणी वाळू काढली जाते आणि त्यामुळे मोठ्या प्रमाणावर प्रश्न निर्माण होतात. मोठ्या प्रमाणावर शेती खचत आहे. त्यामुळे राज्य शासनाला परराज्यातून वाळू आणावी लागणार आहे. शासनाकडून मेट्रो, नयना, विमानतळ यासारखे मोठे प्रकल्प सुरु करण्यात येणार आहेत. परंतु, त्यासाठी रायगड जिल्ह्यामध्ये वाळू उपलब्ध नाही. परराज्यातून वाळू कशी उपलब्ध होईल, या संदर्भात शासन काही धोरण ठरविणार आहे का ?

सभापती महोदय, बांधकाम करणाऱ्याने वापरावयाच्या वाळूची रॉयल्टी भरली आहे किंवा नाही, याबाबतचे प्रमाणपत्र तो जोपर्यंत सादर करीत नाही तोपर्यंत कोणतीही शासकीय बिले काढण्यात येऊ नयेत, अशा प्रकारच्या तरतुदीचा अंतर्भाव धोरणात करणार आहात का ?

श्री.एकनाथराव खडसे : सभापती महोदय, संपूर्ण राज्यभरासाठी एकसंध धोरण आपल्याला ठरविता येणार नाही. साधारणपणे तीन प्रकाराने वाळू उत्खनन केले जाते. नदीमधून आणि समुद्रातून वाळू काढली जाते. प्रत्येक ठिकाणी वाळू उत्खननाबाबत न्यायालयाचे वेगवेगळे निदेश आहेत. डुबी मारुन वाळू काढली जाते, पाठीवरुन पाटीवर टाकून वाळू काढली जाते आणि नंतर ती किनाऱ्यावर टाकली जाते. यासाठी लायसन घेण्याची किंवा परवानगी घेण्याची आवश्यकता नसते.

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

समुद्रातून वाळू काढण्याबाबत वेगळे धोरण आहे. सक्शन पंप लावण्याच्या संदर्भात वेगळे धोरण

...4....



श्री.एकनाथराव खडसे........

आहे. तथापि, सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा नवीन धोरण ठरवितांना निश्चितपणे विचार केला जाईल.

सभापती महोदय, शासकीय अधिकारी आपल्या कामात हलगर्जीपणा करतात, ही गोष्ट खरी आहे. काही अधिकाऱ्यांवर राज्य शासनाने कारवाई देखील केली आहे. परवा पंढरपूर येथे महसूल अधिकाऱ्यांवर हल्ला झाला, काही अधिकारी गंभीर जखमी झाले आहेत आणि त्यापैकी एक अत्यवस्थ आहे. संबंधित पोलीस स्टेशनच्या पी.एस.आय.ने हलगर्जीपणा केला म्हणून त्याच दिवशी त्याला निलंबित करण्यात आले असून चौकशी सुरु केली आहे.

यानंतर श्री.वि.खर्चे....

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.एकनाथराव खडसे...

आता या संदर्भात एक नवीन स्मॅट पध्दती आम्ही अस्तित्वात आणली आहे. ती पध्दत सुरु करण्यात आली आहे. ज्याचा लिलाव दिलेला आहे, त्या स्पॉटमधून किती टन रेती उचलण्यात येणार आहे. तो ठेका कोणाला दिलेला आहे, तो किती अंतरावर आहे. रेती त्या ठिकाणावरुन केव्हा उचलणार आहे. हा ठेका किती दिवसांपुरता आहे. या स्वरुपाचा एक डाटा मोबाईलवरुन देण्यात येईल. ठेकेदाराला आता एक बारकोड क्रमांक देण्यात आलेला आहे. हा प्रयोग काही ठिकाणी सुरु करण्यात आलेला आहे. एक क्रमांक दिल्यानंतर जिल्हाधिकारी, तहसीलदार यांना ते कळवावे लागेल की, अमुक अमुक नांव आहे, हा नंबर आहे, हा ट्रक आहे, यातून आम्ही रेती नेत आहोत, येथून इथपर्यंत अंतर आहे, ते जीपीएस सिस्टीमच्या माध्यमातून तपासता येणार आहे. त्या ठेकेदाराने आतापर्यंत किती वाळू नेली, याची माहिती मोबाईल क्रमांक लावून विचारली तर ती लगेच समजली पाहिजे. आता आणखी एक नवीन सुधारणा करण्यात येत आहे की, रेतीचा ट्रक रस्त्याने जात असेल, त्या ट्रकमध्ये रेती असली तर त्या ट्रकचा क्रमांक कोणत्याही सामान्य माणसाने, शासनाने दिलेला बारकोड क्रमाकांच्या समोर मोबाईल नंबर टाकला तर यासंदर्भातील माहिती मिळू शकेल. ही वाळू कोणाची आहे, किती वाळू नेली, ती नियमात आहे किंवा नाही, हे सामान्य माणसाला कळेल. तो क्रमांक एरर आला तर त्या व्यक्तीला पकडणे सोपे जाणार आहे. अशा स्वरुपाची स्मार्ट प्रणाली आता अस्तित्वात आलेली आहे. या प्रणालीचा उपयोग करुन महसूल विभागाच्या माध्यमातून वाळू माफियांवर नियंत्रण आणण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

<u>**लक्षवेधी सूचना क्रमांक 3 बाबत**</u>

**तालिका सभाध्यक्ष :** लक्षवेधी सूचना क्रमांक तीन सन्माननीय सदस्यांनी केलेल्या विनंती नुसार पुढे ढकलण्यात आली आहे. आला लक्षवेधी क्रमांक चार चर्चेला घेण्यात येईल.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, आमचे म्हणणे असे आहे की, मंत्री महोदयांनी लक्षवेधी सूचना पुढे ढकलावी अशी काल विनंती केली होती तेव्हा सन्माननीय सदस्यांनी आरडाओरडा केला होता. मला असे म्हणायचे आहे की, अशा व्यवहारिक अडचणी येत असतात. याबाबत एवढीच नोंद घेण्यात यावी की, 'कभी गाडी नाव पे, किंवा नाव कभी गाडी पे' ही बाब सर्व सन्माननीय सदस्यांनी समजून घ्यावी अशी माझी विनंती आहे.

----

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गासाठी निधीची तरतूद करणे

**मु.शी.:** अहमदनगर-बीड-परळी या रेल्वे मार्गासाठी निधीची तरतूद करणे यासंबंधी सर्वश्री विनायकर मेटे, धनंजय मुंडे, पांडुरंग फुंडकर, हेमंत टकले, अमरसिंह पंडित, जयवंतराव जाधव, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.विनायक मेटे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने माननीय परिवहन मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"महाराष्ट्रातील मागास मराठवाड्यातील बीड जिल्ह्यामध्ये दळणवळणाची साधने नसल्यामुळे या भागाची प्रगती न होणे, अहमदनगर-बीड-परळी या रेल्वेमार्गाची मागणी मागील 25 वर्षांपासून असणे, सदरील रेल्वे मार्गाकरीता भारताच्या इतिहासात प्रथमच लोकसभेमध्ये घोषणा होणे, या रेल्वे मार्गाला सन 1995-1996 साली मंजूरी मिळणे, सन 1995-1996 साली 261 कि.मी. लांबीच्या रेल्वे मार्गाची किंमत 353 कोटी असणे, याकरिता केंद्र सरकार व राज्य सरकारने 50:50 टक्के भागिदारी प्रमाणे मागील 20 वर्षांत केवळ 310 कोटी रुपये रक्कम मिळणे, सदरील रेल्वेमार्ग हा मागील 20 वर्षापासून रखडलेला असल्यामुळे आज त्याची किंमत 3000 कोटी रुपयांपर्यंत गेलेली असणे, हा प्रकल्प लवकरात लवकर मार्गी लागण्याकरीता जिल्हावासियांनी राज्य शासनाकडे वेळोवेळी आंदोलने करुन मागणी करणे, दिनांक 11 फेब्रुवारी, 2015 रोजी मा.रेल्वेमंत्री यांची शिष्टमंडळाने रेलभवन, नवी दिल्ली येथे भेट घेऊन आर्थिक तरतुदीची केलेली मागणी, मा.रेल्वेमंत्री यांनी रेल्वे अर्थसंकल्पामध्ये 144 कोटींची केलेली तरतूद, त्यानुसार राज्य शासनाच्या 50 टक्याच्या भागीदारीनुसार तेवढ्याच रकमेची करावयाची आर्थिक तरतूद, याकरीता सन 2015-2016 च्या अर्थसंकल्पात 144 कोटी रुपयांची तरतूद करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

श्री.विजय देशमुख (परिवहन राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचने संबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**तालिका सभापती** : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस: येथे सोबतचे निवेदन छापावे)

-----

...4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, अहमदनगर-बीड-परळी हा रेल्वे मार्ग 1995-1996 मध्ये मंजूर झालेला आहे. स्वातंत्र्य काळानंतर ज्या ठिकाणी रेल्वे पोहचू शकली नाही अशा काही जिल्ह्यामध्ये बीड जिल्हा आहे. या जिल्ह्यात रेल्वे यावी यासाठी अनेक वर्षापासून सतत आंदोलने होत होती. या आंदोलनाची दखल घेऊन लोकसभेत 1995-96 मध्ये या रेल्वे मार्गाला मंजुरी देण्यात आली आहे. सदर रेल्वे मार्गाला मंजुरी दिली त्यावेळी या प्रकल्पाची किंमत जवळपास 253 कोटी रुपये होती. आज या रेल्वे प्रकल्पाची किंमत 3000 कोटी रुपये झाली आहे. या प्रकल्पाकडे दुर्दैवाने रेल्वेचे दुर्लक्ष झाले आहे. अहमदनगर, बीड जिल्ह्यातील लोकांना रेल्वेची सुविधा मिळत नाही. तत्कालीन मुख्यमंत्री स्व.विलासराव देशमुख यांनी सन 2007-2008 मध्ये या रेल्वे मार्गाबाबात पुढाकार घेऊन या प्रकल्पाच्या किंमतीतील निम्मा वाटा म्हणजे 50 टक्के रक्कम राज्य शासन देईन असे जाहीर केले होते व तसा ठराव मंजुर करून घेतला आहे. देशातील हा पहिला प्रकल्प आहे की, राज्याचा व केंद्र शासनाचा 50-50 टक्के वाटा यात आहे. स्व.गोपीनाथ मुंडे यांनी या प्रकल्पासाठी अत्यंत कष्ट घेऊन तो पूर्ण करण्यासाठी भरपूर प्रयत्न केले होते. या प्रकल्पासाठी जे जे करता येईल, ती कामे त्यांनी केली आहेत. आतापर्यंत या कामासाठी केंद्र शासनाकडून फक्त 310 कोटी रुपये मिळाले आहेत. ही कामे लवकर पूर्ण करायची असेल तर या प्रकल्पासाठी जास्तीत जास्त निधी मिळणे अत्यंत गरजेचे आहे. या प्रकल्पासाठी मी स्वतः व आमच्या जिल्ह्यातील अनेक पदाधिकाऱ्यांना घेऊन दिल्लीला माननीय रेल्वे मंत्री महोदयांची भेट घेतली होती. त्यानंतर केंद्रीय रेल्वे मंत्री महोदयांनी या बजेटसाठी 144 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. मागील 18 कोटी रुपये व आताच्या अर्थसंकल्पात 125 कोटी रुपये अशा प्रकारे 144 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार राज्य शासनाने आता 144 कोटी रुपयांची तरतूद करणे आवश्यक आहे. मंत्री महोदयांना माझा प्रश्न आहे की, मागासलेल्या जिल्ह्याला न्याय देण्यासाठी व रेल्वे प्रकल्प जलद गतीने पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने किमान 144 कोटी रुपये दिलेच पाहिजेत. भविष्यातील कामांसाठी किमान 500 कोटी रुपयांची तरतूद टप्प्या टप्प्याने राज्य शासन करणार आहे काय ? त्याचप्रमाणे केंद्र शासनाकडील निधीत वाढ करण्याकरिता माननीय



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विनायक मेटे....

मंत्री महोदय तसेच विरोधी पक्ष नेत्यांसह इतर काही संबंधित मंत्री महोदय व सन्माननीय सदस्यांना घेऊन रेल्वे मंत्री यांची भेट घेऊन केंद्र शासनाकडील निधी 500 कोटी रुपयांपर्यंत वाढविण्यसाठी प्रयत्न करण्यात येतील काय ? अहमदनगर येथून बीडपर्यंतचा रेल्वे मार्ग लवकरात लवकर सुरु करण्यात येईल काय ? भूसंपादनाचे 250 कोटी रुपये देणे बाकी आहे, ती रक्कम शासन लवकरात लवकर देणार आहे काय ?

श्री. विजय देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अशी मागणी केली आहे की, राज्य शासनाकडून चालू वर्षात 500 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येईल काय ? याबाबत मी त्यांना असे सांगू इच्छितो की, दिनांक 8 जानेवारी 2015 रोजी रेल्वे मंत्री व मुख्यमंत्री महोदयांची बैठक झाली होती. त्यामध्ये प्रलंबित प्रस्ताव एसपीव्हीद्वारे राबविण्याचा विचार सरकार करणार आहे. सन्माननीच सदस्यांनी ज्या रेल्वे मार्गाचा उल्लेख केला तो रेल्वे मार्ग शासनाच्या विचाराधीन आहे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितल्याप्रमाणे राज्य सरकार व केंद्र सरकार निम्मा निम्मा खर्च उचलून हा प्रकल्प पूर्ण करणार आहे. यामध्ये भूसंपादनाची कामे झालेली आहेत, भूसंपादन प्रारुप निवाडा मंजुरीसाठी सादर करुन दीड वर्षे झाली आहेत. इतका मोठा कालावधी होऊन देखील भूसंपादनाची रक्कम मिळू शकली नाही. केंद्र शासनाकडून आता जेवढा निधी प्राप्त झालेला आहे, तेवढा निधी नियमानुसार राज्य सरकारला द्यावा लागणार आहे. त्यामुळे या अर्थसंकल्पात या रकमेची तरतूद शासन करणार आहे काय ? या रेल्वे मार्गाचे काम फक्त साडेबारा किलोमीटर इतकेच झाले आहे. लातूर-कुर्डुवाडी रेल्वे रुंदीकरणाचे खडी व माती काम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून विशेष बाब म्हणून करण्यात आले होते. तसेच या मार्गाचे उर्वरीत खडीकरण व माती काम महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेमधून शासनाकडून केले जाणार आहे काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, शासन निर्णयाच्या अनुषंगाने अहमदनगर-बीड-परळी वैजनाथ या रेल्वे मार्गाच्या बांधकामासाठी पुढीलप्रमणे निधी आजपर्यंत वितरीत करण्यात आलेला आहे. सन 2010-11 मध्ये 56.25 कोटी रुपये, सन 2011-12 मध्ये 42.50 कोटी रुपये,

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री. विजय देशमुख...

सन 2012-13 मध्ये 60 कोटी रुपये, सन 2013-2014 मध्ये 20 कोटी रुपये, सन 2014-2015 मध्ये 20 कोटी रुपये असे एकूण 198.05 कोटी रुपये राज्य शासनाने आजपर्यंत वितरीत केले आहेत. केंद्र शासनाचा हिस्सा आजपर्यंत 166.65 कोटी रुपये मिळालेला आहे. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी दरवर्षी निधी उपलब्ध करुन दिलेला आहे. चालू वर्षात केंद्र सरकारने 144 कोटी रुपये मंजूर केले असतील तर त्या अनुषंगाने राज्य शासन निधी मंजूर करण्यास तयार आहे.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते व मी देखील स्पेसिफिक प्रश्न विचारला आहे की, 50-50 टक्केच्या भागीदारीप्रमाणे 125.90 कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यामध्ये मागील शिल्लक रक्कम 18 कोटी व आताची 125.90 कोटी रुपये अशा प्रकारे 144 कोटी रुपयांची तरतूद केंद्र शासनाने केलेली आहे. त्याप्रमाणे राज्य शासन या अर्थसंकल्पात तेवढ्या रकमेची तरतूद करणार काय ? आमची मागणी अशी आहे की, राज्य शासनाने या रेल्वे मार्गासाठी किमान 500 कोटी रुपयांची तरतूद करावी, या बाबत कार्यवाही करण्यात येईल काय ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी सांगितलेली बाब माझ्या अधिकारात येत नाही. राज्य शासनाचा बजेट अजून सादर झालेला नाही. त्यामुळे याबाबत स्पष्टपणे मला काहीही सांगता येणार नाही.

या नंतर श्री.बोरले..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांनी मघाशीच सांगितले की, सजेशन फॉर ॲक्शन. आम्ही सकारात्मक विचार करु आता बजेटमध्ये तरतूद करणार काय, तर मी सांगू इच्छितो की, प्रथम माननीय वित्तमंत्री सभागृहाला बजेट सादर करतात. त्यापूर्वी बजेट फोडताही येत नाही. केंद्राने यासाठी तरतूद केलेली आहे. केंद्र शासनाचे बजेट अद्याप पास व्हावयाचे आहे. मंत्री महोदयांनी सांगितले की, याचा आम्ही सकारात्मक विचार करु यातून हुशार सदस्यांनी संकेत घेतला पाहिजे.

श्री.विनायक मेटे : सभापती महोदय, यामध्ये केंद्र शासनाची आणि राज्य शासनाची 50:50 टक्के भागीदारी आहे. केंद्र शासनाने जेवढी तरतूद केलेली आहे तेवढी तरतूद राज्य शासनाला करणे बंधनकारक आहे. मग यामध्ये बजेट फोडण्याचा संबंध कोठे येतो ?

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, आज पर्यंत केंद्र शासनाने जेवढा निधी दिलेला आहे त्या प्रमाणे राज्य शासनाने आपल्या वाट्याचा 50 टक्के निधी दिलेला आहे. यावेळी केंद्र शासनाने जेवढी तरतूद केली असेल त्या प्रमाणे आम्ही देखील शासनाकडे 50 टक्के निधीची मागणी करु.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी दिलेल्या उत्तरामुळे हे निश्चित झालेले आहे की, यापूर्वी केंद्र शासनाने, रेल्वे विभागाने या रेल्वे मार्गासाठी जेवढा निधी उपलब्ध करुन दिला त्यापेक्षा निश्चितपणे आघाडी शासनाने जास्त निधी दिलेला आहे. आघाडी शासनाने त्यापेक्षा 10-15 कोटी रुपये जास्त दिलेले आहेत. मी मघाशी जो स्पेसिफिक प्रश्न विचारला त्या प्रश्नाचे मंत्री महोदयांनी अद्याप उत्तर दिलेले नाही. सभापती महोदय, जे दोन प्रमुख विषय अडचणीचे आहेत ते मला येथे उपस्थित करावयाचे आहेत. माझा पहिला प्रश्न असा आहे की, ज्या ठिकाणी बीड रेल्वे स्टेशन होणार आहे त्या जागेचे भूसंपादन झालेले आहे काय आणि झाले नसेल, असेल, जे काही असेल त्याबाबत मंत्री महोदयांनी स्पष्ट उत्तर द्यावे. माझा दुसरा प्रश्न असा आहे की, या रेल्वे मार्गासाठी बीड शहरातील पश्चिमेकडील बिंदूसरा पात्र ते धानोरा रोड परिसरातील 717 प्लॉट संपादित करुन दोन वर्षे झालेली आहेत. परंतु, या प्लॉटधारकांना त्यांच्या जागेचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत हे खरे आहे काय आणि असल्यास संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला किती व कधी पर्यंत देण्यात येणार आहे ?

..2...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी विचारलेल्या प्रश्नाच्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, या प्रकल्पाचे जवळपास 85 टक्के भूमी अधिग्रहणाचे काम पूर्ण झालेले आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी बीड रेल्वे स्थानकाच्या जागेच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. याबातची माहिती माझ्याकडे आता उपलब्ध नाही. ती माहिती सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

प्रा.जोगेंद्र कवाडे : सभापती महोदय, रेल्वे वाहतुकीची सुविधा नसल्यामुळे बीड जिल्हा अत्यंत मागासलेला राहिलेला आहे. अहमदनगर-बीड-परळी-वैजनाथ या रेल्वे मार्गासाठी निधीची तरतूद करावयाची आहे. आमचे मित्र सन्माननीय सदस्य श्री.विनायक मेटे यांनी या प्रकल्पासाठी कमीत कमी 500 कोटी रुपयांची तरतूद करावी, अशी विनंती केलेली आहे. शासनाने याची दखल घ्यावी, एवढीच माझी विनंती आहे.

श्री.विजय देशमुख : सभापती महोदय, होय.

---------

..3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**<u>सभागृहाच्या कामकाजासंबंधी</u>**

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, मी सभागृहात अनेक अधिवेशनात विनंती केली की, शुक्रवार हा अशासकीय कामकाजाचा दिवस असतो. आजच्या कामकाज पत्रिकेवर म.वि.प. नियम 260 अन्वये विरोधी पक्षातर्फे दिलेला प्रस्ताव दाखविण्यात आलेला आहे. सभापती महोदय, आम्ही सभागृहात जी चर्चा करतो, जे प्रश्न, व्यथा मांडतो त्याची दखल आपण घेणार आहात की नाही ? शुक्रवारी तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना आणि त्यानंतर अशासकीय कामकाज होते. सभापती महोदय, आज सभागृहासमोर किती कामकाज आहे ? आम्ही सकाळी 10.00 वाजेपासून सभागृहात आलेलो आहोत. आपल्या राज्यात अशासकीय विधेयकांवरील चर्चेच्या माध्यमातून शासनाने अनेक शासकीय विधेयके पारीत केलेली आहेत. आपण याकडे लक्षच देत नाहीत. आता 4 वाजून 15 मिनिटे झालेली आहेत. सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस नागपूर येथे राहतात. सन्माननीय सदस्यांना आपल्या मतदारसंघात जावयाचे आहे. सभागृहाचे कामकाज शुक्रवारी दुपारी 4.00 वाजेपर्यंत संपवावे, असे अलिखित संकेत आहेत.

-------

..4...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : औचित्याचे मुद्दे

**तालिका सभापती** : आता औचित्याचे मुद्दे घेण्यात येतील.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात कोणत्याही शैक्षणिक संस्थेला नवीन प्राथमिक अथवा माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी शासनाची मंजुरी असणे अनिवार्य आहे. अनेक शाळांमध्ये विद्यार्थी संख्या कमी होत असून तुकड्या व शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. मात्र दुसऱ्या बाजूला अनैसर्गिक स्पर्धा सुरु असून अनेक संस्थांनी शाळा सुरु केल्या असून त्यांनी अद्यापही शासनाची मान्यता घेतलेली नाही. या सर्व शाळा अनधिकृत असून माननीय मुंबई उच्च न्यायालयाने सर्व अनधिकृत व शासनाची मान्यता नसलेल्या शाळा बंद करण्याचे आदेश देऊनही शासनाने या शाळा सुरुच ठेवल्या असून शासनाकडून अनधिकृत शाळांना संरक्षण दिले जात आहे, अशा प्रकारची लोकांमध्ये भावना निर्माण झालेली आहे. अनधिकृत शाळा नवीन शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी बंद करण्याबाबत तातडीने कार्यवाही व्हावी, अशी मी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला विनंती करतो.

---------

..5...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, शासन मान्य खाजगी अुदानित प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांमधून विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात शिक्षकांची पदे निश्चित केली जात असल्याने शिक्षक अतिरिक्त होत आहेत. आर.टी.ई.नुसार संच मान्यता करताना अतिरिक्त शिक्षकांचे अन्य शाळेत समायोजन करण्यात येते. मात्र अनेक शाळांमध्ये शिक्षकांची पदे पूर्वीच्या पदांपेक्षा जास्त होत आहेत. अशी निर्माण होणारी पदे शासनाकडून मंजूर केली जात नसल्याने त्या जागांवर अतिरिक्तांचे समायोजनही होत नाही व पदे भरण्यासही अनुमती मिळत नाही. म्हणून माझी विनंती आहे की, ज्या शाळांमध्ये शिक्षकांच्या पदांमध्ये वाढ होत आहे त्या पदांना अनुमती देऊन त्या जागांवर अतिरिक्तांचे समायोजन व्हावे व त्यानंतरही पदे रिक्त असल्यास नवीन नियुक्त्या करण्यास परवानगी देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान टाळावे, अशी माझी औचित्याच्या मुद्याच्या माध्यमातून शासनाला विनंती आहे.

--------

..6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दमणगंगा पिंजाळ नदीजोड प्रकल्पातील 20 टीएमसी पाणी मुंबईला देऊन उर्वरित 63 टीएमसी पाणी गुजरातला दिले जाणार असल्याची धक्कादायक माहिती दिनांक 7 जानेवारी, 2015 रोजी उघडकीस येणे, तसेच नारपार खोऱ्यातील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील 32 टीएमसी पाणी गुजरातमधील कच्छ सौराष्ट्रामध्ये नेण्याचे गुजरात सरकार व केंद्र सरकारचे नियोजन असणे, महाराष्ट्र-गुजरात सीमेवरील महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पाणी गुजरातमध्ये नेण्यासाठी केंद्र सरकारकडून व गुजरात सरकारकडून प्रयत्न होत असल्याने विविध राजकीय संघटना व सामाजिक संस्थांकडून दिनांक 12 जानेवारी, 2015 रोजी वा त्या सुमारास नाशिक येथे विविध आंदोलने केली जाणे, दमणगंगा खोऱ्यातील उपलब्ध 83 टीएमसी पाण्यापैकी 15 टक्के पाणी स्थानिक जनतेला राखीव ठेवून उर्वरित पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रस्ताव जलसंपदा विभागाने केंद्र सरकारला सादर करावा अशी नाशिक जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींची मागणी असणे, नार खोऱ्यातील उपलब्ध 50 टीएमसी पाण्यापैकी 15 टक्के पाणी स्थानिक जनतेला राखीव ठेवून उर्वरित पाणी गिरणा (तापी) खोऱ्यात वळविण्याची सुद्धा लोकप्रतिनिीची मागणी असणे, दमणगंगा व नार प्रकल्पाचे राज्याच्या हद्दीतील पाणी गुजरात राज्याकडे वळवियाबाबत गुजरातचे नियोजनबद्धरित्या प्रयत्न असणे, मात्र राज्य शासनाकडून महाराष्ट्राच्या हक्काच्या पाण्याकडे होत असलेले दुर्लक्ष, उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील अतिरिक्त पाणी प्रवाही पद्धतीने मुकणे धरणातून नाशिक व मराठवाड्याला देणे शक्य असूनही शासनामार्फत कार्यवाही केली न जाणे, महाराष्ट्राच्या पाणलोट क्षेत्रातील पश्चिमवाहीनी नद्यांचे गुजरातकडे व अरबी समुद्रात वाहून जाणारे पाणी महाराष्ट्राच्या प्रकल्पांमध्ये वळविण्यासाठी शासनाकडून प्रयत्न होत नसल्याने राज्यातील शेतकरी व नागरिकांमध्ये पसरलेले चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

-------

यानंतर श्री.भोगले........

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, बदलत्या जीवनशैलीमुळे होणाऱ्या संसर्गजन्य आजाराचे प्रमाण वाढणे, रक्तशर्करा, उच्च रक्तदाब, अति लठ्ठपणा यामुळे किडनीचे आजार वाढणे, त्याबरोबरच पेन किलर किंवा काही अँटिबायोटिक्स औषधांचा किडनीवर विपरीत परिणाम होऊन किडनी खराब होणे, त्याची वेगळी लक्षणे दिसत नसल्यामुळे किडनी खराब झाल्याचे चटकन कळत नसल्याने परिस्थिती हाताबाहेर गेल्यानंतर थेट डायलिसीस किंवा प्रत्यारोपणाचा पर्याय उरणे, परंतु किडनीच्या आजारावरील उपचारासाठी डायलिसीसचा खर्च गरीब रुग्णांना परवडत नसणे, राजीव गांधी जीवनदायी योजनेमुळे या सुविधांचा दिलासा फक्त दारिद्रय रेषेखालील रुग्णांना मिळणे, डायलिसीस यंत्र प्रणालीतील महत्वाच्या डायलायझरचे नाव बदलून फिल्टर करण्यात आल्यामुळे त्यावरील सीमा शुल्कात 5 ते 23 टक्के वाढ होऊन डायलिसीस प्रक्रिया महाग होत असल्याने तसेच इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्र राज्यात वॅट कर अधिक असणे, यामुळे डायलिसीसच्या मशिनला लागू केलेला दर कमी करुन मशिनच्या किंमती आटोक्यात आणण्याची आवश्यकता, स्वस्तात उपचार देऊन रुग्णांना दिलासा देण्याची नितांत गरज म्हणून किडनी दिनाचे औचित्य साधून शासनाने या मशिनच्या किंमती आटोक्यात ठेवण्यासाठी उपाययोजना करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

...2...

श्री.आनंद ठाकूर : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, स्वच्छ भारत मिशन अंतर्गत ग्रामीण भागात शौचालये बांधण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतल्यानंतर पालघर जिल्हयातील वाडा तालुक्यात प्रत्येक घरी शौचालय बांधण्याचा कार्यक्रम पहिल्याच महिन्यात 100 टक्के पूर्ण करुन हागणदारीमुक्त होण्याचा पहिला मान वाडा तालुक्याने पटकाविणे, मात्र पूर्ण झालेल्या सुमारे 2300 शौचालयांचे अनुदान दोन ते चार महिन्यांपासून लाभार्थ्यांना न मिळाल्याने त्यांच्यात पसरलेली नाराजी, शौचालयासाठी शासनाकडून मिळणारे अनुदान लवकर मिळण्यासाठी लाभार्थ्यांकडून होत असलेली मागणी, सदर अनुदान लाभार्थ्यांना शासनाने तत्काळ अदा करण्याची गरज, तद्नुषंगाने शासनाने केलेली वा करण्यात येत असलेली कार्यवाही, सदर विषय मी औचित्याच्या मुद्याद्वारे उपस्थित करीत आहे.

-----------

...3...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

ॲड.निरंजन डावखरे : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, ठाणे महानगरपालिकेने कल्याणकारी योजनेंतर्गत अपंगांकरिता 13 विविध प्रकारच्या योजनांसाठी सन 2014-15 या वर्षासाठी रु.8.50 कोटी इतक्या रकमेची तरतूद करण्यात येणे, परंतु आर्थिक वर्ष संपत आले तरी त्यापैकी काहीही रक्कम खर्च झाली नसल्याचे दिनांक 1 मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, इतकेच नव्हे तर मागील 5 वर्षात अपंगांच्या कल्याणासाठी एकूण 18.50 कोटी रुपयांची तरतूद करुन त्यापैकी फक्त रुपये 1.02 कोटी इतकीच रक्कम खर्च करण्यात आली असल्याचे त्याच सुमारास निदर्शनास आले आहे. आश्चर्यकारक बाब म्हणजे शहरातील अपंगांसाठी ठाणे महानगरपालिकेने अद्याप सर्वेक्षण देखील केले नसल्याचेही माहे फेब्रुवारी, 2015 मध्ये आढळून आले आहे. अपंगांच्या कल्याणासाठी शासन करोडो रुपये खर्च करीत असून महापालिका मात्र अपंगांच्या कल्याणासाठी उदासिन असल्याचे दिसून येते, ही अत्यंत गंभीर बाब आहे. त्या संदर्भात बृहन्महाराष्ट्र अपंग विकास कामगार संघटनेने ठाणे महापालिकेकडे वारंवार तक्रार करुनही त्यावर कोणतीही कार्यवाही न होणे, परिणामी शासनाने याबाबत चौकशी करुन अपंगांच्या कल्याणासाठीचा निधी खर्च न करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्याविरुध्द कडक कारवाई करुन हा निधी यापुढे यथोचितरित्या कसा खर्च होईल याबाबत नियोजन करावे व अपंगांना न्याय द्यावा अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनाकडे करीत आहे.

-------

...4..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, दिनांक 5 मार्च, 2015 रोजी व्हॉटस्ॲपच्या माध्यमातून सेलिब्रिटी महिला यांना बेइज्जत करणारा घाणेरडा मॅसेज पाठविल्याची घटना उमरखेड येथील मूळवा गावाजवळ घडली असणे, सदर प्रकार एका शिवधर्म प्रसार माध्यमाच्या कार्यकर्त्याकडून केला जाणे, त्यामुळे शांतता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झालेला असणे, त्यामुळे धार्मिक भावना दुखावण्याचा झालेला प्रकार, त्यामुळे सदर घटनेवर कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, याकरिता मी औचित्याच्या मुद्याद्वारे सदर विषय उपस्थित करीत आहे.

-----

...5..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, मुंबई शहरातील खेळाच्या मैदानाची अवस्था फारच बिकट होत असणे, या मागील अनेक कारणे असणे, मुंबईतील सर्वात सुप्रसिध्द असलेले शिवाजी पार्क मैदान तळीरामांमुळे वादग्रस्त होत असणे, आजही या मैदानाकडे रात्री फेरी मारली असता सत्य परिस्थिती समोर येणे, हे मैदान मद्यपान करण्यासाठी हॉट स्पॉट तयार होणे, अनेक घोळक्याने मैदानात मद्यपान करण्यासाठी बसणे, मद्यपान करणाऱ्यांचा ग्रूप खाली केलेल्या बाटल्या न उचलणे व कचरा इतरत्र टाकणे, यामुळे सदर मैदान मद्यपीचे मैदान भासत असणे, तसेच यात भर म्हणजे प्रेमी युगुलांचे अश्लील चाळे येथे खुल्या मैदानात होणे, एकीकडे खेळाकडे लक्ष केंद्रीत करणारे खेळाडू तर दुसरीकडे मद्यपींची टोळी हे दृश्य चक्रावणारे असणे, त्यामुळे मद्यपी मंडळींनी मैदानाचा संपूर्ण नक्षाच बदलणे, याबाबत या मैदानाचा वापर खेळाशिवाय अन्य बाबीसाठी करण्यात येऊ नये म्हणून उपाययोजना करावी अशी मागणी मी या औचित्याच्या मुद्याद्वारे शासनास करीत आहे.

-------------

...6...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.हरिसिंग राठोड : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे.

सभापती महोदय, राज्यात शासकीय सेवेत नोक-यांसाठी अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, भटक्या जमाती, विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग व इतर मागास वर्ग (ओबीसी) यांना 52 टक्के सामाजिक आरक्षण ठेवणे, परंतु 48 टक्के खुल्या प्रवर्गातही गुणवत्तेच्या आधारावर मागासवर्गीयांनाही निवड करण्याची संधी दिली. मात्र 13 ऑगस्ट, 2014 ला सामान्य प्रशासन विभागाने एक आदेश काढून मागासवर्गीय उमेदवारांना गुणवत्तेवरही खुल्या प्रवर्गातून शासकीय सेवेत प्रवेश मिळण्यावर बंदी घातली. तसेच गुणवत्ता असली तरी सुध्दा मागास आहात, तर मागास म्हणूनच शासकीय नोकरीत या, असे अप्रत्यक्षपणे सुनावणारा सामाजिक न्यायतत्वाचे उल्लंघन करणारा निर्णय घेतला. हा निर्णय घेण्याआधी राज्याचे तत्कालीन ॲडव्होकेट जनरल दरायस खंबाटा यांनी 3 मे, 2013 रोजी घटनेतील तरतुदींचा व अनिलकुमार गुप्ता, राजेशकुमार दारिया आणि रविंदर कुमार या काही प्रमाणातील सर्वोच्च न्यायालयाच्या निकालाचे दाखले देऊन खुल्या प्रवर्गातून गुणवत्तेवर आधारित मागासवर्गीयांची निवड करण्यावर बंदी घालता येणार नाही असा अभिप्राय त्यांनी शासनास देऊनही त्यास केराची टोपली दाखविण्यात आली. आता नव्या सरकारनेही तोच निर्णय कायम ठेवला असल्यामुळे मागासवर्गीयांमध्ये पसरलेले तीव्र असंतोषाचे वातावरण, सबब, 12 जानेवारी 2015 रोजी नव्या सरकारचे ॲडव्होकेट जनरल सुनील मनोहर यांनीही स्पष्ट शब्दात खुल्या प्रवर्गातून नोकरी मिळवण्यास मागासवर्गीयांना बंदी घालता येणार नसल्याचा अभिप्राय शासनास दिला असल्याने हा जीआर तातडीने रद्द झाला पाहिजे. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याकरिता मी औचित्याचा मुद्दा उपस्थित करीत आहे.

--------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

## विशेष उल्लेखाच्या सूचना

**पृ.शी./मु. शी.** : मुंबई महानगरपालिकेच्या विकास आराखड्यात सुधारणा करण्यासाठी जनतेच्या हरकती मागविण्यासाठी 60 दिवसांचा कालावधी देणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश् बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडतो.

मुंबई शहर हे एक स्पर्धात्मक, सर्वसमावेशक व शाश्वत शहर म्हणून विकसित व्हावे यासाठी कटिबद्ध असणाऱ्या मुंबई महानगरपालिकेमध्ये पुढील वीस वर्षासाठी शहराच्या विकासाची दिशा ठरविणारा बहुप्रतिक्षित विकास आराखडा सादर करणे, या विकास आराखड्यामध्ये भूवापर नियोजन करताना आर्थिक-सामाजिक नियोजनाची जोड देण्याची आवश्यकता असताना दुर्दैवाने तसे न झाल्याचे स्पष्ट होणे, मुंबई महानगरपालिकेने या विकास आराखड्यात सुधारणा करण्यासाठी जनतेच्या याबाबत काही हरकती असतील तर त्या मांडण्यासाठी 60 दिवसाचा कालावधी देणे, परंतु, या अल्पकाळात विकास आराखड्याच्या प्रचाराच्या माध्यमातून जनजागृती करून हरकती तसेच आपल्या सूचना मांडण्यास कमीत कमी सहा महिन्याचा कालावधी देण्यात यावा अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : मुंबईतील मरीन ड्राईव्ह येथे सुशोभीकरणा अंतर्गत एलईडी दिवे बसविल्यामुळे या भागाचा राणीचा कंठहार (क्वीन्स नेकलेस) अशी असलेली ओळख संपुष्टात येणे याबाबत श्री.प्रकाश बिनसाळे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.प्रकाश बिनसाळे (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

मुंबईमध्ये आंतरराष्ट्रीय ख्याती असलेल्या तसेच पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या मरीन ड्राईव्हची राणीचा कंठहार (क्वीन्स नेकलेस) अशी ओळख आहे. या संपूर्ण विभागाला हेरिटेजचा दर्जा असणे, परंतु, तेथे सोडियम व्हेपरच्या जागी पांढऱ्या रंगाचे एलईडी दिवे बसविण्यात येणार असल्यामुळे राणीचा कंठहार (क्वीन्स नेकलेस) अशी असलेली ओळख नष्ट होण्याची शक्यता आहे. याबाबत जनसामान्यांतून प्रखर विरोध होणे, सदर बदलामुळे हेरिटेजला लागलेला धक्का याचा विचार शासनाने करणे आवश्यक आहे. मरीन ड्राईव्हला राणीचा कंठहार (क्वीन्स नेकलेस) म्हणून प्राप्त असलेले गतवैभव प्राप्त व्हावे म्हणून या विशेष उल्लेखाद्वारे मी शासनाचे लक्ष वेधत आहे.

सभापती महोदय, मी आजच सकाळी पाहिले की, त्या भागाचे पुन्हा सुशोभीकरण करण्यात येत आहे. दोनच वर्षापूर्वी या भागाचे सुशोभीकरण एमएमआरडीएच्या माध्यमातून केले होते. येथील सुशोभीकरण करत असताना विद्युत खांबांवर फ्लॉवर पॉडस् बसविण्यात आले आहेत. ते विद्युत खांबच्या स्वीचवरच बसविण्यात आले आहेत. यात आपण वरून पाणी टाकले तर ते इलेक्ट्रीक कनेक्शनमध्ये जाण्याची भीती आहे. हा उपक्रम चांगला आहे. पण त्यातून दुर्घटना होऊ नये याची दखलही शासनाने घेणे अत्यंत आवश्यक आहे.

---------

..3

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग (जि.रायगड) मार्फत रिलायन्स कंपनीच्या फायद्याकरिता बेणसे ते कोलेटी (ता.पेण) असा पूल प्रस्तावित करणे याबाबत श्री.जयंत प्र.पाटील वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जयंत प्र.पाटील (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सार्वजनिक बांधकाम विभाग अलिबाग (जि.रायगड) मार्फत सी.एच.15/550 गांधे ते गांधेफाटा-आमटेम असा पूल प्रस्तावित करणे, सदर पुलाचे बांधकाम झाल्यास तो जनतेच्या व पेण तालुक्यातील 5 ग्रामयपंचायतीच्या हिताचा नसणे, तसेच पेण तालुक्याच्या ठिकाणी जाण्यासाठी जवळचा मार्ग नसणे, सदर पुलाचे बांधकाम यापूर्वी केलेल्या अलाईनमेंटनुसार बांधणे, गांधे सी.एच.15/550 ते गांधेफाटा-आमटेम असे बांधकाम केल्यास कमी खर्चात पुलाचे बांधकाम होऊन जनतेला हा मार्ग सुखकर व सोयीचा होईल याकडे लक्ष वेधण्यासाठी मी हा विशेष उल्लेख करीत आहे.

---------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : शहरातील पुरातन जलाशय, तलाव आणि विहिरींचे संरक्षण आणि संवर्धन करणे याबाबत श्री.जगन्नाथ शिंदे, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.जगन्नाथ शिंदे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

आजमितीस राज्यात पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य सर्वच ठिकाणी वाढत असताना राज्याच्या शहरी भागातील पाण्याची गुणवत्ता ही मोठी समस्या निर्माण झालेली असून, शहरातील घनकचरा व्यवस्थापन हे पाण्याच्या गुणवत्तेशी निगडित असून, शहरी भागातील कचऱ्याचे योग्य नियोजन न झाल्यास पावसाचे पाणी दूषित होऊन जमिनीत मुरते. त्यामुळे पाण्याची पातळी खालावत असल्याचे मत अनेक भूजल तज्ज्ञांनी व्यक्त केले असून अशा दूषित झालेल्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी रेन वॉटर हार्वेस्टींग हा उत्तम पर्याय असून शहरातील जुने जलाशय, तलाव आणि विहिरींचा वापर होण्याची गरज असताना, आजमितीस शहरातील जुन्या विहिरींचा वापर सर्रासपणे कचराकुंडीसाठी होताना दिसत असून हेच खऱ्या अर्थाने जमिनीतील पाणी दूषित होण्याचे महत्त्वाचे कारण असल्याने प्रत्येक शहरातील पुरातून जलाशय, तलाव आणि विहिरींचे संरक्षण आणि संवर्धन करण्याबाबत शासनाने विनाविलंब स्थानिक प्राधिकरणांना सूचित करण्यात यावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास करीत आहे.

---------

..5

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : चंद्रपूर जिल्ह्यात घरगुती वीज ग्राहकांची होत असलेली लूट याबाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती शोभा फडणवीस (विधान सभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ मांडते.

चंद्रपूर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात घरगुती वीज ग्राहकांना मीटर सुरू असताना सुद्धा रिडींग प्रमाणे बिल न देता अवाढव्य बिल पाठवून घरगुती ग्राहकांची वीज वितरण कंपनीकडून होत असलेली लूट, त्यातच मागील रिडींग चालू महिन्यात दाखविण्यात येऊनही पुढील महिन्यात मागील व चालू रिडींग दाखविणे, असे असताना मागील रिडींग तेच तर चालू रिडींग INACCS असे दाखवून मागील रिडींग पासून युनिट दाखवून मोठ्या प्रमाणात घरगुती ग्राहकांची लूट सुरु असणे, त्याबाबत संबंधित वीज कंपनीच्या अधिकाऱ्यांकडे ग्राहकांनी रितसर अर्ज करूनही त्याच्या बिलात कोणतीही दुरूस्ती न करता पहिले बिल भरा नंतर काय करायचे ते पाहू अशी समज देण्यात येणे, जिल्ह्यात 50 टक्के पेक्षा घरगुती ग्राहकाकडून फॉल्टी INACCS मीटर सुरु असताना सुद्धा विशेषतः मीटर फोटो रिडींग मध्ये रिडींग दाखविताना सुद्धा INACCS असे दाखवून चाललेली मोठी लूट त्यामुळे ग्राहकांमध्ये पसलेला असंतोष, शासनाने यावर करावयाची कारवाई.

---------

...6

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री.प्रकाश बिनसाळे)**

**पृ.शी./मु. शी.** : किडनी आजार होऊ नये म्हणून जनजागृती मोहीम राबविणे याबाबत श्री.हेमंत टकले, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.हेमंत टकले (विधान सभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

सभापती महोदय, नुकताच जागतिक किडनी दिवस साजरा करण्यात आला. दिवसेंदिवस किडनीच्या आजाराचे प्रमाण वाढत चालल्याचे आपण पहात आहोत. दरवर्षी साधारणपणे 15 ते 20 टक्के इतक्या रूग्णांची नव्याने भरती होत आहे. यासाठी आवश्यक असणाऱ्या डायलिसिसची व्यवस्था राज्यभरात मोठ्या प्रमाणावर माफक दरात उपलब्ध करून देण्याची गरज आहे. किडनी प्रत्यारोपण संबंधी आवश्यक तेवढा प्रतिसाद मिळत नसून योग्य त्या परवानग्या मिळविणे अतिशय खडतर आहे. या सर्व प्रक्रियेबाबत आढावा घेऊन यंत्रणा अधिक सक्षम करण्याची नितांत आवश्यकता आहे. त्याच बरोबरीने हा आजार होऊ नये म्हणून सर्वसामान्य माणसांनी काय करावे या विषयी मोठ्या प्रमाणात जनजागृती मोहीम हाती घ्यावी व त्यायोगे योग्य आहार व जीवन पद्धती त्याचप्रमाणे नियमित तपासण्या करण्यासाठी प्रोत्साहन कार्यक्रम शासनाने हाती घ्यावा अशी विनंती मी या विशेष उल्लेखाद्वारे करीत आहे.

---------

..7

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** :सेंट जॉर्जेस रूग्णालयाचे कॅन्सर रूग्णालयात रूपांतर करणे याबाबत श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्रीमती विद्या चव्हाण (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडते.

परळच्या टाटा कॅन्स हॉस्पिटलवर कॅन्सर पेशंटचा वाढता ताण असणे, त्यामुळे कामा हॉस्पिटल मुंबई येथे महिलांसाठी लिनियर एक्सलरेटर रेडिएशन उपाचार पद्धती सुरू करण्यात आलेली असणे, त्यामुळे राज्य सरकारने पुरूषांनाही फायदा करून देण्यासाठी योजना केलेली असणे, परंतु, रेडियो थेरपी तज्ज्ञांची कमतरता असल्याने पुरूषांना उपचार न मिळणे, याबाबत राज्य शासनाने लवकरात लवकर रेडियो थेरपी तज्ज्ञांची नियुक्त करून कामा रूग्णालयात स्त्रिया व पुरूषांना देखील त्याचा फायदा मिळण्यासाठी प्रयत्न करावा तसेच टाटा कॅन्सर रूग्णालयाप्रमाणे सेंट जॉर्जेस रूग्णालयाचे कॅन्सर रूग्णालयात रूपांतर करावे अशी शिफारस मी या विशेष उल्लेखासद्वारे करीत आहे.

---------

...8

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु. शी.** : राज्यात तालुका व जिल्हा स्तरावर क्रीडा संकुल निर्माण करण्याची घोषणा होऊनही प्रत्यक्षात कार्यवाही न होणे याबाबत श्री.रामनाथ मोते, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग-शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ाची सूच□ा मांडतो.

राज्य शासनाने क्रीडा धोरण जाहीर केले असून जिल्हा व तालुका स्तरावरील विद्यार्थ्यांना प्रेरणा व प्रोत्साहन देण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे क्रीडा विषयक उपक्रम व प्रशिक्षणाची सोय उपलब्ध करून देण्याबाबत सूचना केल्या आहेत. शालेय स्तरावरील क्रीडा स्पर्धेच्या माध्यमातून क्रीडा गुण विकसित करण्यासाठी क्रीडा संकुलांची नितांत आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी तालुका व जिल्हा स्तरावर क्रीडा संकुले निर्माण करण्याची घोषणा होऊनही प्रत्यक्ष कार्यवाही होत नाही. पालघर हा आदिवासी जिल्हा असून या जिल्ह्यासाठी तातडीने क्रीडा संकुल निर्माण होण्याबाबत शासनाने कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. विक्रमगड तालुक्यात क्रीडा संकुल निर्माण होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करूनही व जागा दाखवूनही क्रीडा संकुलासाठी जागा उपलब्ध करून देण्याबात स्थानिक प्रशासनाने अद्यापही कोणतेही सहकार्य व कार्यवाही केलेली नाही. कल्याण येथे कोट्यवधी रूपये खर्च होऊनही या क्रीडा संकुलाचा कोणताही उपयोग क्रीडा प्रशिक्षणासाठी विद्यार्थ्यांना होत नाही. याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही.

---------

यानंतर श्री.अजित...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी./मु.शी.** : सन 1954 सालचा अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा संपुष्टात येऊन त्याऐवजी अन्न व सुरक्षा मानके कायदा, 2006 अंमलात आला असला तरी त्याची अंमलबजावणी करणाऱ्या अन्न निरीक्षकाची सेवा अधांतरीच असणे याबाबत डॉ.निरंजन डावखरे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना

ॲड.निरंजन डावखरे ( कोकण विभाग पदवीधर ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

" 1954 सालचा अन्न भेसळ प्रतिबंधक कायदा संपुष्टात येऊन त्याऐवजी अन्न व सुरक्षा मानके कायदा 2006, हा दिनांक 4 ऑगस्ट, 2011 पासून अंमलात आला असला तरी त्याची अंमलबजावणी करणाऱ्या अन्न निरीक्षकाची सेवा अद्याप अधांतरीच असणे, परिणामी राज्यातील महानगरपालिका व नगरपालिकांच्या 59 अन्न निरीक्षकांपैकी 33 जणांनी शासन सेवेत समाविष्ट करण्यास संमती दर्शविणे, तसेच संबंधित महानगरपालिका व नगरपालिकांनादेखील त्यास मान्यता देणे, परंतु 26 अन्न निरीक्षकांना मात्र शासन सेवेत समाविष्ट करून घेण्यास तत्वतः मान्यता देत शासनाने सन 2012 अखेर तसा आदेशही निर्गमित करणे, मात्र 2006 मध्ये कायदा अंमलात आल्यापासून त्या 33 अन्न निरीक्षकांबाबत अद्याप अंतिम निर्णय शासनाने न घेतल्याने सदरहू अन्न निरीक्षक हे शासनाची सेवा करत असताना त्यांचे वेतन, भत्ते इत्यादींचा खर्च मात्र संबंधित पालिकेस करावा लागत असणे व त्यास महानगरपालिका व नगरपालिकांनी असमर्थता दर्शविणे, तरी उर्वरित 33 अन्न निरीक्षकांना शासन सेवेत समाविष्ट करण्याबाबत शासनाने निर्णय घ्यावा," अशी मागणी मी या विशेष उल्लेखाच्या माध्यमातून शासनास करीत आहे.

--------



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती (श्री.प्रकाश बिनसाळे)** : आता नियम 260 अन्वयेच्या प्रस्तावावरील चर्चेस सुरुवात होईल. माझी माननीय विरोधी पक्ष नेत्यांना विनंती आहे की, त्यांनी प्रस्ताव मांडावा.

श्री.सुनील तटकरे : सभापती महोदय, माझी सभागृहाला विनंती आहे आणि सभागृहाची संमती असेल तर, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी नियम 260 अन्वयेचा प्रस्ताव मांडावा व त्यावर पाच-दहा मिनिटे बोलून त्यांना ऑन लेग ठेवून हा प्रस्ताव सोमवार, दिनांक 16 मार्च, 2015 रोजी विशेष बैठकीत घेता येईल किंवा कसे हे पहावे.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, आज विरोधी पक्षाचा नियम 260 अन्वये "कायदा आणि सुव्यवस्थे" वरील प्रस्ताव चर्चेसाठी आहे. राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झालेला आहे. कॉम्रेड गोविंद पानसरे यांची हत्या झालेली हत्या आणि पोलिसांना त्यांच्या मारेकऱ्यांना पकडण्यात आलेले अपयश तसेच इतर गंभीर विषयावर आम्ही सभागृहात चर्चा उपस्थित केलेली आहे. हा विषय गृह खात्याशी संबंधित आहे. गृह खाते मुख्यमंत्री महोदयांकडे आहे, ते सभागृहात उपस्थित नाहीत आणि त्या विभागाचे राज्यमंत्री देखील सभागृहात उपस्थित नाहीत.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी उपस्थित केलेल्या सर्व मुद्यांची मी नोंद घेईन. त्यांना अपेक्षित असलेली उत्तरे मिळतील, त्याची त्यांना चिंता नसावी.

**तालिका सभापती** : माननीय गृह राज्यमंत्री सभागृहात आलेले आहे. माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी भाषणास सुरुवात करावी.

...3..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**पृ.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती

**मु.शी.:** राज्यात निर्माण झालेली कायदा व सुव्यवस्थेची परिस्थिती या विषयावर सर्वश्री धनंजय मुंडे, माणिकराव ठाकरे, सुनील तटकरे, जयंत प्र.पाटील, हेमंत टकले, संजय दत्त, कपिल पाटील, आनंद ठाकूर, अशोक ऊर्फ भाई जगताप, किरण पावसकर, सुभाष झांबड, रामहरी रुपनवर, जगन्नाथ शिंदे, जयवंतराव जाधव, शरद रणपिसे, श्रीमती विद्या चव्हाण, वि.प.स. यांचा प्रस्ताव.

श्री.धनंजय मुंडे (विरोधी पक्ष नेता ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

"मागील चार महिन्यात राज्यातील कायदा व सुव्यवस्थेची निर्माण झालेली भीषण परिस्थिती, पुरोगामी चळवळीतील अग्रणी नेते, श्रमिक, कष्टकरी व कामगारांचे नेते कॉ.गोविंद पानसरे व त्यांच्या पत्नीवर दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी कोल्हापूर येथे जीवघेणा हल्ला करण्यात येणे, या हल्ल्यात जखमी झाल्याने दिनांक 20 फेब्रुवारी, 2015 रोजी त्यांचे मुंबईत निधन होणे, या घटनेला जवळपास 1 महिना होऊनही आरोपींना पकडण्यात अपयश येणे, कॉ.पानसरे यांचेवरील हा हल्ला मागील वर्षीच्या कै.नरेंद्र दाभोळकर यांच्यावरील हल्ल्या सारखाच असणे, विशिष्ट विचारसरणीने त्यांच्यावर हल्ला केला असण्याचा संशय, पुरोगामी विचारसरणीच्या कार्यकर्त्यांना येत असलेल्या धमक्या, पुणे जिल्ह्यातील लोणावळा येथील कुमार रिसॉर्टमध्ये सात वर्षीय बालिकेवर दिनांक 18 फेब्रुवारी, 2015 वा त्यासुमारास बलात्कार करुन तिची करण्यात आलेली निर्घृण हत्या, यात आरोपींचा शोध न लावता घटनेचा निषेध करणाऱ्या नागरिकांवरच दाखल झालेले खुनाचे गुन्हे, बर्दापूर, गेवराई (जि.बीड) येथे महिलेवर झालेल्या अत्याचाराच्या घटना, डोंबिवली (जि.ठाणे) येथे एका महिला पोलीस शिपायावरच बलात्कार करुन वर्षभर ब्लॅकमेलींग करण्यात आल्याची घटना, महिला पोलीस कर्मचाऱ्यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांविरुध्द



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे...

लैंगिक शोषणाच्या तक्रारी करणे, त्यामुळे महिला वर्गात निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, राज्यात खंडणी व हत्यांचे वाढलेले प्रमाण, दिनांक 10 मार्च, 2015 रोजी वा त्या सुमारास नागपूरच्या व्यापाऱ्याची खंडणी न दिल्यामुळे झालेली हत्या, नगर जिल्ह्यातील दीपक कोलते या पोलिसाची तपासासाठी गेल्यावर झालेली हत्या, यातील आरोपींना मिळत असलेले राजकीय पाठबळ, ठाणे येथून भिवंडीकडे रिक्षाने जाणाऱ्या दोन मुलींचा रिक्षा चालकाने केलेला विनयभंगाचा प्रयत्न, त्यातून त्यांनी स्वतःचा जीव वाचविण्यासाठी धावत्या रिक्षातून उडी मारणे, मुंबई, ठाणे, नागपूर परिसरात महिलांची मंगळसूत्रे व सोनसाखळ्या चोरीच्या वाढलेल्या घटना, मुंबई, ठाणे इतर महानगरात मेफेड्रॉन म्हणजे एम.डी.या नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या जीवघेण्या पावडरची खुलेआम विक्री होणे, या नशेमुळे आतापर्यंत 10 व्यक्तींचा बळी जाणे, तरुण पिढी व विद्यार्थी वर्गात याच्या सेवनाचे प्रमाण वाढणे, मुंबईच्या मरीन ड्राईव्ह पोलीस स्टेशनाच्या लॉकरमध्येच 12 किलो एम.डी. पावडर सापडणे, लाचलुचपत प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडून ब्लॅकमेलींग करण्याचे वाढलेले प्रकार, मुंबई शहरातील हॉटेल रेस्टॉरंट, बार, पब्स 24 तास सुरू ठेवण्याची बाब शासनाच्या विचाराधीन असल्याने याबाबत निर्णय झाल्यास मुंबईत निर्माण होणारा कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न, राज्यात वाळीत टाकण्याच्या प्रयत्नात झालेली वाढ, त्यामधील आरोपींना अद्यापही पकडण्यात आलेले नसणे, वाळूमाफिया राजरोसपणे पोलीस व प्रशासनातील अधिकाऱ्यांवर करीत असलेले हल्ले, नक्षलग्रस्त भागात वाढलेल्या कारवाया, गृह राज्यमंत्र्यांनीच माजलगांव (जि.बीड) येथे राजरोस भ्रष्टाचाराच्या प्रकरणाचे समर्थन करणे, राज्यात कायदा व सुव्यवस्था राखण्यास शासन पूर्णपणे अपयशी ठरणे, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेले भीतीचे व असंतोषाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी."

सभापती महोदय, या राज्यात प्रदीर्घ कालावधीनंतर मुख्यमंत्री महोदयांनी गृह विभाग स्वतःकडे ठेवलेला आहे. मागील 15 वर्षाच्या काळात विद्यमान मुख्यमंत्री विधानसभेने सदस्य असताना ते कायदा आणि सुव्यवस्थेवर भाषण करताना सरकारवर आरोप करीत होते, आज तेच मुख्यमंत्री आहेत आणि त्यांच्याकडे गृह विभागाचा कार्यभार आहे. अलीकडच्या काळामध्ये

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

13-03-2015 ( असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही ) LL-5

AJIT/ पूर्वी श्री.भारवि.. 16:40

श्री.धनंजय मुंडे....

गृह विभागासाठी स्वतंत्र मंत्री हा फॉर्म्युला होता. देशातील ज्या ज्या राज्यांमध्ये भाजपाचे सरकार आहे तेथे गृह विभागाचा कार्यभार मुख्यमंत्र्यांनाकडे आहे म्हणून महाराष्ट्रात देखील मुख्यमंत्र्याकडे गृह विभाग ठेवलेला आहे. कोणाकडे कोणते खाते असावे आणि माननीय मुख्यमंत्र्यांनी स्वतःकडे गृह विभाग ठेवावा किंवा कसे याचे या चर्चेशी काही देणेघेणे नाही.

सभापती महोदय, गृह खात्यासाठी स्वतंत्र मंत्री असावा का ? याबाबत वेगवेगळे मतांतर आहे. माझे आणि माझ्या पक्षाचे मत विचारले तर ते नक्कीच वेगळे आहे. माननीय मुख्यमंत्री राज्याकडे जितके लक्ष देतात तितके लक्ष त्यांनी गृह विभागाकडे देणे गरजेचे आहे. राज्यात मागील चार महिन्यांतील कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती बिघडलेली आहे. या ठिकाणी गृह राज्यमंत्री (ग्रामीण) उपस्थित आहेत. माननीय मुख्यमंत्री गृह विभागाला खरेच न्याय देतात का असा मला प्रश्न पडला आहे.

यानंतर श्री.बोर्डे...

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

सभापती महोदय, महाराष्ट्राची शाहू, फुले, आंबेडकरांचा पुरोगामी महाराष्ट्र अशी ओळख आहे. अनेक वर्षे पुरोगामी चळवळीत श्रमिक, कष्टकरी, कामगारांचे नेते असलेले 82 वर्षीय वृध्द विचारवंत कॉ.गोविंदराव पानसरे आणि त्यांच्या पत्नी कोल्हापूरमध्ये सकाळी फिरायला गेल्यानंतर त्यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यात कॉ.गोविंदराव पानसरे यांचे निधन झाले. हा हल्ला होऊन 25-26 दिवसांचा काळ लोटला आहे. परंतु अजूनपर्यंत यातील एकाही आरोपीला पकडण्यात पोलिसांना यश आलेले नाही. मी जबाबदारीपूर्वक सांगतो की, कॉ.गोविंदराव पानसरेंवरील हल्ला आणि डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्यावरील हल्ला, यामध्ये साम्य आहे. त्यांची हत्या होण्याच्या तीन-चार दिवसांपूर्वी कोल्हापूर विद्यापीठात कॉ.गोविंदराव पानसरे यांचे "शिवाजी कोण" यावर व्याख्यान होते. ते व्याख्यान देत असताना त्यांच्या व्याख्यानामध्ये काही विद्यार्थ्यांनी अडथळा निर्माण केला. या निमित्ताने मी विचारु इच्छितो की, ते विद्यार्थी कोणत्या संघटनेचे होते, त्या विद्यार्थ्यांचा या हत्येशी संबंध आहे काय ? महोदय, 82 वर्षाच्या एका विचारवंतांने असे काय केले की, कोण्यातरी अविचारी तरुणांना, कॉ.पानसरेंना गोळ्या घालून ठार मारावेसे वाटले. शरमेने मान खाली घालायला लावणारी ही घटना याच महाराष्ट्रात घडली. या हल्ल्यातच त्यांचे निधन झाले. महोदय, ज्या दिवशी कॉ.गोविंदराव पानसरेंचे निधन झाले त्या दिवशी राज्याचे गृह मंत्री तथा माननीय मुख्यमंत्री हे नाशिकला पोलीस कार्यालयाच्या उद्‌घाटनासाठी गेले होते. आतषबाजी करीत त्यांनी तो कार्यक्रम पार पाडला. कदाचित ते त्यांना पटलेही असेल. परंतु कोल्हापूरला जाण्याइतपत संवेदना सुध्दा त्यांच्या मनात राहिली नाही. ही घटना महाराष्ट्राचे सबंध पुरोगामी विचार संपविणारी आहे. आज राज्यातील अशा अनेक विचारवंतांना धमक्या येत आहेत. परंतु त्या बाबत कोणतीच दखल घेतली जात नाही.

सभापती महोदय, आपल्या सर्वांना माहीत आहे की, लोणावळा हे पर्यटन स्थळ आहे. लोणावळ्याला सुध्दा मोठमोठे लग्न-समारंभ होतात. लोणावळा येथील कुमार रिसॉर्टमध्ये जैन नावाचे कुटुंब लग्नासाठी आले होते. सायंकाळी आपली मुलगी सापडत नाही म्हणून त्यांनी....

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, सायकांळी 5.00 वाजता सभागृह संपवायचे ठरलेले आहे. या प्रस्तावावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते ऑन लेग राहतील असे ठरलेले आहे.

..2..

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

**तालिका सभापती** : सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांना हा मुद्दा मांडू द्यावा. त्यानंतर त्यांना ऑन लेग ठेवता येईल.

श्री.सुनील तटकरे : मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, कुमार रिसॉर्टबद्दलचा मुद्दा मांडून ते ऑन लेग राहणार आहेत. माननीय विरोधी पक्ष नेते कुमार रिसॉर्टचे प्रकरण मांडत असतानाच आपण त्यांना ऑन लेग राहण्यास सांगत आहात. अजून 5.00 वाजायला 7 मिनिटे बाकी आहेत.

श्री.रामनाथ मोते : महोदय, माननीय विरोधी पक्ष नेते अगोदर कॉ.गोविंदराव पानसरे यांच्या बाबतचे प्रकरण सांगत होते म्हणून मी शांत बसलो होतो. कुमार रिसॉर्टचा विषय मांडल्यामुळे मी बोलले असे म्हणणे योग्य नाही. सन्माननीय विरोधी पक्ष नेत्यांचा प्रत्येक मुद्दा महत्त्वाचा आहे. त्यामुळे अशाचप्रकारे एक-एक मुद्दा मांडला जाईल.

श्री.धनंजय मुंडे : सभापती महोदय, जैन कुटुंबाला आपली 7 वर्षाची मुलगी सापडत नाही म्हणून ते लोणावळा पोलीस स्टेशनमध्ये मुलगी हरविल्याची तक्रार करण्यासाठी गेले. माझ्या माहितीनुसार अल्पवयीन मुलगी हरपल्यानंतर त्या बाबतची फिर्याद अपहरण म्हणून नोंदवून घ्यावयास पाहिजे. ही घटना दिनांक 15 फेब्रुवारी, 2015 रोजी घडली. त्या दिवशी रात्री 10.00 वाजता मुलगी हरविल्याची फिर्याद नोंदविली गेली. परंतु दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक 16 फेब्रुवारी, 2015 रोजी तीच फिर्याद अपहरण म्हणून नोंदविली गेली. कदाचित ज्या दिवशी जैन कुटुंब आपल्या मुलीची फिर्याद नोंदविण्यासाठी गेले होते त्याच दिवशी पोलीस निरीक्षकाने अपहरणाची तक्रार नोंदवून घेतली असती तर पोलीस यंत्रणा सतर्क झाली असती आणि नाकाबंदी वगैरे दोन-चार गोष्टी करता आल्या असत्या. परंतु यातील काहीच झाले नाही. अपहरणाची तक्रार नोंदविण्यात 24 तासाचा वेळ वाया घालविला. अगोदर मुलगी हरवल्याची तक्रार दाखल झाल्यानंतर 24 तासांनी अपहरणाचा गुन्हा नोंदविण्यात आला. महोदय, तिसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक 17 फेब्रुवारी, 2015 रोजी त्या 7 वर्षाच्या मुलीचे प्रेत कुमार रिसॉर्टच्या टेरेसवर सापडले. पोस्ट मार्टेम झाल्यानंतर निदर्शनास आले की, त्या मुलीवर बलात्कार करुन तिची हत्या करण्यात आली. महेदय, एवढी दुर्दैवी घटना पुणे-मुंबईसारख्या एक्स्प्रेस-वे वरील लोणावळासारख्या पर्यटन स्थळी घडली. महोदय, या हत्येबाबत आंदोलन करण्यात आले. परंतु त्या आंदोलनकर्त्यांवर पोलिसांनी कलम 395 अन्वये गुन्हा दाखल केला. वास्तविक पाहता 7 वर्षाच्या मुलीवर बलात्कार



UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION

श्री.धनंजय मुंडे....

करुन तिची हत्या करण्यात आल्याबद्दल लोकांनी आंदोलन केले होते. लोकांचा असंतोष अनावर झाला म्हणून त्यांनी आंदोलन केले. ही मंडळी रिसॉर्टवर आंदोलन करण्यासाठी गेली होती. परंतु लूट केल्यावर लावण्यात येणारा कलम 395 अन्वयेचा गुन्हा त्या आंदोलकांवर दाखल करण्यात आला. महोदय, मी विचारु इच्छितो की, कुमार रिसॉर्ट हे माजी आमदार श्री.कुमार आयलानी यांचे आहे म्हणून त्या आंदोलनकर्त्यांवर 395 चा गुन्हा दाखल केला काय ?

महोदय, एखाद्या मुलीवर बलात्कार झाल्यानंतर, अल्पवयीन मुलीवर बलात्कार करुन तिचा खून केल्यानंतर सर्वसामान्य माणसांमध्ये असंतोष निर्माण झाला, प्रक्षोभ निर्माण झाला म्हणून या राज्यात आंदोलन करायचे नाही काय ? यापुढे जर लोकांनी अशाप्रकारे आंदोलन केले तर त्यांच्यावर कलम 395 अन्वये गुन्हा दाखल केला जाईल. मी विचारु इच्छितो की, राज्य सरकार अशाप्रकारे कायदा व सुव्यवस्था सांभाळत आहे काय ? महोदय, मी विचारु इच्छितो की, या राज्यात हे काय सुरु आहे ? या राज्यात लहान मुलींचा अशा पध्दतीने खून केला जात आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी त्यांच्या निवेदनात सांगितले की, या घटनेतील आरोपी बिहारमध्ये आहेत. या प्रकरणाचा तपास लावण्यासाठी जे पथक नेमले आहे ते 8-10 वेळा बिहारला जाऊन आले आहे, हे मी मान्य करतो. त्यांना कुमार रिसॉर्टमधील वॉचमन तेथे दिसला. पण त्याला पकडण्याची हिंमत पोलिसांनी केली नाही. माननीय मंत्र्यांनी या संदर्भात उत्तरामध्ये काहीही सांगितले तरी, मी जे सांगितले तीच वस्तुस्थिती आहे.

**तालिका सभापती** : या प्रस्तावावरील चर्चेवर सन्माननीय विरोधी पक्ष नेते हे ऑन लेग राहतील.

सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन सोमवार, दिनांक 16 मार्च, 2015 रोजी दुपारी 1.00 वाजता पुन्हा भरेल.

( सभागृहाची बैठक सायंकाळी 4 वाजून 59 मिनिटांनी, सोमवार, दिनांक 16 मार्च, 2015 रोजीच्या दुपारी 1.00 वाजेपर्यंत स्थगित झाली )

---------

UNCORRECTED COPY / NOT FOR PUBLICATION